# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १२-०७-२००४ ते १९-०८-२००४**

## रजिष्टर क्र. ०९

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक १२-०७-०४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १२ जुलै २००८ रोजी मा. सभापती श्री. नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर" स्थायी समिती सभागृह येथे दुपारी १२.१५ वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | स. सदस्य |
| २) | श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३) | श्री. इलियास किरमाणी | -//- |
| ४) | श्रीमती जयश्री किवळेकर | -//- |
| ५) | सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ६) | श्री. प्रल्हाद गणपतराव निमगांवकर | -//- |
| ७) | श्री. मोहन मेघावाले | -//- |
| ८) | श्री. मधुकर दामोधर सावंत | -//- |
| ९) | श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| १०) | सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान | -//- |
| ११) | श्री. शेख मुनाफ शे. यासिन | -//- |
| १२) | श्री. सोपान भाऊराव पारे | -//- |
| १३) | श्री. भगवान दगडूजी रगडे | -//- |
| १४) | श्री. स सलीम स. युसूफ | -//- |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१(१) व (५) अन्वये सभापती पदासाठी निवड करणे.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** पंधरा दिवसापूर्वी महाराष्ट्रातील महान थोर कलावंत स्व. प्रल्हादजी शिंदे यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. त्यांना भक्तिगीते. लोकगीते, कव्वाली या माध्यमातून संगिताची सेवा करून नावलौकिक मिळविलेला होता. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी. तसेच उस्मानपुरा प्रभागाचे स. सदस्य श्री. राजेंद्रसिंग जबिंदा यांचे वडील स्व. तारासिंग जबिंदा यांचेही दु:खद निधन झालेले आहे. त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**भगवान रगडे :** स्व. प्रल्हादजी शिंदे यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर देशात त्यांचे गायनातून गीतातून प्रबोधन केले त्यांना सभागृहाने श्रध्दांजली अर्पण करावी. यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** कृपया सर्वांनी श्रध्दांजलीसाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(यावेळी स्व. प्रल्हादजी शिंदे तसेच स्व. तारासिंग जबिंदा यांच्या दु:खद निधनाबाद्दल दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्री. संजय शिरसाठ :** आजच्या बैठकीला बरेचसे अधिकारी अनुपस्थित आहेत. कोणकोणत्या अधिकाऱ्यांनी आपली परवानगी घेतलेली आहे. याची सभागृहाला माहीती देण्यात यावी.

**मा. सभापती :** मा. आयुक्त हे मुंबईला रस्ते विकास महामंडळाचे अध्यक्षांकडे बैठक असल्यामुळे मुंबईला गेलेले आहेत. उपआयुक्त (प्र.) श्री. कांबळे हे विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक असल्यामुळे माझी परवानगी घेऊन गेलेले आहेत. इतर अधिकारी जे सभागृहात नाहीत. उपस्थित राहणे आवश्यक होते. परवानगी न घेता अनुपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी सहाय्यक आयुक्त-१ यांनी यादी तयार करून सभागृहात सादर करावी. चर्चा अगोदर करावी. यानंतर कोणत्याही अधिकाऱ्यांना सभागृहात प्रवेश देवू नये.

**सौ. शाहीन जफर :** मागील बैठकित तांत्रिक कक्ष बंद असल्याबाबत चर्चा झालेली होती. कर्मचारी / अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असे सांगण्यात आले. तांत्रिक कक्ष बंद झाला असताना काही संचिका उपअभियंता श्री. देशमुख यांचेकडे जातात. डायरेक्ट संचिका मा. आयुक्तांकडे जात नाही. प्रत्येक बैठकीत चर्चा होते. पुढील बैठकीत खुलासा असे म्हटले जाते. याबाबत काय ॲक्शन घेणार आहे. खुलासा करावा. श्री. देशमुख हे का चेक करतात. तांत्रिक कक्ष बंद केला तर कर्मचारी का बसतात.

**मा. सभापती :** तांत्रिक कक्ष बंद केलेला आहे. तांत्रिक कक्ष बद करण्याबाबत स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दिनांक २७-०५-२००८ ला आदेश काढलेले आहेत त्याप्रमाणे तांत्रिक कक्ष बंद केलेला आहे.

**सौ. शाहीन जफर :** श्री. देशमुख काय तपासणीची कामे करतात. याबद्दल माहिती घ्यावी. श्री. देशमुख यांची दोन संचिकेवर सही आहे. त्यानंतर मा. आयुक्तांनी स्वाक्षरी होते. देशमुख यांचेकडे संचिका तपासणीसाठी का जाते खुलासा व्हावा. तांत्रिक कक्ष बंद केलेला आहे. की नाही स्पष्ट खुलासा व्हावा. श्री. देशमुख यांचेकडे संचिका कशासाठी जातात तात्काळ निर्णय घ्यावा. प्रत्येक बैठकीत चर्चा होते की नाही. तांत्रिक कक्ष बंद झालेला दिसून आला नाही तर कुलूप लावण्यात येईल. याची सुध्दा नोंद घ्यावी.

**मा. सभापती :** तांत्रिक कक्ष बंद केल्याचे आदेश दिले. स. सदस्य सांगतात तांत्रिक कक्ष सुरू आहे. श्री. काझी यांची बदली केली. तांत्रिक कक्ष बंद केला आहे. श्री. देशमुख तांत्रिक कक्षाचे काम करीत असतील तर खुलासा देण्यात यावा.

**श्री. स. सलीम :** परत तांत्रिक कक्ष का चालू आहे.

**सौ. शाहीन जफर :** तांत्रिक कक्ष बंद केला. अन्सारी नावाचे कर्मचारी त्याच विभागात काम करतात. दोन संचिकेवर श्री. देशमुख यांची सही झाल्यानंतर मा. आयुक्त यांची सही आहे.

**मा. सभापती :** ६ जुलै २००८ रोजी एका आदेशान्वये मा. आयुक्त यांनी श्री. देशमुख उपअभियंता नगररचना यांनी त्यांचे नगररचना विभागातील नियमित कार्यालयीन कामे सांभाळून तांत्रिक सहाय्यक या म्हणून पुढील आदेशापर्यंत काम पाहावे असे आदेश काढलेले आहेत. तांत्रिक कक्ष प्रमुख म्हणून आदेश नाही. तांत्रिक सहाय्यक म्हणून आदेश आहेत. तांत्रिक कक्ष बंद झालेला आहे. तांत्रिक सहाय्यक म्ळणून श्री. देशमुख ह्यांची नियुक्ती केलेली आहे. तांत्रिक सहाय्यक यांचेकडे सर्व संचिका जायचे कारण काय आहे.

**सौ. शाहीन जफर, श्री. इलियास :** श्री. काझी यांनाच का सहाय्यक म्हणून ठेवले नाही त्यांची बदली का करण्यात आली. आजही तेथे कर्मचारी बसतात. पूर्ण विभाग बंद करावा असे माझे मत आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** गेल्या ३ सभांपूर्वी अग्रही भूमिका मांडून टेक्नीकल सेलबद्दल चर्चा झाली. या महानगरपालिकेत चार कार्यकारी अभियंता आहेत. वेगवेगळ्या विभागामार्फत विविध विकास कामाच्या बाबतीत कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे मत नोंदवितात व ती संचिका डायरेक्ट मा. आयुक्तांकडे गेली पाहिजे व उणिवा काढायचे असतील तर मा. आयुक्तांनी काढवी याबद्दल या स्थायी समितीच्या बैठकीत भरपूर चर्चा झालेली होती. तात्कालीन आयुक्त यांच्या अर्जीनुसार हा तांत्रिक कक्ष सुरू केला होता. महाराष्ट्रात कोणत्याही मनपात तांत्रिक कक्ष नाही. स्थायी समितीची मान्यता झाल्याशिवाय खर्च करता येत नाही. खर्चाची बाब जरी दुय्यम असली तरी एखादा उपअभियंता दर्जाचा अधिकारी कार्यकारी अभियंता यांचे सहीवर उणिवा काढतो हे कितपत योग्य होवू शकते व माझा आक्षेप होता व हा सेल चालू ठेवायचा असेल तर सभेची मान्यता होवून कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी त्या पदावर नियुक्त करावेत. असे मत व्यक्त केलेले होते. त्युनसार मा. सभापतींच्या आदेशानुसार हा तांत्रिक कक्ष बंद केला व तसे सभागृहाच्या निदर्शनास आूणन दिले. परंतु आजही २-३ कर्मचारी टेक्नीकल सेल विभागात काम करतांना दिसून येतात. एखाद्या कार्यकारी अभियंत्याकडून आलेली संचिका उपअभियंता यांनी तपासणी करणे याचा अर्थ कार्यकारी अभियंता सक्षम नाही. अकार्यक्षक आहे असा त्याचा अर्थ होतो. म्हणून अशा संचिका उपअभियंता कडे न देता मा. आयुक्तांकडे डायरेक्ट आल्या पाहिजे. फार काही कार्यकारी अभियंत्यावर कार्यवाही व्हावी. इतर पर चर्चा झालेली होती. असे असतांना काही संचिका आजही उपअभियंता यांचेकडे जातात. मा. आयुक्त यांना त्यांचे अधिकारानुसार जर तांत्रिक संल्लागार आवश्यक वाटत असेल तर तो कार्यकारी अभियंता दर्जाचे घ्यावे. यामुळे सर्वांचा असा गृह झालेला असेल की श्री. काझी उपअभियंता यांचेकडून काम काढून घ्यायचे होत की काय? अशा भावना निर्माण झालेली असून ती अत्यंत चुकीची आहे. सर्व सामान्यपणे अधिकाऱ्यांच्या बदल्या होत असतात. परंतु श्री. काझी यांचेबद्दल काही तक्रारी होत्या का तांत्रिक कक्ष बंद केला तर आज उपअभियंता कडे संचिका का पाठविली जातात. तांत्रिक कक्ष ठेवायचा असेल तर कार्यकारी अभियंता दर्जाचे पदनिर्मिती करावी असे मी त्यावेळी सूचना केल्या होत्या यापुढे आजनंतर कोणत्याही उपअभियंत्याकडे संचिका जावू नये कार्यकारी अभियंत्याकडे पाठवाव्यात. पदनिर्निती केल्यानंतर शासन मान्यतेसाठी सहा महिने लागतील तो पर्यंत इतर अधिकाऱ्यांकडे चार्ज द्यावा म्हणून मी मा. आयुक्त यांनी वैयक्तिक चर्चा केलेली होती. आजच्या नंतर कोणत्याही संचिका उपअभियंता यांचेकडे तपासणीसाठी देण्यात येवू नये. कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी नियुक्त करावे. गांभीर्य लक्षात घ्यावे. टेक्नीकल सेल बंद केला यात जातीचे राजकारणासंबंधीचा संशय निर्माण होत आहे. एका अल्पसंख्यांक अधिकाऱ्यांकडून चार्ज काढून दुसऱ्याकडे देणे ही बाब बरोबर नाही. उपअभियंता यांचेकडे संचिका जाता कामा नये.

**मा. सभापती :** उपआयुक्त (म) माहिती वाचून दाखवतील की, इतर मनपात तांत्रिक कक्ष आहे का?

**उपआयुक्त (म.) :** मागील स्थायी समितीमध्ये इतर मनपात तांत्रिक कक्ष कार्यरत आहेत का, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यानुसार माहिती घेतली असता काही मनपाची माहिती प्राप्त झालेली आहे. अमरावती मनपातील माहिती अशी की, जेथे तांत्रिक कक्ष नियंत्रण बांधकाम विभाग, विद्युत विभाग, ई. साठी कक्ष सुरू करण्याबाबतची कार्यवाही त्यांचे स्तरावर सुरू आहे. तांत्रिक कक्ष नाही. पुणे महानगरपालिकेडून माहिती घेतली असता मा. आयुक्त यांचे अधिपत्याखाली दक्षता विभाग या नावाने तांत्रिक कक्ष स्थापन केलेला आहे. त्यांचे खाते प्रमुख म्हणून विकास अभियंता किंवा नगर उपअभियंता दर्जाचे अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे. दक्षता विभगाकडे बांधकाम नियंत्रण विकास विभाग, विद्युत विभाग, स्थापत्य विभाग, यांचे ही कामाकाजासाठी प्रत्येकी एक सहाय्यक अभियंता व त्यांचे नियंत्रणाखाली प्रत्येकी तीन दुय्यक किंवा कनिष्ठ अभियंता यांची नेमणूक केलेली आहे. व मा. आयुक्त यांचेकडे सादर होणाऱ्या तांत्रिक प्रकरणांची छाननी करणे. तपासणी करणे, जागा तपासणीकरणे, जागा पाहणी करणे व मा. आयुक्त यांचेकडे टिप्पणी किंवा निवेदने सादर करणे. ई. स्वरुपाची कामे या तांत्रिक कक्षामार्फत हाताळणी जातात. विकास अभियंता मनपा आयुक्त पुणे यांनी पत्र दिलेले आहे. ठाणे मनपाकडे माहिती घेतली असता त्यांचेकडे रस्ते दुरुस्ती कक्ष, केंद्रीय भांडारगृह, कक्ष स्थापत्य अभियांत्रिकी प्रयोग शाळा कक्ष, इमारत बांधणी व दुरुस्ती कक्ष ई. आहे. परंतु तांत्रिक कक्ष नाही इतर ही मनपाकडून माहिती मागविण्यात आलेली होती. अद्याप माहिती आलेली नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** आपण कोणता आधार घेतला. अमरावती मनपात हा कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही चालू आहे. पुणे मनपात आहे तर स्थायी समितीची मान्यता लागते की नाही. सर्व बाबी न तपासता नुसती कागदोपत्री माहिती देतात. जो निर्णय घेतला कशाच्या आधारे घेतला. दक्षता विभाग हा तक्रारी घेण्याचा असतो. मा. आयुक्त उपस्थित असते तर २२-२३ वर्षाच्या सेवेचा आधार घेता आला असता ते अपस्थित नाही. यापुढे कोणती संचिका उपअभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे तपासणीसाठी देण्यात येवू नये. असे प्रशासनास आदेशित करावे. सहाय्यक म्हणून घ्यावयाचे असेल तर कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी मा. आयुक्त यांनी घ्यावे.

**श्री. मधुकर सावंत :** इतर नसल्यामध्ये मा. आयुक्तांच्या कडे बील मंजुरीसाठी जाणे असे नाही. परंतु या मनपामध्ये मा. आयुक्तांकडे बीलाची संचिका जाते. पुणे मनपात दक्षता विभाग आहे. जर रस्ता खराब लाईट नाही. इतर तक्रारीचे निवारण करतात. स्थायी समितीची मान्यता असताना तांत्रिक कक्ष ठेवण्याची गरज नाही. तात्कालीन आयुक्त श्री. भोगे यांनी बील वगैरे तपासणी करीत होतेचे साईटवर सुध्दा जात होते. तपासणी करीत होते. बील मागवून घेत होते. तपासणी करीत होते.

**श्री. भगवान रगडे :** सभागृहाच्या भावना लक्षात आल्या असेल कार्यकारी अभियंता यांनी अंदाजपत्रक केल्यानंतर उपअभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे संचिका तपासणीसाठी जाते. याचा अर्थ कार्यकारी अभियंता सक्षम नाही का? स. सदस्य श्री. शिरसाठ यांनी जी मागणी केली सर्व मुद्दे निदर्शनास आणून

दिले तसेच स. स. श्री. सावंत यांनी काही मुद्दे मांडलेले आहे. तांत्रिक कक्ष बंद करण्याचे आदेश आपण दिले तो कक्ष बंद केलेला होता. पुन्हा चालू करण्याची गरज नाही. तांत्रिक सहाय्यक म्हणून कोणत्या अधिकारात नियुक्त करण्यात आली योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन दिनांक २७-०५-०८ च्या बैठकीत मनपात अस्तित्वात असलेला तांत्रिक कक्ष बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दि. ०६-०७-०४ रोजी नगररचना विभागाचे उपअभियंता नगररचना श्री. देशमुख यांनी तांत्रिक सहाय्यक म्हणून काम बघावे असे आदेश मा. आयुक्तांनी काढले आहेत. स. सदस्यांच्या भावना अशा आहेत की, विशिष्ट व्यक्तीला बदलून दुसऱ्या कडे चार्ज देणे योग्य नाही. त्यामुळे स. सदस्यात गैरसमज निर्माण झाला आहे. कार्यकारी अभियंता अंदाजपत्रक तयार करतात व देयक शिफारस करतात. मा. आयुक्तांना जर यामुळे तांत्रिक कक्ष सहाय्यक पाहिजे असल्यास त्यांनी उपअभियंता दर्जाचा तांत्रिक अधिकारी ठेवणे योग्य नसल्याचेच सदस्यांचे म्हणणे आहे. स. स. श्री. शिरसाठ यांची मागणी आहे की सदरील कक्षास स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. त्या अनुषंगाने या स्थायी समितीत असा निर्णय घेण्यात येतो की, मा. आयुक्त यांना तांत्रिक सहाय्यक पाहिजे असल्यास किंवा त्यांना तांत्रिक सल्ला आवश्यक वाटल्यास तो त्यांनी मनपामध्ये कार्यकारी अभियंता दर्जाचे जे अधिकारी आहेत. त्यांच्याकडून मागवावा. / घ्यावा.

**श्री. सावंत मधूकर :** अधिकारी उपस्थित नाही. खुलासा कोण करणार आहे. मा. आयुक्त उपस्थित नाही.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता श्री. पानझडे यांनी मला कल्पना दिलेली आहे ते दुपारी १.०० वाजेच्या दरम्यान येतो म्हणून सांगितलेले आहे. उपअभियंता श्री. सिंकदर अली यांनी माझी परवानगी घेतलेली आहे. सभा सुरू झाली तेंव्हाच मी आदेशित केले की, यानंतर कोणत्याही अधिकाऱ्याला सभागृहात प्रवेश देण्यात येऊ नये. सभा उशीर सुरू होते त्यात अधिकाऱ्यांनी आणखी उशिरा येणे योग्य नाही. सभागृहाची जी शिस्त आहे ती पाळले पाहिजे सभागृह कदापी सहन करणार नाही याची सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**श्री. भगवान रगडे :** पावसाळ्याचे दिवस चालू आहे. माशांचा उपद्रव वाढत आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना गॅस्ट्रो, कॉलरा, मलेरिया या सारखे साथीचे रोगांचे प्रमाणात वाढ झालेली आहे. जेथे घाण कचरा साठविला जातो. अशा ठिकाणी माशांचे प्रमाण जास्त असेत व औषधी फवारणी होणे आवश्यक असते. योग्य प्रकारे फवारणी होत नाही. औषध फवारणी करूनही उपयोग नाही. सुदरीकउे जातात. याचा सर्वात मोठा अनुभव माझ्या वॉर्डात येतो. त्यावर कोणती प्रक्रिया करून नष्ट केल्या जात नाही. आपण स्वत: पाहणी केलेली आहे. पूर्वीची जी स्थिती होती तीच पुन्हा आहे. रासायनिक प्रक्रिया केलेले आंबे कशा पध्तीने नष्ट केले. सर्व बाब स. सदस्यांनी आपल्या निदर्शनास आणून दिलेली आहे. मृत्यूमुखी पडलेले जनावर त्या कचरा डेपोत आणून टाकले जाते. दुर्गंधी मोठ्या प्रमाणात येते तसेच आंब्यामुळे माशाचे प्रमाणे खूप वाढलेले आहे. वॉर्डातील कॉलरा. मलेरिया गॅस्ट्रोचे जास्त रुग्ण झालेले आहेत. त्या कचरा डेपोतील कचऱ्यावर व्यवस्थित फवारणी केल्या जात नाही. धुवा यंत्र येते. एक तासाच्या वर औषध

फवारणी करीत नाही. किती तास औषधी फवारणी होते. याचाही खुलासा करण्यात यावा. ठोस निर्णय घ्यावा. एका गल्लीत फवारणी होते तर बाजुच्या गल्लीत नाही. अशी परिस्थिती आहे. कॉलरा, गॅस्ट्रो लागवन झालेली आहे. किती दिवसांत कार्यवाही होणार आहे. अनेक वेळा प्रश्न मांडलेला असून गांभीर्य लक्षात घेतले नाही. प्रशासन जबाबदार राहील.

**सौ. शाहीन जफर :** अनेक विषयावर चर्चा होते. निर्णय घेतले जातात. परंतु अंमलबजावणी होत नाही. झोपडपट्टी भागात गरीब नागरिक राहतात. लहान लहान मुले असतात. माशा व डासांचा उपद्रव होणार नाही यासाठी चांगल्या प्रतिचे औषध फवारणी व्हावे. आरोग्य विभागाने दक्षता घेतली पाहिजे. ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी.

**श्रीमती किवळेकर जयश्री :** स.स. श्री. रगडे वेळोवेळी प्रश्न उपस्थित करतात. त्यांचे वार्डात या शहरातील कचरा टाकला जातो. नेहमी प्रश्न उपस्थित करतात. केवळ हासत होते. हे योग्य नाही. गेल्या ६ महिने ते १ वर्षापूर्वी या सभागृहात स. सदस्य पोटतिडकीने प्रश्न मांडतात. ह्या वार्डातील प्रश्न केव्हा सुटणार आहे. चर्चा होते. निर्णय होतो. परंतु अंमलबजावणी होत नाही. तर अंमलबजावणी होत नसेल तर या सभागृहात न बसलेलेच बरे असे माझे मत आहे. स. सदस्य वेगवेगळे प्रश्न उपस्थित करतात. प्रश्नाचे निवारण होईल अशी सर्वच सदस्यांना अपेक्षा आहे. आपण सक्रीय सभापती आहात. आपल्या कार्यकाळात ही परिस्थिती असेल तर योग्य नाही. घेतलेल्या निर्णयावर आजपर्यंत का कार्यवाही झालेली नाही. ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. नसता आजची सभा तहकूब करावी.

**श्री. मोहन मेघावाले :** यापूर्वी शहरात येणाऱ्या दुधाची तपासणी होत होती. आपणांस सर्व कल्पना आहे. त्यानंतर आता नुकतेच एक वेळेस ८०० ते ८५० लिटर दूध तपासणी केले. जास्त प्रमाणात दूध का तपासणी झाले का नाही. बातमी लिक होते का? तसेच आताच स. स. श्री. रगडे यांनी माशांचे प्रमाणाबाबत प्रश्न उपस्थित केला ते प्रमाण कमी होणे आवश्यक आहे. चांगल्या प्रतीचे औषध फवारणी होत नाही. जर चांगल्या प्रतीचे औषध फवारणी होत असेल तर माशांचे प्रमाण कमी का होत नाही. नारेगांव भागात रस्त्याने जातांना मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येते. पावसाळयाचे दिवस आहे. आरोग्य विभागाने, मनपा प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

**मा. सभापती :** नारेगांव कचरा डेपोत माशांचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच शहरात सुध्दा माशांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते. डासांचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे. यापूर्वीही आरोग्य अधिकारी यांनी आरोग्य समितीच्या बैठकीत फवारणी करीत असलेले औषध चांगल्या प्रतीचे नसल्याने डासांचे प्रमाण वाढत आहे. असा खुलासा केलला होता. वेगवेगळ्या वृत्तपत्रातून उत्तरे वाचण्यास मिळाली. परंतु माशांचे प्रमाण कमी होण्यासाठी चांगल्या प्रतीचे औषध फवारणी करावे. जेणे करून नागरिकांना साथीचे आजार होणारच नाही. यासाठी नियोजन होणे गरजेचे आहेत. तसेच अर्धा तसा धुँवा यंत्र फवारणीचे चालविण्यात येते. पेट्रोल नसते असे सांगतात. अशा ही सूचना मांडलेल्या आहे. याबाबत आरोग्य विभागाने सुक्ष्म नियोजन करून शहरात साथीचे रोग होणार नाही याची दखल घेण्यात यावी.

**श्रीमती किवळेकर जयश्री :** औषध किती फवारणी होते. किती तास होते. कोणते कर्मचारी कोणत्या भागात होणे गरजेचे आहे. यासाठी नियमावली आहे का? कर्मचारी येतात. फवारणी करतात. पाणीच फवारतात की काय याकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे. कर्मचारी सुध्दा प्रशिक्षित असावा. त्यास प्रमाणानुसार औषध फवारणी केले पाहिजे.

**मा. सभापती :** जो कर्मचारी औषध फवारणी करतो तो प्रशिक्षित आहे का? एका भागात फवारणी केल्यास त्या भागात पुन्हा केवा फवारणी होणे आवश्यक आहे. याबाबतचे नॉम्स् काय आहेत. थोडक्यात खुलासा द्यावा.

**जीव शास्त्रज्ञ (सौ. जिवने) :** नारेगांव येथील कचरा डेपोमध्ये सतत २८ तास चार कर्मचारी चार पंपाद्वारे फवारणी करतात. स. स. श्री. रगडे यांचे वॉर्डात दोन पंप सतत फवारणीचे चालू असतात. माशांचे प्रमाण वाढते म्हणून नोव्हान नावाचे चांगल्या प्रतीचे औषध आपण फवारणी करतो. जे औषध फवारणी करतात ते सर्व प्रशिक्षित कर्मचारी असून या दोन महिन्यात माशांचे प्रमाण वाढतच असते. सतत औषध फवारणीचे काम चालू असून वॉर्डा-वॉर्डात ही वेळोवेळी औषध फवारणी होते. प्रमाण कमी होईल दर ८ दिवसाला प्रत्येक वॉर्डात औषध फवारणी होते.

**श्रीमती किवळेकर जयश्री :** २४ तास औषध फवारणी होते. औषध फवारणी होते की पाणी असा प्रश्न पडतो. तरी सुध्दा माशांचे प्रमाणे कमी होत नाही. हे औषध निकृष्ट दर्जाचे असावेत. संबंधित डॉक्टरांनी त्या-त्या भागात पाहणी केलेली आहे का?

**जीव शास्त्रज्ञ (सौ. जिवने) :** जी औषध फवारणी होते त्याची तपासणी होते. त्यानंतरच फवारणीसाठी दिले जाते. नारेगांव कचरा डेपोत ४ पंप २-२ पंप १२-१२ तास या प्रमाणे फवारणी होते. १० लिटर पाण्यात ३० मिली लिटर औषध मिसळले जाते. प्रत्येक वॉर्डात दुसऱ्यांदा म्हणजे प्रत्येक आठवड्यातून एक वेळेस फवारणी होते. तसा कर्मचाऱ्यांच्या सेवेचा आराखडा तयार केलेला आहे. त्या-त्या भागात नेमून दिलेले कर्मचारी फवारणी करतात.

**श्रीमती किवळेकर जयश्री :** माझा वॉर्डात १५ दिवसातून एक वेळेस कर्मचारी औषध फवारणीसाठी येतात.

**श्री. भगवान रगडे :** माशा मारण्यासाठी औषध फवारणी होते. परंतु त्यांचा मृत्यू होत नाही. एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जावून बसतात. औषध फवारणी होते तेव्हा मच्छर, डास, सुध्दा हवेत उडून दुसऱ्या ठिकाणी जातात. पुन्हा त्या जागेवर डास मच्छर माशा दिसून येतात.

**मा. सभापती :** शहरात माशांचे प्रमाण कमी झालेले नाही. सर्वांचे मत आहे. औषध प्रभावी नाही. शहरातील नागरिकांना कॉलरा, गॅस्ट्रो, मलेरिया अशा प्रकारचे साथीचे आजारांचे प्रमाण वाढले आहे. औषध फवारणीमुळे माशांचे प्रमाण कमी झालेले नाही. उपआयुक्त (म.) श्री. शिंदे यांनी या विभागाच्या काम काजाबाबत चौकशी करून तसेच औषध चांगल्या प्रतीचे वापरण्यात येते का? फवारणी होते की नाही. कर्मचारी यांची काम करण्याची पध्दती किती तास काम करतात. संपूर्ण माहिती घेऊन पुढील बैठकीत अहवाल सादर करावा व आरोग्य विभागाने शहरातील नागरिकांना कोणतेही प्रकारचे साथीचे आजार होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रभावी यंत्रणा राबविली का, उपआयुक्त (म.) यांनी या सदंर्भात लक्ष घालावे.

**सौ. शाहीन जफर :** पुढील बैठकीत अहवाल मागविला, १५ दिवसानंतर बैठक होईल या मधील काळात ५० लोकांना साथीचे आजार झाल्यास जबाबदार कोण?

**श्री. सोपान पारे :** या पूर्वी कोणत्या भागात केव्हा औषंध फवारणी झालेली आहे. रेकॉर्ड प्रत सर्वांना देण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** यापूर्वी सभागृहात अनेक निर्णय घेतले. अंमलबजावणी झालेली नाही. म्हणून आजची सभा घेण्यात येऊ नये. नागरिकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. साथीच्या वाढते तर भयंकर परिस्थिती निर्माण होईल कचरा डेपोत औषध फवारणी होत नाही. अधिकारी सभागृहाची दिशाभूल करतात.

**मा. सभापती :** प्रत्येक वार्डात फवारणी होते. किंवा कोणत्या वॉर्डात किती दिवसाआड फवारणी होते. उपआयुक्त (म.) त्यांचा अहवाल देतील.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** अधिकारी सांगतात आठवड्यातून एकवेळेस प्रत्येक वॉर्डात फवारणी होते. चुकीची माहिती सभागृहाला देण्यात येते. दिशाभूल करतात.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** आठवड्यातून एक वेळेस पवारणी होत असेल तरी सुध्दा डास माशांचे प्रमाण कमी होत नाही. दिवसात पुन्हा फवारणीसाठी कर्मचारी येतच नाही. चुकीची माहिती देतात. आपल्या आदेशाचे पालन होत नाही. चुकीची माहिती देवून सभागृहाची दिशाभूल होत आहे.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सुक्ष्म नियोजन केले आहे का? त्याप्रमाणे काम होते का? दिवसाचा कालावधी देण्यात येतो. स. सदस्य पोटतिडकीने प्रश्न मांडतात. गांभीर्य लक्षात घ्यावे. प्रभावीपणे फवारणी होत नसेल माशांचे प्रमाण वाढतच राहिले तर साथीच्या आजार ही वाढेल साथीचे रोग नियंत्रणात यावे. व संबंधित अधिकारी आदेशाचे पालन करीत नसेल तर विभाग प्रमुख म्हणून आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

**श्री. मोहन मेघावाले :** दुधाची तपासणी का होत नाही. चांगल्या प्रतीचे प्रमाणित दूध येते का?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** ०५-०७-०४ रोजी औरंगाबाद शहरात बाहेरून येणाऱ्या एकूण ४२८३० लिटर दूधाची तपाणी करण्यात आलेली आहे. नगरनाका व वाल्मी नाक्याकडून येणाऱ्या दूधाच्या गाड्या आडविण्यात आल्या होत्या या दुधापैकी शासकीय दूध डेअरीकडून ८७० लि. दूध अप्रमाणित आले. म्हणून दूध नष्ट करण्यात आले व प्रमाणित असलेले दुधाच्या गाड्या सोडण्यात आल्या. यात कृष्णाई पॉश्चराईज्ड चे २१० लिटर दूध व माऊली ॲग्रो ब्रॅन्डचे ६६० लिटर दूध नष्ट केलेले आहे. हे काम करण्यासाठी शासकीय दूध डेअरी विभागाचे अधिकारी मनपाचे अधिकारी तसेच अन्न व भेसळ विभागाचे अधिकारी यांनी मदत केलेली आहे. संयुक्तपणे कार्यवाही झालेली आहे.

**मा. सभापती :** शहरात दररोज किती गाड्या येतात. त्या दिवशी गाड्या अडविल्या. दररोज तेरा गाड्या दूधाच्या येतात का? ४२०० लिटर दूध ज्यादिवशी तपासणी झाली त्या दिवशी आले. माझ्या माहिती प्रमाणे शहरात दररोज १५-१९ गाड्या दूधाच्या येतात. त्या दिवशी १३ गाड्या का आल्या? आपण करणार असलेल्या कार्यवाही बाबत संबंधितांना माहिती मिळाली की काय असा प्रश्न निर्माण होतो. व चांगल्या प्रतीचे दूध होते तेच दूध उत्पादक दूध घेवून आले. उर्वरित परस्पर परत केले असा अर्थ त्या मागचा होतो.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** दूध तपासणी मोहिमत हाती घेण्याबाबतची माहिती मा. आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांना रात्री १०.०० वाजता देण्यात आलेली होती. तोपर्यंत मा. आयुक्तांनाही माहिती नव्हती. सकाळी ११.३० वाजता नगर नाक्यावर पहिली गाडी अडवली. गोपनीयता पाळली होती. गाड्या तपासणी होत असतांना कोणाकडून माहिती गेली असेल त्यामुळे तीन-चार दुधाची वाहने कमी झालेली आहेत.

**मा. सभापती :** कोणाकडून माहिती गेल्यानंतर ३-४ दूधाच्या गाड्या कमी आलेल्या आहेत. त्यास अनुसरून पुढील कार्यवाही काय करण्यात आली फक्त ४२००० लिटर दूध शहरात आले. आपण राबविलेली मोहिम १००% यशस्वी झालेली नाही. यापुढे असे होऊ नये ही मोहिम चालू ठेवावी. नागरिकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. अप्रमाणित दूध शहरात येऊ नये.

**श्री. संजय शिरसाठ :** संबंधित अधिकारी दूध तपासणी मोहिम हाती घेणार आहे. याची माहिती अधिकारी कर्मचाऱ्यांना माहिती केलेली होती. याची कल्पना अधिकारी कर्मचाऱ्यांना असावी असा या मताचा अर्थ निघतो. यानंतर अशी मोहिम हाती घ्यायची तेंव्हा फक्त मा. आयुक्त उपआयुक्त यांना कळविणे योग्य होईल. ज्या ठिकाणी दुध गाडीतून काढले जाते तेथे तपासणी करणे योग्य राहील.

**मा. सभापती :** ज्या ठिकाणी दुध गाडीतून उतरविल्या जाते. त्या ठिकाणी तपासणी केल्यास या बाबींवर आळा बसेल. नियोजन करावे. गोपनियता ठेवावी. यापुढे उपआयुक्त (म.) श्री. शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली प्रयत्न करावे व सतत ही मोहिमी राबवावी.

**श्री. संजय शिरसाठ :** गेल्या बैठकीत रासानिक प्रक्रिया करून आंबे पिकवून ते विकणाऱ्या मालकाच्या दुकानावर धाड टाकण्यात आली. आंबे पकडले. चांगल्या प्रकारे चर्चा झाली. ते रासायनिक प्रक्रिया केलेले आंबे पकडल्यानंतर आरोग्य विभागामार्फत कचरा डेपोत घेवनू गेले. खड्डा केला त्यावर कचरा टाकला असे सांगण्यात आले. याबाबत एशीरनने संपूर्ण साफसफाई करून पाण्याने धूवुन खावे. म्हणून नागरिकांना सांगितले. नागरिकांनी तेथून आंबे घेवून गेले त्यांनी ते खाल्ले. त्यानंतर अनेक लोक आजारी पडले. संदर्भात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले होते की, अन्न व औषधी प्रशासन विभाग तसेच मनपाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिलेली होती. मला १.३० वाजता माहिती मिळाली. मी ४.३० वाजता प्रत्यक्ष पाहणी केली. त्या ठिकाणचे आंबे लोकांनी घेवून गेले होते त्या बैठकीत मा. आयुक्त यांनी सुध्दा सेटमेंट केले होते की, ही जबाबदारी फक्त मनपाच्या विभागाची नसून अन्न व औषधी प्रशासन विभागाची सुध्दा आहे. आणि या बाबतची संपूर्ण चौकशी करून मा. आयुक्त अहवाल सादर करणार होते.

**मा. सभापती :** रासायनिक प्रक्रिया करून फळे पिकवणाऱ्या दुकानांवर दि. १४-०६-०४ रोजी धाड टाकून ११-१२ क्विंटल आंबे पकडण्यात आले होते. त्या संबंधिचा संपूर्ण अहवाल आदेश केल्यानुसार उपआयुक्त (म.) यांनी नुकताच सादर केलेला आहे. त्या अहवालाच्या प्रती स. सदस्यांना वितरीत कराव्या. तयानंतर चर्चा करण्याची इच्छा असेल तर चर्चा घेण्यात येईल.

**श्री. भगवान रगडे :** आर. बी. ए. बाबत माहिती देणार होते. माहिती सादर झालेली आहे का?

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा. माहिती उपलब्ध असेल तर सर्व सदस्यांना प्रत वितरीत करावी.

**सौ. शाहीन जफर :** दोन महिन्यापूर्वीपासून प्रश्न उपस्थित करीत आहे. एका कुटुंबातील तीन शिक्षक एकाच शाळेवर कार्यरत आहेत. शाळा सुरू झाल्यानंतर कार्यवाही होईल असे म्हटले होते. १४ जूनला शाळा सुरू झाल्या. अद्याप कार्यवाही नाही. शाळेत मराठी माध्यमाचे शिक्षक उर्दू माध्यमासाठी तर उर्दू माध्यमाचे शिक्षक मराठी माध्यमासाठी दिले. तसेच एकाच कुटुंबात राहणाऱ्या व सेवेत कायम असणाऱ्या दोघांनाही घरभाडे भत्ता देता येतो का? खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती :** एकाच वॉर्डाच्या शाळेच्या विषय नाही. सर्वच ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. कैलासनगर भागात शाळेत ३०-४० विद्यार्थी शिक्षण घेतात. ३-४ शिक्षक तेथे कार्यरत आहेत. सुरेवाडी भागात शाळेत शिक्षक नाही. याबाबत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात किती शिक्षक असावे. जेथे आवश्यकता आहे तेथे बदल्या कराव्यात. तसे नियोजन करण्याबाबत आदेश केलेले होते. तेस बदल्याचे आदेश दिले का? जसे आताच चर्चा झाली. उर्दूचे शिक्षक मराठी माध्यमासाठी व मराठी चे उर्दू माध्यंमासाठी सर्व समायोजन करावे. आवश्यकतेनुसार शिक्षक त्या तया शाळेत नियुक करावे असे आदेश केलेले हाते. तसेच काही शाळा खाजगी संस्थेला चालविण्यासाठी देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. तसा प्रस्ताव स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेत सादर करण्याचे आदेशित केलेले होते. तसेच काही शिक्षक खिचडी वाटण्याचा व्यवसाय करतात व इतर काही खाजगी व्यवसाय करतात. त्याबाबत चौकशी व्हावी. तसेच एकाच कुटुंबातील पती-पत्नी यांना दोघांना घरभाडे भत्ता मिळतो का चौकशी करण्याचे निर्देश दिलेले होते.

**सौ. शाहीन जफर :** एकाच कुटुंबातील पती-पत्नी सेवेत असतील तर एकाच कर्मचाऱ्यास घरभाडे भत्ता दिला जातो की दोघांनाही दिला जातो. नियम काय आहेत खुलासा व्हावा. दुसरी बाब की १४ जुनच्या अगोदर सर्व शाळांमध्ये लागणारे फर्निचर द्यावी अशी सूचना केलेली होती. शाळेत शिक्षकांना बसण्यासाठी खुर्च्या नाहीत. टेबल नाहीत. परिस्थिती गंभीर आहे. माझ्या वॉर्डातील एक श्रीमती अनिसा नावाची शिक्षिकेची रोषणगेटच्या शाळेत बदली करण्यात आली त्या शिक्षिकेच्या जागेवर शिक्षक दिले नाही तर अभ्यासक्रम कसा पूर्ण होईल. त्या गणित विषय तीन वर्गासाठी शिकवीत होतया. एक वर्ष झाले शिक्षक दिलेले नाही. प्रत्येक शाळेत जाऊन भेट दिली जाईल. असे आपणा म्हटले होते. शाळेला भेट दिली नाही. गणित विषयासाठी जे शिक्षक होते त्यांची बदली केली. त्यांचे जागेवर अद्याप दुसरे शिक्षक एक वर्षापासून दिलेले नाही ते देण्यात यावे.

**प्र. शिक्षणाधिकारी (श्री. जावरे) :** समायोजनाची तयार झली आहे. ज्या शाळांमध्ये जास्त शिक्षक आहेत त्यांची बदली होणार आहे. समायोजन प्रशासनाकडे सादर करणार आहे. एकाच कुटुंबातील तीन लोकांच्या एकाच शाळेत नियुक्त राहणार नाही. आता सध्या शिक्षक समितीनचे सभापती सुध्दा शाळेवर वेळोवेळी भेटी देत आहेत. मी सुध्दा बऱ्याच शाळांना भेटी दिल्या. समायोजनाचा रिपोर्ट आज / उद्या सादर होईल.

**मा. सभापती :** पती / पत्नी सेवेत असल्यास दोघांनाही घरभाडे भत्ता देता येतो का? तसेच मुख्यध्यापकांच्या पदोन्नती बाबत काय झाले खुलासा करावा.

**प्र.शिक्षणाधिकारी :** या बाबतची संपूर्ण संचिका तपासली आहे. एकाच शहरात पती-पत्नी जर सेवा करीत असतील तर घरभाडे भत्ता देता येतो. दोघेही पती-पत्नी एकाच शाळेत सेवेत असतील तर दोघांनाही घरभाडे भत्ता देय आहे. या बाबींवर न्यायालयीन स्थगिती आदेश आहे. न्यायप्रविष्ट बाब आहे. मुख्यध्यापक पदाचे पदोन्नती देण्यासाठी यादी तयार करण्यात येत आहे.

**मा. सभापती :** मुख्यध्यापकांची पदे भरण्यास विलंब झाला. बरेच शिक्षक मुख्याध्यापक पदापासून वंचित राहीले. वेळीच कार्यवाही झाली असती तर त्यांना त्यांचा लाभ मिळाला असता त्यांचे बाबतीत प्रशासनाने विचार करावा. तसेच सभागृहाच्या वतीने सूचना देतो की, कोणत्याही शिक्षणाची बदली करण्यास आल्यानंतर कोणतेही कारण विचारात न घेता त्याची पुन्हा बदली करण्यात येवू नये. जेथे बदली झाली तेथे त्या-त्या शिक्षकांनी रुजू होवून तसा अहवाल तात्काळ घेण्यात यावा.

**श्री. मधुकर सावंत :** खाजगी संस्थेस शाळा चालविण्यास देणेबाबत प्रशासन काय निर्णय घेणार आहे.

**प्र. शिक्षणाधिकारी :** संदर्भात नाशिक मनपाकडून माहिती घेतली असता त्यांनी मनपाच्या इमारती खाजगी शाळांसाठी दिलेल्या आहेत परंतु विद्यार्थी व शिक्षकांचे प्रशासन खाजगी संस्थेला दिलेले नाही. आपल्याकडे एस.एस.सी कोड आहे. त्यामध्ये अशी कुठलीही प्रोव्हीजन नाही वर्ग शाळा खाजगी संस्थेस चालविण्यास द्याव्यात. मुंबई शहरात काही शाळा खाजगी संस्थेस दिलेल्या असल्याची माहिती आहे. हे कशाचे आधारे दिले याबद्दल माहिती घेवून पुढील बैठकीत माहिती सादर करण्यात येईल.

**मा. सभापती :** माहिती घेवून तात्काळ त्या संबंधी कार्यवाही करण्यात यावी.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** शाळांमध्ये नियोजन नाही विद्यार्थी संस्थेच्या प्रमाणात शिक्षक नाही १४ जून २००८ रोजी शाळा सुरू झाल्या. शिक्षकांना बसण्यासाठी खुर्च्या दिल्या जात नाही. शाळेत इतर फर्निचरही दिले जात नाही. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसनपट्ट्या नाही. याबाबत खुलासा करावा.

**प्र. शिक्षणाधिकारी :** भांडार विभागातर्फे कार्यवाही होत आहे. लवकरच फर्निचर उपलब्ध होईल.

**मा. सभापती :** फर्निचर खरेदी करण्याबाबतची निविदा काढलेली आहे. नवीन फर्निचर तात्काळ खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात यावी. जुने फर्निचर दुरुस्त करावे.

**श्री. भगवान रगडे :** ब्रिजवाडी शाळेच्या खिडकीच्या तारा निघालेल्या आहेत. दरवाजे खिडक्या तुटलेल्या अवस्थेत आहे. या संदर्भात आठ (८) दिवसात कार्यवाही करण्याबाबत दीड-दोन महिन्यापूर्वी आदेश दिले होते. आपण स्वतः शाळेची पाहणी केली. अद्यापपर्यंत दुरुस्ती करण्यात आलेली नाही. पूर्वी जी स्थिती होती ती तशीच आहे. सभापतींच्या आदेशाचे पालन होत नाही.

**शहर अभियंता :** सर्वच शाळांचे दुरुस्ती बाबत अंदाजपत्रक तयार केले होते. शाळा दुरुस्तीसाठी १० लक्ष रुपयांची तरतूद आहे. अंदाजपत्रक ४० लक्ष रुपयाचे होत आहे.

**मा. सभापती :** शाळा दुरुस्तीसाठी असलेल्या तरतूदीमधून प्राधान्याने ज्या ज्या शाळांची दुरुस्ती करावयाची आहे त्या बाबत माहिती मागवावी व किरकोळ कामासाठी तीन दिवसाची अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करावी. तुटलेले दरवाजे, खिडक्या, जाळ्या फरशी, पत्रे पाणी गाळणे हे सर्व दुरुस्त करण्यात यावे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** स्थायी समितीच्या अर्थसंकल्पात किती तरतूद करण्यात आली होती. गेल्या वर्षात शाळेसाठी किती किती तरतूद करण्यात आलेली होती. तसेच शहर अभियंता यांचे विभागासाठीची तरतूद किती करण्यात आलेली होती.

**मा. सभापती :** मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** सर्वच हेड मिळून सर्वसाधारण सभेमध्ये तीन कोटींच्या तरतूदी कमी करण्यात आलेल्या आहेत. शहर अभियंता विभागाचे देखभाल दुरुस्ती वर बऱ्याचशा बाबी कमी झालेल्या आहे. त्याचा तपशील दिला जाईल.

**श्री. इलियास किरमाणी :** १५ ऑगस्टला शालेय विद्यार्थ्यांना गणवेश दिला जातो १५ ऑगस्ट जवळ येत आहे. केंव्हा कार्यवाही होणार? यावर्षी गणवेश देणार की नाही?

**मुख्य लेखाधिकारी :** शालेय गणवेश खरेदी करण्याबाबतच्या निविदा आचार संहितेमुळे काढता आलेल्या नव्हत्या दि. १७-०५-०४ रोजी निविदा काढण्यात आल्या. एकूण १३ निविदा विक्री झाल्या व ०८-०६-०४ रोजी ६ निविदा प्राप्त झाल्या एक पॉकेट उघडले. एका निविदा धारकाकडे कादपत्राची पूर्तता न झाल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली नाही. उर्वरित पाच निविदा धारकांचे सॅम्पलल्स तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे. सॅम्पल्सचा लॅब रिपोर्ट दि. ३०-०६-०४ रोजी प्राप्त झालेला आहे. ०३-०७-०४ रोजी दुसरे पाकीट उघडण्यात आले. त्यात बहुतांशी दर गतवर्षी पेक्षा जास्त असल्याचे दिसून आले. वाटाघाटीसाठी दि. ०८-०७-०४ रोजी बोलविण्यात आले. लेखी स्वरुपात निविदा धारकांनी जे दर दिले ते गतवर्षीच्या तुलनते ५०% ने जास्त होते. त्यामुळे नाशिक, पुणे महापालिकेकडून दरांचा तपशील मागविण्यात आलेला आहे. स्थायी समिती सभेपुढे ठेवू, गणेवश प्रक्रिया किचकट आहे. यात पारदर्शकता रहावी. जिल्हा परिषदेमार्फत सुध्दा अशी योजना राबविली जाते. दोन वर्षापासून मुलांना गणवेश दिलेले नाही. फक्त मनपाच दरवर्षी विद्यार्थ्यांना गणेवश वाटप करते ही जी प्रक्रिया आचार संहितेमुळे लांबणीवर पडलेली होती. फक्त कालावधी मागेपुढे होईल. येणाऱ्या सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शिक्षण विभागाची चर्चा चालू आहे. संपूर्ण शाळांच्या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी १० लक्ष तरतूद व अंदाजपत्रक ४० लक्ष होते. आताच खुलासा झाला. अंदाजपत्रकाची रक्कम जास्त होते. कोणत्या कामास प्राधान्य द्यावे. त्यांना अडचण होत आहे. दुरुस्तीसाठी तीन कोटीची तरतूद सुचविण्यात आली. अर्थसंकल्प आलेले आहे. जेंव्हा सन २००३-०४ चे सुधारित व सन २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक सर्वसाधारणसभेसाठी ठेवण्यात आले होते. स्थायी समितीची सुचविलेल्या संपूर्ण बजेटला मान्यता दिलेली होती. त्या ६ कोटीने वाढवले. सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला जी काही उद्दिष्टात वाढ केली. त्यांचे अधिकार मा. महापौर व पदाधिकारी यांना दिलेले होते. सर्वसाधारण सभा झाल्यानंतर दोन महिन्याचा कालावधी निघून

गेला. कोणती कामे घ्यायची कोणती नाही यात वेळ गेला. मुळ अंदाजपत्रकास जी स्थायी समितीने मंजुरी दिली होती त्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली व तरतूद केलेली रक्कम कपात करायची असेल तर अधिकार कोणाला असतात. कोणी कपात केली? माझ्या मते सभागृहाचा अधिकार होता.

**मा. सभापती :** मुळ प्रस्तावात जी स्थायी समितीने मान्यता दिली होती व सर्वसाधारण सभेने जे अधिकार दिले त्यानंतर झालेली जी तफावत आहे मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीने सर्वसाधारण सभेत मांडले. मा. महापौरांना सर्व अधिकारी दिले होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीने सादर केले. सर्वसाधारण सभेने दोन कोटी जकात. दोन कोटी मालमत्ता कर व एक कोटी पाणीपट्टी अशी पाच कोटीची वाढ सुचविली. तो त्या सभागृहाचा अधिकार होता. परंतु सर्व अधिकार पदाधिकारी यांना देवून स्थायी समितीने मंजूर केलेल्या मूळ अंदाजपत्रकात कोणत्याही प्रकारची कपात करण्याबाबत उल्लेख झालेला नाही. तीन कोटी कपात करण्यात आली त्यास कोणी मान्यता दिली.

**मा. सभापती :** सर्व अधिकार मा. महापौरांना दिले होते. स्थायी समितीने सादर केलेल्या अर्थसंकल्पास अधिकन राहून बदल करण्याबाबत निर्णय झाला होता.

**श्री. काशिनाथ कोकाटे** : सर्वसाधारण सभेने जकात मालमत्ता कर व पाणीपट्टीत पाच कोटीने उद्दिष्ट वाढविले व पुढील कामाच्या बाबत जे नियोजन करावयाचे होते. त्या संबंधी मा. महापौर व सर्व पदाधिकारी यांना अधिकारी दिलेले होते. मुळे अंदाजपत्रक स्थायी समितीने मंजूर केले त्या कोणतीही कपात करू नये. असा निर्णय झाला. त्यानंतर तीन कोटी कपात केले. सभागृहात अर्थसंकल्प येण्यापूर्वी पुस्तक वाचन केलेले होते व सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार जे पुस्तक तयार करण्यात आले. त्यात निश्चितपणे बदल झाल्याचे दिसून येत आहे. कोणाच्या अधिकारात बदल झालेला आहे.? सभागृहाची मान्यता नसताना अशा रकमा कपात करता येतात का?

**मा. सभापती :** स्थायी समितीनेच अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत सादर केलेला आहे. सर्व अधिकार मा. महापौरांना दिलेले होते. मा. महापोरांना दिलेले होते. मा. महापौर यांनी अर्थसंकल्प पुस्तक तयार करून प्रशासनास दिलेले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पाणी पुरवठ्याचा विषय यात आहे. रकमेत कपात केल्या विकास कामे होतील का? पाच कोटीने उद्दिष्ट वाढविले हा सभागृहाचा निर्णय झाला. परंतु कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे किंवा बदल करण्याचे अधिकार मा. महापैरांना दिलेले नव्हते. जे मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीचे आहे त्यास अधिन राहून कोणताही बदल न करता अर्थसंकल्पास मान्यता देण्याचे अधिकार दिलेले होते. जो बदल झाला तो कोणाच्या अधिकारात झाला. सभागृहात झाला असेल तर त्या सभेची ध्वनिनिती सभागृहास वाचून दाखववावी ज्या कामांना प्राधान्य देण्यात आले ते करता येईल परंतु खुलासा घेणे गरजेचे आहे. कार्यकारी अभियंता यांनी सुध्दा ७१४ लक्षचा पाणीपुरवठाच अत्यंत महत्वाचा प्रस्ताव मांडलेला आहे. महत्वाचा प्रस्ता असतांना तीन कोटीची कपात केली. कुणाच्या अधिकारात केली याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे. सर्वोच्च सभागृह आहे. यात मु. प्रा. मनपा अधिनियमाचे कलम १०० नुसार महानगरपालिका म्हणजेच सर्वसाधारण सभेने अर्थसंकल्पात म्हणजेच यथास्थिती केलेल्या बाबींसाठी कलम ९८ पोट कलम (२) खंड (अ) (क) व (ड) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संपूर्ण बाबींसाठी पूर्णपणे तरतूद करता आली पाहिजे. स्थायी समितीने निर्णय घेवून मा. महापौर म्हणजे सर्वसाधारण सभेला सर्व अधिकार दिलेले होते. स्थायी समितीने निर्णय घेतला असेल तरी स्थायी समितीने मान्यता दिली. सर्वसाधारण सभेत निर्णय झाला.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** यथास्थिती याचा अर्थ काय? अर्थसंकल्पात बदल करण्याचे अधिकार दिलेले नव्हते. फक्त सभागृहाच्या भावना लक्षात घेवून त्यांनी जी उद्दिष्टात पाच कोटींची वाढ केली त्यास मान्यता दिलेली आहे. आपण जे कलम १०० (क) ३ वाचन केले त्यानुसार अधिकार दिलेले नाही.

**मा. सभापती :** सर्वसाधारण सभेची बाब आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सर्वसाधारण सभेत सुध्दा मुद्दा उपस्थित करता येईल. अर्थसंकल्पाच्या संबंधित वाचून दाखविले. अर्थसंकल्प कोणते काम घ्यायचे कोणत नाही. याची समिती ही नियोजन समिती आहे. मा. महापौरांना हे अधिकार दिलेले नव्हते. अधिकारांचा गैरवापर झाल्याचे वाटते. पदाधिकारी व अधिकारी यांच्यात समन्वय ठेवून नियोजन व्हावे. स्थायी समितीने केलेली तरतूद कमी करण्यात आली. त्याचा विचार केलेला नाही. तसेच टिप्पनीही ठेवली होती. त्यास तत्कालीन सभापती यांनी मान्यता दिली होती. ६५ कोटीची तरतूद करण्यात यावी. त्यामध्ये यंत्रसामुग्री कपात करण्यात आली होती. ती रक्कम कोणत्या लेखाशिर्षकाखाली गेलेली आहे. विचार विनिमय करून फेरबदल झालेला असेल.

**मुख्य लेखाधिकारी :** सर्वसाधारण सभेकडून दुरुस्ती होवून नवीन कामाची यादी मा. महापौरांनी दि. १४-०६-०४ रोजी दिली. विविध लेखाशिर्षामध्ये कपाती करण्यात आलेल्या आहेत. शाळा देखभाल दुरुस्ती स्था. स. १५ ऐवजी सर्वसाधारण सभेने १० लक्ष ठेवले. लक्षची तरतूद ठेवली होती. ती कमी करण्यात आली. प्रतापनगरसाठी स्था. स. ने. १ लक्ष तरतूद ठेवली होती ती कमी करण्यात आला. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राकरिता ३० लक्षची तरतूद होती. त्या ऐवजी १० लक्ष करण्यात आली. इत्यादी लेखाशिर्षामध्ये अशी एकूण ३ कोटीची तरतूद देखभाल दुरुस्ती अंतर्गत कमी करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** मा. महापौरांनी त्यांचे अधिकार वापरून कमी जास्त झालेले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** चार दिवसांपूर्वी संत एकनाथ रंगमंदिर येथे शिवसेनेचे विभागीय अधिवेशन झाले. त्यावेळी वर्तमानपत्रात वाचून माहिती मिळाली. देखभाल दुरुस्तीची तरतूद सुरुवातीला होती नंतर ती कमी केली. पीर बाजार भाजी मार्केट मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थलांतर करायला सर्व साधारण सभेने मंजुरी दिली व या प्रमाणे शहानूरमियाँ दर्गाजवळ करावयचे ठरले. त्यांची पण ५ लाखाची तरतूद वगळली. आपण कशा पध्दतीने नियोजन करणार याबाबत विचार केलेला नाही.

**मा. सभापती :** लेखाशिर्ष मध्ये कमी जास्त झालेली तरतूद आपण बदलून घेऊ शकते. कमी झालेले असेल तर वाढविण्याचा अधिकार आहे. कोठे कमी कोठे वाढवायचे आहे तो आपण निर्णय घेवू.

**मुख्य लेखाधिकारी :** स्थायी समितीपुढे मंजूर झालेल्या टिप्पणी प्रमाणे अर्थसंकल्पात तरतूद झालेली नाव्हती. स्थायी समितीने फेब्रुवारीत अर्थसंकल्प मंजूर केला. नंतर पाणी पुरवठ्यासंबंधी अडचणी सुरू झाल्या. कार्य. अभियंता यांनी टिप्पणी सद करून तरतूद करून घ्यावी अशी विनंती केली. त्याच्या प्रती वितरीत करण्यात आल्या व सर्वसाधारण सभेपुर्वी सर्व पदाधिकाऱ्यांना प्रशासनातर्फे दाखविण्यात आल्या.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** या संदर्भात टिप्पणी मंजूर केली होती. शासनाचे अनुदानातून तरतूद उपलब्ध करून द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** मुळ अर्थसंकल्पात प्रस्ताव नव्हता. स्थायी समितीने अर्थसंकल्पात देखील तरतूद केलेली नव्हती. स्थायी समितीने अर्थसंकल्पात देखील तरतूद केलेली नव्हती. सादर झालेली टिप्पणी पाचही पदाधिकारी यांचेसमोर ठेवली. त्यांच्या निदर्शनास आणून दिली. अर्थसंकल्प मंजूर करतांना अतिरिक्त तरतूद नव्हती. मुळ प्रस्तावात उल्लेख नव्हता.

**मा. सभापती :** प्रस्ताव दुरुस्तीबद्दलचे असेल तर आपण बदल करू. मुळ अंदाजपत्रकात तरतूद ठेवलेली नाही याही पलिकडे या सभागृहाला फेरबदल करण्याचे अधिकार आहेत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** २००४-२००५ चे अर्थसंल्पाच्या वेळी प्रशासनाच्या वतीने टिप्पणीची दखल घेवून तरतूद करायला हवी होती. आता शासकीय अनुदानातून करावे.

**मुख्य लेखाधिकारी :** जायकवाडी पाणी पुरवठा संबंधीची टिप्पणी मा. पदाधिकारी यांच्या निर्दनास आणून दिली होती.

**मा. सभापती :** दहा मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.

**(वेळ दुपारी सुमारे २ वाजता सभा तहकूब . सभेला पुन्हा सुरुवात ३ वाजता.)**

**श्री. मधुकर सावंत :** नाथ प्रांगण बद्दल बोललो होतो. आर. पी. नाथ ची सर्व कागदपत्रे मी दाखवतो स.स. न. र. यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक न.र. :** नाथ प्रांगण रेखांकनास तत्कालीन नगर परिषदेच्या वेळी उपसंचालक नगर रचना यांनी त्यांचेकडील क्रमांक १५५४/१९७८ दि. ०८-०३-१९७८ नुसार तात्पुरती मान्यता दिलेली आहे. १४-०९-९४ ला सदर जागा महानगरपालिकेस हस्तांतर केली. स. सदस्यांशी चर्चा झाली. ज्या वर तात्पुरती मान्यता देण्यात आली आहे १४-०९-९४ ला सदर जागा महानगरपालिकेस हस्तांतर केली. स. सदस्यांशी चर्चा झाली. ज्या क्षेत्रावर तात्पुरती मान्यता देण्यात आली ते नव्हते. स. सदस्यांचे म्हणणे आहे की, दिशाभूल करून त्यांनी सातबारावर नांव घेतले. न्यायालयाच्या निर्णयानुसार श्री. राजेंद्र पवार यांची मालकी असतांना त्यांनी सादर केले. फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. १९७८ ला मंजूर झालेल्या रेखांकनाप्रमाणे रस्ते व खुली जागा मनपाकडे हस्तांतर करून घेतली या भागात जवळपास विकास होवून घरे बांधण्यात आलेली आहेत. आज हस्तपेक्ष करण्यासारखी परिस्थिती दिसून येत नाही. मुळ वाद मालकी

हक्काबाबत दिसतो. हा वाद मिटवण्यासाठी महानगरपालिका सक्षम प्राधिकरण नाही.

**श्री. मधुकर सावंत :** महानगरपालिकेमध्ये दबावाखाली किंवा आमिष दाखवून चुकीच्या रेखांकनास मंजुरी देण्यात आली. तेथील लोकांना आर. पी. नाथ यांचेकडून जमीन घेतल्यानंतरही पुन्हा श्री. राजेंद्र पवार अंडे कंपनीस पैसे देवून जागा घ्यावी लागेल.

**मा. सभापती :** मालकी हक्काबाबत वाद चालू होता. महानगरपालिकेला पार्टी करण्यात आले होते का?

**विधी सल्लागार :** रेखांकन मंजूर झाले. त्यापूर्वी प्रकरण न्यायप्रविष्ट नव्हते. १९७८ मध्ये मंजूर झाले त्याबाबत मनपास मा. न्यायालयाचे निर्देश नाही.

**मा. सभापती :** न्यायालयात आपले मत मांडावयास पाहिजे होते. आपली फसवणूक झालेली होती. आजही न्यायालयाच्या निर्णयानंतर आपणास कार्यवाही करता येईल.

**सहा. संचालक न.र. :** रस्ते व खुली जागा महानगरपालिकेस हस्तांतर झालेली आहे. त्यास हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**मा. सभापती :** जे कागदपत्र दाखल केलेले आहेत ते मा. न्यायालयाकडून मागवून द्यावेत.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** मनपाने तार फेन्सींग केली होती. ती रातोरात काढण्यात आलेली आहे.

**श्री. मधुकर सावंत :** श्री. आर. पी. नाथ यांना करारनामा करण्याचा अधिकारच नाही.

**मा. सभापती :** सदर प्रकरणात मा. न्यायालयाचे मनपाला काहीच आदेश नाहीत.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** याचा काही संबंध येत नाही. जागा आपल्या ताब्यात आहे.

**मधुकर सावंत :** ज्या वेळेस रेखांकन मंजूर केले परंतु आज सदर जागा त्यांची नाही. महानगरपालिकेची फसवणूक झाली. लाखो रुपये उचलले. आज बांधकाम चालू आहे ते थांबवावे. राजेंद्र पवार हे महानगरपालिकेकडे आले होते.

**मा. सभापती :** सदर रस्ते व खुल्या जागेचा आपण विकास केलेला आहे. श्री. राजेंद्र पवार यांना आपण जागा देवू शकत नाही. जागा आपल्या ताब्यात आहे व या प्रकरणात न्यायालयाचे महानगरपालिकेला कोणतेही आदेश नाहीत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एक वेळेस आपण तात्पुरती मंजुरी दिलेली आहे. परवानगी देतांना खात्री करूनच परवानगी देतो. परवानगी दिलेली आहे. त्या भूखंडाची विक्री करण्यात येते. १९७८ ला तात्पुरती मंजुरी झालेली आहे. त्यांनी फसवणूक केलेली आहे ते आपल्या निदर्शनास येत आहे. तात्पुरते रेखांकन नामंजूर करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहे का? कोणास अधिकार आहे व आपण करू शकतो व जबाबदारी कोणाची आहे? खुलासा करावा.

**सहा. संचालक न. र. :** उपसंचालक नगर रचना यांनी तात्पुरती मंजुरी १९७८ ला दिलेली आहे. अंतिम मान्यता घेतलेली नाही. भूखंडाची त्यांनी परस्पर विक्री केली. जागेवर विकास झालेला असल्याने आपण ते रद्द करत नाही. न्यायालयाचे आदेश आणले तर आपण कार्यवाही करू. मालकी हक्काबाबतचा वाद त्यांनी आपसात मिटवावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** अधिकाराचा गैरवापर झालेला आहे. आज विकास केला. खर्चही झालेला आहे. महानगरपालिकेने परवानगी दिली. त्या ठिकाणी घरांचे बांधकाम झाले. रस्ते व खुली जागा ताब्यात घेतली आता त्या लोकांनी जायचे कोठे?

**मा. सभापती :** केस केंव्हा चालू होती आणि निकाल कधी लागला.

**विधी सलागार :** सदरील प्रकरणातील मा. न्यायालयाने दिलेला निर्णय मिळकतीचा वाद सर्व्हे नंबर इत्यादी बाबत सर्व संचिका तपासल्यानंतर माहिती देता येईल.

**श्री. संजय शिरसाठ :** प्लॉट विक्री करू नये व बांधकाम करू नये याबाबत स्थगिती नाही. आदेशही नाही जो कोणी असेल त्यांनी न्यायालयात जावे.

**मा. सभापती :** मा. न्यालयातून सर्व आदेशाच्या प्रती प्राप्त करून घ्याव्या. व सविस्तर माहिती देण्यात यावी.

**श्री. इलियास किरमाणी :** अग्निशमन विभागाकडून विविध व्यावसायिकांना नाहकरत प्रमाणपत्र आवश्यक केलेले आहे. परंतु व्यावसायिक आणि अनेक नागरिकांच्या या विभागा संबंधी अनेक तक्रारी आहेत मी. स्वतः बऱ्याच पकरणामध्ये संबंधित व्यावसायिकांसोबत अग्निशमन विभागाचे अधिकाऱ्यांकडे गेलो असतो. नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरिता त्यांचेकडून प्रकरण नांमजूर केले जाते. असा अनुभव आहे. उपआयुक्त (म.) हे या विभागाचे प्रमुख आहेत हे तांत्रिक नाहीत. त्यांचेकडून कामाचा व्याप जास्त असल्यामुळे अग्निशनम विभाग शहर अभियंता यांचे अधिपत्याखाली असावा अशी मागणी मी यापूर्वीच्या सभेमध्ये केलेली होती. परंतु कार्यवाही झाली नाही. नाहरकत प्रमाणपत्रांची अनेक प्रकरणे या विभागाकडे पडलेली आहेत. म्हणून हा विभाग शहर अभियंता यांचे अधिपत्याखाली देण्यात यावा.

**मा. सभापती :** बऱ्याच तांत्रिक बाबी अग्निशमन विभागशी संबंधीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. किरमाणी यांची मागणी लक्षात घेवून तसेच या विभागातील नागरिकांची / व्यावसायिकांची कामे तात्काळ व्हावीत या दृष्टीने अग्निशमन विभाग हा शहर अभियंता यांचे अधिपत्याखाली देण्यात यावा.

**श्री. संजय शिरसाठ :** महापालिका अस्थापनेवरील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तके अस्थापना विभागाकडे असतात. त्याच प्रामाणे अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक वैयक्तिक संचिका देखील मनपाच्या अस्थापना विभागाकडे असाव्यात. याबाबत त्वरित आदेश द्यावेत.

**मा. सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. संजय शिरसाठ यांनी सूचना केल्याप्रमाणे अग्निशमन विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक, वैयक्तिक संचिका मनपाच्या अस्थापना विभागाकडे वर्ग करण्यात याव्यात. असा निर्णय देण्यात येतो.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** उप आयुक्त ऐवजी शहर अभियंत्याकडे हा विभाग देण्याबाबत निर्णय दिला. स. सदस्यांनी मागणी केली व मा. सभापतींनी तत्परतेने बजावली.

**श्री. इलियास किरमाणी :** उप आयुक्त टेक्नीकल नाहीत. एन.ओ.सी. देतांना अनेक तांत्रिक बाबी तपासाव्या लागतात. अशा वेळी तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. शहर अभियंता टेक्नीकल असल्याने ते तांत्रिक बाजू तपासणी करू शकतात. अग्निशमन विभागाचे काम सुरळीतपणे चालावे त्यांना अडचणी येवू नये म्हणूनच हा निर्णय घेण्यात आला. अग्निशमन विभागाने उप आयुक्त यांचे अधिपत्याखाली काम केले काय किंवा शहर अभियंता यांचे अधिपत्याखाली काम केले काय याचा त्यांना काहीच फरक पडणार नाही. यातून वेगळा अर्थ स. सदस्यांनी काढू नये. सभापतींनी दिलेला निर्णय योग्यच आहे. त्याची अंमलबजावणी प्रशासनाने त्वरित करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या विभागाची संपूर्ण माहिती घेण्यात यावी. सर्वसाधारण सभेने दोन वेतनवाढ देऊन गौरव केलेला आहे. महाराष्ट्र शासनाने देखील गौरव

केलेला आहे. चांगले काम करतांना जीव धोक्यात घालूनच काम करावे लागते. त्यांचे मनोधैर्य खच्चीकरण होवू नये. हे चुकीचे आहे. त्यांना जसे शहर अभियंता, कार्य. अभियंता यांचे अधिपत्याखाली ठेवण्याबाबत आदेश देण्यात तत्परता दाखविली. अशीच तत्परता सर्व बाबतीत दाखविली जात नाही ही बाब योग्य नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** अंगुरीबाग येथील एक देवडी आहे. ती हेरीटेज मध्ये मोडते का?

**सहा. संचालक नगररचना :** अभिलेख तपासून स. सदस्यांना माहिती देण्यात येईल.

**श्री. इलियास किरमाणी :** हे सांगण्याचे मुख्य कारण असे आहे की, ही देवडी तुटत आहे. जर ही हेरिटेजमध्ये मोडत असेल तर हे चुकीचे होते.

**मा. सभापती :** त्या ठिकाणी होत असलेले बांधकाम हे हेरिटेज नियमावलीत समाविष्ट वास्तुमध्ये आहे. किंवा नाही हे तपासूनच परवानगी द्यावयास पाहिजे. या सर्व बाबी पाहुन अहवाल देण्यात यावा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** आपल्याकडे श्री. कमलाकर फंड हे उपजिल्हाधिकारी आहेत. त्यांच्या कामाची देखील वाटणी करावी त्यांना देखील वाढवी कामे देण्यात यावीत.

**श्री. इलियास किरमाणी :** मी मागील अनेक सभामधून बिल्डरांशी संबंधी प्रश्न विचालेला आहे. भोगवटा प्रमाण पत्र नाही. त्यांना सील करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. त्यांचेवर गुन्हे दाखल करावेत. याबाबत कार्यवाही झाली नाही. किती लोकांवर गुन्हे दाखल झाले? किती लोकांचे तोडले व किती लोकांवर कारवाई केली नाही? आणि काय कारवाई केली.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** श्री. फंड यांना देखील काम देण्याबाबत आदेश देण्यात यावेत.

**मा. सभापती :** या बाबतीत मा. आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

**सहा. संचालक न. र.** : भोगवटा प्रमाणपत्रासंबंधीची माहिती पुढील प्रमाणे देण्यात येत आहे. ०१-०४-२००३ ते ३१-०३-२००४ या कालावधीमध्ये भोगवटा प्रमाणपत्राची ६८ प्रकरणे आहेत. यापैकी ६ प्रकरणे नामंजूर करण्यात आलेली आहे. १८ प्रकरणे प्रशासकीय अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेली आहेत व कार्यवाही अंतर्गत २७ प्रकरणे असून १७ प्रकरणात मंजुरी देण्यात आलेली आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** २७ लोकांना केंव्हा नोटीसा दिलेल्या आहेत? याचा तपशील देण्यात यावा.

**सहा. संचालक न. र. :** काही प्रकरणात पूर्तता झालेली आहे. काही प्रकरणात पूर्तता व्हायची आहे. कार्यवाही अंतर्गत प्रकरणे आहेत.

**श्री. इलियास किरमाणी :** त्यांच्यावर गुन्हा का दाखल केलेले नाही?

**मा. सभापती :** सदर प्रकरणे कार्यवाही अंतर्गत आहेत. त्यांना भोगवटा प्रमाणपत्र देता येत असेल तर देण्यात यावे. नामंजूर ६ प्रकरणा बाबतीत काय कार्यवाही करण्यात आली त्याची माहिती द्यावी.

**श्री. इलियास किरमाणी :** तापडीया नाट्यमंदिर, व्यापारी संकलाबाबत गुन्हा का दाखल झाला नाही. त्याला सील करण्यात आलेले नाही? एकाला तरी सील करण्यात यावे.

**मा. सभापती :** त्यांचे सुधारीत बांधकामाचा प्रस्ताव आहे. सदर प्रस्ताव प्रोसेसमध्ये असून प्रलंबित आहे. मुदतवाढ देता येत असले तर देण्यात यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आपण दुकानांना परवाना देतो. अनाधिकृत वसाहतीमध्ये परवाना देण्यात येतो का? परमीट बार असेल तर फायर ब्रिगेडची एन.ओ.सी. घेणे गरजेचे आहे का?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** अधिकृत, अनाधिकृत वसाहतींमध्ये अन्न भेसळ परवाना देणे आवश्यक आहे. ५० फुट उंच व ५००० चौ. फुट इमारतीसाठी अग्निशमन दलाची एन.ओ.सी. आवश्यक आहे. उर्वरित प्रकरणात महाराष्ट्र दुकाने अधिनियमा अंतर्गत तपासणी करून अन्न भेस परवाना देतो.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** मयुरपार्क येथील ड्रेनेजच्या कामाचे निविदा घेवून दोन महिने झाले. अद्याप काम का सुरु झाले नाही.

**मा. सभापती :** अनामत रक्कम भरून घेवून ताबडतोब काम का सुरू झाले नाही.

**उपअभियंता (ड्रे.) :** संबंधिताने २% अनामत रक्कम भरलेली आहे. करारनामा करून काम सुरू करण्यात येईल.

**मा. सभापती :** उद्याच मार्कआऊट देवून काम सुरू करावे.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** प्रेरणानगर येथे खुल्या जागेच्या मालकी हक्कात आखीव पत्रिकावर खाजगी नाव लावण्यात आलेले आहे. त्या जमिनीची किंमत लाखो रुपये आहे. सदर जागेला कुंपण भिंत बांधता येत नाही. त्या जागेची आखीव पत्रिका तयार होते. याबाबतीत प्रशासन काय करते?

**मा. सभापती :** अर्थसंकल्पात तरतूद आहे. खुल्या जागेच्या हद्दित भूखंड पाडले. मालकी देखील त्यांच्याच आहे. त्याचा सि.स.न. १५०३ असून मनपाच्या खुल्या जागेमध्ये प्लॉट पाडण्यात आलेले आहे. स्थळ पाहणी करून अहवाल द्यावा.

**श्री. मधुकर सावंत :** स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने मालमत्ता सर्वेक्षणाच्या निविदा मंजूर केलेल्या आहेत. त्या कामाचा अहवाल देण्यात यावा.

**प्र. माल अधि. (श्री. कालेले) :** संपूर्ण माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. सर्वेक्षणाचे काम सुरू आहे.

**श्री. मधुकर सावंत :** २ कोटीचे टेंडर आहे. या कामासंदर्भात त्यांच्या सहिचे पत्र आहे. ते दिशाभूल करतात.

**मा. सभापती :** आज कुठपर्यंत काम झालेले आहे. सविस्तर माहिती सर्व सदस्यांना देण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** सिध्दार्थ उद्यानातील प्रमोद नांवाचे पांढरा वाघाचा मृत्यू कसा झाला?

**संचालक (प्रा. स.) :** प्रमोदर नावांचा पांढरा वाघ मृत्यूसमयी त्यांचे वय १४ वर्ष होते. तीन चार दिवसांपासून आजारी होता. बहुउद्देशिय पशुचिकित्सालय यांच्याकडे उपचारासाठी दाखवण्यात आले होते. तीन दिवस सतत निदान. नंतरही प्रकृतीच सुधारणा होत नव्हती. त्यानंतर पशु वैद्यकीय डॉक्टरांचे पथक बोलावण्यात आले. त्यांना फॅक्स करण्यात आला. ते पथक येण्यापूर्वीच वाजता त्याचा मृत्यू झाला. मृत्यू बाबतचा लेखी अहवाल मा. सभापतीकडे सादर केलेला आहे. या संदर्भात वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्दी झाली तरी बरोबर नाही. वाघाच्या पाटीवर हात फिरवण्याचा प्रश्न नाही. खाजगी मुळे पॅथॉलॉजी लॅब व शासकीय प्रयोगशाळेत तपासणीकरिता नमुने पाठविण्यात आलेले आहेत. वन्यप्रमाणी संरक्षण कायद्या अंतर्गत मृतदेह वन विभागाकडे हस्तांतर करण्यात आला. शव विच्छेदनानंतर नियमानुसार वाघाचा मृतदेह जाळण्यात आला. जनावरांची कशी दक्षता घेण्यात यावी. याबाबत मुंबई पशु

वैद्यकीय महाविद्यालयाचे मेडीसीनचे प्राध्यापक. अधिष्ठाता पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी यांचे मार्गदर्शन घेण्यात आले.

**मा. सभापती :** प्रयोगशाळेकडून अहवाल आल्यानंतर याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**विषय क्र. ४० :**

दिनांक २३-०३-०४ रोजी तहकूब झालेल्या व दिनांक २४-०६-०४ (का.प.क्र. ८) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. मधूकर सावंत :** स. न. ५४ बाबत काय कार्यवाही झाली.

**उपआयुक्त (म.) :** स.न. ५४ मधील महानगरपालिकेची जागा ताब्यात घेण्यासंबंधी स. नगरसेवक श्री. मधूकर सावंत यांनी मा. आयुक्त यांचेकडे लेखी निवेदन दिल्यानुसार संबंधित भोगवटा धारकांना सुनावणीला बोलावण्यात आले. व दि. ०५-०७-०४ रोजी संबंधितांची सुनावणी घेण्यात आली. २५ न. भू. क्रमांकाच्या मिळकतीचे अभिलेख तपासले स. न. ५४ चे एकूण क्षेत्र ९ एकर आहे. त्यापैकी स्मशान ६३१४ चौ. मी. असून ५९८७ चौ. मी. भाडेपट्ट्याने दिलेले आहे. खाजगी १९१३३ चौ. मी. व लिज धारकाकडे २१९१.५ चौ. मी. जमीन आहेत्र ५ लोकांकडे भाडे जमीनीच्या व्यतिरिक्त जास्तीची जागा आहे. त्यांना मु. प्रा. अधिनियम १९४९ चे कलम १ (ब) अन्वये कारवाई सुरू केली आहे. कॅव्हेट दाखल करण्याचा सूचना दिलेल्या आहेत. उर्वरित १८ लोकांनी १३५४ फसली मध्ये लोकल फंड नोंदणीकृत खरेदी खत केले आहे. १९३६ मध्ये सरकारी लिलावात त्यांना मिळालेले आहे. १९६१ मध्ये त्यांना बांधकाम परवानगी व आकृषी परवानगी मिळालेली आहे. मालकी हक्काचे दस्ताऐवजी आहेत. ५० वर्षापासूनची कागदपत्रे तपासण्यात आले. विधीसल्लागार यांचे मार्फत उर्दूत असलेली कागदपत्रे भाषांतर करून तपासले. त्याची विधी ग्राह्यता तपासणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** या कामासाठी न्यायालयात वेगळे विधिज्ञ नियुक्त करावे. इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २३-०३-०४ रोजी तहकूब झालेल्या व दिनांक २४-०६-०४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४१ :**

कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या वार्षिक ब्लिचिंग पावडरच्या पुरवठ्यासाठी अंदाजपत्रक र. रु. १६,५००,००/- चे तयार करण्यात आले असून त्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त महोदय, यांनी दिनांक १७-०६-०४ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

आर्थिक वर्ष २००४-०५ च्या अर्थसंल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदी करिता एकूण ८५.०० लक्ष रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. (अर्थसंकल्प पृष्ठ क्र. १३७ बाब क्र ८४) वर्ष २००४-०५ मधील वार्षिक ब्लिचिंग पावडर खरेदी रुपये १६,५०,०००/- चे अंदाजपत्रक

स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे. कृपया प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जल शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या वार्षिक ब्लिचिंग पावडरच्या पुरवठ्यासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १६,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२ :**

कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता काढण्यासाठी आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसूची २००४-०५ नुसार र. रु. १४,४२,०००/- चे तयारकरण्यात आले असून या अंदाजपत्रकास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ०१-०७-०४ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

आर्थिक वर्ष २००४-०५ च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदी करिता एकूण ८५.०० लक्ष रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. वर्ष २००४-०५ मधील खरेदीसाठी रुपये १४,४२,०००/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जल शुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता काढण्यासाठी आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १४,४२,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३ :**

कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसूची २००४-०५ नुसार र. रु. १६,९७,१००/- चे तयार करण्यात आले असून या अंदाजपत्रकास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ३०-०६-०४ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

आर्थिक वर्ष २००४-०५ च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदी करीता एकूण ८५.०० लक्ष रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.(अर्थसंकल्प पृष्ठ क्र. १३७ बाब क्र. ४) वर्ष २००४-०५ मधील क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी रुपये १६,९७,१००/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

कृपया प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जल शुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी तयार करण्यात आलेल्या तयार करण्यात आलेल्या र. रु. १६,९७,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४ :**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार मौजे हर्सूल येथील स.क्र. १७९/ पै मिळकत धारक श्री. अवतार सिंग इंदिरसिंग सोधी यांच्या मिळकती मधून विकास योजना १५ मीटर व १२ मीटर रुंद रस्ते प्रस्तावित असून मिळकत धारकने उक्त विकास योजना रस्त्या खालील २२९८.२६ चौ. मी. क्षेत्र सोडून रेखांकन मंजुरी सन २००० मध्ये घेलेले आहे. त्यावेळी सदर रस्ता मिळकत धारकाने रस्त्याचा मोबदला अबाधित ठेवून महानगरपालिकेस हस्तांतरीत आलेले आहे.

तसेच मौजे ईटखेडा येथील गट क्र. ४२/पै. मिळकत धारक श्री. केवलसिंग सोधी यांच्या उक्त मिळकतीमधून मंजूर विकास ६० मीटर रुंद रस्ता मध्ये १५ मीटर रुंदीच्या भागाने १३५० चौ. मी. क्षेत्र बांधित असून उपक्त रस्त्याखालील क्षेत्र सोडून रेखांकनास मंजुरी सन १९९३ मध्ये घेलेले आहे. त्यावेळी अर्जदराने विकास योजना रस्त्याखालील क्षेत्राचा मोबदला अबाधित ठेवून महानगरपलिकेस हस्तांतर केलेले आहे.

उपरोक्त मिळकत धारकांनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ५१८३/०३ व ५१७९/०३ दाखल करून मोबदला रक्कम मागणी केली आहे. मा. उच्च न्यायालयाने प्रकरणात मोबदला निश्चित करणे बाबत आदेशित केले असता वरील दोन प्रकरणात खालील प्रमाणे मोबदला निश्चित करून मा. न्यायालयात सादर केले आहे.

| सर्व्हे क्रमांक | मिळकतधारकाचे नांव | सर्व वजावटी जाता मोबदला |
|---|---|---|
| १७९/पै. मो. हर्सूल | श्री. अवतारसिंग | रु. ६,९६,६००/- |
| गट क्र. ४२/पै | इंदरसिंग सोधी | रु. १,३९,७२५/- |
| | श्री. केवलसिंग सोधी | |

वरील प्रमाणे मोबदला निश्चित मा. आयुक्ताची व मा. स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. प्रकरण मा. उच्च न्यायालयात दिनांक २६-०६-०४ रोजी सुनावणी होवून वरील मोबदला सुनावणीच्या तारखेपासून तीन आठवड्यात म्हणजेच साधारणपणे जमा करणे बाबत मा. उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत.

सबब वरील प्रमाणे मोबदला रजिस्टार उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबादचा नावाने जमा करणे बाबत मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. काशिनाथ कोकाटे :** प्रस्तावित २२९८.२६ चौ. मी. क्षेत्र सोडून रेखांकनास २००० मध्ये मंजुरी दिलेली आहे असे नमूद केले. संबंधित जागा मालकास न्यायालयात जावे लागेल न्यायालयाच्या आदेशानुसार हा मोबदला देण्याचा प्रस्ताव समोर

मंजुरीसाठी ठेवला. हर्सूल येथील स. क्र. १७९/ पैकी किती जागा रेखांकनातून अंतर्गत रस्ते सोडणे आवश्यक होते ते सोडलेले आहेत का? परवानगी दिली ती तात्पुरती दिली आहे का? दिली असेल तर कशासाठी दिली. सध्या त्या जागेवर कशासाठी होता. निवासी किंवा वाणिज्य वापरासाठी परवानगी दिली आहे. खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** यात रु. ६,९६,६००/- व रु. १,३९,७२५/- एवढी रक्कम मा. आयुक्त यांनी स्थायी समितीच्या मंजुरीस अधिन राहून मा. न्यायालयात जमा करणेसाठी सादर केलेले होते. यात नमूद केल्याप्रमाणे २३-०७-०४ रोजी पर्यंत ही रक्कम मा. उच्च न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिलेले आहेत. सहा. संचालक नगररचना यांनी खुलासा करावा की, कशामुळे या व्यक्तीस न्यायालयात जावे लागले. रजिस्ट्रीचा खर्च वेगळा आहे का? संबंधित व्यक्ती न्यायालयात गेले. न्यायालयाच्या आदेशाची वाट प्रशासन बघत होते का?

**श्री. काशिनाथ कोकाटे :** विषय क्र. ४४ मध्ये मंजूर रेखांकनातील रस्ते व इतर बाबीच्या संदर्भात प्रस्ताव आहे. नकाशासह सभागृहात सादर करावा.

**मा. सभापती :** सहा. स. न. र. यांनी खुलासा करावा. संबंधिताची जागा किती. तो दस्तऐवज झालेला आहे का, रजिस्ट्रीचा खर्च नमूद नाही. परवानगी दिली ती तात्पुरती होती की, कायमस्वरुपी होती. हा सर्व खुलासा सभागृहाला अपेक्षित आहे.

**सहा. संचालक न. र. :** सदरील ले-आऊटला अंतीम मंजुरी पत्र क्र. २४१०/- २००० दि. ३१-१०-२००० अन्वये दिलेली आहे. त्या रेखांकनातील रस्ते व ओपन स्पेस मनपाकडे हस्तांतरीत झालेले आहे. जी परवानगी दिली ती निवासी वापर म्हणून दिलेली आहे. घरे वगैरे झालेले आहे.

**मा. सभापती :** अंतिम मंजुरी देतांना काही अटी होत्या का, इतकाच मोबदला अदा करावा म्हणून.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** निवासी वापरासाठी परवानगी दिली असे सांगण्यात आले परंतु तेथे सध्या कमर्शियल वापर होतो असे माझे मत आहे. संबंधित व्यक्ती न्यायालयात प्रकरण दाखल करण्याचे कारण काय? मनपाचे विधी सल्लागार आहे. त्यांनी न्यायालयासमोर काय मत मांडले?

**विधी सल्लागार :** याबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जी जागा घेतलेली आहे. व ले आऊट मंजूर झालेला आहे त्याचा मोबदला दिलेला आहे का अशी विचारणा करण्यात आली. परंतु मनपाने अद्याप मोबदला दिलेला नाही. आणि भूसंपादन प्रक्रिया सुरू झालेली आहे की नाही ही विचारणा करण्यात आली. त्यावेळी प्रक्रिया सुरू झालेली नाही म्हणून संबंधित व्यक्तीस मोबदला किती देता येईल याविषयी मा. न्यायालयाने विचारणा केली. नगर रचना विभागातर्फे न्यायालयात माहिती सादर करण्यात आली व मा. न्यायालयाने निर्देश दिले की, मनपाने या व्यक्तीची जागा घेतलेली असेल तर मोबदला देणे आवश्यक आहे. म्हणून तसे निर्देश दिले.

**मा. सभापती :** त्यास मोबदला देणे योग्य होते का, प्रशासनाचे मत काय? दोन दिवसांची मुदत शिल्लक आहे.

**विधी सल्लागार :** दि. २६-०२-२००३ रोजी संबंधिताना पत्र दिले आहे. दि. १८-०२-२००३ पर्यंत कोणताही रिप्लाय दिलेला नाही. २००३ पासूनची ही पक्रिया आहे. जागा मनपा वापरते असे त्या व्यक्तीने मत मांडले.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** १००% या प्रकरणात वेगवेगळे इंटरेस्ट आहे. असे असल्याशिवाय हे प्रकरण न्यायालयापर्यंत गेलेले नाही. संबधितास पैसे देणे गरजेचे होते तर का दिले नाही? तो व्यक्ती न्यायालयात कशासाठी गेले, का कोर्टात जावे लागले? मनपाने काय बाजु मांडलेली आहे. विधी सल्लागार व स. स. न. र. यांनी ठरविले असेल की, काम करायचे असेल तर न्यायालयात जा. मोबदला का दिला नाही. लेखी अहवाल येऊ द्या. वाणिज्य वापर करीत असेल तर उल्लंघन केले आहे. कोण वकील काम पाहतात.

**विधी सल्लागार :** ॲड. सोमण हे वकील म्हणून काम हाताळत होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** निवास वापरासाठी ले-आऊट मंजूर केला असेल व वाणिज्य वापर होत असेल तर ही बाब मनपाच्या वकीलांनी न्यायालयाचे निदर्शनास आणून दिली का? स्पष्ट उत्तर द्यावे.

**मा. सभापती :** ही रक्कम न्यायालयात जमा होणार आहे. मनपा कोणती बाजू मांडणार आहे. जमा करून न्यायालयामार्फत रक्कम देण्याची वेळ आली असेल तर मनपाला बाजू मांडावी लागणार की नाही?

**विधी सल्लागार :** नगर रचना विभागातर्फे सर्व माहिती देण्यात आलेली आहे. रक्कम न्यायालयात जमा करावयाची आहे. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकूण न्यायालयाचा निर्णय होईल.

**मा. सभापती :** ठिक आहे रक्कम जमा केल्यानंतर चांगले वकीला मार्फत न्यायालयात या प्रकरणात बाजू मांडण्यात यावी. विहित मुदतीत पैसे दिले नसेल व ती व्यक्ती न्यायालयात गेली असेल तर चूक मनपाची होते आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** ५५ मी. १२ मी. रस्त्यावरील जे मिळकत धारक आहेत. किती लोकांना पैसे देणे बाकी आहे. व एकच व्यक्तीला पैसे द्यावयाचे बाकी आहे. किती मिळकत धारक या रस्त्याने बाधित होतात. या सर्व प्रश्नांचा खुलासा होत नाही.

**सहा. संचालक न.र. :** प्रश्न डी.पी. रोड मावेजा देण्याबद्दलचा आहे त्या ले-आऊट मधील भूखंड वापर जे अनुज्ञेय आहे ते करता येते. या व्यक्तीने मावेजा देण्याबद्दल मागणी केलेली होती. लेखा विभागाकडे संचिका पाठविली आहे. आजपर्यंत या विभागात ती संचिका मिळालेली नाही. ले. आऊट मंजूर करून होतो. रस्ते हस्तांतर करतांना जे लोक जागा देवून मावेजा मागतात त्यांच्याबद्दल कार्यवाही करीत आहे.

**मा. सभापती :** १०० फुटाचा डी. पी. रस्ता असेल व एकाच व्यक्तीने मावेजाची मागणी केली इतरांना मावेजा दिला नाही तर त्यांना सुध्दा न्यायालयात जावे लागेल का? हा प्रश्न आहे.

**सहा. संचालम न. र. :** तपासणी करावी लागेल.

**मा. सभापती :** संपूर्ण प्रकरणांची आयुक्तांमार्फत चौकशी करून अहवाल द्यावा. न्यायालयात ताबडतोब पैसे भरावे दुसरे चांगले वकीलामार्फत न्यायालयासमोर बाजु मांडावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेण्यात यावी. न्यायालयास रक्कम भरणा केल्यानंतर मनपास ती रक्कम परत येणार नाही. कोणतेही सल्लागार दिले तरी मनपाच्या विरोधात निर्णय जावू शकतो. २३ तारखेला न्यायालयाने निर्णय दिला. २४ तारखेला स्थायी समितीची सभा झाली त्या सभेत प्रस्ताव का घेतलेला नाही?

**मा. सभापती :** १४-०७-२००४ पर्यंत मा. उच्च न्यायालयाने पैसे भरणा करण्योच आदेश दिलेले आहेत. याची चौकशी मा. आयुक्तांच्या मार्फत करण्यात यावी. जे कोणी दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. १४ जुलै पर्यंत पैसे जमा करून या प्रकरणातील वकील बदलून दुसरे वकीला मार्फत मनपाची बाजु मांडण्यात यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** चौकशी होत असताना ज्या ज्या सदस्यांना हरकती घ्यावयाची असेल त्यांचेकडून माहिती घेतली पाहिजे. स. सदस्यांना सुध्दा बोलविण्यात यावे.

**मा. सभापती :** चौकशी करीत असतांना स. सदस्यांना कुणाला मत मांडावयाचे असेल तर चौकशी अधिकारी यांनी स. सदस्यासंचे मत ऐकूण घ्यावे. त्यानंतरच निर्णय घेण्यात येईल. या प्रकरणात मनपाची चुक नसेल तर अपील करण्यासाठी अपील पिरियड आहे का तपासावे.

**विधी सल्लागार :** या प्रकरणाचा आणखी अंतीम निर्णय झालेला नाही. अंतीम निर्णय होईपर्यंत मा. उच्च न्यायालयात पैसे जमा राहतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजने नुसार मौजे हर्सूल येथील सर्वे क्र. १७९/ पै मिळकत धारक श्री. अवतारसिंग इंदिरसिंग सोधी यांचे मिळकतीतून १५ मीटर व १२ मीटर रुंद रस्त्याखालील बाधित २२९८.२६ चौ. मी. क्षेत्राचा मोबदला रक्कम रु. ६,९६,६००/- तसेच मौजे तसेच मौजे ईटखेडा येथील गट क्र. ४२/पै. मिळकत धारक श्री. केवलसिंग सोधी यांच्या मिळकतीमधून मंजूर विकास योजना ६० मीटर रुंद रस्ता मध्ये १५ मीटर रुंदीच्या भागाने बाधित १३५० चौ. मी. क्षेत्राचा मोबदला र. रु. १,३९,७२५/- मा. उच्च न्यायालयात रजिष्ट्रार, उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद या नावाने जमा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५ :**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मुंबई नाका, शरणापुर फाट्या लगत स्थलांतरीत करण्यासाठी मौजे मिटमिटा येथील गट क्र. ३१ मधील ५१ आर. क्षेत्र जमीन संपादन करण्याबाबत मा. आयुक्तांसमवेत जकता अधिक्षक, उप आयुक्त (म.) यांचेसह स्थळ पाहणी करून निर्णय घेण्यात आला आहे.

उपरोक्त जमीन संपादन करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७७ अन्वये खाजगी वाटाघाटीने संपादन करणेसाठी मिळकत धारकास द्यावयाचा मोबदला सर्व वजावटी जाता रुपये १२,८२,०००/- (अक्षरी बारा लाख ब्याऐंशी हजार रुपये फक्त) देयक होईल. तसेच खरेदी खतासाठी रुपये २,०४,०००/- (अक्षरी दोन लाख चार हजार रुपये फक्त) अपेक्षित आहे.

सध्या जकात नाका सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे नाशिक निर्मल राज्य रस्त्यावर आहे. महानगरपालिकेची जकात नाकासाठी स्वतंत्र स्वत:ची जागा आवश्यक असून ती शरणापुर फाट्याजवळ महानगरपालिका हद्दीजवळ मौजे मिटमिटा गट क्र. ३१ मधून जमीन संपादन केल्यास जकात चुकविणाऱ्यांवर नियंत्रण ठेवता येईल.

करिता वरील प्रमाणे गट क्र. ३१ चे मिळकत धारकाचे मालकी हक्क तपासून तसेच संबधित मिळकत धारकांचे अधिन राहून मोबदला देण्याबाबत व संपादित क्षेत्र खरेदी खत करून घेण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** फक्त एवढीच जमीन आहे का, आणखी जास्त संपादन करणार आहात. आणखी जास्त जागा लागते का ते पाहावे. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन ही जागा दाखविण्यात यावी. त्यानंतर जागा ताब्यात घेणे. मोबदला देणे इत्यादी कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई नाका शरणापुर फाट्यालगत स्थलांतरीत करण्यासाठी मौजे मिटमिटा येथील गट क्र. ३१ मधील ५१ आर. क्षेत्र जमीन खाजगी वाटाघाटीने संपादन करणेसाठी मिळकतधारकास द्यावयाचा मोबदला मिळकत धारकाचे मालकी हक्क तपासून तसेच संबंधित मिळकत धारकाचे संमतीस अधिन राहून सर्व वजावटी जाता रुपये १२,८२,०००/- (अक्षरी बारा लाख ब्याऐंशी हजार रुपये फक्त) देण्यास तसेच खरेदी खतासाठी रुपये २,०४,०००/- (अक्षरी दोन लाख चार हजार रुपये फक्त) च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तथापी जागा ताब्यात घेणे व मिळकत धारकास मोबदला देण्यापूर्वी सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन ही जागा दाखविण्यात यावी. त्यानंतरच पुढील कार्यवाही अनुसरावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६ :**

मुख्य पशु संवर्धन अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा पडेगांव कत्तलखाना (मोठी जनावरे करिता) व शहाबाजार कत्तलखाना (लहान जनावरांकरिता) कत्तल फि प्रति जनावर रु. ५/- प्रमाणे वुसली २००४-०५ करिता जाहिर लिलाव वर्तमान पत्राद्वारे प्रसिध्द करून जाहीर लिलाव दिनांक १४-०६-०४ रोजी उपआयुक्त (प्र.) यांच्या दालनात ठेवण्यात आला होता. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**१) शहाबाजार कत्तलखाना (लहान जनावारांकरिता)**

एकूण पाच व्यक्तींनी बोलीत भाग घेतला असता त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्री. अय्युब कुरेशी मोहम्मद सहाब यांची रु. २,८०,०००/- बोली बोलली आहे. जी. मागील वर्षाचे रु. २,३१,०००/- पेक्षा रु. ४९,०००/- ने जास्त आहे. त्यामुळे त्यांना या वर्षाचा लिलाव (मान्यतेपासून ३०-०६-०५) या कालावधीकरिता देण्यास हरकत नाही.

**२) पडेगांव कत्तलखाना (मोठी जनावरे)**

या लिलावाकरिता बोली बोलण्यासाठी दोन वेळा कोणीही आले नाही. मागील वर्षी मनपा तर्फे कत्तल ची फी वसुली करण्यात आली होती. जी रु. ८५,३२०/- तरी यावर्षी कोणीही बोली बोलण्यास आलेले नाही. करिता यावर्षी सुध्दा मनपाकडून कत्तल फि वसुल करण्यात येईल.

**संवाद :**

**श्री. भगवान रगडे :** औरंगाबाद शहरात दोनच कत्तल खाने आहेत का? टी. व्ही. सेंटर जाधववाडी पुंडलिकनगर भागात उघड्यावर जनावरांची कत्तल केली जाते. प्रस्तावात रु. ५/- प्रत्येक जनावराची फि वसूल करणार आहे. सविस्तर खुलासा देणे गरजेचे आहे.

**मा. सभापती :** यात ५ लोकांनी बोलीत भाग घेतला. श्री. मोहम्मद सहाब यांची सर्वात जास्त २.८० लक्ष बोली आहे. गत वर्षीपेक्षा जवळपास ५० हजार रुपये वाढून येत आहे. रु. ५/- प्रती जनावरामागे कत्तल फीस घेणार आहे का? खुलासा करावा.

**संचालक (प्रा. सं.) :** कत्तलखान्यात जनावरांची कत्तल केल्यास रु. ५/- प्रत्येक जनावरामागे फिस आकारणी होते. दर महिन्याला ३००० ते ३५०० इतकी संख्या होते.

**मा. सभापती :** त्या कत्तल खान्यावर होणारा खर्च व येणारे उत्पन्न यात तफावत आहे का? खुलासा द्यावा.

**संचालक प्रा.स. :** अस्थापनेवरील खर्च आहे. इतर जास्त खर्च येत नाही मनपाचे नुकसान नाही.

**श्री. मोहन मेघावाले :** अनाधिकृत उघड्यावर बकरे कत्तल करून विकतात त्यांचेवर काय कार्यवाही होते.

**मा. सभापती :** याशिवाय अनाधिकृत जे कुणी रस्त्यावर जनावरांची कत्तल करीत असेल त्यास प्रतिबंध करावा. त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करावी.

**श्री. भगवान रगडे :** नागरिकांना व्यवस्थित मांस मिळावे. शिक्का मारून कापणे काही लोक कापून ठेवतात. कोण जबाबदार आहे.

**मा. सभापती :** आपणांकडे पथके आहेत. त्यांचेमार्फत कार्यवाही केली जाते. आपणाकडे काही माहिती असेल तर देण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** आपले लोक जातात. पैसे खातात. तपासणी करीत नाही. अशा मांस विक्रेत्यांचे दुकान सील केले पाहिजे. नियमाने त्या विक्रेत्यावर कायदेशीर कार्यवाही झाली पाहिजे.

**संचालक (प्रा. सं.) :** एक पथक सध्या कार्यरत आहे. दुसऱ्या पथकाचा प्रस्ताव आहे. एक पथक शहरात नियमित फिरतीवर असते.

**मा. सभापती :** दोन पथके असावी म्हणून प्रस्तावित केलेले होते. आजपर्यंत कार्यवाही केलेली नाही. उघड्यावर मांस विक्री होत असेल तर पथक त्या ठिकाणी गेले पाहिजे. तसेच रात्रीच्या वेळी मोकाट कुत्रे पकडण्यात यावे मी ह्या संदर्भात पत्र दिलेले आहे.

**श्री. भगवान रगडे :** ज्या भागात डुकरे आहेत ते पकडण्यात येणार का नाही. मा. सभापतींच्या आदेशाचे पालन होत नाही. पुढील बैठकीत अहवाल येत नाही. नंतर पुन्हा वेळ दिला जातो.

**मा. सभापती :** सुट्टीच्या दिवशी लोक अनाधिृत बांधकाम करतात. कुणास तक्रार द्यावयाची झाल्यास प्रशासकीय विभाग बंद असल्याचे दिसून येते अशी माहिती हाती आलेली आहे. म्हणून यापुढे प्रशासकीय विभाग सुटीच्या दिवशी चालू असावा. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा पडेगाव कत्तलखाना मोठी जनावरे करीता व शहाबाजार कत्तलखाना (लहान जनांवाराकरिता) कत्तल फि प्रति जनावर रु. ५/- प्रमाणे वसुली २००४-०५ करिता जाहिर लिलावात **शहाबाजार कत्तलखाना (लहान जनावरांकरिता)** सर्वात जास्त बोली श्री. अय्युब कुरेशी मोहम्मद सहाब यांची रु. २,८०,०००/- बोली असल्याने त्यांना या वर्षाचा लिलाव (मान्यतेपासून ३०-०६-०५) या कालावधीकरिता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच **पडेगांव कत्तलखाना (मोठी जनावरे)** च्या लिलावात या वर्षी कोणीही बोली बोलण्यास आलेले नाही. म्हणून गतवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा मनपाकडून कत्तल फि वसुली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७ :**

उप आयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळ, सिध्दार्थ उद्यान वाहनतळ व पैठणगेट वाहनतळाच्या फि वसुलीसाठी कार्यालयातील निविदा सूचना क्र. ३ दि. २५-०५-०४ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द देण्यात येवून सिलंबद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

**१) संत एकनाथ रंगमंदिर :** बोली निविदा विक्रीच्या अंतीम तारखेस एकूण ५ कोऱ्या निविदा फार्म विक्री झाल्या व सिलंबद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण ३ सिलंबद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | देवेंद्र दौलतराव मोरे | रु. ५५५५/- प्रती माह |
| २) | कौतिक वसंतराव लहाने | रु. ५१२५ प्रती माह |
| ३) | आश्विन रत्नाकर दांडगे | रु. ३७७७/- प्रती माह |

सदर कामासाठी आधारभूत किंमत ही रु. ९०२० प्रतीमाह असा दर कार्यालयाने ठरविलेला आहे. परंतु प्रत्यक्षात तीनही निविदा धारकांनी आधारभूत रक्कमेपेक्षा फारच कमी दर दिलेले आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होईल. यासाठी फेर निविदा काढणे योग्य.

**२) सिध्दार्थ उद्यान वाहनतळ :** सदर वाहन तळासाठी कोरी निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ६ कोऱ्या निविदापत्रके विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेस एकूण ४ सिलंबद निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | कौतिक वसंतराव लहाने | रु. २५,१०५/- प्रती माह |
| २) | देवेंद्र मोरे | रु. २०,१२५/- प्रती माह |
| ३) | दत्तु पंढरीनाथ नलावडे | रु. १९,९९९/- प्रती माह |
| ४) | आश्विन दांडगे | रु. १५,०००/- प्रती माह |

सदरच्या वाहन तलावासाठी कार्यालयातर्फे आधारभूत रक्कम ही रुपये २४,४७५/- प्रतीमाह अशी देण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात प्राप्त निविदामध्ये सर्वात जास्त दर हा श्री. कौतिकराव वसंतराव लहाने यांचा असून तो दर रु. २५,१०५/- प्रती माह असा दिलेला आहे.

तरी सदर प्रकरणी श्री. कौतिक वसंतराव लहाने यांनी दिलेला दर रु. २५,१०५/- प्रती माह मान्यतेस्तव सादर.

**३) पैठणगेट वाहन वाहनतळ :** कोरी निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एक सिलबंद निविदा प्राप्त झाली ती श्री. शेख अय्युब शेख अफसर यांची रुपये १७६५/- प्रतीमाह अशी आहे.

सदर कामासाठी कार्यालयातर्फे रु. १७६५/- प्रतीमाह असा दर ठरविण्यात आलेला आहे. त्यामुळे श्री. शेख अय्युब शेख अफसर यांनी रु. १८००/- प्रतीमाह जो दर दिलेला आहे तो मान्य करणेस्तव.

करिता प्रकरण १,२, व ३ चे अवलोकन घेऊन प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंग मंदिर वाहनतळ, सिध्दार्थ उद्यानास वाहनतळ व पैठणगेट वाहनतळ या वाहन तळाच्या फि वसुलीसाठी प्राप्त झालेल्या निविदा नुसार **संत एकनाथ रंगमंदिर** वाहन तळाकरीता प्राप्त झालेल्या सर्वात जास्त दराची निविदा श्री. दौलतराव मोरे यांची ५५५५/- प्रतीमाह अशी असून कार्यालयाने ठरविलेल्या आधारभूत रक्कमेपेक्षा फारच कमी असल्याने फेरनिविदा काढण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**सिध्दार्थ उद्यान वाहन** तळासाठी प्राप्त झालेल्या निविदामध्ये सर्वात जास्त दर हा श्री. कौतिक वसंतराव लहाने यांच्या रु. २५,१०५/- प्रतीमाह या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व **पैठणगेट वाहनतळ** तळाकरिता प्राप्त झालेल्या श्री. शेख अय्युब शेख अफसर यांची रु. १८००/- प्रतीमाह या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात पान क्र. १२० वर अनुक्रमांक ६ अन्वये लिटल फ्लॉवर शाळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय या रस्त्याचे पुनडांबरीकरण्याच्या कामासाठी रक्कम रु. १० लक्ष तरतूद उपलब्ध आहे. त्यानुसार सन २००३-०४ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचीचा वार करून अंदाजपत्रक र. रु. ९,९९,९००/- तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रक प्रशासकीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लिटल फ्लॉवर शाळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय या रस्त्याचे पुर्नडांबरीकरणाच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,९९,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४९ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रुपये ६७.३० कोटी किंमतीची सिडको व विस्तारीत भागाची योजना महानगरपालिकेतर्फे राबविण्याचा धोरणात्मक निर्णय झाल्याने व त्या संदर्भात सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन पातळीवर पत्र व्यवहार सुध्दा झाल्याने योजना टप्पे निहाय बांधणीचा

कार्यक्रम आखण्यात आला. त्यानुसार सन २००४-०५ वर्षाकरिता उपरोक्त योजनेतील टप्पा १ साठी चालू वर्षात रुपये ७१४००/- लाखांची मागणी करण्यात आली होती या संकल्पाने नुसार शहराची सन २००६ ची पाणीपुरवठा गरज पूर्ण करणे संकल्पीत होते. परंतु सन २००४-०५ वर्षाकरिता प्रस्तावित अर्थसंकल्पात टप्पा-१ च्या रुपये ७१४.०० लाखाच्या मागवीचा समावेश केला गेला नाही. असे दिसून येते. सद्य:स्थितीत पाणी टंचाईच्या अनुषांगाने दिनांक ३०-०६-०४ रोजी मा. महापौर सौ. रुख्मीनीताई शिंदे, मा. उपमहापौर सौ. साधनाताई सुरडकर, मा. सभापती, स्थायी समिती श्री. नंदकुमारजी घोडेले, ना. विरोधी पक्ष नेता श्री. मीर हिदायत अली यांनी मा. आयुक्त महोदया सोबत पाहणी केली. त्यावेळी तेथे झालेल्या चर्चेत टप्पा १ ची कामे हाती घेणे कसे गरजेचे आहे. याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. उपस्थित मा. पदाधिकाऱ्यांनी प्रस्तावाबाबत सहमती दर्शविली याबाबत सविस्तर टिप्पणी / प्रस्ताव / पत्र मा. सभापती (स्थायी समिती) यांचेकडे अर्थसंकल्पात या रुपये ७१४ लाखांच्या निधीची तरतूद करण्यासाठी देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. तद्नुषांने टप्पा क्र. १ मधील कामांचा अहवाल खालील प्रमाणे सादर.

**टप्पा क्र. १ मध्ये खालील कामांचा समावेश करण्यात आलेला आहे.**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम (आकडे लाखात) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **भाग 'अ' यांत्रिकी कामे** | |
| १) | जायकवाडी जुने पंपगृह येथे ४०० अ.श. व्हि. टी. पंप बसविणे व चाचणी देणे (चार नग) (सर्व साहित्यासह) | १०२.०० |
| २) | जायकवाडी नवीन पंपगृह येथे ४९० अ.श. व्हि. टी. पंपाचे बाऊल असलेली नवीन पुरविणे, बसविणे व चचाणी देणे (चार नग) | ५०.०० |
| ३) | ढोरकीन बुस्टर पंपगृह येथे ३५० अश्व शक्तीचे नवीन पंप बसविणे व चचाणी देणे (सहा नग) फक्त पंप | ६०.०० |
| ४) | जुना फारोळा पंपगृह येथील ४७५ अश्व शक्ती पंपामध्ये सुधारणा करण्यासाठी रोटरींग असेब्लीं बदलविणे (सहा नग) | ६०.०० |
| ५) | पाईप लाईन वरील ग्राहकांसाठी पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी पंपींग मशिनरी पुरविणे बसविणे (दोन संच ५० अश्वशक्ती) | ३०.०० |
| ६) | नवीन फारोळा पंपगृह येथील ६५० अश्व शक्ती पंपाचे कॉलम पाईप बदलणे (सहा संच) | ३०.०० |
| ७) | पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा करण्यासाठी एक बाब पंप बसविणे (३०० अश्व शक्ती) नवीन फारोळा पंपगृह | ३५.०० |
| ८) | नवीन फारोळा पंपगृह येथील ३५० मी. मी. व्यासाचे स्लुस व्हॉल्व बदलविणे (सहा नग) | १०.०० |
| | **एकूण रुपये** | **४१७.००** |
| | **भाग 'ब' यांत्रिकी कामे** | |
| | | |
| १) | आपतकालीन पाणी पुरवठा योजने करिता पानबुडे पंप (Sump Pump) पुरविणे उभारणी करणे व चाचण देणे | ६५.०० |
| | **ब) एकूण रुपये** | **६५.००** |
| | **भाग 'क' स्थापत्य कामे** | |
| १) | जायकवाडी उद्भव ते फारोळा दरम्यान जलवाहिनीवरील टाअर व्हॉल्व्ह बदलणे व इतर संलग्न करणे. | २६.०० |
| ०२ | फारोळा जलशुध्दीकरण केद्र येथे ६ फिल्टर बेडची ३ भारणी करणे, टाअर व्हॉल्व बसविणे व इतर संलग्न कामे. | ६१.५० |

| | | |
|---|---|---|
| ०३ | नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक दरम्यान १२०० मी. मी. व्यासाचे पाप बत्स्फ्लॉय व्हॉल्व व ९०० मी. मी. व्यासाचे दोन बटरफ्लॉय व्हॉल्व बदलणे व इतर संलग्न कामे. | ३९.५० |
| ०४ | रस्त्यातील पाणी ग्राहकांकरिता स्वतंत्र जलवाहिनी टाकणे. | १०५.०० |
| | **ब) एकूण रुपये** | **१३२.००** |

औरंगाबाद शहर वाढीव पाणी पुरवठा योजना अंतर्गत सन २००४-०५ करिता पाणी विभागाने वाढीव पाणीपुरवठा विभागाने वाढीव पाणीपुरवठा योजनेतील टप्पा -१ संदर्भात रुपये ७१४.०० लाखाची मागणी करण्यात आलेल्या रक्कम रुपये ७१४.०० लाखाचा समावेश नाही. याबाबत स्थायी समितीच्या अर्थसंकल्पीय बैठकीत सविस्तर निवेदन समितीच्या अर्थसंकल्पीय बैठकीत सविस्तर निवेदन कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी केले होते. परंतु ही बाब कोणीही गांर्भीर्याने घेतली नाही.

पाणी पुरवठा विभागाने येत्या वर्षासाठी किमान व आवश्यक तेवढाच निधी मागितला होता व त्यासह वाढीव पाणी पुरवठा योजनेचा टप्पा क्र. १ साठी रुपये ७१४.०० लाखाची मागणी केली होती. परंतु टप्पा १ संदर्भात मागणी विचारात घेतली व ही असे दिसून येते, च्यामुळे टप्पे बांधणी संकल्पन पूर्णपणे विस्कळीत होईल तसेच जर त्या त्या वेळी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या टप्प्याची पूर्तता न झाल्यास रुपये ६७.३० कोटीची योजना महानगरपालिका स्वतः बांधू/ राबवू शकेल किंवा नाही याबाबत संभ्रम निर्माण होईल. विनंती की सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात किमान ७१४.०० लाखांचा वाढीव निधी टप्पा-१ करिता कोठल्याही परिस्थितीत उपलब्ध करून द्यावा लागेल. नसता शहराचे पाणी पुरवठ्यातील संकल्पन व नियोजन पूर्णपणे ढासलेले यात शंकाच नाही. कारण आज कसे बसे चालू असलेले पंप पूर्णपणे आयुष्य मर्यादा संपल्याने बंद घेण्याच्या मार्गावर आहेत. सध्याच्या पंपाव्या वारंवार दुरुस्त्यामुळे तसेच वारंवार बिघाड घेण्यामुळे पाणी पुरवठ्यावर विपरीत परिणाम होत आहे. या पंपाच्या बदला संदर्भात टप्पा-१ मध्ये समावेश करण्यात आला असून पाणी परिणाम १० ते १५ द. ल. ली वाढविण्याचे नियोजन आहे. नसता शहराचे पाणी पुरवठा नियोजन पूर्णपणे ढासळेल. आणि अपुऱ्या पाणी प्रभागामुळे शहर वासीयांचे हाल होतील. व जनक्षोम उसळून येईल व त्यास पाणी पुरवठा विभाग जबाबदार राहणार नाही. असे नम्रपणे नमूद करीत आहे. कृपया या प्रकरणी गांर्भीयाने विचार घेणे गरजेचे आहे. तरी शहराची भविष्यातील पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता टप्पा-१ करिता रुपये ७१४.०० लाख एवढा अतिरिक्त निधी उपलब्ध करून द्यावा ही विनंती. या मागणी केलेल्या ७१४.०० लाख रुपये निधीमध्ये नवीन आपत्कालीन योजना (जर यावर्षी पावसाचे आगमन जुलै २००४ अखेर लांबले तर) राबविण्याचे नियोजन आहे. कारण सध्याची आपत्कालीन योजना कुचकामी ठरत असून पूर्ण क्षमतेने चालेल याची काहीच खात्री नाही. कारण ही आपत्कालीन योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाने येतात व उन्हाळ्यात त्यांची पुन्हा उभा ारणी करण्यात येते. या प्रक्रियेत मशिनरीचे नुकसान झाले आहे. बसविण्यात आलेले पंप व मोटारी वेगवेगळ्या क्षमतेचे आहेत तसेच वेगवेगळ्या बनावटीचे / प्रकारचे आहेत. त्यामुळे अपेक्षित पाणी परिणाम मिळण्यास अडचणी येत आहेत.

तरी वरील सविस्तर विवेचन विचारात घेता रुपये ७१४.०० लाख एवढा अतिरिक्त निधी अर्थसंकल्पात उपलबध करून देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** या प्रस्तावाच्या अनुषंगाने एवढी मोठा निधी कसा उभारता येईल या संबंधी खुलासा होणे आवश्यक आहे.

**काशिनाथ कोकाटे :** ७१४ लक्षचा प्रस्ताव समोर मंजुरीसाठी ठेवलेला आहे. जायकवाडी येथून होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या संदर्भात या सभागृहात दोन तास चर्चा झालेली होती. कार्यकारी अभियंता (पाप) यांनी यापूर्वी टिप्पणी दिलेली होती. त्यास मान्यता सुध्दा दिलेली होती. रक्कम किती असावी मी वृत्तपत्रात वाचले मला माहिती आहे. शहराला लागणारा वाढीव पाणी पुरवठा म्हणून सन २००४-०५ साठी ७१४ लक्षची तरतूद करण्याची मागणी केलेली होती. ६७ कोटीच्या योजनेचाच एक भाग म्हणून यावर्षी काम करणार होते. ७१४ लक्षाची अर्थसंकल्पात समावेश केला नाही. कार्यकारी अभियंता यांना सादर केलेली टिप्पणी मंजूर केलेली होती. परुं त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. या सभागृहात चर्चा होवून निर्णय दिलेला होता. सर्वसाधारण सभेत सुध्दा त्यावर चर्चा झालेली होती. शहरात पाणी येण्याची सध्याची क्षमता १६० एमएलडी आहे. विद्युत उपकरणात बदल आवश्यक आहे. पाण्याची वाढती मागणी होणार आहे. हर्सूल तलावातील पाण्याचे प्रमाण कमी होत आहे. या सर्व बाबी समोर ठेवून टिप्पणीस मंजुरी दिलेली होती. म्हणून पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी ७१४ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करण्याची अत्यंत गरज आहे. हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा निगडीत प्रश्न आहे. ४१४ लक्षच्या प्रस्तावास मान्यता द्यावी. प्रस्ताव मंजूर करावा इतर कामातून तरतूद वळती करावी लागेल. कोणत्या प्रकारचे पाईप आसावे. त्याचे स्वेसिफिकेशन हे डी. एन आर. मध्ये आहे का. शहरी व ग्रामीण भागासाठी कोणते असावे? त्याचे रुल्स असतात त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. खुलासा घेण्यात यावा.

**मा. सभापती :** टप्पा क्र. १ म्हणून जी ६७ कोटीची योजना आहे त्यासाठी ७१४ लक्ष खर्च यावर्षात अपेक्षित आहे.

**कार्य अभियंता (पापु) :** स.स. श्री. कोकाटे यांनी कोणते पाईप वापरण्यात येतील याचा खुलासा मागितला आहे. त्यापूर्वी सर्वसाधारण सभेत होता त्याचा खुलासा मागितला आहे. त्यापूर्वी सर्वसाधारण सभेत होता त्याचा खुलासा करण्यात येत आहे. शहरी ग्रामीण भागासाठी वेगवेगळी जलवाहिनी टाकावी लागते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या डी. एस. आर. प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत सी.आय. व डी आय पाईप वावरावे. ए. सी. पाईप वापरू नये अशा सूचना आहेत. सी.आय.डी. आय चे पाईप विचारात घेवून अंदाजपत्रक रक्कम जास्त लागेल. ते पुरणार नाही. सुमारे निम्मे काम होईल. ए. सी. पाईप आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. परंतु जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने वापरू नयेत

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पी. व्ही. सी. पाईप आणखी वेगळे असेल. सिडको भागाचा पाणीपुरवठा १९८४ साली हस्तांतरीत केला सी.आय. पाईप हस्तांतरानंतर सिमेंट पाईप टाकले का बदलले? महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या नियमानुसार निविदा निघते. अंमलबजावणी का नाही. त्या जल वाहिनीचे आयुष्यमान किती आहे. बदल करता येतो का? या बाबतीत खुलासा होवून त्यावर सविस्तर अशी चर्चा होणे गरजेचे आहे. कमी दरात पाईप मिळताच म्हणून पाईप घ्यायचे का? सांगोपाग विचार करूनच निर्णय घ्यावा. मनपाचा फायदा कशामुळे होवू शकतो याकडे लक्ष देवून खरेदी करण्याची कार्यवाही व्हावी व नियमाचं पालन करण्याची गरज आहे.

**मा. सभापती :** संबधित अधिकारी यांनी तशी टिप्पणी सभागृहात द्यावी ए. सी. पाईप वापरण्याबाबत निर्देश काय आहे. क्लास पाठवून वापरू शकतो. पर्याय शोधा. आर्थिक परिस्थिती बघता तसा निर्णय घ्यावा लागणार आहे. टिप्पणी घ्यावी. आर्थिक परिस्थिती पाहता निर्णय घेणार आहोत.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** परिस्थितीवर अवलंबून आहे.

**मा. सभापती :** खोजी जास्त असेल तर निर्णय घेण्यात येईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** लोखंडी पाईप घेण्याचे आपण आदेश द्यावे.

**मा. सभापती :** सभागृहाच्या संमतीने बदलण्यात येतील. काही भागासाठी लोखंडी पाईप घेण्याचा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. खर्च करण्याची गरज आहे का. श्री. पोहणीकर यांचा वेळ घेवून सल्ला घेण्यात यावा. शाह कन्सल्टचे निवृत्त अभियंता यांचेसह बैठक ठेवणार होतो. त्याचे मार्गदर्शन कधी घेणार. सध्या ते जिवेदमला गेले आहेत. ही बाब प्रशासनाने गांभीर्याने घेवून ४१४ लक्ष निधी कसा उपलब्ध करणार आहे?

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सभापतींना अधिकार दिले. त्यांनी त्यांचे स्तरावर प्रशासनास आदेशित करावे.

**मा. सभापती :** हा विषय मंजूर करण्यात येत असून तरतूद कशी उपलब्ध करता येईल याबाबत चर्चा करून सभागृहात निर्णय घेतला जाईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००४-०५ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठ्याशी संबंधी टप्पा क्र. १ मधील समाविष्ट असलेल्या भाग 'अ' 'ब' आणि 'क' मध्ये दर्शविण्यात आलेल्या एकूण १४ कामांनी आणि ही कामे करण्याकरिता लागणारी एकूण रक्कम रु. ७१४ लाख च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या कामाकरिता लागणारी आर्थिक तरतूद सभागृहाच्या संमतीने विचार विनिमय करून उपलब्ध करून देण्यात येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** स. सदस्यांकडून अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे तसेच विविध कामासाठी सुधारित उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने सन्माननीय तरतूद उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने सन्माननीय सदस्याकडून वॉर्ड क्र. ४५ मधील लिंगायत स्मशानभूमी विकसित करणे ऐवजी एन-११ मनपा शाळेजवळील परिसराचे सौंदर्यीकरण करणे, वॉर्ड क्र. ४५ मधील हडको एन-११ स्मशानभूमी विकसित करणे ऐवजी एन-११ मनपा शाळेजवळील दत्तजी भाले सभागृहाचे सौंदर्यीकरण करणे वॉर्ड क्र. ४० जयभीमनगर स्लम भागात डांबरी करणे ऐवजी मुख्य रस्त्यावर द्वारगेट करणे साईनगर उद्यनातील खोलीत वाचनालयाऐवजी व्यायाम शाळा सुरू करणे. पहाडसिंगपुरा येथील रस्तयाचे खडीकरण करणेच्या कामासाठी ७ लाख ऐवजी १५ लाख तरतूद करणे व सिध्दार्थ उद्यानातील जलतरण तलावाचे देखभाल दुरुस्तीचे कामात नवीन फायबर शीट बसवण्यिाचे काम समाविष्ट करून रु. ४ लाख ऐवजी रु. ६ लाखाची तरतूद करणे व वाढीव रक्कम तांत्रिक दृष्ट्या २६ होणाऱ्या कामातून व बचतीतून वाढीव तरतूद उपलब्ध करणे या प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देण्याचा निर्णय होते.

**निर्णय :**

सन २००४-०५ च्या अर्थसंकल्नात समाविष्ट असलेल्या कामाचे लेखाशिर्षात बदल करणे काही कामांसाठी असलेली तरतूद अपुरी असल्याने सुधारित आर्थिक तरतूद करणे संबंधाने ज्या कामाकरिता सुधारित वाढीव आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. अशा कामांकरिता अतिरिक्त शहर अभियंता यांनी तांत्रिकदृष्ट्या होणारी कामे तसेच इतर कामाचे होणाऱ्या बचतीमधून वाढीव तरतूद उपलब्ध करून या कामाकरिता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव अर्थसंकल्पातील तरतूद | सुधारित कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतूद |
|---|---|---|
| ४५ | वॉर्ड क्र. ४५ मधील लिंगायत स्मशानभूमी विकसित करणे रु. ५.०० लक्ष (पृष्ठ क्र. ११७) | एन-११ येथील मनपा शाळेजवळील सभागृहाच्या परिसराचे सौंदर्यीकरण करणे रु. ५.०० लक्ष |
| ४५ | वॉर्ड क्र. ४५ हडको एन-११ स्मशानभूती विकसित करणे रु. ४.०० लक्ष (पृष्ठ क्र. ११७) | एन-११ येथील मनपा शाळेजवळील दत्ताजी भाले सभागृहाचे सौंदर्यीकरण करणे रु. ४.०० लक्ष |
| ४० | प्रभाग क्र. ४० जयभिमनगर स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करणे रु. २.०० लक्ष (पृष्ठ क्र. १११) | प्रभाग क्र. ४० जयभिमनगर येथे मुख्य रस्त्यावर द्वारगेट करणे रु. २.०० लक्ष |
| ५२ | साईनगर उद्यानात बांधलेल्या खोलीमध्ये वाचनालय सुरू करणे रु. १.५० लाख (पृ.क्र.) | साईनगर उद्यानातील खोलीमध्ये वाचनालय ऐवजी व्यायाम शाळा सुरू करणे रु. १.५० लाख |
| | पहाडसिंगपुरा भागातील स. न. ४६ व ९८ मधील रेखांकनातील गाडी रस्त्याचे खडीकरण करणे रु. ७.०० लाख (पृष्ठ क्र. १३३) | पहाडसिंगपुरा भागातील स. न. ४६ व ९८ मधील रेखांकनातील गाडी रस्त्याचे खडीकरण करणे रु. १५.०० लाख |
| | सिध्दार्थ उद्यान येथील पोहण्याचा तलावाचे देखभाल दुरुस्ती व रंगरंगोटी रु. ४.०० लाख (पृष्ठ क्र. १४४) | सिध्दार्थ उद्यान येथील पोहण्याचा तलावाचे देखभाल दुरुस्ती व रंगरंगोटी करणे व नवीन फायबर शीट बसविणे रु. ६.०० लाख |

"राष्ट्रगितानंतर" सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २१-०७-०४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक २१.०७.२००४ मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी १२.३५ वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| **१)** | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | स. सदस्य |
| **२)** | श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| **३)** | श्री. शे. इलियास किरमाणी | -//- |
| **४)** | श्रीमती जयश्री किवळेकर | -//- |
| **५)** | सौ. शाहिन जफर महेमुद जफर | -//- |
| **६)** | श्री. प्रल्हाद गणपतराव निमगांवकर | -//- |
| **७)** | श्री. मोहन मेघावाले | -//- |
| **८)** | श्री. मधुकर दामोधर सावंत | -//- |
| **९)** | श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| **१०)** | सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान | -//- |
| **११)** | श्री. सोपान भाऊराव पारे | -//- |
| **१२)** | श्री. भगवान दगडूजी रगडे | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती :** अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** चर्चेला सुरुवात करावी. नंतर विषयपत्रिका घेण्यात यावी. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात जी कामे नमूद केलेली होती त्यातील बरीचशी कामे वगळण्यात अलेली आहेत. ६ कोटी बदल्लचा अधिकार दिला होता.

**मा. सभापती :** आपण स्थायी समितीची सभागृह होतात आपणच अर्थसंकल्पात मंजूर करून मा. महापौरांकडे दिलेला आहे. मा. महापौरांना आपणच सर्व अधिकार दिले. हा विषय सर्वसाधारण सभेच्या संबंधित आहे. जर लेखाशिर्ष बदलायचे असेल तर करून घेता येईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** १६७ कोटीची पाणी पुरवठा पाईप लाईनच्या योजनेतील तरतूद कमी केली. इतर अनेक कामे कमी केलेली आहे.

**श्री. जयश्री किवळेकर :** मा. सभागृहाने अर्थसंकल्पात उद्दिष्टात जी वाढ केलेली होती त्यात सर्वच अधिकार दिलेले नव्हते.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सर्वच अधिकार सर्वसाधारण सभेला दिले तर स्थायी समितीचे अधिकार काय व अर्थसंकल्प आणण्याची गरज नाही का अर्थसंकल्प सादर केला जातो.

**मा. सभापती :** आणखी काही फेरबदल करायचे असतील तर हे सभागृह सक्षम आहे. तसा बदल करता येईल. स. सदस्यांनी तसे सुचवावे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** ५-६ कोटीचे उद्दिष्ट वाढविले. त्यात कमी जास्त करण्याचे अधिकार दिले होते. कामे करीत करण्याचे नाही.

**मा. सभापती :** तसा रितसर कामे टाकण्याचा प्रस्ताव मांडावा. मागणी करावी. सर्वसाधारण सभा सक्षम आहे. मा. महापौरांनी जे बदल केले तो त्यांनी त्यांचा अधिकार वापरला. त्यांना सभागृहाने अधिकार दिलेले होते.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** इतरही ३-४ कोटीची कामे कमी करण्यात आली. त्यात सिध्दार्थ उद्यान विककसित करणेसाठी तसेच महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठी १० लक्ष व संत एकनाथ रंगमंदिर येथे संत एकनाथ महाराजाच्या पुतळ्यासाठी २.३२ लक्षची तरतूद होती. तसेच धुत हॉस्पिटल समोरील चौकात अशोक स्तंभ उभारणार होतो. त्यांचे बजेट कमी करण्यात आले हे बरोबर नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** हा विषय सर्वसाधारण सभेच्या संबधितात येतो.

**(याच वेळी स. सभासद मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)**

**मा. सभापती :** मोठमोठ्याने कोणही बोलू नये. सर्वांचा प्रश्नाचा खुलासा होईल.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** स्थायी समितीचे अधिकार का कमी करण्यात आले. कामे कमी करण्याचे अधिकार मा. महापौरांना दिलेले नव्हते.

(याच वेळी स. सदस्य श्री. भाऊसाहेब ताठे हे अर्थसंकल्प सभागृहात फाडून फेकतात असा बदल करून कामे कमी करणे योग्य नाही. असे मोठमोठ्याने बोलतात.)

**श्री. मधुकर सावंत :** मा. महापौरांना उद्दिष्ट वाढविले ते कमी जास्त करण्याचे अधिकार दिले होते. सर्वच फेरबदल करण्याचे अधिकार दिलेले नव्हते.

**मा. सभापती :** मुद्देसुद बोलावे उत्तर अधिकाऱ्यांकडून घेतले जातील.

**श्री. संजय शिरसाठ :** सभापतींना कचाट्यात आणण्याच्या स. सदस्य प्रयत्न करीत आहेत हा विषयाचा सभागृहाचा नसतांना पुन्हा-पुन्हा त्याच विषयावर चर्चा होत आहे. वेठीस धरीत आहे. मा. महापौरांनी अर्थसंकल्नात मंजुरी दिली आहे. सर्वसाधारण सभेत तो विषय चर्चेला द्यावा.

**मा. सभापती :** एका वेळी एकाच सदस्यांने बोलावे अशी विनंती आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** गेल्या सतत चार वर्षापासून आपण मनपाचे सदस्य आहेत. प्रत्येक स. सभासद जबाबदारी बोलतात. यात शंका घेण्याचे कारण नाही. आताच उल्लेख केला. शिवसेना-भाजपा मिळून या मनपा मध्ये सत्ता आहे. याची सर्व कल्पना सदस्यांना आहे. गेल्या चार वर्षात शासनाकडून या मनपास जेवढ्या मोठ्या प्रमाणात अनुदान मिळवयास पाहिजे होते ते मिळालेले नाही. चांगले प्रस्ताव या मनपाकडून शासनाकडे गेले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी मराठवाडा पॅकेज म्हणून देण्याची घोषणा केली. हे शहर मराठवाड्याची राजधानी आहे. या सर्व ठिकाणी सर्व मंत्री तसेच मोठमोठे अधिकारी जात-ये असतात. असे असताना देखील जे काही सन १९९५-२००० मध्ये युती शासनाच्या काळात नागपुर साठी करोडो रुपयांचे बजेट (पॅकेज) देण्यात आले होते. तेथील सर्व जनतेला दिलासा मिळावा हा त्या भागचा दृष्टीकोण होता. हे शहर मराठवाड्याची राजधानी असतांना देखील येथे पाण्याचा प्रश्न गंभीर असतांना देखील अनेक योजना घोषित केल्या परंतु सर्व योजना हवेतच विरल्या मराठवाडा पॅकेजमध्ये फक्त या शहरासाठी ४ कोटी रुपये देण्याचे मान्य केले. व त्याची सुध्दा परस्पर विल्हेवाट लावण्याचे प्रयत्न महाराष्ट्र सरकारने केलेला आहे. जे दरवर्षात १० कोटी प्रत्येक वर्षात देवू केले होते. त्यापैकी ५ कोटी देऊ केले. त्यातुनही २ कोटी रुपये सार्वजनिक

बांधकाम खात्याला वळती करण्यात आलेले आहेत. फक्त एकच रोड जो जळगांव टी. पॉईटला जळगांव रोड सुशोभिकरण करण्यास ते वापरण्यात आले. खरी अडचण आहे ती शासनाच्या अनुदानाची आहे. त्याची मागणी झाली पाहिजे. आताच मत व्यक्त केले. बातम्या काही येत राहतील थोडक्यात बोललो तर जास्त मजकूर येवू शकतो. आपल्या बाजुने बातम्या आल्या तर आनंद होता परंतु थोड्याफार प्रमाणात निगेटिव्ह आल्या तर ते सुध्दा सहन करण्याची क्षमती पाहिजे. इतर चर्चा न करता निश्चितपणे विषय पत्रिकेला अनुसरून चर्चा केली पाहिजे. अर्थसंकल्पात ज्या काही दुरुस्त्या करायच्या असतील त्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार या सभागृहाला आहे जी कामे सुटलेली असतील ती आपण सर्व सदस्यांनी सुचवावी. स. सदस्यांची चर्चा केली तरी सभापतींनी तोडगा काढला पाहिजे. शेवटी आपण जनतेची विकास कामे करण्यासाठी येथे आलेलो आहोत. वस्तुस्थिती समोर ठेवलेली आहे. सर्वांना विनंती करेन अर्थसंकल्पात जी कामे वगळलेली असतील संत एकनाथ महाराज यांचा पुतळ्यासाठीची तरतूद वगळली नाही. माझ्या मते तेथे पुतळ्याचे उद्घाटन झाले किंवा होईल. तसेच महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याची कार्यवाही चालू आहे. बजेट ठेवले असेल ठिक आहे. नेसल तर ठेवण्यात यावे. चांगले नियोजन करावे. चांगले काम करावे. अर्थसंकल्पातील सर्व कामे व्हावी अशी विनंती आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** जी कामे अर्थसंकल्पातून कमी करण्यात आली ती कमी करण्यात येऊ नये. सर्व समाविष्ट करावीत.

**मा. सभापती :** बदल करण्याचे अधिकार सभागृहाला आहेत. सभागृहात प्रस्ताव येवू द्यावा. हे सभागह सक्षम आहे. नवीन आणखी काही कामे आवश्यक वाटत असतील ती सुध्दा घेण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. त्यास मान्यता दिली जाईल.

**श्री. भगवान रगडे :** सन २०००-०१ पासून अर्थसंकल्पात माझ्या वॉर्डात ब्रिजवाडी भागात वाचनालय होण्यासाठी तरतूद ठेवण्यात आली होती. सभागृहाच्या कामाची पध्दत व प्रशासनाच्या कामाच्या पध्दतीत सुधारणा होणे गरजेचे आहे. काम होईल न होईल तो प्रश्न वेगळा आहे. माझ्या वॉर्डात ब्रिजवाडी येथे वाचनालय होण्यासाठी तरतूद ठेवली. नगररचना मालमत्ता विभागाचे अभिप्राय आले. ज्या ठिकाणी मनपा शाळा आहे. तेथेच लागून २२ लक्षचे नाला संरक्षित भिंत बांधकाम असून मा. आमदार बसैये बंधु यांचे निधीतून बांधकाम झालेले आहे. रु. ८.५० लक्षचे शौचालय बांधण्यात आले. हे सर्व असतांना त्याच भागात वाचनालयासाठी निश्चित केलेली जागा नगररचना विभागाकडून जागा मनपाची नाही म्हणून म्हटले जाते. मनपाची शाळा आहे. ती जागा आजही ७/१२ वर मालकी हक्कात नोंद नाही. मनपाच्या मालकीची नाही. तर शाळा कशाच्या आधारे बांधली आहे. वाचनालयासाठी तरतूद केलेली होती मी वारंवार सभागृहात मुद्दा मांडला. त्यावर इमारत बांधकामासाठी बजेट तरतूद नव्हती असे उत्तर मिळाले. परंतु त्याच वर्षी माजी महापौर विकास जैन यांचे वॉर्डात बहुउद्देशीय हॉल होता. माझ्या वॉर्डात वाचनालय का झाले नाही? त्यावर मा. आयुक्त यांनी १५ दिवसात निविदा वॉर्डात असे उत्तर दिले होते. त्यास ८ महिने झाले वाचनालयाचे काम तर झालेच नाही. उलट या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातून ते

वगळण्यात आले. हा खोड्याळपणा कोणी केला. का काम कमी करण्यात आले याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सकारात्मक अभिप्राय दिलेले आहेत का. नगररचना विभागाचे अधिकाऱ्यांनी खुलासा करावा तेथे शाळा, शौचालय सभागृह आहे.

**सहा. संचालक न. र. :** जेथे वाचनालय बांधावयाचे त्या जागेची मोजणी करावी लागेल. औरंगाबाद शहराची वाढीव हद्दिची जी विकास योजना आहे. यामध्ये स. न. / गट नं. च्या हद्दित मोठी तफावत आहे. यापूर्वी त्या भागात शाळा, शौचालय, सभागृह बांधलेले आहे. या बद्दल मी काही बोलणार नाही. वाचनालय बांधकाम करण्याच्या संदर्भात संचिका नगर रचना विभागात आलेली होती. सुकृत दर्शनी असे दिसते की, नाल्याच्या बाजूला असलेली जागा ही विकास योजनेत रस्त्यासाठी प्रस्तावित आहे. प्रस्तावित जागा बाधित होईल असे वाटते. त्यासाठी अगोदर मोजणी करून घ्यावी लागेल.

**मा. सभापती :** ती जागा रस्त्याने बाधित होत असेल तर बांधकाम करता येणार नाही. असे अधिकाऱ्याचे मत आहे. परंतु जागा बदलून अभिप्राय घेता येईल.

**श्री. भगवान रगडे :** सभागृहात अधिकारी खोटे बोलतात. त्या ठिकाणी एकूण १०० गुंठे (अडीच एकर ) जागा आहे. अडीच एकर जागेत कोठेही वाचानालय होवू शकते. सभागृह व शौचालय यामध्येही वाचनालयाची जागा येते. त्यामुळे अडचण येणे शक्य नाही. अधिकारी दिशाभूल करतात.

**सहा. संचालक न.र.** : शाळा सभागृह शौचालय बांधकाम करतांना नगर रचना विभागाचा अभिप्राय घेतला होता. किंवा काय तपासावे लागेल सदर जागा विकास योजनेत बाधित होते काय तपासावे लागेल. त्यामुळे अभिप्राय देवू शकत नाही.

**मा. सभापती :** विकास योजना रस्ता सोडून दुसऱ्या ठिकाणी वाचनालय बांधण्याबाबत प्रस्तावित करावे. तसा अभिप्राय देण्यात यावा.

**सहा. संचालक न. र. :** तपासून पाहतो.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** अधिकारी हे सभागृहात समाधानकारक उत्तर देत नाही.

**मा. सभापती :** अडीच एकर जागा आहे व वाचनालयाची जागा रस्त्याने बाधत होत असेल तर दुसऱ्या ठिकाणी बांधण्याबाबत सकारात्मक टिप्पणी सादर करावी. त्यानुसारच अंदाजपत्रक तयार करता येईल. सहा. संचालक नगररचना यांनी सकारात्मक अभिप्राय दिले तर आपण विचार करू.

**श्री. भगवान रगडे :** संबंधित अधिकारी यांना प्रत्यक्ष त्या ठिकाणी मी घेवून गेलो होतो. ज्या शाळा, सभागृह, शौचालय बांधकाम केले ते पाडणार आहात का? नारेगाव भागात स्मशानभूमी आहे. रस्ते झालेले आहे. अर्थसंकल्पात कामे नमूद होती ती वगळण्यात आलेली आहे. माझ्या वॉर्डातील एकही काम घेण्यात आलेले नाही.

**मा. सभापती :** जी कामे घ्यावयाची किंवा जी वगळण्यात आली अशा कामाचा प्रस्ताव आपण ठेवावा. वाचनालयासाठी अधिकाऱ्यांचा अभिप्राय येईल. त्यानुसार त्या कामासाठी तरतूद करण्यात येईल.

**श्री. भगवान रगडे :** ब्रिजवाडी येथे मोकळ्या जागेवर दगडाची भिंत बांधण्यात यावी तसेच वसैय्ये बंधुचे निधीतील सभागृहास व त्या जवळील मोकळ्या जागेस संरक्षित भिंत बांधण्यात यावी. ब्रिजवाडी येथे स्मशानूभमीत शेड बांधण्यात यावे. नारेगांव स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता करण्यात यावा या संदर्भात मा.

महापौर, मा. सभापती प्रशानास पत्र दिलेले असून सुध्दा कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. तरतूद करण्यात यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** १२-०७-२००४ च्या स्थायी समितीत आपण आदेश दिले होते की, मयुरपार्क येथील नागरिकांनी गेल्या चार वर्षापासून बेटरमेंट चार्जेस भरलेली आहेत. मंजूर रेखांकनातील असे असतांना सुध्दा तेथे पाण्याची लाईन, ड्रेनेज व्यवस्था नाही. १५ मी व ३६ मी असे दोन रस्ते सुध्दा या भागासाठी विकास आराखड्यात दाखविण्यात आलेले आहेत. त्या रस्त्याच्या विकास करण्याची जबाबदारी सुध्दा मनपाची आहे. शहर विकास आराखडा हा संपूर्ण नगररचना विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे जागेचे पर्चेस नागटीस. जागेचा मोबदला देणे, परवानगी देणे, याशिवाय नगररचना विभागाचे दुसरे काही काम आहे का? हा प्रश्न समोर येतो. जी महत्वाची कामे करायची अशा कामांना नगररचना विभागामार्फत निश्चित वेगळा अभिप्राय दिला म्हणून ती कामे होत नाही. मयुरपार्कला १५ मी व ३६ मी. रस्ता विकास आराखड्यात असतांना कोणताही विकास केलेला नाही. वेगवेगळ्या गृहनिर्माण संस्थंना परवानगी दिली. जवळपास प्लॅननुसार ४५० घरे त्या ठिकाणी आहेत. आज त्या भागात ड्रेनेजचे पाणी उघड्यावर वाहते व तेच पाणी जे हातपंप व विहिरी आहेत त्यात झिरपते आहे. जनतेचे आरोग्य ध्योक्यात येवू शकते. हे सर्व नगरररचना विभागच्या निष्काळजीपणामुळे ता आहे. व तेथील घाण पाणी विहिरीत हातपंपाच्या मध्ये वर्क्स लेशन होऊ नये म्हणून सक्त सूचना केलेल्या आहेत. तेथील काही नागरिकांसोबत मा. आयुक्तांनी बैठक सुध्दा घेतलेली आहे. काम चालू करावे व अहवाल द्यावा असे मा. आयुक्तांनी सूचना दिल्यानंतरही कामे करण्यात येत नाही. भूसंपादन होईल परंतु अगोदर ड्रेनेज लाईन टाकणे जरुरीचे आहे. आदेश करुनही या विभागाच्या अधिकाऱ्यांना कामे करायची नसतील तर योग्य नाही. सक्त आदेश देण्यात यावेत.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे मयुरपार्क जाधववाडी भागात वाड्या वसाहती आहेत. विकास आराखड्यानुसार १५ मी ३६ मी. डी. पी. रोड आहेत. जेंव्हा ले-आऊट मंजूर केले डी. पी. रोडवरुन मंजूर केलेले आहेत का?मोठी वसाहत झाली म्हणून त्या भागातील रस्ता भूसंपादन करणे आवश्यक आहे. यासाठी काय प्रयत्न केलेले आहे.

**सहा. संचालक न. रचना :** मयुरपार्क कडे जाणारा रस्ता ३६ मीटरचा आहे. परंतु औरंगाबाद शहराची वाढीव हद्दिची जी विकास योजना मंजूर झाली त्या नकाशात सर्व्हे नंबर व गट नंबर मध्ये १००-१०० फरक पडलेले आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास मानसिंग पवार यांचे सर्व्हे नं. १३ हा विकास योजना नकाशानुसार जळगांवच्या पूर्वेला दाखविण्यात येतो. मोजणी नकाशानुसार जळगांव रोडच्या दोन्ही बाजुला दाखविण्यात आलेला आहे. मा. आयुक्तांनी सुध्दा रस्त्याच्या जागेची हद्द निश्चित करून घेण्याच्या सूचना दिल्या. ते थोडेफार होवू शकते. प्रत्यक्ष तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांचेकडून मोजणी करूनच निश्चित करणे योग्य होईल. जो पर्यंत होत नाही तो पर्यंत काही करू शकत नाही.

**मा. सभापती :** त्या भागात काम करण्याची निविदा २४-०६-०४ रोजी मंजूर झालेली आहे. ड्रेनेज लाईनचे काम करण्यास काय हरकत आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** जे उत्तर देत आहे ते विसंगत आहे. दिशाभूल करतात. माझ्या बरोबर आपण यावे. प्रयत्क्ष पाहणी करू. जबाबदारीने बोलतो आहे. १००-१०० फुट जागा बदलली जाते का? प्रत्येक कामाच्या बाबत संबंधित अधिकारी दुर्लक्ष करतात. सभागृहाला चुकीची माहिती देतात. ३६ मीटर रत्यामध्ये स. न. १३ चा काही संबंध नाही.

**मा. सभापती :** निविदा काढली काम सुरू करायचे आहे. इथपर्यंत कामे आल्यानंतर जागेची हद्द वगैरे बघावी लागेल असे प्रश्न उपस्थित करणे योग्य नाही. ले-आऊटचे रस्ते मंजूर केले काम सुरू करण्यात का अडचण यावी?

**सहा. संचालक न.र. :** सर्व्हे नं १३ चा व या कामाचा संबंध येत नाही वाढीव हद्दीच्या संदर्भात उदाहरण दिलेले आहे.

**मा. सभापती :** ले-आऊट मंजूर केले डी. पी. रोडला ग्राह्य धरून मंजूर केले. प्लॉट पाडले घरे झाली. ३६ मीटरचा रस्ता हा प्रस्तावित आहे. ड्रेनेजचे काम सुरू करणार टी. आय. एल. आर. होत राहील जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला. यापुढे आपण अभिप्राय पॉजिटिव्ह पाहिजे ज्या ठिकाणी कामे होवू शकते ते काम करायलाच पाहिजे.

**मा. आयुक्त :** उपआयुक्तांशी मी चर्चा केली होती. त्याप्रमाणे यांनी पाहणी केलेली. मिसारवाडीकडून क्रॉस लाईन येईल तेथे भूमीपूजन करून घ्यावे. डिमार्केरेशन होत राहील.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** नारेगांवच्या शाळेजवळ जागा आहे. हा स्लम भाग आहे. मनपाचे त्या भागात काही आरक्षित जागा आहे. शाहेच्या व स्मशान भूमीच्या बाजुला जो कचरा डेपो आहे त्या बाजुला सर्रास प्लॉट पाउण्याचे काम चालू आहे. ती जागा मनपाची आरक्षित की, खाजगी मालकीची आहे. खुला होणे आवश्यक आहे. त्या शाळेत आज ही १४००-१५०० विद्यार्थी शिक्षण घेतात. ती वसाहत वाढत आहे. ती जागा मनपाची असेल तर तेथे समाज मंदिर, हॉल वाचनालय करण्याची गरज पडणार आहे. म्हणून ती जागा अबाधित ठेवावी.

**प्रशासकीय अधिकारी :** नारेगांवच्या शाळेजवळ अनाधिकृत बांधकाम केलेले होते ते काढण्यात आलेले होते. तेथील सामान पत्रे वगैरे जप्त करण्यात आलेले होते. सध्या काम बंद आहे. एक दोन ठिकाणी काम चालू असेल तर पाहणी करून कार्यवाही करण्यात येईल. त्याचेंकडून कागदपत्र वगैरे मिळालेले नाही. नोटीसही दिलेली नाही. पत्रे घेण्यास चाऊस नावाचे व्यक्ती आले होते. कागदपत्रे मागविलेली आहे.

**मा. सभापती :** जाहिर प्रगटन तात्काळ द्यावे की, कोणी जागा घेवू नये. अतिक्रमण केल्यास कार्यवाही होईल म्हणून जे अतिक्रमण झाले असेल ते काढण्यात यावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** जी जागा आरक्षित आहे. त्यांचे कागदपत्र मनपाकडे आहेत का?

**मालमत्ता अधिकारी :** जी जागा आरक्षणात आहे जागा संपादन केल्याचे कागदपत्र मनपाकडे नाही. माहिती अधिकारी घेवून सभागृहात सादर केल्या जाईल.

**सहा. संचालक न.र. :** तपासणी करूनच सभागृहाला माहिती दिली जाईल.

**श्री. भगवान रगडे :** माझ्या माहिती प्रमाणे ती जागा दिपक सरोदे नावाच्या व्यक्तीची होती. त्यांनी प्लॉट पाडून विक्री केलेले आहे. रस्त्याच्या बाजूला कचरा डेपो आहे. दक्षिण भागाकडून दशनाम गोसावी समाजाला स्मशानभूमीसाठी जागा दिलेली आहे. त्यासमोर श्री. पिठले नावाचा व्यक्ती आहे. त्यांचेकडे १२ गुंठे

जमीन आहे. त्या १२ गुंठे जागेत त्यांनी प्लॉटींग केली विक्री केले. माझ्या नाही ती प्रमाणे ती जागा एका खाजगी मालकीची असून बांधकाम परवानगीसाठी संचिका सुध्दा सादर केलेली आहे.

**मा. सभापती :** या संदर्भात बांधकाम परवानगीसाठी संचिका सादर केलेली आहे. नगररचना अधिकारी यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक न.र.** : याबाबत तुर्त माहिती उपलब्ध नाही. पुढील बैठकीत खुलासा केला जाईल.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** स. सदस्यांनी अत्यंत जबाबदारीने माहिती दिली. नांव दाखविले. १२ गुंठे प्लॉट पाडले. विक्री केलेले बांधकाम परवानगीसाठी संचिका दाखल केली असेल तर आवक क्रमांक पडला असेल त्या भाग विकसित होणार आहे तेथे वाचनालय, मंदिर, समाजमंदिर होण्याची गरज भासणार आहे. बांधकाम परवानगी मागणी केली असेल तर तसा अभिलेख मनपाकडे असेल जे काम चालू आहे ते थांबविण्यात आले पाहिजे. अनाधिकृत झाले असेल तर पाडण्यात यावे. आरक्षण असेल व कोणी अतिक्रमण करीत असेल तर कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** सरोदे नावाचे व्यक्तीचे प्लॉटींग केलेली आहे. विनापरवानगी प्लॉटींग केली आहे. म्हणून त्यांचेवर तात्काळ कार्यवाही (करण्यात यावी) करावी.

**श्री. प्रशासकीय अधिकारी :** एकूण सहा लोकांवर आज पोलिंसात गुन्हे दाखल करणार आहेत. फाईल तयार केली आहे.

**मा. आयुक्त :** आरक्षण आहे का? आरक्षणाने ती जागा बाधित होत असेल तर दाखल घ्यावी लागेल. परवानगीसाठी अर्ज दाखल झाला किंवा काय? त्याबाबतची माहिती सभागृहासमोर ठेवावयास पाहिजे होती. मा. महापौरांकडे व आयुक्तांकडे आठवड्याला रजिस्टर मध्ये नोंद केलेली माहिती येते. याचा अर्थ सर्व नाही ती अधिकाऱ्यांकडे असणे आवश्यक आहे. पाच मिनिटात माहिती द्यावयास पाहिजे होती.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** नाथ प्रांगण येथे ओपन स्पेसवर संरक्षित भिंतीचे बांधकाम सुरू केले होते ते बांधकाम का थांबविण्यात आले. खुलासा करण्यात यावा.

**प्रशासकीय अधिकारी :** काम थांबविण्यात आलेले नाही.

**उपअभियंता न. र. :** काम सुरू केले होते. जागेच्या मालकी हक्काबाबत काही नागरिकांनी आक्षेप घेतले. संबंधित विभागाचे कागदपत्र दाखल केले त्यावर सुनावणी होईल त्यानंतर काम सुरू करावे असे तेथील काही नागरिकांचे म्हणणे होते. संचिका नगररचना विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे. अभिप्राय आल्यानंतर कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांचे आदेश घ्यावे. संबंधित व्यक्ती व नगररचना विभाग एकत्रित बसून प्रश्न निकाली काढतील. काम थांबविण्यात आले असेल तर मा. आयुक्तांच्या आदेशानुसार सुरू करावे. संबंधित व्यक्ती व नगररचना विभाग एकत्रित बसून प्रश्न निकाली काढतील. काम थांबविण्यात आले असेल तर मा. आयुक्तांच्या आदेशानुसार सुरू करावे. जो काही निकाल लागेल दोन्ही पार्टीला मान्य राहील. मनपाची जागा असेल तर काम थांबवू नये.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** झोन क्र. ४ चे विभाजन होणार होते. काय कार्यवाही झालेली आहे? तसेच मेहरनगर येथे रस्त्यात भिंत बांधलेली आहे ती काढण्यात यावी.

**मा. सभापती :** लवकरच प्रस्ताव समोर येत आहे. त्यावेळी चर्चा करून निर्णय घेतला जाईल. मेहरनगर भागात जर कोणी नागरिकांच्या मनपाच्या जागेवर भिंत बांधलेली असेल तर संबधित विभागाने कार्यवाही करावी.

**श्रीमती शाहीन जफर :** मागील बैठकीत चर्चा केलेली होती. अे-१ ची सर्व कामे थांबवून आहेत. याबाबत आपण काय कार्यवाही केलेली आहे. सर्व सदस्यांचे सुध्दा हेच मत आहे. टेंडर होते काम करण्यास वेळ लागते. तातडीचे कामे होणार की नाही. पावसाळ्याचे दिवस आले का बांद आहेत.

**मा. आयुक्त :** या विषयाचा मी अभ्यास केल्यानुसार बोलतो. मुळात मी इतर महापालिकेचे आयुक्त व शासनाचे संबंधित अधिकारी यांचेशी चर्चा केलेली आहे. नाशिक, कोल्हापुर, नागपुर येथे ५०,०००/- पर्यंत मंजुरीचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना आहे. नागपुर महापालिकेस त्यांचे कायद्याअंतर्गत नगर विकास विभागाने खुलासा ही केलेला आहे. या मनपात सुध्दा ५०,०००/- नव्हे तर २५०००/- पर्यंतच कामाचे मंजुरीचे अधिकार कार्यकारी अभियंता यांनी वापरण्यास हरकत नसावी. असे चर्चेत बोलतो आहे. मात्र त्या बैठकीत बोलाविल्यानुसार मुख्य लेखाधिकारी सुध्दा होते. मात्र त्याबाबत नोटीस बोर्डवर प्रसिध्दी लावणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** नोटीस बोर्ड लावण्यास काही हरकत नाही. पूर्वी सुध्दा प्रचलित पध्दत होती.

**मा. आयुक्त :** लेखा विभागाने चांगल्या कामासाठी मनपाची आर्थिक परिस्थती विचारात घेता काटकसरतीचे धोरण म्हणून येणाऱ्या सर्व कामाचे जाहिरात एकत्र देत असते. त्यानंतर वृत्तपत्रात एकत्र निविदा सुचना देत असते. उदा. १५ कामाचे जाहिर निविदा प्रसिध्द करायची ती काही दोन तासात सर्वच कामे लेखा विभागात येत नसत. त्यासाठी ८-१५-२० दिवस लागतात. संबधित विभागाची सुध्दा अडचण निर्माण होत असे. निविदा पाठविली परंतु दिली नाही. दिल्यानंतर जाहीर प्रसिध्द झाल्यानंतर त्या नंतर ती कार्यवाही होत असे. त्यास उशीर होत असे. वृत्तपत्र पब्लीकेशन बाबत मी मुख्य लेखाधिकारी तसेच मा. सभापती आम्ही इतर मनपाची चर्चा केली. सार्वजनिक बांधकाम खात्याचे नियम पध्दत बाबत वाचन केले ज्यांनी मनपाचे आयुक्त म्हणून काम केले. त्यांचेशी मी चर्चा केली. त्यावर असे उत्तर मिळाले की, वृत्तपत्र पब्लीकेशनची गरज नाही. परंतु ऑफिस नोटीस बोर्डवर लावणे बंधनकारक आहे.

**मा. सभापती :** यात काही वेगळे आदेश आवश्यक आहे का?

**मा. आयुक्त :** तातडीच्या कामास अडचण निर्माण येणार नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** नोटीस बोर्डवर निविदा लावणे गरजेचे आहे. तातडीचे काम असेल तर त्याबाबत मा. आयुक्तांनी सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या आहे. ड्रेनेज व पाणीपुरवठा या संबंधिच तातडीची कामे असतात. इतर ए-१ ची जी कामे आहेत त्या संबंधी नोटीस बोर्डवर पब्लीकेशन केल्याशिवाय निविदा उघडली जाणार नाही. व देयके ही दिले जाणार नाही. नोटीस बोर्डवर लावण्याची ही पध्दत पूर्वी पासूनची आहे. ऑडीटमध्ये ऑब्जेक्शन घेतलेले आहे. तातडीची जसे ड्रेनेज, पाणी पुरवठ्याची कामे असतील त्यास मा. आयुक्त स्वतः मंजुरी देऊन कार्यवाही होईल त्यास अडचण नाही.

**मा. सभापती :** पाणी पुरवठा, ड्रेनेजच नाही तर विद्युत पाथदिवे व इतर रस्त्यात खड्डा असेल ती सुध्दा तातडीने काम म्हणून करता येतील. असे जनरल ठेवावे अशा कार्यकारी अभियंता व मा. आयुकत यांना सूचना देण्यात येतात. तातडीचे काम असेल तर कार्यकारी अभियंता यांना २.५० लक्ष पर्यंतचे मंजुरीचे अधिकार दिलेले आहे. ठराव झालेला आहे. कार्योत्तर मान्यता मा. आयुक्तांनी द्यावी लागेल. अे-१ ची जी कामे आहे ती लेखा विभागात पाठवून २,४,६ कामे येतील, नोटीस बोर्डवर लावून त्याप्रमाणे कार्यवाही करणार.

**श्री. मधुकर सावंत :** गेल्या ४ वर्षापासून जी प्रचलित पध्दत हाती त्या प्रमाणे चालू ठेवावी. पुढील काळात दोन वेळेस आचार संहिता लागेल. वेळ जाणार आहे. १२ महिने मिळणार आहे. जी प्रचलित पध्दत आहे त्या प्रमाणेच कार्यवाही करावी. निवडणूकीला सामोरे जायचे आहे. कामे झाली पाहिजे.

**मा. सभापती :** २.५० लक्षचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना दिलेले आहेतच नोटीस बोर्डवर लावूनच फायनल होत होते.

**श्री. मधुकर सावंत :** जी अट लावण्यात आली ती शिथील करावी. ४ वर्ष जसे चालत आले त्याप्रमाणे कार्यवाही करावे.

**मुख्य लेखाधिकारी :** कायद्याने नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. गेल्या चार वर्षापासून नोटीस बोर्डवर लावण्यात आले नसेल ती जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची होती. ऑडीटमध्ये ऑब्जेक्शन घेतलेले आहे. नोटीस बोर्डवर लावल्यानंतर तीन दिवसाच्या आंत मान्यता दिली जाईल. यास जबाबदार कोण चौकशी करू शकता.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** पहिलीच पध्दत चालू द्या.

**मधुकर सावंत, श्रीमती शाहीन जफर :** आचारसंहिता केंव्हाही लागू होवू शकत. कामे पाहिजे आतापर्यंत.

**मा. सभापती :** अे-१ च्या बाबतीत सभागृहाच्या भावना लक्षात घेवून प्रचलित जी पध्दतीने काम होत होती त्या पध्दती प्रमाणेच कार्यवाही व्हावी. अशा सूचना सभागृहाच्या वतीने देण्यात येतात.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सेल ॲड कंपनी मालकाने आतापर्यंत मनपाकडे किती रक्कम भरणा केलेली आहे. त्यांचेकडे बाकी असलेली ही रक्कम किती? खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** सेल ॲड कंपनी मालकाने मनपाकडे एकूण १९,४०,९३६/- रु. भरणा केलेला आहे. एकूण रक्कम ३८,८१,८५१/- इतकी आहे. त्यापैकी वरील प्रमाणे रक्कम भरणा केलेली आहे. उर्वरित रक्कम भरणा केली नाही. म्हणून नोटीस द्यायची आहे. नोटीसच्या अनुषंगाने संचिका विधी सल्लागार यांचेकडे पाठविण्यात आली आहे. त्यात एक अट अशी की, वर्क ऑर्डर छिल्यानंतर पहिल्या ३ महिण्यात त्यांनी सर्व जाहिरात फलक लावावी त्यानंतरचा दुसऱ्या दिवसापासून दुसऱ्या वर्षाचा कालावधी सुरू होईल. ही बाब तपासणीसाठी संचिका विधी सल्लागार यांचेकडे दिलेली आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** संचिका तपासतील सल्ला येत राहील. यात वेळ जाईल. ३९ लक्षचा ठेका दिला. सुरुवातीला त्यांनी १९.५० लक्ष भरणा केले. नंतरच्या ६ महिन्याचा कालावधी सुरू होणाच्या सुरुवातीच्या १५ दिवसांत उर्वरित रक्कम भरणा करावयास पाहिजे होती ती न करता ६ महिने कालाधी निघून गेलेला असून पुढील वर्ष सुरू झाले. १९.५० लक्ष उर्वरित रक्कम भरणा केली नाही. त्यावरील व्याज १८% गृहित धरता २२ लक्ष घेतात. पुन्हा

नवीन वर्षाचे ६ महिन्याचा कालावधी सुरू झाला. १९.५० पुन्हा रक्कम त्यात ॲड होते. असे एकूण ४१.५० लक्ष रुपये त्या कंपनी मालकाने भरणा करणे आवश्यक आहे. मुदत संपली टेंडर रद्द करा.

**मा. सभापती :** ४१ लक्षची नोटीस दिलेली का?

**उपआयुक्त (म.) :** ३८,८१,८५१/- रुपये घ्यायचे होते. १९,४०,९३६/- रुपये पहिल्या ६ महिन्याच्या सुरवातीस घेतलेले आहे. उर्वरित रक्कम त्याने विहित मुदतीत न भरल्यामुळे १८% व्याज लावून कशा पध्दतीने निविदा रद्द करायची कार्यवाही करायची या संदर्भात विधी सल्लागार यांचेकडे संचिका पाठविण्यात आलेली आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** त्या व्यक्तीकडून एकूण ४१.५० लक्ष रुपये भरणा करून घ्यावे.

**उपआयुक्त (म.) :** सुरुवातीचे ३ महिने हे जाहिरात फलक उभारणीसाठी कालावधी दिलेला आहे. त्यानंतर जर त्यास कालावधी वाढवून पाहिजे असेल तर अपील करनू व महिन्यापर्यंत आत होणे बंधनकारक होते. नसता जाहिरात फरलक उभारणीचा ३ महिण्याचा कालावधी नंतरचा दुसरा दिवस हा पुढील वर्षाचा पहिला दिवस म्हणून ग्राह्य धरण्यात आलेला आहे. ही बाब तपासणी साठी विधी सल्लागार यांचेकडे संचिका पाठविण्यात आलेली आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** मनपाचे ४१.५० लक्षचे नुकसान होणार आहे. कशा पध्दतीने भरणा करून घ्ह्रोणार आहे. संबधित कंपनी कालम पैसे भरणा करीत नाही तो न्यायालयात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**विधी सल्लागार :** जी संचिका माझ्याकडे भरलेली आहे. मुदतीत पैसे भरणा न केल्यामुळे करारनामा रद्द करून कार्यवाही करावा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** कॅव्हेट दाखल करावे नसता ती व्यक्ती कोर्टात जाईल. रक्कम भरणा करून घ्यावी. होर्डींग जप्त करावी करारनामा रद्द करावा.

**मा. सभापती :** महानगरपालिकेच्या विरुध्द कोणतीच कार्यवाही संबंधिताने करू नये यासाठी कॅव्हेट दाखल करावे. पैसे भरणा करून घ्यावे. कायद्यानुसार तपासणी करून कठोर कार्यवाहीचे आदेश देण्यात येत आहे. १५ मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.

**तहकूब वेळ दुपारी २.०० वाजता पुन्हा सभा २.३५ वाजता सुरू**

**श्री. संजय शिरसाठ :** गेल्या दोन-तीन वर्षापासून मनपामध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचारी दैनिक वेतनावरील कर्मचारी कनिष्ठ लिपिक यांचे भरती संदर्भात सभागृहात वारंवार चर्चा झाली. या संदर्भात पदाधिकारी काही नगरसेवक व प्रशासानाच्या प्रयत्नामुळे पाठपुरावा करून शासनाकडून मान्यता मिळविली अनेक दिवसांपासून कार्यरत असलेले दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले त्यांना मोठा आनंद झाला. या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करतांना प्रशासनाकडून निश्चितच काही चुका सुध्दा झालेल्या आहेत. १४१-१४२ लोकांना कायम स्वरुपातील नोकरीचे आदेश पारीत केले. त्यांना आनंद झाला. पेढे वाटप करून आनंद व्यक्त केला. हे सर्व झाल्यानंतर ऑर्डर चुकीच्या पध्दतीने दिल्या म्हणून पुन्हा ते आदेश प्रशासनाने लगेच परत घेतले. आदेश दिले त्यास जबाबदार कोण हा विषय महत्वाचा जरी असेल तरी थोड्याफार लहान चुका होणारच. एक दोन, तीन, चार, पाच कर्मचाऱ्यांना चुकीचे ऑर्डर दिल्या असत्या तर समजू शकलो असतो. परंतु १४२ लोकांना चुकीच्या पध्दतीने ऑर्डर अशा पध्दतीने दिल्या जातात. हा

महत्वाचा गंभीर प्रश्न आहे. काही अधिकाऱ्यांना बाजार मांडला मी जबाबदारीने सांगतो. आर्थिक उलाढाली झाली. तयात संघटनेचे व इतर लोक गुंतलेले आहे. ह्या आर्थिक उलाढाल होत असतात. जे कामावर कर्मचारी होते ते सेवेत कायम होईल या अपेक्षेने काम करीत होते. त्यांची नांवे वगळून दुसऱ्याच लोकांची नांवे टाकण्यात आली असे माझे स्पष्ट मत आह. ही चूक होते आहे व त्याबाबतीत मा. आयुक्तांच्या लक्षात आले व चांगली प्रतिमा जनतेसमोर गेली व झालेली चूक कोणी केली कशी केली याबाबतीत कार्यवाही अद्याप प्रस्तावित केलेली नाही. या पध्दतीने क. लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी तयार केली. जेष्ठता यादीत एक कनिष्ठ लिपीक श्री. रविंद्र श्रीनिवास देशमुख यांचे क्र. २८ वर नांव आहे हे कर्मचारी १०-०१-१९९८ ला मनपाच्या सेवेत कार्यरत होते. या झालेल्या आर्थिक व्यवहारामध्ये तो कर्मचारी अडकला नाही म्हणून त्यांची संचिका गहाळ करण्यात आली. तयानंतर त्या कर्मचाऱ्यास कमेटीसमोर बोलावण्यात आले. आपण आले म्हणून सांगण्यात आले आठ दिवस वाट पाहिली पुन्हा त्यांचे लक्षात आले की संचिका गायब झाली. अस्थापना विभागाच्या कर्मचाऱ्यास सांगतात तुम्हीच तुमची संचिका तयार करून पुन्हा सादर करावी. असे सांगण्यात आल्यानंतर सुध्दा श्री. देशमुख यांनी पुन्हा कागदपत्र तयार करून दुसरी संचिका तयार करून दुसरी संचिका तयार करून दिली. त्यानंतर ती संचिका तत्कालीने आयुक्त श्री. गजभिये यांचे बंगल्यावर गेली तेथुनच संचिका गायब झाली. एक वेळेस संचिका गायब होवू शकते. दुसऱ्यांना होते. याचा अर्थ संशयास्पद बाबत आहे. त्यानंतर श्री. देशमुख यांनी पत्रव्यवहार केला की, यादी नांव टाका, संचिकेचा शोध लावून मला त्वरित कामावर घ्यावे. यादीत नाव टाकावे. यादीतील श्री. देशमुख यांचे नांव वगळून धक्कादायक माहिती समोर येते की, कनिष्ठ लिपीकांच्या यादीत सौ. ललिता जाधव, बालवाडी, शिक्षिका यांचे नाव टाकण्यात आले जो विभाग आपण स्वतः चालवायचा सर्व कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड ठेवायचे जबाबादारी आपली आहे. अशा शाखा प्रमुखांनी स्वतःच्या पत्नीचे नाव क. लिपीकाच्या जेष्ठता यादीत ती देखील बालवाडी शिक्षिका असतांना कसे टाकण्यात येते हा महत्वाचा मुद्दा येतो. यासारखे दुर्देव मनपामध्ये असू शकत नाही. जे कामगार काम करीत होते काम करण्यास इच्छुक आहे. त्यांना न्याय मिळकत नाही. व स्वतःच्या पत्नीचे नांव यादीत टाकायचे हे कितपत योग्य आहे ही गंभीर चूक आहे. हा एक प्रकार माझ्याकडे आलेला आहे. असे अनेक प्रकार असू शकतात. या संदर्भात मी मा. आयुक्तांशी सुध्दा चर्चा केली. माझी विनंती की, कालच्या सर्व साधारण सभेत ठराव पारित केला की, जे दैनित वेतनावर आहे त्यांची यादी शासनाकडे पाठवावी म्हणून रवि देशमुख यांचे नाव त्या यादीत समावेश करून घेऊन या सर्व प्रकरणाची मा. आयुक्तांना चौकशीचे आदेश करावेत अशी माझी विनंती आहे.

**मा. सभापती :** आताच स. स. श्री. शिरसाठ यांनी जो प्रश्न उपस्थित केला. संचिका गायब झाली श्री. रवि देशमुख यांचे क. लिपिकाच्या (दैनिक वेतन) जेष्ठता यादीत २८ नंबरवर नांव होते. त्यांचे नांव काढून बालवाडी शिक्षिकेचे नांव कसे टाकले?

**सहा. आयुक्त :** आताच स. सदस्य यांनी मुद्दा उपस्थित केला की, श्री. रविंद्र देशमुख यांचे नांव वगळून ललिता जाधव यांचे नांव टाकले परंतु श्री. रविंद्र देशमुख हे सन १९९८-२००३ पर्यंत मनपाच्या सेवेत कार्यरतच नाही. अस्थापना विभागाकडे जी यादी तयार करण्यात आली होती. ती कार्यरत लोकांची यादी तयार केलेली होती. टंकलेखन मराठी-इंग्रजी पास होते. पात्र होते. त्यांची यादी तयार करून दाखविण्यात आली. लोकांचे ऑब्जेक्शन मागविण्यात आले. तयानंतर विचार करून अंतीम यादी १७ तारखेला मा. उपआयुक्त (प्र.) यांनी सादर केली त्यात श्री. देशमुख व सौ. ललिता जाधव यांचे नांव नाही.

**मा. सभापती :** अगोदर जी यादी तयार केली ती कोणती यादी होती? श्री. रवि हे १९९८ मध्ये मनपा सेवेत होते. प्रशासनाच्या चुकीमुळे जेष्ठता यादीत नांव आले नाही.

**सहा. आयुक्त :** जे कर्मचारी कार्यरत होते ती यादी अगोदर तयार केलेली होती. जे कर्मचारी आजारी कारणामुळे किंवा इतर कारणास्तव गैरहजर होते. तसेच तांत्रिक खंडानंतर कामाला आले नाही जे अनुपस्थित होते. त्यांना यादीतून कमी केलेले आहे व डिसेंबर २००३ ला कार्यरत कर्मचाऱ्यांची यादी तयार केलेली आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** माझा प्रश्न असा की, १४२ लोकांच्या अशाच चुकीच्या पध्दतीने ऑर्डर केल्या. माझ्याकडे जी यादी आहे ती ०१-०४-०८ ची प्रसिध्द केली. ४५ लोकांची यादी आहे. नांव चुकून आले का? या यादीच्या वरच्या भागात क. लिपीक दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी असे दिले. क. लिपीकाच्या यादीत एका बालवाडी शिक्षिकेचे नांव कशाच्या आधार घेवून किंवा कोणत्या नियमाने टाकण्यात आले. हे प्रकरण उघडकीस आले नसते तर सौ. ललीता जाधव यांचा यादीत समावेश असताच नोकरीवर घेतले असते हे तर गृहितच आहे.

**सहा. आयुक्त :** यापूर्वीचे खुलासा केला की, क. लिपीक पदासाठी जे पात्र उमेदवार आहे त्यांनी अर्ज सादर केले होते. त्या लोकांच्या नावाची यादी तयार केलेली होती.

**श्री. संजय शिरसाठ :** एकीकडे अधिकारी क. लिपीक पदावरील कर्मचाऱ्यांच्या संचिका गहाळ करतात दुसऱ्या कर्मचाऱ्याचे नावे जेष्ठता यादीत घेतात. गंभीर बाब आहे. श्री. देशमुख याची दोन वेळेस संचिका गहाळ झाली. आजी त्यांची संचिका अस्थापना विभागाकडे नाही. गंभीर प्रकरण आहे. तो व्यक्ती वारंवार विनंती करतो मी प्रकल्प ग्रस्त आहे. कामावर घ्यावे. विचार केला गेला नाही. मा. आयुक्तांनी दखल घ्यावी. सदर कर्मचारी दिनांक १०-११-१९९८ ला मनपाच्या सेवेत होत. याबाबत मा. आयुक्तांमार्फत चौकशी व्हावी. श्री. देशमुख यांचे नाव जेष्ठता यादीत द्यावे अशी विनंती आहे.

**मा. सभापती :** श्री. रविंद्र देशमुख यांनी क. लिपीक म्हणून मनपाच्या सेवेत दैनिक वेतनावर काम केलेले आहे. यादीत २८ नंबरवर त्यांचे नाव जेष्ठता यदीत घेण्यात यावे व या संपूर्ण प्रकरणाची होते. श्री. रवि देशमुख यांचे नांव जेष्ठता यादीत घेण्यात यावे. हे या संपूर्ण प्रकरणाची मा. आयुक्त यांनी चौकशी करून पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

**मा. आयुक्त :** उपआयुक्त (प्र) यांनहीच खुलासा करणे अपेक्षित आहे. जी माहिती निश्चित व ठामपणे आहे ती माहिती समोर यावयास पाहिजे. ते इतिवृत्तांताच यावयास पाहिजे. १४२ लोकांची नांवे कमी केल्याबाबतचे मी आयुक्त म्हणून आल्यापासून माझ्या १४२ लोकांची नांवे कमी केल्याबाबतचे मी आयुक्त म्हणून झाल्यापासून माझ्या निदर्शनास नाही. वर्ग-४ चे कर्मचारी आपण कायम केलेले आहे. चर्चा होते वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या बाबत चालू आहे. वर्ग-३ चे एकही कर्मचारी मी आल्यापासून कायम झालेले नाही. वर्ग-४ मध्ये सुध्दा सन २००० ची जेष्ठता यादीप्रमाणे ४६ लोक जेष्ठ होते. त्यांना २००० मध्ये कायम करण्यास कमेटीने मंजुरी दिलेली होती. झोन क्र. ८ चे काही कर्मचारी जेष्ठ होते. म्हणून ४६ लांकाच्या ऑर्डर परंत घेतलेल्या आहेत.१४२ चा आकडा माझ्या निदर्शनास नाही. ते ४६ कर्मचारी कामावर आहे. फक्त सेवेत कायम होवू शकला नाही. चौकशी करावी. लागेल मी आल्यापासून बंगल्यावरून संचिका गेली वगैरे प्रकार झालेला नाही. तत्कालीन आयुक्त यांचे काळात गहाळ झाली असे नमूद करावी.

**श्री. संजय शिरसाट** : १४२ कर्मचारी नसतील ४६ असतील त्यांना ऑर्डर कशा दिल्या? ऑर्डर दिल्यानंतर त्यांनी त्यांचा आनंद व्यक्त केला. पुन्हा परत घेतल्या यात चुक झाली की नाही. जेंव्हा कमेटीने निर्णय घेतला. कमेटी कशासाठी होती. चुकीच्या पध्दतीने कमेटी मार्गदर्शन करते. अस्थापना विभागात काय काम चालते हे निदर्शनास आलेले आहे. झालेली चूक गंभीर असून यापुढे असे होवू नये. यासंबंधी मा. आयुक्तांनी चौकशी करून पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

**मा. सभापती :** क. लिपीकाच्या जेष्ठता यादीत नांव टाकण्यात आले वगैरे व इतर बाबीतीत जी चर्चा णाली या संबंधी मा. आयुक्त यांनी चौकशी करून पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** दैनिक वेतनावर कर्मचारी घेताना महाराष्ट्र शासनाचे आदेश आलेले होते. ९५-९६ चे आदेश होते की, यानंतर कोणताही कर्मचारी दैनिक वेतनावर भरती करू नये. शासनाचे आदेश असतील तर खुलासा करण्यात यावा. शासन आदेश असतांनाही नंतर काही कर्मचारी दैनिक वेतनावर कसे घेण्यात आले. माहिती देण्यात यावी. जे कर्मचारी मनपाकडे कार्यरत आहे व जी जेष्ठता यादी तयार करण्यात आली व त्या कर्मचाऱ्यांचे शिक्षण व वयाचा विचार केला तर त्याची सुध्दा यादी प्रसिध्दीला देण्यात यावे. १८ वर्ष २१ वर्षानंतर कोणताही व्यक्ती नौकरीस पात्र ठरतो. परंतु १८ वर्षाच्या आतील कोणी कर्मचारी सेवेत भरती करतांना कायम केले का याचा सुध्दा शोध घेण्याची गरज आहे. भरती घेतांना ज्यांनी वयाची, शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणात काही खाडाखोड केलेली आहे का हे सुध्दा तपासण्याची आवश्यकता आहे. याबद्दल कोणीही तक्रार येतील व अस्थापना विभागाची जी काही प्रतिमा मलीन झालीची सुधारण्यासाठी मदत होईल तसे आदेश आपण प्रशासनास द्यावे.

**मा. सभापती :** जेष्ठता यादी वर्ग-४, वर्ग-३ ची लावायची का?

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या मनपामध्ये अशी परिस्थिती आहे एखादा कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांची ग्रॅज्युटी दिली जात नाही. रेकॉर्ड मिळत नाही.

**मा. सभापती :** अस्थापना विभाग संगणकीकरण करण्यात होते का करण्यात आले नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** झोनमध्ये संगणकीकरण करणार होते. त्याची गरज सुध्दा आहे. पाणीपट्टी मालमत्ता कराची वसुली करण्यास सोपे जाईल. रेकॉर्ड ताबडतोब मिळतील.

**उपआयुक्त (प्र.) :** जे-जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले एकही प्रकरण असे नाही की, पेन्शन मंजूर केलेले नाही. ८ दिवसाच्या आंत मान्यता दिलेली आहे. एक प्रकरण प्रशासनाकडे प्रलंबित नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** वर्ग ३ व वर्ग ४ ची जी १२०० कर्मचऱ्यांची जेष्ठता यादी तयार केली त्याची प्रत मा. महापौर मा. उपमहापौर सर्व पदाधिकारी यांना दिली तर योग्य होईल.

**उपआयुक्त (प्र.) :** शासनाने जेव्हा ११२४ कामगारांना सेवेत कायम करण्याचे निर्देश दिले त्यातच ३ अटी टाकण्यात आलेल्या होत्या व यापुढे शासनाच्या परवानगी शिवाय एक कर्मचारी दैनिक वेतनावर भरती करण्यात येवू नये. त्यानंतर भरती केलेली नाही. रविंद्र देशमुख हे क. लिपीक म्हणून सन १९९८-९९ मध्ये कार्यरत होते. त्यांचे वैयक्तिक अडचणीमुळे ते कामावर आलेले नाही. म्हणून दैनिक वेतनाच्या यादीत त्यांचे नांव नाही व १९९९ पासून ते कामावरच नाही. जी जेष्ठता यादी तयार केली जे कार्यरत आहे. त्याची जेष्ठता यादी तयार केलेली आहे. रविंद्र देशमुख कामावर नव्हते म्हणून जेष्ठता यादीत नांव आलेले नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** श्री. देशमुख यांची संचिका गहाळ झालेली आहे. एकीकडे संचिका प्रशासन गहाळ करण्यास त्यास कामावर घेणार नाही. एकीकडे सांगणार कामावर नव्हते म्हणून यादीत नांव समावेश झाले नाही ही चुकीची पध्दत आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** २००१ पर्यंत दैनिक वेतनावर भरती होते का?

**उपआयुक्त (प्र.):** काल सर्वसाधारण सभेत प्रस्ताव दिला होता. वर्ग ३ , वर्ग ४ मध्ये ज्याचा जास्तीचा खंड पडला त्यांना कामावर घ्यावे किंवा काय? त्या अनुषंगाने प्रस्ताव दिलेला होता भरती न करण्याबाबतचे शासन आदेश तपासावे लागतील की ते केव्हापासूनचे होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** १९९५-९६ व त्यानंतर जे कर्मचारी दैनित वेतनावर भरती करण्यात आले. दैनिक वेतनावर भरती करण्याची प्रोसीजर कशी होती. मा.आयुक्तांचे काही तसेच आदेश होते का? जे दैनिक वेतनावर कर्मचारी कार्यरत आहे कोणी आदेश दिले होते. त्यांना कामावर घेण्याचे. कामाची गरज होती का? किंवा वृत्तपत्रात जाहिरात देवून भरती केली. कोणत्या वृत्तपत्रात दिलेले होते. खुलासा देण्यात यावा. याचा अर्थ दैनिक वेतनावर घेणारे प्रशासनाच, काढून टाकणार प्रशासन, संचिका गायब करणारे प्रशासनच ही बाब योग्य नाही.

**उपआयुक्त (प्र.):** १९९७ ला सुरत पॅटर्न अंतर्गत विभागीय अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार ५-१० कर्मचारी भरती करण्योच अधिकार देण्यात आलेले होते. सुरत पॅटर्न भरती करण्यात आली. त्यावेळेस ते कर्मचारी याचीच जेष्ठता यादी प्रशासनाने तयार केलेली आहे. त्या संबंधीचे ऑब्जेक्शन सजेशन मागविण्यात आले. ज्याची तक्रार होती. त्याचे निवारण करून पुढे ठेवण्यात आली.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** हे स्पष्ट झाले की, १९९५ ला प्रत्येक विभागीय अधिकाऱ्यामार्फत ५-१० कर्मचारी घेण्याचे ठरले. १९९७ ला प्रत्येक अधिकाऱ्या मार्फत ५-१० कर्मचारी घेण्याचे ठरले. १९९७ त्या वर्षाच्या शेवटचे वर्ष दैनित वेतनावर आदेश देण्याचे. त्यानंतर भरती करण्यात आलेली नाही का? जेव्हा विभागीय अधिकाऱ्यांना ५-१० कर्मचारी घेण्याचे अधिकार दिले. त्यावेळेस त्यांना तशी भरती करतांना नोटीस बोर्डवर लावण्यात आले होते का? यावरून स्पष्ट होते. विभागीय अधिकाऱ्यांनी मनमानी करून त्यांना जे लोक कमावर घ्यावयाचे होते. त्यांनाच घेतले. प्रत्येक सुशिक्षित बेरोजगारांना अपेक्षा असते की, मला रोजगार मिळावा म्हणून अशा नागरिकांवर अन्याय झालेला आहे. याबाबतचे संपूर्ण रेकॉर्ड मागवावे चौकशी व्हावी. अस्थापना विभागाचे कामकाज स्वच्छ पध्दतीने चालावे ही अपेक्षा करतो.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** उपआयुक्त (प्र.) श्री. कांबळे साहेब यांचेकडे विविध विभागाचे चार्ज दिलेले आहे. उपआयुक्त (म) किंवा उपआयुक्त (टॅक्स) यांचेकडे काही विभागाचे चार्ज देण्यात यावे.

**मा. आयुक्त :** दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या बाबत मा. सभापती यांनी दिलेले रुलींग पुरेसे आहे, परंतु गेल्या १५ महिन्यापासून मी आल्यापासून अभ्यास केला. नियमित जे कर्मचारी नियुक्त केले. त्यांची जेष्ठता यादी हायकोर्टाने विचाराधीन घेतली व न्यायालयाने आदेश दिल्यानंतर यादी प्रशासनाने अंतिम केलेली आहे. ही बाब खरी की न्यायालयाच्या यादीनंतर ही काही नांवे आलेली आहे. जस जसे कर्मचारी सेवेत दाखल झाले त्या संबंधी जेष्ठता यादी प्रसिध्द केली होती. हरकती सुचनांचा विचार करून अंतिम केलेला आहे. आपला प्रश्न वेगळा आहे. पूवी जे कर्मचारी सेवेत आले. त्यांना सेवेत घेतांना कोणते निकष लावण्यात आले. अधिकार कोणाला दिले होते. मागील एक ते दीड वर्षाच्या काळात मा. उपआयुक्त यांचे तजविजनुसार व आयुक्तांची सुध्दा सही असेल. विभागीय अधिकाऱ्यांना अधिकार दिलेले आहे. प्रश्न हा होता सेवेत कायम करतांना जेष्ठता यादी कशी वापरायची त्यात न्यायालयाने केलेली अंतर्गत यादी अगोदर त्यानंतर सेवेत घेतलेले जेष्ठता यादीचा वापर केलेला आहे आणि ही यादी माझ्या काळात प्रसिध्द केलेली आहे. मनपा क्षेत्रात पूर्णतः प्रसिध्द झाली हरकती घेतलेल्या आहेत. त्यानुसार अंतीम केलेली असून या पलीकडे कोणताही आयुक्त काम करणार नव्हता. जेवढे कायम केले. त्यांची संचिका प्रत्येक कर्मचाऱ्यांची संचिका कायम करतांना उपआयुक्त (म) व त्यांचे सहकायाऱ्यांनी केलेली आहे. सभागृहाची सूचना रास्त आहे. वैयक्तीक संचिका अस्थापना विभा ागने ठेवणे आवश्यक आहे. संगणकावर सर्व कर्मचाऱ्यांची जेष्ठता याद्या जाते २००४ पर्यंत तयार केलेल्या आहे. त्याची प्रत केव्हाही त्या विभागास पाहण्यासाठी मिळेल व उपआयुकत (प्र.) यांनी त्यांची प्रसिध्दी अधिक व्यापक करावी अशा सूचना देण्यात येतात जो जी.आर. उपआयुक्त (प्र) यांना सांगता आला नाही ८ नोव्हेंबर २००३ चा आहे त्याही अगोदर शासनाची सूचना आहे की, दैनिक वेतनावर कर्मचारी भरती करू नये. माझ्या कार्यकाळात तर एकाही कर्मचाऱ्यांची दैनिक वेतनावर नेमणूक केलेली नाही. कदाचित श्री. गजभिये यांचे कार्यकाळात सुध्दा नवीन कर्मचारी दैनिक वेतनावर भरती करण्यात आलेला नाही.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** आताच कर्मचारी भरती संदर्भात मा. आयुक्त यांनी न्यायालयाच्या जेष्ठता यादीला प्राधान्य देवून नोकर भरती केली त्याचाच एक भाग पीरबाजार शिफ्ट करण्या संदर्भात सुध्दा न्यायालयाचे निर्देश आले. असे असतांना का कार्यवाही करण्यात येत नाही. वेळेवर कार्यवाही न झाल्यास मा. न्यायालयात अवमान याचिका दाखल होईल त्यात मनपाची बदनामी होईल याची दखल घेण्यात यावी. पीरबाजार शिफ्ट करावा सोयी सुविधा नंतर देता येतील सोयी सुविधा दिल्या जात नाही म्हणून शिफ्ट करणार नाही का? ५ लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे.

**उपआयुक्त (म) :** पीरबाजार स्थलांतरीत करण्या संदर्भात सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. स्थलांतरीत होणाऱ्या जागेवर अगोदर सोयी सुविधा करण्यात याव्यात व त्यानंतर बाजार स्थलांतर करावा म्हणून निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानंतर मा. आयुक्त स्थरावर दोन बैठका झालेल्या आहेत. सुविधा देण्या संदर्भात विद्युत अभियंता, कार्यकारी अभियंता (पापु.) शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता यांना बेसिक सुविधा देण्यासंबंधीचे अदांजपत्रक तयार करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. मुलभूत सुविधा दिल्या शिवाय बाजार स्थलांतर करणे योग्य होणार नाही. असे माझे मत आहे. किमान लाईट, पाणी पुरवठा, शौचालय इत्यादी सुविधा तरी देणे गरजेचे आहे. तशी मागणी ओटे आणि शेड तयार करून देण्याची सुध्दा आहे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** पीर बाजार तात्काळ शिफ्ट करावा. सोयी सुविधा होत राहतील. प्रत्येक बाजारात सोयी सुविधा उपलब्ध आहेत का? सोयी सुविधा होत नाही तो पर्यंत शिफ्ट होणार नाही का? प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

**उपआयुक्त (म.) :** सोयी सुविधा दिल्या शिवाय स्थलांतर करू नये असा ठराव आला. कार्यकारी अभियंत्याचे बरेचशे त्या संबंधीचे अंदाजपत्रक तयार केलेले आहेत. कार्यवाही तातडीने होत आहे.

**मा.सभापती :** ठीक आहे. सोयी सुविधा देणे गरजेचे आहे. त्यानंतर स्थलांतर करण्यात यावे.

**मा.आयुक्त :** सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही चालू आहे. मा. उच्च न्यायालयाने आपण केलेल्या कार्यवाहीबद्दल आपले अभिनंदन केलेले आहे.

**श्री. मधुकर सावंत :** या बागेची आज काय परिस्थित आहे? या जागे संबंधी मुंबई मध्ये कार्यवाही चालू असल्याचे समजते. नगर विकास विभागाकडून काही माहिती आलेली आहे का. तेथे आपण विकास करायला जाऊ परंतु रिकाम्या हाताने परत यावे लागेल अशी परिस्थिती निर्माण होवू नये.

**सहा. संचालक न.र. :** धोबीघाट संबंधी शासनासकडून अहवाल मागविण्यात आला होता. अहवाल सादर केलेला आहे. १५८८१ चौ. मी. जागा आपण पंचनामा करून ताब्यात घेतलेली आहे. ७/१२ वर मालकी हक्कात महानगरपालिकेचे नांव लागलेले नाही. ७/१२ वर मनपाचे नांव लागेपर्यंत विकास कामे करणे योग्य होणार नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शासनाला काय अहवाल मागविण्यात आला.

**श्री. संजश शिरसाठ :** अहवालाबद्दल मा. आयुक्तांना विचारणा होते. मा. आयुक्त अहवाल पाठवतात. मा. आयुक्तांचा खुलासा घ्यावा.

**सौ. शाहीर जफर :** काल झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये विरोधी पक्षनेता श्री. हिदायत अली यांनी जकात विभागातील दोन पावती पुस्तके हरवले त्याबद्दल कर्मचाऱ्यांविरुध्द मा. आयुक्तांनी काय कार्यवाही केली? लाखोचा भ्रष्टाचार झाला. कर्मचाऱ्यांना निलंबित केले नाही. नगरसेविकेचा पती असल्यामुळे कारवाई होत नाही. संबंधितावर कार्यवाही केली नाही तर कोट्यावधीचे नुकसान होईल. या संबंधी मुख्य मुद्दा असा आहे की, नगरसेविकेचे पती असल्यामुळे कारवाई केली नाही. त्यांना जागेवरच निलंबित व्हायला पाहिजे. चौघांनी गुन्हा मान्य केलेला आहे. काय कारवाई केली?

**श्री. इलियास किरमानी :** आजपर्यंतची प्रचलित पध्दत काय आहे. यापूर्वी काही कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. ज्यांनी चुक लक्षात आणून दिली त्यांनाच कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. चार कर्मचाऱ्यांना वाचवायचे कारण काय? फक्त त्यांच्या बदल्या करण्यात आल्या. काहीच्या बाबतीत पोलिसात गुन्ह दाखल करण्यात आले. लॉकअप मध्ये पाठवले. याची मात्र दखल करण्यात आली. गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. प्रशासनास यांचेकडून काही मिळकत असेल. पहिल्यादाच असे पाहण्यात येते की, ज्यांनी निर्दशनास आणून दिले त्यांनाच कारणे दाखवा नोटीस देण्यात येते. जे चोरी करतात ते बाजुलाच राहिले. कुणाचा पती असेल, कुणाची पत्नी असेल परंतु साधा कर्मचारी असेल तर गुन्हा नोंदविल्या जातो. अशा किती लोकांवर कारवाई झालेली नाही.

**सौ. शाहीन जफर :** त्यात नगरसेविकेचा पती आहे. चौघांनी गुन्हा मान्य केलेला आहे. त्यांना निलंबित करावे.

**मा. सभापती :** त्यांना शिक्षा देण्यात आलेली आहे. त्यांची तेथून बदली केलेली आहे. सविस्तर चौकशी करण्यात येईल. दोषीवर कडक कार्यवाही करण्यात येईल. आदेश देण्यात येत आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** बदली करणे म्हणजे त्यांना शिक्षा दिलेली नाही. अगोदर निलंबित करावे. नंतर चौकशी करावी. निर्दोष असले तर पुन्हा कामावर घ्यावे.

**सौ. शाहीन जफर :** सभागृहाची दिशाभूल होत आहे. चोरी केल्याचा गुन्हा कबूल केला आहे. त्यांना निलंबीत केलेच पाहिजे. अशी माझी मागणी आहे.

**मा. सभापती :** प्रशासनाला पूर्ण अधिकार आहे. कार्यवाही करण्याचे आदेशीत केले आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** दुसरे कर्मचारी असते तर गुन्हा दाखल केला असता.

**मा. सभापती :** प्रशासन सक्षम आहे. त्यांनी जी कार्यवाही केली ती योग्य केली. या प्रकरणात प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे.

**सौ. रशिदा बेगम :** जाणून बुजून संबंधित कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले नाही.

**श्री. भगवान रगडे :** प्रशासनाने चुकीची कार्यवाही केलेली आहे. कारणे दाखवा नोटीस का दिली? जे चांगले काम करतात त्यांनाच कारणे दाखवा नोटीस दिली जाते.

**उपआयुक्त (प्र) :** बीड नाक्यावरील पावती पुस्तक गहाळ झाले त्या पाळीत कार्यरत असलेले लिपीक, जेष्ठ लिपीक यांच्या ताबडतोब बदल्या करण्यात आलेल्या आहेत. दोन पावती पुस्तकांचे ५० रुपये प्रति पावती प्रमाणे १० हजार रुपये भरून घेण्यात आलेले आहेत. त्यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. या प्रकरणाचे लेखा परिक्षण करणे आवश्यक असल्याने मुख्य लेखा परिक्षक यांना सूचना देवून लेखा

परिक्षण करण्यात येईल. लेखा परिक्षण अहवाल आल्यानंतर कडक कार्यवाही करण्यात येईल. या संदर्भात प्रशासनावर दबाव नाही.

**श्री. भगवान रगडे :** आर. सी. एच अंतर्गत नोकरी भरती होत आहे. दोन दवाखान्यांसाठी विविध पदाकरीता अनेक अर्ज आलेले असून बरेच उमेदवारांना मुलाखत पत्र मिळालेले नाही. उद्याची नोकर भरती रद्द करण्यात यावी. माझ्या माहितीप्रमाणे मोजक्या व जवळील साधलेल्या उमेदवारांना मुलाखत पत्र देण्यात आलेले आहे. दोन दवाखान्यासाठी भरती करण्यात येत आहे व आपणांस चार दवाखान्यासाठी भरती करावयाची आहे. चारही दवाखान्याची भरती एकदाच करावी. उद्याची भरती रद्द करावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आर.सी.एच. प्रकल्पांतर्गत त्या केंद्राच्या आवश्यकतेनुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून त्यात अटी-शर्ती नमूद करून अर्ज मागवण्यात आले. २०० अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी प्राप्त ठरलेल्या ९० उमेदवारांना मुलाखत पत्र दिलेले आहे. उद्या मुलाखतीची तारीख आहे.

**श्री. भगवान रगडे :** यांनी अगोदरच भरती करून घेतलेली आहे. २०० उमेदवारांना बोलवा. ज्यांनी अर्ज केले ते सक्षम आहेत.

**मा. आयुक्त :** ही नोकर भरती नाही. कंत्राटी पध्दतीने ठराविक वेतनावर नेमणूक करावयाची आहे. अर्जाची छाननी जबाबदारीने केलेली आहे. मुलाखती पुढे ढकलण्यात याव्यात यात प्रशासनाला काही अडचण नाही.

**श्री. भगवान रगडे :** बाकीच्या लोकांना मुलाखतपत्र देण्यात यावे.

**मा. आयुक्त :** संबंधित विभागाने छाननी केली. मी पण केलेली आहे. पात्र अपात्र उमेदवार डॉक्टर नर्सेस इत्यादी यादी. मा. सभापतींनी पहावी. सर्व सदस्यांनी पहावी. याबद्दल मा. सभापतींनी रुलींग द्यावे.

**मा. सभापती :** मा. आयुक्त अध्यक्ष असून ही पदे भरणे आवश्यक आहे. स. सदस्य श्री. रगडे यांनी विशिष्ट उमेदवारावर अन्याय झाला असल्यास ते दाखवावे. मा. आयुक्त ते तपासून घेतील. उद्या १० वाजेपर्यंत दाखवून द्यावे. ते पात्र असल्यास त्यांना मुलाखतीस बोलाविण्यात यावे.

**श्री. भगवान रगडे :** मुदतवाढ देण्यात यावी. चांगल्या दर्जाची छाननी करावी. २०० मधून फक्त नव्वदच पात्र झाले. यात हित लपलेले दिसते. उद्याची मुलाखत रद्द करण्यात यावी. नसता लोकशाही पध्दतीने विरोध करण्यात येईल.

**मा. सभापती :** मुलाखती रोखण्याचे अधिकार आपणास नाही. कोणी उमेदवार पात्र असेल तर आपण दाखवून द्यावे. ते पात्र ठरत असतील तर त्यांना मुलाखत पत्र देण्यात येईल. आपले आर. सी. एच प्रकल्पावर नियंत्रण नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** दिल्ली गेटच्या बाजुला आपण रस्त्यासाठी जागा संपादन केलेली आहे. त्यांना मोबदलाही देण्यात आलेला आहे. त्यावर स्थगिती नाही. पैसे उचलेले आहेत. शीट नं. ३५६ सि. स. नं. ७४६६ व इतर जागा संपादन केलेली आहे. ते ताब्यात घेण्याची कार्यवाही ताबडतोब करावी.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांनी ताबडतोब कार्यवाही करावी.

**श्री. संजय शिरसाठ :** महानगरपालिकेच्या जागेवर विकास व्हावा त्यातून उत्पन्न प्राप्त व्हावे. म्हणून अनेक ठिकाणी जागा विकसित करण्यासाठी दिलेल्या आहेत. या संदर्भात अनेकवेळा सभागृहात चर्चाही झालेली आहे. ज्या जागेचा विकास करण्यासाठी दिला त्या जागेवर गेल्या ५ ते ६ वर्षापासून इमारतीचे बांधकाम झालेले आहे. तेथे शॉपिंग सेंटर झाले. अशा जागेवरील मनपाच्या मालकीचा

जो हिस्सा येतो तो तात्काळ ताब्यात घेण्याचे आदेशित केलेले होते व सभागृहात मा. आयुक्त यांनी सुध्दा असा खुलासा केलेला होता की, अशा जागा ताब्यात घेण्याबाबत अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिलेल्या आहेत. जय टॉवर्स येथे २७ ते २८ दुकाने बांधून आहेत असे असतांना व मा. आयुक्तांनी सूचना करूनही ती जागा मनपा हस्तांतर करीत नाही. अधिकारी सूचनांचे पालन करीत नाही. अनेक मालमत्ता ७५.२५% प्रमाणे विकसित नाही. जय टॉवर्सच दुकाने हस्तांतर करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर कधीही आलेला नाही. सहा. संचालक नगररचना हे या संबंबधित विभाग प्रमुखाने काम करतात. आर्थिक (म) तसेच आणखी एक दोन अधिकारी यांची समिती स्थापन करून असे सर्व प्रस्ताव पुढील बैठकीत समोर आले पाहिजे अशा सूचना कराव्यात अनेक ठिकाणच्या जागा मनपाच्या हिश्याच्या तशाच पडून आहेत. मुळ मालम जागेचा विकास करतो. दुकाने विक्री करतो, भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. वापर सर्रासपणे सुरू आहेत ते होते कसे. यास जबाबदार कोण?यात महापालिकेचे आर्थिक नुकसान होते. अनेक प्रकरणे नगररचना विभागात बांधकाम परवानगी साठी येतात. परंतु एन. व चा परवानगी असल्याशिवाय बांधकाम परवानगी दिली जात नाही. एन. ए. फिस वसूल करण्याची व परवाना देण्याची जबाबदारी मा. जिल्हाधिकारी यांची आहे. महानगरपालिकेचा कुठलाही संबंध येत नाही. त्यामुळे अनेक प्रकरणे परवानगी विना थांबून आहेत. मनपास येणारे उत्पन्न येत नाही. महसूल बुडतो आहे. एन. चा परवाना असल्याशिवाय बांधकामास परवानगी दिली जात नाही. ही पध्दत बंद करावी एन. चा परवाना मा. जिल्हाधिकारी देतील तो त्या विभागाची जबाबदारी आहे. म्हणून एन. चा परवानगी नसतांना बांधकामास परवानगी देण्याच्या सूचना प्रशासनास कराव्यात अशी विनंती आहे.

**मा. सभापती :** ७५% २५% प्रमाणे ज्या जागेचा विकास करण्यासाठी महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे. व अशा जागेवरील हिस्सा महापालिकेस मिळालेला नाही आशा जागा तात्काळ ताब्यात घेवून भाडे तत्वावर देवून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे. म्हणून सभागृहात चर्चा झालेली होती. याची दखल घेतलेली दिसून येत नाही. मागील चर्चेचा अनुभव व लक्षात घेता अशा जागांवरील आलेला विकास व महापालिकेस मिळणारा हिस्सा मिळण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी शहर अभियंता सहा. संचालक नगररचना, उपआयुक्त (म) तसेच मुख्य लेखाधिकारी यांची एक समिती स्थापन करण्यात येते. शहरात किती ठिकाणी अशा जागा विकसित करण्यासाठी दिलेल्या आहेत. विकास झालेला आहे की नाही? मनपाचा किती टक्के हिस्सा आहे व तो दिला किंवा नाही. संपूर्ण अहवाल मा. आयुक्तांकडे देऊन स्थायी सिमतीच्या मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. तसेच शहरातील बरेच नागरिक बांधकाम परवानगीसाठी महापालिकेत येतात. आताच मुद्दा उपस्थित केलेला आहे. परंतु आकृषी कर भरणा व एन.ए.ची परवानगी नसेल तर त्यांना बांधकाम परवानगी दिली जात नाही. एन.ए. प्रमाणपत्र जोपर्यंत मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडून मिळत नाही. तोपर्यंत बांधकाम परवानगी दिली जात नाही. एन. ए. वसूल करण्याची जबाबदारी मा. जिल्हाधिकारी यांची आहे. त्यामुळे या सभागृहात असा

निर्णय घेण्यात येतो की, एन.ए. ची अट शिथील करण्यात येते. एन.ए नसतांना सुध्दा नागरिकांना बांधकाम परवानगी देण्यात यावी. मनपाचे उत्पन्न वाढेल.

**सहा. संचालक न.र. :** एन. ए. चे प्रमाणपत्र नसतांना बांधकाम परवानगी देणे योग्य होणार नाही. ७५% २५% प्रमाणे जागा विकसित करण्यासाठी देण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत. लोकेशन बाबत परवानगी संदर्भात मा. आयुक्तांकडे सादर करण्यात आली होती. आकृषी परवानगी बाबत मा. आयुक्तांनी आदेश दिल्याप्रमाणे नाशिक, पुणे, व इतर महानगरपालिकांकडून याबाबत माहिती मागविलेली आहे. शासनाचे स. स. न. र. निवासी उपजिल्हाधिकारी व मनपाचे सहा. संचालक नगररचना यांची संयुक्त चर्चा झाली. ज्यावेळी असे ठरले की, समुह योजना (Group Houses) परवानगी देताना अगोदर परवानगी द्यायची व नंतर आकृषी परवानगी द्यायची.

**श्री. इलियास किरमाणी :** या शहरातील अनेक बिल्डरांनी इमारतीचे बांधकाम केले. भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. अशा लोकांवर काय कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. तापडीया नाट्य मंदिराच्या मुद्दा मी वारंवार उपस्थित करतो. स्थगिती आदेश आहे. असे उत्तर दिले जाते. परंतु जी दुकाने तेथे थाटलेली आहेत. त्यांचेसाठी मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश नाहीत. भोगवटा प्रमाणपत्र न घेता त्या दुकानाचा वापर कसा केला जातो सिल का केले जात नाही. प्रशासन ॲक्शन का घेत नाही. रेग्युलर करावयाचे असेल तर दंड वसूल करून रेग्युलर होतील. महापालिकेस उत्पन्न येईल. २० बाय ३० च्या प्लॉट धारकानी बांधकाम केल्या तात्काळ कार्यवाही होते. मोठ मोठ्या बिल्डरांच्या इमारतींचा अनाधिकृत वापर सुरू असतांना कार्यवाही होत नाही. यापूर्वी आपण या सभागृहात प्रशासनास आदेश दिलेले होते का कार्यवाही झालेली नाही. बिल्डरांना प्रशासन पाठीशी घालत आहे.

**मा. सभापती :** अशा लोकांना प्रशासनाने नोटीसा दिल्या आहेत. मुदत संपल्यानंतर प्रशासन नियमाने कार्यवाही करील.

**श्री. इलियास किरमाणी :** सारा बिल्डर्सने स्वच्छता गृहाच्या जागेवर दुकाने काढून विक्री केली त्यांचे संदर्भात की मुद्दा उपस्थित करूनही अद्याप कार्यवाही केलेली नाही. नोटीसची मुदत ही संपलेली असतांना कार्यवाही नाही. शंका येत आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** येत्या २४ तारखेला नोटीसची मुदत संपणार आहे. त्यांचेकडून माहिती मागविली आहे. सदर दुकाने केंव्हा बांधण्यात अली. परवानगी केव्हा दिलली या संबंधीचा संचिका मागवून त्या नुसार कार्यवाही होईल.

**श्री. इलियास किरमाणी :** अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण तसेच नगर रचना विभागावर चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करावी सविस्तर चर्चा करता येईल ठोस निर्णय घ्यावे.

**मा. सभापती :** शंका घेण्याचे कारण नाही. हे सभागृह कोणासही पाठीशी घालणार नाही. अनाधिकृत बांधकाम तसेच अतिक्रमणाबाबत व नगररचना विभागाच्या संबंधी जे काही प्रश्न स. सदस्यांना विचारावयाचे असतील त्यासाठी आठ दिवसाच्या आत स्वतंत्र बैठक आयोहित करण्यात येईल.

**मा. आयुक्त :** या बैठकीला प्रशासकीय अधिकारी तसेच सहा. संचालक नगर रचना यांचे अधिनस्त जेवढे अधिकारी आहेत त्यांनी जातीने या बैठकीला उपस्थित

राहणे आवश्यक आहे. त्यांचेकडून सुध्दा माहिती घेण्याची आवश्यकता पडेल.

**सौ. शाहीन जफर :** शिक्षकांचे आर. डी. पुस्तक मुख्याध्यापका जवळ होते ते मुख्य कार्यालयामध्ये ठेवण्यात येत आहेत. अनेक महिला शिक्षिका आहेत. त्यांना मुख्य कार्यालयात यावे लागते. त्यासाठी खर्चही येतो. या ठिकाणी त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत नाही. मुख्य कार्यालयास का जमा केले? पूर्वीप्रमाणेच चालू ठेवावे.

**मुख्य लेखाधिकारी :** मुख्य कार्यालयात आर.डी.च्या जमा रकमेचा एक धनादेश देण्यात येतो. शिक्षण विभागाचे ४० धनादेदश देण्यात येत होते. महानगरपालिकेचे इतर विभागाचे सर्व कर्मचाऱ्यांना एकच धनदेश दिला जातो. याचे कमिशन महानगरपालिकेचे मिळत नाही. हे काम शिक्षकांचे नाही. मुख्य कार्यालयात शिक्षण विभागामध्ये उपलेखापाल दिलेले आहेत. पाच वर्षानंतर ही रक्कम परत मिळते एकाच धनादेश देण्याची कार्यवाही करणे योग्य आहे.

**मा. आयुक्त :** आर.डी. खाते पाहणे ही महानगरपालिकेची जबाबदारी नाही. ते बंद करण्यास हरकत नाही.

**मा. सभापती :** या संदर्भात तपासणी करून निर्णय घ्यावा.

**विषय क्र. ५० :**

दिनांक १२-०७-२००४ (का. प.क्र.-९) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम

**ठराव :**

दिनांक १२-०७-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५१ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी सादर केला आहे की. औरंगाबाद शहरास जायकवाडी जलाशयातून पाणी उपसा करून जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा केला जातो. सदरील जलवाहिनी मध्ये पाणी गळती झाल्यास किंवा फुटल्यास पाण्याचे परिणाम व दाब प्रचंड असल्यामुळे कमी क्षमतेच्या पंपाद्वारे पाणी उपसा करणे शक्य होत नाही. अशा वेळेस अग्निशमन विभागाचा पंप तात्पुरत्या स्वरुपात होवून काम केले जाते. अशा प्रकारचा पंप पाणीपुरवठा विभागाकडे असणे गरजेचे आहे. यामुळे जलवाहिनी दुरुस्तीचे काम जलदगतीने करण्यास मदत होईल.

या कामासाठी के. पी. एफ. १६०० पोर्ट बळ पंपाचे उत्पादन मे. किर्लोसकर ब्रदर्स लि. कंपनीच्या दर पत्रकानुसार रुपये ११,७५,७५४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्या मा. आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ११,७५,७५४/- च्या मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. आयुक्त :** १० लाखावरील रक्कमेसाठी प्रकरणे स्थायी समितीकडे येतात. मा. स्थायी समितीने मान्य करावयाचे आहे. प्रस्तावात आयुक्तांची शिफारस अशी दुरुस्ती करावी व सर्व विभागप्रमुखांनी याची नोंद घ्यावी.

**मा. सभापती :** प्रस्तावित दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** पाणी पुरवठ्यासाठी ए. सी. पाईप वापरण्यात येतात. चार-पाच वेळा जलवाहिनी फुटली. तसेच नवीन जलवाहीनीची चाचणी होतानाच फुटत असेल तर आपण किती वेळा दुरुस्त करणार. सदरचे पाईप औरंगाबाद शहरात वापरु नयेत. कनिष्ठ अभियंता, उपअभियंता यांना दाखवण्यात आलेले आहे. मागच्या वर्षी टाकण्यात आलेली जलवाहिनी फुटलेली आहे. ती जलवाहिनी टाकण्यासाठी जे पाईप टाकण्यात आलेले आहे ते यापुढे वापरण्यात येऊ नये.

**मा. सभापती :** वरील प्रमाणे अहवाल संबंधित अभियंता कडून प्राप्त झाला तर आपण निर्णय घेवू विषय क्र. ५१ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलवाहनी दुरुस्तीचे काम जलदगतीने करण्यासाठी के. पी. एफ १६०० पोर्टेबल पंपाचे उत्पादक मे. किर्लोस्कर ब्रदर्स लि. कंपनीच्या दरपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या रुपये ११,७५,७५४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२ :**

संचालक, प्राणी संग्राहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००४-०५ या वर्षाकरिता मनपा प्राणी संग्राहलयाकरिता बीफ खन्नी खरेदीचे दर निश्चित करणे करिता स्थायी समितीसमोर दि. २७-०५-०४ च्या बैठकीत प्रस्ताव दाखल केला होता. त्यामध्ये बीफ खरेदी करणे करीता फेर निविदा काढण्यात यावी असे ठरविण्यात आले होते. त्या अनुषंगाने या विभागातर्फे बीफ खरेदी करिता फेरनिविदा मागविण्यात आल्या असता त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | भाव प्रती किलो |
|---|---|---|
| १. | श्री. शेख खलील शेख चाँद | रु. २६.०० |
| २. | श्री. म. सलीम म. हनीफ | रु. ३०.०० |

तुलनात्मक दृष्टीने सर्वात कमी दर श्री. शेख खलील शेख चाँद यांचे २१.२९% प्रति किलो कमी करून रु. २०.०० प्रती किला या दराने पुरवठा करणेस तयारी दर्शवली आहे.

तथापी यापूर्वी मागविल्या बीफचे प्राप्त एकच निवदाधारक यांनी बीफ चे दर रु. १७/- प्र. कि. दिले होते. जे सध्या प्राप्त निविदेतील दरापेक्षा रु. ३-०० प्र. कि. ने कमी आहे म्हणजे प्रति दिवशी २१४ कि. लागणारे बीफ नुसार प्रती महा. रुपये १६,६९२/- प्रमाणे मनपाचे आर्थिक नुकसान होणार आहे.

तरी सदर दर हे सुध्दा बाजार भावापेक्षा कमी असले तरी पूर्वीचे प्राप्त दरापेक्षा रु. ३-०० प्र. कि. ने जास्त आहे. तरी या संदर्भात योग्य निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** श्री. शे. खलील शे. चाँद यांनी २६ रुपये प्र. कि. दराची निविदा भरली असून श्री. म. सलीम यांनी ३० रुपये दर भरलेले आहेत. वाटाघाटीनंतर श्री. शे. खलील यांनी २० रुपये प्रति किलोदराने पुरवठ्याची तयारी

दर्शविली आहे. यापूर्वी फेर निविदा मागविली होती. तेंव्हा १७ रुपये प्र. कि. दर आलेला होता. आताची वाटाघाटीनंतर निविदा धारकाने ३ रुपये जास्त दर मान्य केलेले आहे. त्यामुळे प्रतिमाह १६६९२/- इतके आर्थिक नुकसान होणार आहे. प्रशासनाला पत्र देवून याबाबत स्पष्ट मत देण्याबाबत कळविले होते की, ही निविदा स्विकारायची किंवा नाही? प्रशासनाने आपले मत मांडावे.

**संचालक (प्रा.सं.) :** २९ मे २००४ ला स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केला होता त्यावेळी अभिप्राय देण्यात आले होते. मात्र त्यावेही सभागृहाने फेरनिविदा मागवायचा निर्णय घेतला. नंतर ३ रुपये जास्त दराने निविदा धारकाने पुरवठा करण्यास सहमती दर्शविली. आताचे व पूर्वीचे दर विचारात घेता बाजारभााव लक्षात घेतले तर ३ रुपये प्रती किला विक्री होते आता त्यांनी १७ ऐवजी २० रुपये प्र. की. चे दर दिलेले आहेत. आपणास दररोज किती मांस लागते हे प्रस्तावात दर्शविलेले आहे. बीफ दरा बाबत वस्तुस्थिती सभागृहासमोर सादर केलेली आहे. सध्या पूर्वीचा पूरवठाधारक रु. १७ प्र. कि. प्रमाणे पुरवठा करतो. त्यांना विनंती करण्यात आलेली आहे की, निर्णय होईपर्यंत देण्यात यावे.

**मा. सभापती :** आपले मत काय आहे? निविदाधारक रु. १७ प्र. कि. प्रमाणे चांगल्या प्रतीचे बीफ देईल का?

**संचालक (प्रा. सं.) :** मासांची तपासणी शासनाचे डॉक्टराकडून केली जाते. त्यांनी जनावरांची निवड केल्यानंतरच पडेगांव कत्तल खान्यात कत्तल केली जाते व महानगरपालिकेच्या देखरेखीखाली प्राणी संग्रहालयात आणण्यात येते.

**श्री. मधुकर सावंत :** मागच्या वेळेस फेरनिविदा मागवावी असे बोललो होतो. महानगरपालिकेचे हित जपणे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. जो पूर्वी पुरवठा करीत होता त्या दराने देण्यास तयार असल्यास घेण्यात यावे. मालेगांव महानगरपालिकेमध्ये सव्वा लाखाचे आर्थिक नुकसान झाले त्यामुळे स्थायी समिती सदस्यांची पदे रद्द झाली. हित जपणे आद्य कर्तव्य आहे. रु. १७ प्रमाणे देत असेल तर घेण्यात यावे.

**मा. सभापती :** वाटाघाटी करून रु. १७/- प्र. कि. प्रमाणे देत असेल तर घेण्यात यावे. नसता फेरनिविदा काढण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्राणी संग्राहलयासाठी बीफ खन्नीचे निविदातील कमी दराचे निविदाधारक सह पुन्हा वाटाघाटी करण्यात याव्यात व ते रु. १७/- प्रती किलो प्रमाणे बीफ खन्नीचा पुरवठा करण्यास तयार असतील त्यांचेकडून घेण्यात यावे. अन्यथा फेर निविदा काढण्यात यावी. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३ :**

श्रीमती शकुंतलाबाई विश्वनाथराव भावस, सेविका (बडतर्फ) मनपा के. प्रा. शाळा, भावसिंगपुरा, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या अपीलावर त्यांना सदर अपील सादर करण्यासाठी १५ दिवस उशीर झाला हा विलंब माफ करण्यास स्थायी समिती सभा ठराव

क्र. ८२ दिनांक १४-०१-२००४ अन्वये सर्वानुमते मंजुरी देण्यात येवून सदर प्रकरणात वेगळी सुनावणी घेण्यात येवून स्थायी समितीसमोर अपील ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले आहे.

त्यानुसार श्रीमती शंकुतलाबाई मावस यांनी दि. १०-६-२००४ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार त्यांना कायमचे सेवेतून कमी केल्या बाबतच्या अपीलावर विचार करुन कामाचा मोबदला देण्यात यावा व त्यांचे जागेवर त्यांचे मुलीस कामावर घेण्यात यावे.

करीता संबंधीचे अपील विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रशासनाने या संदर्भात खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र) :** श्रीमती शंकुतलाबाई मावस या महापालिकेच्या शाळेत सेविका म्हणून कार्यरत होत्या. सतत पाच वर्ष गैरहजर असल्याने त्यांना बडतर्फ करण्यात आले. त्यांनी मा. उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले. मात्र उच्च न्यायालयाने सक्षम प्राधिकरणाकडे अपील करण्यास सांगितले. त्यामुळे त्यांनी स्थायी समितीपुढे अपील सादर केलेले आहे. त्या नोकरी करण्यास सक्षम नाही. त्यांचे सेवेत राहण्याचे वय राहिलेले नाही. त्यांना बडतर्फ करण्यात आलेले आहे. त्यामुळे परत कामावर घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यांनी विनंती केलेली आहे की, त्यांच्या मुली-मुलास कामावर घेण्यात यावे, महाराष्ट्र नागरी सेवा नियमात बडतर्फ कर्मचाऱ्यांच्या मुला-मुलीस कामावर घेण्याची तरतूद नाही.

**विधी सल्लागार :** श्रीमती शकुंतलाबाई मावस यांनी अनाधिकृतपणे कार्यालयाचे पूर्व परवानगी न घेता सतत पाच वर्षे गैरहजर राहिल्या. त्यामुळे त्यांना शिस्तभंगाचे कारवाई अंतर्गत बडतर्फ करण्यात आले. त्यांनी मा. उच्च न्यायालयात कामावर घेणेसंबंधी रिट याचिका दाखल केली. माञ उच्च न्यायालयाने प्रकरण पाहुन व कायद्यातील तरतूदी तपासून बडतर्फीच्या संबंधी अपीलीची ॲथॉरिटी अपील करण्यास सांगून प्रकरण निकली काढले. प्रशासकीय दृष्टीकोनातून महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार अनाधिकृत गैजहजरी शिस्तभंगास पात्र ठरते. प्रशासनाने बडतर्फीची जी कारवाई केली ती अगदी योग्य आहे. कायदेशीर रित्या बडतर्फ केलेले आहे. पुन्हा सेवेत घेण्याची तरतूद नाही. वारसांना कामावर घेता येणार नाही. प्रशासनाने केलेली कार्यवाही योग्य व वैद्य आहे.

**मा. सभापती :** १० तारखेस अर्ज दिलेला आहे. त्यांनी अडीच महिने काम केलेले आहे. त्यांचा मोबदला द्यावा म्हणून त्यानी विनंती केलेली आहे. अडीच महिन्याचा मोबदला देण्यात यावा व इतर बाबतीत कायदेशीर बाबी तपासून प्रशसनाने निर्णय द्यावा.

**ठराव :**

श्रीमती शकुंतलाबाई विश्वनाथराव मावस यांनी सादर केलेल्या अपीलावर त्यांनी दिलेला अर्ज व प्रशासनाने सादर केलेली माहिती विचारात घेवून त्यांनी अडीच महिने केलेल्या कामाचा त्यांना मोबदला देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच इतर बाबतीत कायदेशीर बाबी तपासून प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा असे ठरले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४ :**

श्री. आर. बी. टाक जेष्ठ स्वच्छता निरिक्षक (निलंबित) महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचे निलंबनाविरुध्द सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** आर्थिक बाबींचा संबंध येणार नाही असे त्यांना काम देण्यात यावे. तसेच आपण त्यांनी काम न घेता ७५% पगार देतो. सबब अपील मंजूर करण्यात येते व प्रशासनाने त्यांना कामावर रुजू करून घ्यावे.

**ठराव :**

श्री. आर. बी. टाक, जेष्ठ स्वच्छता निरिक्षक (निलंबीत) महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचे निलंबना विरुध्द सादर केलेले अपील खालील अटी सह मंजूर करण्यात येते.

१) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून नागरींकाकडून जमा झालेल्या करातून कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देण्यात येतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांकडून कामे न घेता ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही. तसेच सेवेत असतांना देखील खातेचौकशी करता येवू शकते.

२) संबंधित कर्मचाऱ्यास आर्थिक बाबींचा संबंध येणार नाही असे त्यांना काम देण्यात यावे. अपील कर्त्यांचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतीम निर्णयानुसार गृहित धरण्यात यावा.

उपरोक्त बाबींचा विचार करता श्री. आर. बी. टाक जेष्ठ स्वच्छता निरिक्षक (निलंबीत) महानगरपालिका औरंगाबाद यांचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून रद्द करण्यात येते. संबंधीतास कामावर रुजू करून घ्यावे. प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ५५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची विकासात्मक कामे सत्वरतेने न नियोजनात्मकरित्या होण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(१) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार २.५० लाख (रुपये दोन लाख पन्नास हजार) आर्थिक मर्यादेपर्यंतच्या कार्यालयीन कामांना (जी.पी.एफ. पेन्शन/ सेवेचे कार्यक्रम व कामे/ जाहिरात देयके/ पशुधन विभागाचे देयक संचिका/प्रकल्प विभागार्गत विविध कामे/ आरोग्य विभागाची देयके/ निवडणूक विभाग देयके/ लेखा विभाग देयके/  इत्यादी) प्रशासकीय मंजुरी देणे व आर्थिक खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार तसेच मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये महानगरपालिके तर्फे करावयाच्या रुपये २.५० लाख मर्यादेपर्यंत तसेच करारनामा करून देण्या संदर्भाचे अधिकार उपआयुक्त (प्रशासन) महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रदान करणेसाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रुपये २.५० लाख (रुपये दोन लाख पन्नास हजार) आर्थिक मर्यादेपर्यंतच्या कार्यालयीन कामांना (जी.पी.एफ. पेन्शन/ सेवेचे कार्यक्रम व कामे/ जाहिरात देयके/ पशुधन विभागाचे देयक संचिका/प्रकल्प विभागार्गत विविध कामे/ आरोग्य विभागाची

देयके/ निवडणूक विभाग देयके/ लेखा विभाग देयके/ इत्यादी) प्रशासकीय मंजुरी देणे व आर्थिक खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार तसेच मुंबई प्रांतिक मर्यादेपर्यंतचा करारनामा करून देण्यासंदर्भाचे अधिकार उपआयुक्त (प्रशासन) महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६ :**

कार्यकारी अभियंता (पापु) प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-७ पुजा हॉटेल ते एन-७ बुध्द विहार पर्यंत सिडको कार्यालयाने २५ ते ३० वषापूर्वी २५० मीमी व्यासाची पीव्हीसी पाईपलाईन टाकलेली असून त्यांवरून एन-७/जी-१, जी-३ बी-१, ए-४ या भागाचा पाणी पुरवठा होतो. पीव्हीसी पाईपलाई असल्यामुळे तरी वारंवार फुटत असते व कमी वेळेत या लाईनचे दुरुस्तीचे काम करता येत नाही. कारणी पी.व्ही.सी. पाईपचे सामान बाजारात उपलब्ध होत नाही. त्यामुळे या जलवाहिनीची दुरुस्तीच्या कामासाठी पुरवठ्यावर होता. व कधी कधी नागरिकांना पाण्याअभावी रहावे लागते. करिता सदरील ठिकाणची पी.व्ही.सी. जलवाहिनी बदलून त्या ठिकाणी २५० मीमी व्यासाची डी.वाय. जलवाहिनी टाकणे अत्यंत आवश्यक आहे. करिता सदरील कामाचे अंदाजप९ाक रक्कम रु. ११,६३,५६२ चे महाराष्ट्र जीवन प्राधिकारण च्या सन २००४-०५ च्या दरसचूीनुसार तयार करण्यात आले असून या कामावर होणार खर्च सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पीय तरतूद पान क्र. १५२ क्र. २३ वर करण्यात आलेल्या भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षकातून करण्यात येणार आहे. सदर कामास मा. आयुक्तांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

तरी सदरील एन-७ पूजा हॉटेल ते एन-७ बुध्द विहारापर्यंत २५० मीमी व्यासाची डी.आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अदांजपत्रक र. रु. ११,६३,५६२/- चे मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-७ बुध्द विहारापर्यंत २५० मीमी व्यासाची डी.आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ११,६३,५६२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको एन-७ म्हाडा कॉलनी खुल्या जागेत जिम्नॅशियम हॉल बांधणेच्या कामाकरिता सा. बां. विभागाचे सन २००१-०२ च्या जिल्हा दरसूचीनुसार र. रु. १४,९९,४४५/- चे अंदापत्रक तयार करण्यात आले असून त्या मा. आयुक्तांनी परिच्छेद २६, २९,३० च्या म्हणजेच खालील अटींच्या अधीन राहून शिफारस केली आहे.

**परिच्छेद क्र. २६ :**

विकास नियंत्रण नियमावली नियम १३-३ व त्याचे कलमानुसार

१) तळमजल्याचे बांधकाम बांधीव क्षेत्र जास्तीत जास्त १०% किंवा २०० चौ. मी. जे कमी असेल म्हणजेच बांधव क्षेत्र २०० चौ. मीञ करण्यात येईल.
२) बांधकामाचा वापर जिम्नॅशियम (or other activites releated to open space) पॅव्हेलियन वापर अनुज्ञेय.
३) टॉयलेट ब्लॉक- अनुज्ञेय नाही. त्यामुळे बांधण्यात येणार नाही.

**परिच्छेद क्र. २९ :**

नियोजन प्राधिकरण सिडको असल्यामुळे सिडकोकडून परवानगी घेणे योग्य. त्याप्रमाणे सिडकोची परवानगी घेण्यात येईल.

**परिच्छेद क्र. ३० :**

१) (Open Space) अतिक्रमण विरहित असावी.
२) ७/१२ पी.आर. कार्ड मनपाचे नांवे करून द्यावे. हस्तांतरण करून घेताना अटी टाकून हस्तांतरण करून घ्यावे.

सदर कामासाठी सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात अ.क्र. १ पृष्ठ क्र. ९२ वर १० लक्ष व अ.क्र. ७ पृष्ठ क्र. १०३ वर ५.०० लक्ष असे एकूण १५ लक्ष रुपयाची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. करिता सदर कामाचे अ.प. रु. १४,९९,४४५/- मान्यतेस्वत व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-७ म्हाडा कॉलनी खुल्या जागेत जिम्नॅशियम हॉल बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १४,९९,४४५/- च्या अंदाजपत्रकास प्रस्ताव नमूद परिच्छेद क्र. २६, २९, ३० च्या अटीस अधिन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजना अंतर्गत महानगरपालिकेच्या शालेया विद्यार्थ्यांना सन २००४-०५ या आर्थिक वर्षात प्रतयेकी दोन गणवेश पुरवठा करणेसाठी दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दैनिक सकाळ पुणे व दैथ्नक लोकमत औरंगाबाद या वर्तमान पत्रात दिनांक १८-०५-०४ रोजी जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या.

एकूण १३ निविदापत्रकांची विक्री झाली पैकी दिनांक ०८-०६-०४ रोजी सहा निविदा दरपत्रके या कार्यालयास प्राप्त झाली ती खालील प्रमाणे प्राप्त सहा दरपत्रकापैकी मे. ओंकार इंडस्ट्रीज उमरगा यांची निविदा कागदपत्रा अभावी उघडण्यात आली नाही. इतर पाच निविदाधारकांनी सादर केलेले कापडाचे नमूने दिनांक १४-०६-२००४ रोजी मे. केंद्रीय कपास औद्योगिक अनुसंधान संस्थान मुंबई येथे निविदा विवरणानुसार कापडाच्या तपासणीसाठी पाठविण्यात आले. दिनांक ३०-०६-०४ रोजी या कार्यालयात संबंधित लॅब मधून तपासणी अहवाल प्राप्त झाला. तपासणी अहवाल खालील प्रमाणे.

प्राप्त सहा निविदा दरपत्रके

१) मे. एम.एसृ एम. आय. डी. सी. औरंगाबाद.
२) मे. जागृती महिला औद्योगिक सहकारी संस्था, औरंगाबाद
३) मे. शुभम इंडस्ट्रीज, पैठण
४) मे. अंकित कॉटेज इंडस्ट्रीज, पैठण
५) मे. क्रिस्टल इंटरनॅशनल, पुणे.
६) मे. ओंकार इंडस्ट्रीज, उमरगा.

**तपासणी अहवाल :**

**१) खाकी कापड**

मे. एम.एस.एस. आय. डी. सी., औरंगाबाद
मे. अंकित कॉटेज इंडस्ट्रीज, पैठण

मे. क्रिस्टल इंटरनॅशनल, पुणे.
यांचे नमूने योग्य असल्याचे अहवाल प्राप्त

**२) पांढरे कापड**

मे. शुभम इंडस्ट्रीज, पैठण
मे. अंकित कॉटेज इंडस्ट्रीज, पैठण
मे. क्रिस्टल इंटरनॅशनल, पुणे.
नमूने योग्य असल्याचे अहवाल प्राप्त

**३) निळे कापड**

मे. शुभम इंडस्ट्रीज, पैठण
मे. अंकित कॉटेज इंडस्ट्रीज, पैठण
मे. क्रिस्टल इंटरनॅशनल, पुणे.
यांचे नमूने योग्य असल्याचे अहवाल प्राप्त

उपरोक्त प्रमाणे मे. जागृती महिला (तिन्ही नमूने योग्य असल्याचे अहवाल प्राप्त असल्याने) वगळता इतर चार निविदाधारकांचे दराचे पाकिट दिनांक ०२-०७-०४ रोजी उघडण्यात आले.

प्राप्त दराचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडण्यात आलेला आहे. प्राप्त दराचे अवलोकन केले असता खाकी कापडाचे गणवेशात प्राप्त दर मे. एम.एस.एम.आय.डी.सी. यांचे दर गत वर्षीच्या मान्य दराचे तुलनेत योग्य असल्याने ते अंतिम करण्यात येवून इतर दोन पांढऱ्या व निळ्या कापडाच्या दराची गतवर्षीच्या मान्य दराशी तुलना केली असता प्राप्त दर अतिशय जास्त असल्याने मा. आयुक्त यांची तजविज दिनांक ०३-०७-०४ अनुसार चारही निविदा धारकांस दराचे वाटाघाटीस दिनांक ०८-०७-०४ रोजी बोलाविण्यात येवून त्याचे दरात कमी करणेस विनंती करण्यात आली. संबंधितांनी बंद पाकीटात दर कमी करून दिले. परंतु सदरील दर देखील अतिशय जास्त असल्याने कार्यालयाने शासनाचे कापडाचे मान्‍ दर, वर्गानुसार लागणारे कापड, जिल्हा परिषदेचे शिलाईचे दर, विक्री कर, जकात कर, वाहतुक इत्यादीचा खर्चाचा विचार करून वर्गनिहाय व कापड निहाय दर काढण्यात येवून येणाऱ्या दरानुसार संबंधितास दिनांक १३-०७-०४ रोजी प्रत्यक्ष बोलावून दर कमी करण्यास सांगितले असता मे. अंकित कॉटेज व मे. क्रिस्टल इंटरनॅशन या दोन एजन्सी वगळता मे. शुभम इंडस्ट्रीज यांनी प्रस्तावित करात कर करणेस तयारी दर्शविली असल्याने प्रकरण मान्यतेस्तव मा. आयुक्त यांचेकडे पाठविण्यात आले. सदरील प्राप्त दरास मा. आयुक्त यांनी दिनांक १७-०७-०४ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दर जि. प. कापडाचे दरानुसार येणार दर इत्यादीचा तक्ता सोबत जोडलेला आहे. सदरील दरानुसार खालील प्रमाणे खर्च येत आहे. शिक्षण विभागाचे म्हणणेनुसार शालेय विद्यार्थ्यांची वस्तुनिष्ठ संख्या जुलै अखेर प्राप्त होणार असल्याने प्रकरणात विलंब होवू नये म्हणून गतवर्षीची विद्यार्थी संख्या गृहित धरण्यात आलेली आहे. यामध्ये कमी पडलेले गणवेश मागविण्यात येतील.

**गणवषे खरेदी दराच्या वाटाघाटीनंतर प्राप्त दरानुसार येणारा खर्च दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र | अ) मुलांसाठी खाकी रंगाची हाफ पॅन्ट | अंदाजित खरेदी | प्राप्त दर रुपये | येणारा खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | वयोगट ५ ते ६ वर्ष (बालवाडी) | २६०० | १५.५० | ४०,३००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) | वयोगट ६ ते ७ वर्ष (पहिली) | २२०० | १६.७५ | ३६,८५०.०० |
| ३) | वयोगट ७ ते ८ वर्ष (दुसरा) | १९०० | १८.२५ | ३४,६७५.०० |
| ४) | वयोगट ८ ते ९ वर्ष (तिसरी) | १७५० | २०.२५ | ३५,४३८.०० |
| ५) | वयोगट ९ ते १० वर्ष (चौथी) | १७०० | २१.२५ | ३६,९७५.०० |
| ६) | वयोगट १०ते ११ वर्ष (पाचवी) | १५०० | २२.५० | ३३,७५०.०० |
| | **मुलांसाठी खाकी रंगाची फुल पॅन्ट** | | | |
| ७) | वयोगट ११ते १२ वर्ष (सहावी) | १४०० | ६१.५० | ८६,१००.०० |
| ८) | वयोगट १२ते १४ वर्ष (सातवी) | १२०० | ९७.२५ | ८०,७००.०० |

| **ब) मुलांसाठी पांढरा हाफ शर्ट** | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | वयोगट ५ ते ६ वर्ष (बालवाडी) | ५२०० | २६.०० | १३५२००.०० |
| २) | वयोगट ६ ते ७ वर्ष (पहिली) | ४४०० | २८.०० | १२३२००.०० |
| ३) | वयोगट ७ ते ८ वर्ष (दुसरी) | ३८०० | ३०.४० | ११५५२०.०० |
| ४) | वयोगट ८ ते ९ वर्ष (तिसरी) | ३५०० | ३२.८० | ११४८००.०० |
| ५) | वयोगट ९ ते १० वर्ष (चौथी) | ३४०० | ३५.५० | १२०७००.०० |
| ६) | वयोगट १०ते ११ वर्ष (पाचवी) | ३००० | ३८.९५ | ११६८५०.०० |
| ७) | वयोगट ११ते १२ वर्ष (सहावी) | २८०० | ४२.३५ | ११८५८०.०० |
| ८) | वयोगट १२ते १४ वर्ष (सातवी) | २४०० | ४५.७५ | १०९८००.०० |

| **क) मुलींसाठी निळा स्कर्ट** | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | वयोगट ६ ते ७ वर्ष (पहिली) | ४३०० | ४०.०० | १७२०००.०० |
| २) | वयोगट ७ ते ८ वर्ष (दुसरी) | ३९०० | ४३.१० | १६८०९०.०० |
| ३) | वयोगट ८ ते ९ वर्ष (तिसरी) | ३४०० | ४८.५० | १६४९००.०० |

| **ड) मुलींसाठी पांढरे ब्लाऊज** | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | वयोगट ६ ते ७ वर्ष (पहिली) | ४३०० | २१.९० | ९४१७०.०० |
| २) | वयोगट ७ ते ८ वर्ष (दुसरी) | ३९०० | २४.२५ | ९४५७५.०० |
| ३) | वयोगट ८ ते ९ वर्ष (तिसरी) | ३५.३० | २५.३० | ८६०२०.०० |
| | **इ) मुलींसाठी निळा सलवार** | | | |
| १) | वयोगट ९ ते १० वर्ष (चौथी) | ३५०० | ७५.३० | २६७०५०.०० |
| २) | वयोगट १०ते ११ वर्ष (पाचवी) | ३१०० | ८०.१५ | २४८४८६५.०० |
| ३) | वयोगट ११ते १२ वर्ष (सहावी) | ३१०० | ८७.१५ | २७०१६५.०० |
| ४) | वयोगट १२ते १४ वर्ष (सातवी) | २६०० | ९९.४० | २५८४४०.०० |

| **ई) मुलींसाठी पांढरा पंजाबी शर्ट** | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | वयोगट ९ ते १० वर्ष (चौथी) | ३५०० | ६६.४० | २३२४००.०० |
| २) | वयोगट १०ते ११ वर्ष (पाचवी) | ३१०० | ७३.२० | २२६९२०.०० |
| ३) | वयोगट ११ते १२ वर्ष (सहावी) | ३१०० | ५६.६० | २३७४६०.०० |
| ४) | वयोगट १२ते १४ वर्ष (सातवी) | २६०० | ८०.०० | २०८०००.०० |

| **क) वयोगट ५ ते ६ वर्ष (बालवाडी)** | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | पिको फ्रॉक | ५४०० | ५९.७५ | ३२२६५०.०० |
| | | | **एकूण** | ४३९०७४३.०० |

उपरोक्त प्रमाणे एकूण रुपये ४३,९०,७४३.००/- एवढा खर्च येत आहे. अंदाजपत्रकीय तरतूद रुपये ४०.०० लक्ष पैकी रुपये ३६.० लक्ष एवढी तरतूद शिल्लक असून रुपये ८ लक्ष एवढी तरतूद कमी पडत असल्याने ती इतर लेखा शिर्षातून (लिखाण साहित्य/छपाई साहित्य/क्रमिक पुस्तके व विज्ञान साहित्य इ. या लेखाशिर्षातून) वळीत करून घ्यावी लागेल.

करिता उपरोक्त प्रस्तावित केलेनुसार खाकी रंगाचे गणवेषाचे पुरवठा आदेश मे. एम.एस.एस. आय.डी.सी. औरंगाबाद यांना तर पांढऱ्या व निळ्या रंगाचे गणेवषाचे पुरवठा आदेश मे. शुभम इंडस्ट्रीज पैठण यांना देणेस्तव तथा कमी पडणारी अंदाजपत्रकीय तरतूद रुपये ८ लक्ष एवढी रक्कम उपरोक्त दर्शविलेल्या लेखाशिर्षातून वळती करून घेणेस प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** स. सदस्यांकडून अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे बाबत प्राप्त झालेले प्रस्ताव अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे तसेच विविध कामासांठी सुधारीत तरतूद उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने सन्माननीय सदस्यांकडून वॉर्ड क्र. २३ सिंधी कॉलनी ड्रेनेज ऐवजी कॉँक्रीट फुटपाथ करणे, रमानगर ते पन्नालालनगर नाल्याच्या कामासाठीची २ लक्षची तरतूद डॉ. आंबेडकर पुतळा येथे स्लॅब टाकणेकरिता वापरण्यात यावे. वॉर्ड क्र. २४ श्रेयनगर स्वानंद हौ. सो. खुल्या जागेवर बहुउद्देशीय हॉल बांधणे ऐवजी संत एकनाथ रंग मंदिरासमोरील रस्ता रुंदीकरण व फुटपाथ बांधणे (५ लक्ष) वॉर्ड क्र. ३९- भडकलगेट नुर कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे या कामाकरिता २.५० लक्ष तरतूद करणे. वॉर्ड क्र. २८- अभिनंदन हौ. सो. मनपाच्या जागेत उद्यान विकसित करणेच्य कामासाठी रु. ३ लक्ष ऐवजी रु. २ लक्ष तरतूद करणे आणि अभिनंदन हौ. सो. येथे मनपाच्या खुल्या जागेवर व्यायामशाळा बांधणेच्या कामासाठी ४ लक्ष ऐवजी ५ लक्ष तरतूद करणे. नविन कामाकरिता लागणारी तरतूद व वाढीव रक्कम तांत्रिकदृष्ट्या रद्द होणाऱ्या कामतून व बचतीतून वाढीव तरतूद उपलब्ध करणे या प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देण्याचा निर्णय घेते.

**निर्णय :**

सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामाचे लेखाशिर्षात बदल करणे काही कामांसाठी असलेली तरतूद अपुरी असल्याने सुधारित आर्थिक तरतूद करणे संबंधाने ज्या कामांकरिता सुधारित वाढीव आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. अशा कामांकरिता अतिरिक्त शहर अभियंता यांनी तांत्रिकदृष्ट्या रद्द होणारी कामे तसेच इतर कामाचे होणाऱ्या बचतीमधून वाढीव तरतूद उपलब्ध करून या कामाकरिता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव अर्थसंकल्पातील तरतूद | सुधारित कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतूद |
|---|---|---|
| २३ | सिंधी कॉलनी येथे ड्रेनेजचे काम करणे - ५ लक्ष (पान नं. ११४/११) | सिंधी कॉलनी येथे कॉँक्रीट फुटपाथ तयार करणे - ५ लक्ष |
| | रमानगर ते पन्नालालनगर नाल्याचे काम - २ लक्ष (पान नं. ११४/११) | रमानगर येथील डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यावर स्लॅब टाकणे - २ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| २४ | श्रेयनगर स्वानंद हौ. सो. खुल्या जागेवर बहुउद्देशीय हॉल बांधणे - ५ लक्ष | संत एकनाथ रंगमंदिरासमोरील रस्ता रुंदीकरण करून फुटपाथ बांधणे. - ५ लक्ष |
| ३९ | भडकलगेट, नुर कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे -२.५० लक्ष | हे काम नविन समाविष्ट करून या करिता लागणारी तरतूद इतर कामाच्या होणाऱ्या बचतीमधून तसेच तांत्रिकदृष्ट्या रद्द होणाऱ्या कामाचे तरतूदीमधून वळती करण्याबाबत संबंधित कार्य. अभियंता यांनी कार्यवाही करावी. |
| २८ | अभिनंदन हौ. सो. सा मनपाच्या जागेत उद्यान विकसित करणे.-३.०० लक्ष | अभिनंदन हौ. सो. सा. मनपाच्या जागेत उद्यान विकसित करणे.-२.०० लक्ष |
| २८ | अभिनंदन हौ. सो. सा मनपाच्या खुल्या जागेवर व्यायाम शाळा बांधणे.- ४.०० लक्ष | अभिनंदन हौ. सो. येथे मनपाच्या खुल्या जागेवर व्यायाम शाळा बांधणे.- ५.०० लक्ष |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना सन २००४-०५ या आर्थिक वर्षात प्रत्येकी दोन गणवेश पुरवठा करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी कापडाचे नमुने निविदा विवरणानुसार प्राप्त असलेल्या निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार खाकी रंगाचे गणवेशाचे पुरवठा आदेश मे. एम.एस. एम.आय.डी.सी. औरंगाबाद यांना तर पांढऱ्या व निळ्या रंगाचे गणवेशाचे पुरवठा आदेश मे. शुभम इंडस्ट्रीज पैठण यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या कामाकरिता लागणाऱ्या एकूण रक्कम रु. ४३,९०,७४३/- च्या खर्चास आणि अंदाजपत्रकीय तरतूद ३६.०० लक्ष उपलब्ध असल्यामुळे कमी पडत असलेली ८.०० लक्षची तरतूद लिखाण साहित्य छपाई साहित्य, क्रमिक पुस्तके व विज्ञान साहित्य इ. लेखाशिर्षातून वळती करून घेण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | सभापती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | स्थायी समिती महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २९-०७-०४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक २९.०७.२००४ रोजी मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. भाऊसाहेब ताठे | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. संजय पांडुरंग शिरसाठ | -//- |
| ३) | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| ४) | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी | -//- |
| ५) | स. स. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर | -//- |
| ६) | स. स. सौ. शाहीन जफर | -//- |
| ७) | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ८) | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ९) | स. स. सौ. रशिदा बेगम | -//- |
| १०) | स. स. श्री. शेख मुनाफ शे. यासीन | -//- |
| ११) | स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| १२) | स. स. श्री. प्रल्हाद निमंगावकर | -//- |
| १३) | स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १४) | स. स. श्री. स. सलीम स. युसूफ | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती :** सभा वेळेवर सुरू केलेली आहे. अधिकाऱ्यांनी सुध्दा वेळेवर येणे गरजेचे आहे. याची नोंद घ्यावी.

**श्री. संजय शिरसाठ :** आजची सभा वेळेवर सुरु झालेली असून चांगला पायंडा आपण पाडत आहात सर्वच अधिकारी यानंतर सभेला वेळेवर उपस्थित राहतील. बरेच नागरिक / अधिकारी / नगरसेवक यांची वाटा पाहतात. आजच्या बैठकीला उपस्थित नसतील तर पुढील बैठकीपासून वेळेवर हजर राहतील अशी अपेक्षा आहे. कोरम नाही म्ळणून सभा १५ मिनिटांसाठी तहकूब करण्यांत यावी.

**मा. सभापती :** सभेची वेळ लक्षात घेवून अधिकारी / कर्मचारी यांनी वेळेवर उपस्थित राहणे गजरेचे आहे. एक प्रकारची शिस्त लागावी यासाठी जे जे अधिकारी सभेला अनुपस्थित असतील जे अनुपस्थित आहे. त्यांची सहाय्यक आयुक्त-१ यांची नोंद घ्यावी. तशी यादी सादर करावी. कोरम पूर्ण नाही म्हणून १५ मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यांत येते.

**(वेळ सकाळी ११.३० वाजता सभा पुन्हा दुपारी १२.०० वाजता सुरू)**

**श्री. मधुकर सावंत :** मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार नगररचना व प्रशासकीय विभाग यावरच चर्चा करायची का?

**मा. सभापती :** मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे या बैठकीत प्रशासकीय विभाग व नगररचना विभागाच्या संबंधित चर्चा होईल. विषय पत्रिका अगोदर की चर्चा अगोदर घ्यायची सभागृहाने ठरवावे. विषय पत्रिका व दोन विभागावरच चर्चा करायची आहे. माझ्या मते अगोदर चर्चा नंतर विषय पत्रिका घ्यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** चर्चेसाठी वेळ देण्यात यावा. प्रशासकीय विभागाच्या बाबतीत अगोदर चर्चा व्हावी की नगर रचना विभागावर. परंतु नगररचना विभागाच्या बाबतीत चर्चा व्हावी म्हणूनच आपणच सूचित केले. नगररचना विभागाच्या संबंधित जो विषय आहे, या शहरात किती मालमत्ता आहे व किती मालमत्तावर टॅक्स लागलेला आहे. हे सर्व करण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविलेली होती. माझ्या मते निविदेनुसार संपूर्ण मालमत्तेचा सर्वे करण्यासाठी हैद्राबाद येथील स्पेक कंपनीला ठेका दिला होता. त्या एजन्सी मार्फत सर्वेचे काम चालू आहे. ६ महिन्यात काम पूर्ण करून अहवाल सादर करण्याच्या करारनाम्यानुसार उल्लेख आहे. निविदा होवून ०५ महिने झाले १ महिना बाकी आहे. आजपर्यंत ३००० मालमत्तेचा सर्वे केलेला आहे. जे महापालिकेस उत्पन्न मिळून देवू शकते. जे फक्त जकात नंतर मालमत्तेच्या माध्यमातून मिळू शकते. त्या सर्व बाबतीत विचार करून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने एका खाजगी एजन्सीला मालमत्तेचा सर्वेक्षण करण्याचे काम दिलेले आहे. हे सर्व होत असतांना गेल्या ५ महिन्यात जो सर्व झाला. त्याचा अहवाल या सभागृहासमोर आलेला नाही. दर ८ दिवसात एक बैठक होत आहे. तरी अहवाल सादर होत नाही. सर्वसाधरण सभा किंवा स्थायी समितीच्या सर्वच सदस्यांना या बाबत माहिती देणे गरजेचे होते. वृत्तपत्रात माहिती मिळते व त्यानंतर अधिकारी कोण आहे. कशा पध्दतीने काम चालते. चौकशी सुरू होते या सर्वेक्षणासाठी जो कर्मचारी वर्ग निविदेप्रमाणे नियुक्त करणार होते त्यानुसार कामकाज होते आहे का?

**मा. सभापती :** या शहरातील मालमत्तेचे सर्वेक्षणाचे काम सध्या स्पेक कंपनी हैद्राबाद यांचे मार्फत चालू आहे. निविदा देवून ५ महिने झाले. दर महिन्याला किंवा नियोजित वेळी सवेक्षणाचा अहवाल सभागृहाला सादर करणे आवश्यक होते. करारनाम्यानुसार त्या कामासाठी आवश्यक कर्मचारी व अटी शर्तीनुसार सर्वेक्षणाचे काम होते की नाही. सविस्तर माहिती या सभागृहाला अपेक्षित आहे. उपआयुक्त श्री. फंड साहेब हे निवडणूकीच्या कामानिमित्त मुंबईला गेलेले आहेत. श्री. कालेले हे सभागृहात उपस्थित असतील व त्यांनी गेल्या ५ महिन्यात या कंपनीचे काम कशा पध्दतीने होते त्याची सविस्तर माहिती या सभागृहाला द्यावी.

**उपअभियंता (श्री. कालेले) :** मालमत्तेचे खाजगी एजन्सीमार्फत सर्वेक्षण करून त्यास टॅक्स लावण्या संदर्भात निविदा काढण्यात येऊन दि. २६-०२-०४ रोजी संबंधित एजन्सीला वर्क ऑर्डर देण्यात अलेली आहे. त्यानुसार ०६ महिन्याची मुदत असून २५-०८-०४ रोजी मुदत संपणार आहे. महापालिकेच्या नोंदीनुसार १.३४ लक्ष मिळकती आहेत. या सर्वेक्षणानंतर किमान २ लक्ष मिळकतीचे सर्वेक्षण होईल. या निविदेनुसार १५३ रु. प्रति मिळकत असा दर निश्चित केलेले आहे. गेल्या ५ महिन्यात झोन ४ मध्ये सर्वेक्षण केले ४० ॲसेसमेंट ब्लॉक पैकी ३४ चे काम पूर्ण झालेले आहे. झोनच्या रेकॉर्डनुसार मिळकती

३१.६८२ इतक्या आहेत. त्याच भागात आतापर्यंत ३४.३५४ मिळकतीचे सर्वेक्षण झालेले आहे. झोन ८ मध्ये सर्वेक्षण चालू आहे. त्याचे ३७ वॉर्ड केले आहे. महापालिकेच्या नोंदीनुसार ११६२० मिळकती अभिलेखावर आहेत. सर्वेक्षण ९२९५ मिळकतीचे झालेले आहे. व सर्वेक्षणाचे काम दोन्ही झोनमध्ये चालू आहे. माझे फक्त झोन क्र. ४ पुरते नियंत्रण मर्यादीत आहे. बाकीचे श्री. फंड साहेब पाहतात.

**मा. सभापती :** ज्या शर्ती अटी नुसार काम सदर कंपनीतर्फे होते का? बऱ्याच नागरिकांच्या तक्रारी आहे व नर्गिस प्रमाणे जो कर्मचारी ठेवावयास पाहिजे ते ठेवण्यात आलेले नाही असे म्हटले जाते. तसेच जे कर्मचारी नियुक्त केले कर कमी लावण्यात येईल मला वेगळे पैसे द्या अशी मागणी करतात तशा तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत. महापालिकेचे कंट्रोल असावेत. जर १०० मालमत्तेचे सर्वेक्षण केले तर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी सुध्दा तपासणी करणे आवश्यक आहे.

**उपअभियंता (श्री. कालेले) :** तसे पत्र सदर कंपनीला देण्यात आलेले आहे. प्रशिक्षित कर्मचारी वर्ग आहे.

**श्री. मधुकर सावंत :** चुकीची माहिती देत आहे. नॉर्म प्रमाणे कर्मचारी नियुक्त केलेले नाही. प्रशिक्षित कर्मचारी नाही. सर्वेक्षणासाठी जे इंजिनियर पाहिजे ते दिलेले नाही. या शहराच्या आजुबाजूच्या भागातील १० वी १२ वी पास असलेले बेरोजगार सर्वेक्षणाचे रु. १०-१० प्रती मिळकत प्रमाणे काम करून घेत आहे. गेल्या ०५ महिन्यात फक्त ३२९१ मालमत्तेचा सर्वे झालेला आहे. संबंधित अधिकारी यांचे सहीचाच तक्ता माझ्या हातात आहे. कदाचित यावरील सहीही त्यांची आहे. विभाग-४ मालमत्ता सर्वेक्षणाचा अहवाल दिला आहे. अनु. क्र. नवीन प्रभाग क्र. आकारणी प्रभागातील क्षेत्र व नांव आकारणी प्रभागातील मालमत्तेची संख्या आकारणी केलेल्या प्रभागातील सर्वेक्षणाची संख्या परिपूर्ण मालमत्तेची संख्या व अपूर्ण भरलेली फॉर्म संख्या परिपूर्ण झालेली मालमत्तेची सर्वेक्षणाची संख्या ३२९१ असून अपूर्ण भरलेल्या फॉर्मची संख्या ११६४६ इतकी आहे. या कंपनीस काम देवून ५ महिने झाले ६ महिन्याचा कालावधी पूर्ण होत आहे. १/३ काम झालेले नाही. एकूण २-३ कोटी रुपये खर्च होणार आहे. हीत जपतो की नुकसान करतो हेच कळायला मार्ग नाही.

**मा. सभापती :** जो कर्मचारी वर्ग पाहिजे नॉर्म प्रमाणे नियुक्त केलेला आहे का? क्वालिफाईड स्टाफ पाहिजे. इंजिनियर्स, सब ओव्हरसीअर्स नियुक्त केले आहे का?

**उपअभियंता (श्री. कालेले) :** सुरुवातीस जे काही अशिक्षित कामगार लावण्यात आलेले होते त्यावर त्यांना पत्र दिले व नॉर्म प्रमाणे जे काही इंजिनियर वगैरे आवश्यक आहे ते घेण्यात यावे. म्हणून पत्र देवून कळविण्यात आलेले होते.

**मा. सभापती :** जो करारनामा झाला त्यात जे नमूद केलेले आहे ते सर्व कर्मचाऱ्यांमार्फत पोहचविणे आवश्यक आहे.

**उपअभियंता (श्री. कालेले) :** सर्व माहिती कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली आहे.

**श्री. मधुकर सावंत :** खात्रीने सांगेल यात ९०-९५% लोक गंगापुर, वैजापुर, सिल्लोड, सोयगांव भागातील १० वी ते १२ वी शिक्षण घेतलेले मुले ८-१० प्रमाणे प्रत्येक मालमत्तेचा सर्वेक्षण करून देत आहे. सर्व बेकार मुले आहेत.

इंजिनियर नाही. सब ओव्हर्सियर नाहीत. १००-५० रु. दिल्यानंतर हे कामगार काम करतात. कसाही व किती टॅक्स लावतात. महापालिकेचे २००१-२००२ ला महानगरपालिकेचे अधिकारी/ कर्मचारी यांनी सर्वेक्षणाचे काम केलेले होते. २-३ कोटी रुपये खर्च करून महापालिकेचे हित साध्य करणार आहोत का? हा प्रश्न आहे. आतापर्यंत फक्त ३२९१ मालमत्तेचे सर्वेक्षण केलेले आहे. म्हणून दिलेले टेंडर रद्द करावे व होणारे महापालिकेचे नुकसान टाळावे.

**मा. सभापती :** विशिष्ट मुदतीत काम करावयास पाहिजे दंडात्मक काय कार्यवाही करणार आहे. दिलेल्या कालावधीच्या प्रमाणात काम होत नाही.

**उपअभियंता (श्री. कालेले) :** विहित मुदतीत काम केले नाही तर दर दिवसाला रु. ५०००/- दंड म्हणून वसूल करण्याबाबत टेंडर मध्ये नमूद आहे दि. ०१-०७-०४ रोजी तसे पत्र संबंधित कंपनीस दिलेले आहे. तशा प्रकारची कार्यवाही करू म्हणून, परंतु कार्यवाही सुरू नाही.

**मा. सभापती :** या संपूर्ण प्रकारणाची चौकशी करून उपआयुक्त (म.) व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील स्थायी समितीच्या बैठकीत अहवाल द्यावा.

**श्री. भगवान रगडे :** २-३ दिवसापूर्वी मिसारवाडी भागातील काही नागरिक महानगरपालिकेत आलेले होते. त्यांनी आपली प्रत्यक्ष भेटी घेतली. आपण स्वत: तेथे जाऊन पाहणी केली. उपआयुक्त शिंदे साहेब पण होते. बाबुलाल नावाच्या एका गरीब व्यक्तीचे राहते घर अनाधिकृत आहे म्हणून पाडण्यात आले. तो राहत होता. त्याचा संसार उघड्यावर पडला. राहते घर तोडण्याचा अधिकार आहे का? या शहरात १५०० चे वर अनाधिकृत घराचे बांधकाम चालू असेल. त्यांचेवर कार्यवाही होत नाही हेच घर पाडण्याचे कारण काय? राहते घर पाडतांना कायद्यात नोटीस देण्याची तरतूद आहे.

**मा. सभापती :** मिसारवाडी भागात बाबुलाल नावाच्या व्यक्तीचे घर पाडण्यात आले. कोणीही नागरिक पावसाळ्याच्या दिवसात बेघर होऊ नये म्हणून शासनाचेच निर्देश आहे. मागील बैठकीत फळ विक्रेत्याच्या बाबतीत मा. आयुक्तांनी सुध्दा शासन निर्देश वाचून दाखविला होता की बेघर होऊ नये. त्या भागात इतर अतिक्रमण होत आहे असे असतांना सुध्दा एका विशिष्ट व्यक्तीचेच घर का पाडण्यात आले.

**प्रशासकीय अधिकारी :** जेंव्हा बांधकाम चालू होते तेंव्हा ते पाडण्यात आलेले होते. त्यांचे सामान जप्त करून आणले होते. या जागेचा वाद आहे. म्हणून सांगण्यात आले. वाद मिटल्यानंतर बांधकाम कराचे जे सामान जप्त करून आणले होते त स. सदस्य श्री. रगडे यांनी चिठ्ठी दिल्यानुसार व फोन केल्यानंतर परत केले. त्यांनी बांधकाम करू नये म्हणून ताकीद दिली. पुन्हा त्या व्यक्तीने दुसऱ्या दिवशी बांधकाम सुरू केले.

**मा. सभापती :** जागेचा वाद सोडविण्याचे काम आपल्या विभागाचे नाही. इतर विभाग आहे. काम होत असलेले अधिकृत की अनाधिकृत हेच बघण्याचे काम आपल्या विभागाचे आहे. ते काम अनाधिकृत की अधिकृत होत आहे हे फक्त एका विशिष्ट व्यक्तीचेच का बघितले गेले हा स. सदस्यांचा प्रश्न आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** स. नगरसेवक श्री. खुंगर यांची त्या व्यक्तीने बांधकाम करून नये म्हणून तक्रार होती. सामान परत केल्यानंतर त्या व्यक्तीने पुन्हा बांधकाम

सुरू केले होते. म्हणून ते पाडण्यात आले बांधकाम पाडतांना घरात कोणीही नव्हते त्याचे निरुपयोगी सामान सुध्दा नव्हते.

**मा. सभापती :** विशिष्ट व्यक्तीचेच का पाडण्यात आले. पाडले तर वरिष्ठांचे आदेश होते का संचिका मागवावी सभागृहात दाखवावी.

**प्रशासकीय अधिकारी :** वरीष्ठांचे आदेश आहे. अनधिकृत असेल तर पाडण्याचे आदेश आहे. त्या दिवशी एकूण ६ ठिकाणचे अनाधिकृत बांधकाम काढण्यात आलेले होते.

**मा. सभापती :** स. सदस्यांची तक्रार होती की, माझ्या वॉर्डात अनाधिकृत बांधकामे १०० चालू आहे. महापालिकेचे प्रशासकीय विभाग काय कार्यवाही करते.

**श्री. भगवान रगडे :** बऱ्याच ठिकाणी अनाधिकृत बांधकाम चालू असतांना फक्त एका विशिष्ट व्यक्तीचेच मातीचे घर का पाडण्यात आले असा माझा प्रश्न आहे. १०००० घरे अनाधिकृत सिमेंटचे बांधकाम असलेले बांधण्यात आलेले आहेत. ते का पाडण्यात आले नाही. पैसे घेतले, सुपारी घेवून राहते घर पाडले. टि. व्ही. सेंटर उताराची इमारत अनेक बिल्डरने पार्कींग जागेत बांधकाम केले. मा. न्यायालयाचा निकाल आहे. पार्कींग का काढत नाही. गरीब माणसाचेच का पाडले.

**मा. सभापती :** त्या दिवशी स्थळ पाहणी करून उपआयुक्त (४) यांना चौकशीचे आदेश देण्यात आलेले होते.

**श्री. भगवान रगडे :** संगेवार नावाच्या इमारत निरिक्षक यांनी तेथील काही लोक ना मारहाण केलेली आहे. मुस्लिम समाजातील स्त्रियांना बाहेर काढले आहे.

**श्री. मधुकर सावंत :** एक इमारत निरिक्षक नागरिकांना मारहाण करीत असेल तर त्यांचेवर कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**सौ. शाहीन जफर :** सिल्लेखाना येथील अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही महिन्यापासून करीत आहे. कोणतीही कार्यवाही नाही जे पोलिस आहे. त्यांच्या बदल्या करणार होते. ते काही कामाचे नाही. प्रशासकीय अधिकारी यांना अनेकवेळा इमारत निरिक्षकांना स्थळ पाहणी करण्याचे आदेश देवूनही कर्मचारी तेथे जात नाही. सिल्लेखान येथील अतिक्रमणाच्या बाबत काय रिझल्ट लागलेला आहे. ३-४ कर्मचारी असूनही काम करीत नाही. त्यांचे बदल्या करण्यात न्यायालयाचे आदेश असतांना कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** सिल्लेखाना येथील जे अतिक्रमण केले होत तार फेन्सींगचे काम होते. संबंधित व्यक्तीने न्यायालयाचे स्थगिती आदेश मिळविले आहे. पुढील आदेशापर्यंत जैसे थे आदेश आहे.

**सौ. शाहीन जफर :** न्यायालयाचे आदेश होते. पूर्ण सपाटीकरण करावे. वेळेत काम न झाल्यामुळे संबंधितास पुन्हा स्थगिती आदेश मिळाले.

**मा. सभापती :** न्यायालयाचे स्थगिती ओदश किती दिवसापर्यंतचे आहेत.

**प्रशासकीय अधिकारी :** न्यायालयाचे जे आदेश झाले त्यात पुढील आदेशास्तव असे दिलेले आहे. तारीख नमूद नाही.

**श्री. भगवान रगडे :** पावसाळ्याच्या दिवसात रात्रीच्या वेळी एखाद्याचे राहते घर पाडता येते का. शासनाचे निर्देशन आहे. मागील बैठकीत मा. आयुक्तांनीच वाचून दाखविले होते. त्या व्यक्तीचा संसार उघड्यावर आणला.

**मा. सभापती :** श्री. संगेवार यांनी तेथे काही मुलांना मारहाण केलेली आहे. असे स. सदस्य श्री. रगडे यांची तक्रार आहे. मी. स्वतः तेथे भेट दिलेली होती. प्रशासकीय

विभाग व त्याप्रमाणे त्या भागातील किती तक्रारी प्राप्त आहे व किती तक्रारीचे निरसन केले किती बाकी आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** नागरिकांच्या एकूण १७० तक्रारी असून १२९ तक्रारी निकाली काढलेल्या आहेत. ४१ तक्रारी शिल्लक आहेत. स. नगरसेवकांच्या १९ तक्रारी आहेत. १५ निकाली तर ४ शिल्लक तसेच वरिष्ठांच्या ७५ तक्रारी प्राप्त असून ५५ निकाली काढलेल्या आहेत. २० तक्रारीचे शिल्लक आहेत. ३१ लोकांवर आतापर्यंत पोलिस गुन्हे दाखल केलेले आहे. या विभागाचे कोणतेही कर्मचारी कुणास मारहाण करीत नाही व तसा अधिकार सुध्दा नाही. राहते घर तोडत नाही. तोडण्याचा अधिकार नसून पोलिस पथकही सोबत होते. तसे रेकॉर्ड बनवले. चौकशी करू शकतो. त्या दिवशी व्हिडीओ शुटींगवाले आले नाही वेळ निश्चित झालेले नव्हते. म्हणून आले नाही. त्या दिवशी त्यांना बोलावले होते.

**मा. सभापती :** श्री. शिंदे साहेब प्रत्यक्ष स्थह पाहणीसाठी माझ्या सोबत होते त्यांचे निदर्शनास जे आले त्याचा खुलासा त्यांनी करावा.

**उपआयुक्त (म) :** व्हिडीओ शुटींग करण्याच्या सूचना दिलेल्या आहे. काही प्रकरण किचकट स्वरुपाचे असतात. त्यामुळे ते करणे आवश्यक आहे.

**सौ. शाहीन जफर :** यापूर्वी पत्र दिले. यापूर्वी अधिकाऱ्यांनी ४-५ फोटो सुध्दा मा. आयुक्तांना दिले होते. त्यावेळी प्रत्यक्ष त्या जागेवर भेट देण्या संदर्भात मा. आयुक्तांनी सम्मती दर्शविली होती. काढलेली छायाचित्रे चुकीचे असतात. शुटींग चुकीची दाखविण्यात येते. कोणतेही काम हे कर्मचारी करीत नाही. स्थायी समिती समोर वारंवार मुद्दा उपस्थित करून ही कार्यवाही होत नसेल तर नागरिकांच्या भावना वेगळ्या होत जातात. सिल्लेखाना येथील प्रकरणाच्या बाबत कार्यवाही न होता वेळ वाया घातला शेवटी संबंधित व्यक्तीने न्यायालयाचे स्थगिती आदेश घेऊन आले. अशी संधी दिली जाते. सभागृहात नुसता निर्णय होतो. अंमलबजावणी होत नाही. श्री. बावस्कर व आणखी काही कर्मचारी काम करीत नाही. प्रत्येक ठिकाणी जाऊन पैसे घेतात. अतिक्रमण काढत नाही. काम करीत नाही. दूरध्वनी वरून संपर्क साधला असता ११.००, १२.०० ला येतो. म्हणून सांगतात. परंतु येत नाही. अशी स्थिती आहे. जे काम करणारे कर्मचारी आहेत. त्यांना घेण्यात यावे. श्री. बावस्कर यांची बदली करावी. कार्यरत कर्मचारी ५००-१००० घेऊन येतात. संबंधित अधिकाऱ्यांना बदनाम करतात. खालचे कर्मचारी बदमाश आहे. काम करीत नाही.

**श्री. मधुकर सावंत :** संगेवार नावाचे कर्मचारी यांचे संचिकेवर मा. तत्कालीन आयुक्त श्री. शर्मा साहेब यांनी ५ वर्ष या कर्मचाऱ्यांची बदली प्रशासकीय विभागात करू नये म्हणून शेरा दिलेला आहे. त्या विभागात पुन्हा त्यांना देण्यात आले. संचिकेत नोंद असेल तर आजच बदलीचे आदेश प्रशासनास देण्यात यावे.

**उपआयुक्त (म.) :** मिसारडवाडी प्रकरणामध्ये प्रशासकीय विभागामार्फत जी काही कार्यवाही करण्यात आली, त्याची सहा. संचालक नगररचना हे चौकशी तरी आहे. कागदपत्रे व झालेली मारहाण वगैरे याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. राहते घर पाडले की, राहत नव्हते तेंव्हा पाडले. याबाबत चौकशी करून अहवाल मा. आयुक्तांकडे देण्यात येत आहे. सध्या त्या विभागात कार्यरत असलेला संगेवार यांना अशा प्रकारचे काम देण्यात येवू नये. अशा सूचना

करण्यात येत आहे. तसेच जे पोलिस कर्मचारी आहेत ते कार्यक्षम नाही म्हणून ते बदलून देण्यात यावे. म्हणून वारंवार पोलिस आयुक्त यांचेकडे पत्र व्यवहार होत आहे. त्यामुळे अतिक्रमण काढण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागतो. त्वरित पोलिस कर्मचारी बदलून द्यावे. यासाठी तात्काळ मा. आयुक्त यांचे समवेत एक बैठक घेत आहोत तशी विनंती केलेली आहे. प्रशासकीय विभागाला माझ्या अशा सूचना नेहमीच दिलेल्या आहेत का, अतिक्रमण असेल तर कोणतीही नोटीस न देतात ते अतिक्रमण तात्काळ काढणे आवश्यक आहे. बांधकाम असेल तर ए.डी.टी.पी. याचा अभिप्राय घेवून तात्काळ कार्यवाही करू शकतो. बांधकाम चालू असतांना कार्यवाही केल्यास पुढील कार्यवाही करण्याची वेळ येत नाही. पावसाळा आहे तो पर्यंत पाडता येत नाही.

**श्री. भगवान रगडे :** सभागृह नेते, विरोधी पक्षनेते तसेच उपआयुक्त (म.) यांनी प्रत्यक्ष ज्या ठिकाणी भेट दिली, त्या व्यक्तीच्या खाण्यापिण्याच्या वस्तु उघड्यावर पडलेल्या होत्या त्या सर्वांच्या नजरेस आलेल्या आहे की, नाही खुलासा करावा. वेगळा खुलासा नको आहे. भांडे वेगवेगळ्या ठिकाणी पडलेले होते. खाण्याचे पीठ मातीत पडलेले होते ए.सी.एन. वर दाखवलेले आहे.

**मा. सभापती :** याबाबत तथ्य आहे. त्या भागातील इमारत निरिक्षक सध्या त्या भागासाठी नाही. त्या भागाचा चार्ज त्यांचेकडे नाही. ए.डी.टी.पी. ने अहवाल तात्काळ द्यावा व प्रशासनास सूचना की, प्रशासनाने सुध्दा कुणालाही पाठीशी न घालता, दोषी असले त्यांचेवर कडक कार्यवाही करून चौकशी अहवाल आल्यावर काय कार्यवाही करायची ते ठरवू.

**श्री. भगवान रगडे :** ०५ वर्ष त्या विभागात बदली करू नये असे मा. आयुक्तांचे आदेश असतांना असे का होते. संगेवार नावाचे कर्मचारी पैसे घेतात. भ्रष्टाचार करतात. असे स्पष्ट आहे. पुन्हा त्याच विभागात देण्याचे कारण काय.

**मा. सभापती :** जे प्रश्न विचारलेले आहे. उपआयुक्त यांना सूचना दिलेल्या आहे. चौकशी अहवाल समोर आल्या नंतर कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** या सभागृहात नगरसेवकांनी तक्रार केल्या नंतरच कार्यवाही होते. नगरसेवक बदनाम होतात. प्रशासनाचे काम काय असते. नाथ प्रांगण येथे अनाधिकृत बांधकाम होते हे नगरसेवकांनी सांगण्यावरूनच कार्यवाही का? प्रशासनाचे अधिकारी यांचे काम काय असते. नगरसेवक पाडायला लावतात म्हणून अधिकारी सांगतात. नाथप्रांगण येथे ताबडतोब तार फेंसीग करावी. अशी माझी मागणी आहे. मेहरनगर येथे भिंतीचे बांधकाम चालू आहे. गारखेडा येथे नाल्यावर घरे झालेत.

**प्रशासकीय अधिकारी :** मेहरनगर येथे बांधकामास परवानगी घेतलेली आहे. त्यानुसार बांधकाम चालू आहे.

**मा. सभापती :** नाथ प्रांगण येथे अतिक्रमण झालेले आहे. जागा महापालिकेच्या ताब्यात घेतलेली आहे का? घेतली नसेल तर कार्यवाही करावी.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** आताच सांगण्यात आले. पावसाळ्यात घरे पाडण्यात येवू नये. परंतु एका रात्रीत १०X१० रुम बांधकाम होऊ शकते. भांडे घेऊन जाण्यास वेळ लागत नाही. अशा वेळी ते अतिक्रमण काढणार नाही का?

**इमारत निरिक्षक (श्री. विधाते) :** नाथ प्रांगण येथील घर एका रात्रीत घेऊन सामान टाकलेले होते ते कसे पाडणार हा प्रश्न आहे.

**मा. सभापती :** चर्चा सभागृहात चालू असतांना अधिकारी व त्यांचे खालचे अधिकारी यांनी वैयक्तीक मत आपआपल्यात व्यक्त करणे हे सभागृहाची शिस्त नाही. यापुढे असे होवू देवू नये.

**श्री. इलियास किरमाणी :** अशा अधिकाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही केली पाहिजे. सभागृहाचा अपमान आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** स. सदस्य श्री. भगवान रगडे यांनी ज्या व्यक्ती बाबत प्रश्न उपस्थित केला त्या व्यक्तीचे अतिशय नुकसान झालेले आहे. महापालिकेतर्फे नुकसान भरपाई देण्यात यावी.

**मा. सभापती :** आपण सहानुभूती दाखविली परंतु अनाधिकृत घर पाडल्यानंतर नुकसान भरपाई देण्याची तरतूद कोठेच नाही. म्हणून वैयक्तिक आर्थिक मदत आपण करू शकतो.

**श्री. इलियास किरमानी :** पुर्ण औरंगाबादचे क्षेत्रफळ १३५ चौरस किला मीटर आहे. या सर्वभागात येणाऱ्या जागेवर निगराणी ठेवण्यासाठी फक्त एकच प्रशासकीय अधिकारी आहे. प्रत्येक विभागात दोन-दोन अधिकारी देण्यात आलेले. प्रशासकीय अधिकारी सुध्दा दोनच असावे. एकच अधिकारी संपूर्ण अधिकारी संपूर्ण कारभार सांभाळू शकत नाही. जे अतिक्रमण होत आहे ते थांबेल.

**मा. सभापती :** स. सदस्यांच्या प्रश्न बरोबर आहे. ऐनवेळी झोन सक्षमीकरण करण्याचा विषय येत आहे. त्यात झोन अधिकाऱ्यांना काही अधिकार प्रथम करण्यात येणार आहे. कामकाजामध्ये विभागणी होईल. चांगले कामकाज होत असल्याचे निदर्शनास येईल.

**सौ. शाहीन जफर :** इमारत निरिक्षक यांची ही भरती करावी जेणे करून कामकाज करण्यास सोपे होईल. कार्यवाही वेळेवर होत नाही.

**मा. सभापती :** जो ऐनवेळी प्रस्ताव झोन अधिकाऱ्यांना अधिकार देण्याबाबत सादर होणार आहे. त्यात मुद्दा क्र. ६ मध्ये अनाधिकृत बांधकामे अतिक्रमण यांचे विरुध्द कार्यवाही करण्याचे अधिकार झोनला देणार आहोत. अतिशय चांगला प्रस्ताव समोर येत आहे.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** मेहरगनर येथील भिंत पाडण्याचे आदेशित केले होते. ती भिंत न पाडता तेथील नागरिकांनाच उलट नोटीस दिल्या जागा किती आहे. मालकी हक्क कोणाचा म्हणून त्यांनी पत्र दिले त्यांनाच नोटीसा देण्यात आल्या. भिंतीमुळे पाणी थांबते.

**मा. सभापती :** स. सभासद एखाद्या बाबतीत विचारणा करीत असेल तो मुद्दा बाजुला ठेवून वेगळीच कार्यवाही होते. पाणी आडते म्हणून भिंतीचा मुद्दा होता. स. सभासदांनी मुद्दा उपस्थित केला म्हणून कार्यवाही होते तेथील नागरिकांच्या भावना स. सदस्यांच्या बाबतीत वेगळ्या होतात.

**प्रशासकीय अधिकारी :** बांधकाम परवानगी घेवून ती भिंत बांधलेली आहे. त्या भिंतीला लागून जेवढे लोक आहेत त्यांना नोटीस दिलेल्य आहेत.

**मा. सभापती :** दुसरीकडे लक्ष वळवण्याचा प्रकार होत आहे. नगरसवेकांचा पाणी अडते म्हणून पाणी निचरा होण्याचा उद्देश आहे. पब्लिक स्ट्रेस मध्ये तोडण्याची कार्यवाही करू शकतो. नागरिकांचा त्रास होत असेल तर बांधका परवानगी रद्द करावी. ती भिंत पाडण्यात यावी. त्या भिंतीमुळे पाणी आडते ए.डी.टी.पी.कडे संचिका पाठवा. अभिप्राय द्यावा. तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** कॅव्हेट दाखल करावे. आजच्या आज कार्यवाही करावी. सर्वसाधारण सभेत चर्चा झाली. एस.टी. कॉलनी भिंती पाडली अनेक लोकांच्या घरात पाणी गेले तेथील कोणत्याही नागरिकांना नोटीस किंवा माहिती देण्यात आलेली नाही. एस. टी. कॉलनीतील भिंत पाडण्यात आली ती नियमाने पाडलेली नाही. प्रशासनाचे आदेश नसतांना कार्यवाही केली व सभागृहात चर्चा होवून प्रशासकीय अधिकारी सक्षम नाही म्हणून त्यांची बदली करावी अशी मागणी झाली. निर्णय ही आला होता ते कार्यक्षम नाही म्हणून म्हटले गेले. त्याचें कडून झालेल्या चुका पुराव्यासह सभागृहात निदर्शनास आणून देण्यात आल्या. बदली करणाचा निर्णय घेतला परंतु बदली का करण्यात आली नाही. एक-एक अधिकारी एकाच विभागात १५-१५ वर्षापासून काम करतात.

**मा. सभापती :** दोन स. सभासद वेगवेगळे मुद्द उपस्थित करतात. एक सदस्य श्रीमती शाहीन जफर यांनी चांगले काम करतात म्हणून कौतुक केले तर आपण त्या विरुध्द बोलतात.

**सौ. शाहीन जफर :** खालच्या कर्मचाऱ्यामुळे प्रशासकीय अधिकारी बदनाम होतात हा माझा बोलण्याचा उद्देश होता.

**मा. सभापती :** झोन सक्षमीकरण करण्याचा प्रस्ताव येतो आहे. त्यात त्यांचे काही अधिकारी कमी करण्यात आले प्रशासनाकडून प्रस्ताव येत आहे. दोन वेळचा असेल तरी सर्व सदस्यांना वितरीत करण्यात यावा.

**श्री. मधुकर सावंत :** शहरात अनाधिकृत रित्या किती ठिकाणी प्लॉटींग चालू आहे. त्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

**मा. सभापती :** मागील बैठकीत नारेगांव येथे प्लॉटींग चालू आहे. त्याबाबत अहवाल देणार होते. का देण्यात आलेला नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** याबाबत माहिती दिलेली आहे. त्यांचेवर पोलिस गुन्हे दाखल केलेले आहे.

**मा. सभापती :** प्लॉटींग कोण करीत आहे. जागा महापालिकेची आहे का हाच मुद्दा सदस्यांचा होता. त्या ठिकाणचे बांधकाम संचिका दाखल झालेली आहे का. असा प्रश्न मा. आयुक्तांनी सुध्दा सभागृहात अे.डी.टी.पी. यांना विचारलेला होता. तसा बांधकाम परवानगीचा प्रस्ताव अे.डी.टी.पी. विभा ागत आहे का, व त्या ठिकाणी बांधकाम चालू होते. ती जागा खाजगी की, महापालिकेची याचा खुलासा करावा.

**प्रशासकीय अधिकारी :** नो डेव्हलपमेंन्ट झोनमध्ये ती जागा येते.

**मा. सभापती :** १२ गुंठेचा प्रश्न आहे. उर्वरित ८ गुंठे बाबत काय?

**सहा. संचालक नगररचना :** ग. नं. ४ नारेगांव येथील तार फिक्सींगसाठी परवानगी मागणी केली होती ती या विभागाने फेटाळलेली आहे.

**मा. सभापती :** तार फिक्सींगचे परवानगी कोणत्या कारणामुळे फेटाळली असे प्रशासकीय विभागास कळवावे. करून होणारे अधिकतम प्रशासकीय विभागा मार्फत थांबविण्यात यावे. शहरात किती ठिकाणी अनाधिकृत बांधकामे चालू आहे. त्याबाबत खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** नारेगांव येथील गट क्र. ४ हा ५.८१ हेक्टरचा आहे. मालमत्ता विभागाच्या अभिप्रायानुसार ७/१२ वर त्यांची नोंद (डिटीपी विभागाने तपासावे त्यानंतरच तसा अभिप्राय प्रशासकीय विभागास देण्यात यावे.)

**मा. सभापती :** माझ्याकडे श्री. कंकाळ यांनी मला माहिती दिली. किमान मी तरी सभागृहात दाखविणे योग्य नाही. माहितीच्या शेवटच्या पानावर काहीच नाही. कव्हरींग लेटर दिले. सोबत जोडले आहे. असे म्हटले मागील पानावर काहीच नमूद नाही. अशी दिशाभूल करणे बरोबर नाही. स्वत: अधिकाऱ्यांनी तपासून माहिती माझ्याकडे देणे गरजेचे आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** नारेंगाव येथील अतिक्रमण बाबत चर्चा चालू आहे. संबंधीतांवर गुन्हा वगैरे दाखल केला याबद्दल खुलासा व्हावा. ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे का हा मुद्दाच्या बैठकीत होता त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. असे मी चर्चेत स्पष्ट बोललो होतो. आताच खुलासा केला ती जागा महानगरपालिकेची नाही परंतु नो डेव्हलपमेंट झोनमध्ये आहे ती जागा महानगपालिकेस ज्या उद्देशासाठी घ्यायची त्या संदर्भात त्या व्यक्तीला महानगरपालिकेमार्फत नोटीस वगैरे देण्यात आलेली आहे? हा मुळ प्रश्न आहे. नोटीस वाढविली नसेल किंवा पाठवून ही ती बांधकाम करीत असेल तर पोलिसात गुन्हा वगैरे दाखल करणे योग्य होवू शकेल. नोटीस न पाठविता पोलिस गुन्हा दाखल केला असेल तर अन्याय झाला असे माझे मत आहे. अपूर्ण माहिती मुळे स. सदस्यांना काम करण्यस अडचण निर्माण होते. जनतेला सुखसोयी देणे जेसे जबाबदार ट्रस्टी या नात्याने नगरसेवकांची आहे त्याच प्रमाणे प्रशासनाची सुध्दा तितकीच जबाबदारी आहे. ज्या भागात नियमाला धरून काम होते. तेथील तक्रार येणार नाही. परंतु ज्या पध्दतीने वॉर्डात प्रशासनाच्या वतीने कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे होत नाही. ते जर व्यवस्थितपणे हाताळले तर या सभागृहात आरोप प्रत्यारोप होणार नाही. शहराचा विकास व लोसंख्येत होणारी वाढ लक्षात घेता अनाधिकृत रित्या बांधकाम होणार हे सर्वानाच माहिती आहे. परंतु जेंव्हा ठराविक बांधकाम होते व त्या संबंधित तक्रार येते त्यावेळी निश्चितपणे अधिकाऱ्यावर व त्या भागातील नगरसेवक लोकप्रतिनिधीवर दडपण येते. आताच मुद्दा उपस्थित झाला. मेहरनगर येथील भिंत पाडायची तर त्या नागरिकांना नोटीस देण्याची गरज होती. का. स. सदस्यांना नागरिकांच्या समोर जावे लागते. नाल्याचा प्रवाह अडविणाऱ्याचा कुणास अधिकार नाही. विकास आराखड्यात काय दाखविले ते पहावे. एखाद्या पुल करावयाचा झाल्यास मा. आयुक्तांच्या परवानगीशिवाय काय सुरू होत नाही. मेहेरनगर येथे पाणी अडते भिंत बांधली त्यास जबाबदार कोण असा प्रश्न येतो. भिंत पाडण्याचे बाजुला ठेवून तेथील नागरिकांनाच पुन्हा नोटीसा देणे बरोबर नाही व सभागृहात अधिकाऱ्यांवर आरोप करीत नाही. आम्हाला जनतेसमोर जागे लागते. नगरसेवकांचा वापर करून नागरिकांची दिशाभूल करणे बरोबर नाही. छावणी भागात नुकतीच पाहणी केली. जागेच्या बाबत निर्णय घेतला ते काम अर्धवट राहिलेले आहे. ते काम होणार किंवा नाही हे अधिकारी तडकाफडकी निर्णय घेतील परंतु. त्या भागातील नगरसवेकांना सुध्दा अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. नगरसेवकांनी सूचना करायची नंतर कार्यवाही करणार याचा अर्थ नगरसेवकांना वेठीस धरण्याचा प्रकार आहे. नाला कुणास अडवण्याचा अधिकार नाही. ४ फुट उंच स्लॅब टाकायचा असेल तर मा. आयुक्तांच्या परवानगी शिवाय करता येत नाही. मोठी भिंत बांधली त्यास जबाबदार कोण

दुसरा मुद्दा असा की, शहरातील जुन्या इमारत पाडण्यात येत आहे. काम व्यवस्थित होत नाही. माहिती माझ्याकडे आहे त्या इमारतीची सुधारणा विकास करण्यासाठी जागेचे हस्तांतरण मुळ मालंकाकडून केले जाते. त्या इमारती ३०-४० वर्षा पूर्वीच्या असतात. त्यात भोडकरू असतात. त्याचा कोणताही विचार न करता केवळ बिल्डर्स लोक भेटल्यानंतर मोडकळीस आलेली इमारत पाडण्याचा अधिकार महानगरपालिकेला आहे. म्हणून पाडली जाते. रस्त्यावरील नागरिकांना त्रास होतो. वित्तहानी होण्याची शक्यता असते. नियम लावण्यात याव्यात. इमारत पाडली जाते जर अशी इमारत महानगरपालिकेने पाडण्याचे काम केले असेल तर येणारा खर्च हा सुध्दा त्या संबंधित मालकाकडून वसूल होणे गरजेचे आहे. कायद्यात तरतूद आहे व याची संपूर्ण माहिती स्थायी समिती समोर येणे गरजेचे आहे. तशी तरतूद आहे. ८ दिवसातून एक बैठक होते परंतु अद्याप अशी माहिती या सभागृहासमोर सादर झालेली नाही. संबिंधत अधिकाऱ्यांकडून पाडलेल्या आहेत. त्यातील मुळ मलक / रहिवाशी किती आहेत. त्या इमारती कशासाठी पाडण्यात आलेल्या आहे. याचा सविस्तर खुलासा व्हावा. आताच स. सदस्य खेत व्यक्त केला १०x१० चे घर होवू शकत नाही. असे होत असेल तर त्यामुळे ही वसाहत वाढवू शकते. याचा अर्थ गोरगरीब जनतेकडे जास्त लक्ष दिले जाते. बिल्डर मोठमोठ्या इमारत डेव्हलप करण्यासाठी घेतात त्या महानगरपालिकेस काय फायदा झाला. भाडेकरू कोण, मालक कोण, खुलासा व्हावा.

**श्री. संजय शिरसाठ :** प्रशासकीय विभागांवर चर्चेस सुरुवात केली. या विभागाने काय काम केले पाहिजे. नगर सेवकांनी केलेली तक्रार होत असलेले अनाधिकृत बांधकाम यावर जास्त चर्चा होते. ती होणे सुध्दा गरजेचे असून किमान नगरसेवक त्यांचे वॉर्डाकरिता जागरूक तरी आहेत हे सिध्द होते. एका दैनिकात दररोज फोटो येतो. गुलमंडी, पैठणगेट क्रांतीचौक येथील अतिक्रमण ट्राफीक अडकते म्हणून दिले जाते. शहरातील कोणत्याही रस्त्यावर सामान्य नागरिकांच्या रहदारीला अडथळा येणार नाही म्हणून जे या विभागाचे भरारीपथक असते त्यांचे मार्फत आले पाहिजे. प्रशासकीय विभाग रस्त्यावरील हातगाड्या धारक असलेल्यांवर अशा किती लोकांवर दररोज कार्यवाही होते. एखाद्याच्या घरासमोर वाहन उभे असेल ते हटविण्याचा अधिकार प्रशासकीय विभागाला आहे की नाही त्या अधिकाऱ्यांनाच प्रश्न पडतो. असे माझे मत आहे. शहरात अनेक भिंतीवर रंगविलेले असून नाहीत्या अधिकाऱ्यांनाच प्रश्न पडतो. असे माझे मत आहे. शहरात अनेक भिंतीवर रंगविलेले असून जाहिरात दिलेली आहे. ते अतिक्रमण काढले जात नाही. त्याखाली फोन क्र. दिलेला असता असे असतांना नगरसेवकांनी तक्रार केल्या शिवाय कार्यवाही पुढे येत नाही १४७ तक्रार आल्या त्यातील बऱ्याचशा तक्रारी नगरसेवकांच्या आहे ती मुळात चुकीची आहे. एखाद्या गरीब व्यक्तीची टपरी ए. सी. बी. मशिनने उचलतांना मी अनेक वृत्तपत्रतात बघितलेले आहे. बाजुला प्रशासकीय अधिकारी असतांना दाखविले जाते. असे वाटते की, शहरात अतिक्रमण पाडण्यास सुरुवात झाली की काय? भरारीपथक शहरात किती वेळा कोणत्या रस्त्यावरून किती वाजता फिरते उपआयुक्त (म) यांनी खुलासा करावा.

शहरात रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्या त्यांना हटविण्याची भरारी पथकामार्फत कशा पध्दतीने कार्यवाही होते. मुंबईत गाडी आली तर पळतात. परंतु येथे उपआयुक्त व पथकाची गाडी आली तर आपली गाडी बाजुला घ्यावी लागते.

**मा. सभापती :** धोकादायक इमारती पाडण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित झाला. काही ठिकाणी घरमालक किरायेदायर यांचा वाद आहे. अशा इमारती पाडतांना शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला पाहिजे व ADTP विभागाने सुध्दा शहर अभियंता यांचा अभिप्राय घेतल्याशिवाय इमारत पाडण्याची कार्यवाही व्हावयास नको. तसेच महानगरपालिकेच्या वतीने इमारत पाडण्यात आल्यानंतर होणारा खर्च वसूल केला जाता का? आतापर्यंत किती रक्कम वसूल झालेली आहे तसेच किती इमारती केंव्हा पाडण्यात आल्या त्याचा अहवाल वरिष्ठांमार्फत सभागृहात यावा अशी सुध्दा मागणी झालेली आहे. कार्यवाही होत असतांना नियमानुसार सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे. एकतर्फी कार्यवाही होते माहिती समोर येत नाही. सदस्यांनी खेद व्यक्त केलेला आहे. पावसाळ्याचे अर्धे दिवस गेले त्यापूर्वीच धोकादायक इमारती पाडावयास पाहिजे होत्या. किंवा पावसाळा सुरू झाल्यानंतर ज्या मोडकळीस अहेत त्या पडण्यास आहे अशा इमारती विशिष्ट पध्दतीने मंजुरी घेवून तशी कार्यवाही होते का तसेच प्रत्येक वेळी अहवाल का दिला जाता नाही व खर्च वसूल केला जातो का खुलासा करावा.

**प्रशासकीय अधिकारी :** मोडकळीस आलेल्या इमारतीचा अहवाल पुढील बैठकीत दिला जाईल. सध्या माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही.

**मा. सभापती :** विशिष्ट अशा व्यक्तींचे हित जपण्यासाठी कार्यवाही होते असे सदस्यांच्या निदर्शनास आले म्हणून हा मुद्दा उपस्थित झालेला असून किती इमारतीवर याबाबत कार्यवाही झालेली आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** कुणाचे हित जपण्याचे कोणताही प्रकार नाही. मोडकळीस आलेल्या अशा १० इमारती पाडण्यात आलेल्या आहेत. शहर अभियंत्या कडूनच संचिका येते नोटीस दिल्या जाते. त्यानंतर या विभागामार्फत कार्यवाही होते. खर्च वसूल करतो आता सुध्दा डिटेल माहिती नाही. जेथे मालक/ किरायेदार यांचा वाद असतो ते लोक पैसे भरणा करीत नाही. त्यावेळी परवानगी घेवून इमारत पाडली जाते. त्यानंतर झोन मार्फत त्या संबंधित मालकास नोटीस देवून कार्यवाही करण्यात येते.

**मा. सभापती :** आजची सभा TP विभाग व प्रशासकीय विभागावर चर्चा करण्यासाठी आयोजित केली. सर्व प्रश्नांची उत्तरे स. सदस्यांना अपेक्षित आहे. पुढील कोणती सभा आयोजित होणार आहे. वेळोवेळी सभागृहात स. सदस्यांना उत्तर दिले जात नाही म्हणून आजची सभा ही विशेष सभा दोन विभागावर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. आजच खुलासा अपेक्षित आहे. अगोदर झालेली कार्यवाही याबाबत प्रशासकीय विभागाकडे तपशील नसेल तर यापेक्षा दुसरी दुर्दैवाची बाब नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या शहराच्या जनतेसाठी शिस्तीचे पालन करणारी ही महानगरपालिका आहे हे चित्र जनतेसमोर आपण ठेवायचे आहे. मा. विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडून संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान अंतर्गत पारितोषिक महानगरपालिकेस मिळालेले आहे. असा गौरव या

महानगरपालिकेचा झाला पाहिजे त्याचा सन्मान झाला पाहिजे. त्या पध्दतीने अधिकाऱ्यांनी काम केले पाहिजे. अधिकाऱ्यांना धन्यवाद दिले पाहिजे. सभागृहात त्याचा सन्मान केला पाहिजे. त्यासाठी जे यापूर्वी आले असेल ते सोडून नवीन काय करता येईल ते करावे गोरगरीब जनतेवर अन्याय करण्यापेक्षा न्याय कोणास देण्यात येते हा मुद्दा महत्वाचा आहे. गरीब नागरिकांना वेठीस धरून मोठमोठ्या लोकांसाठी महानगरपालिका निर्णय घेत असेल तर वाईट संदेश जनतेपर्यंत जाईल. हे विसरता येणार नाही. ते आपणास अपेक्षित नाही. पुढील बैठकीत खुलासा ही प्रशासकीय अधिकारी यांचे कायमचे वाक्य बनले आहे. कोणत्या भागात कोणती इमारत पाडण्यात आली. माझ्या माहितीप्रमाणे १० इमारती पाडल्या तर त्यांची तारीख त्यांना रेकॉर्ड न पाहता माहिती असावयास पाहिजे. एखादी इमारत पाडणे म्हणजे लहानसा प्रश्न नव्हे. माहिती लपविण्याचे कारण नाही. सभागृहाला सत्य माहिती देणे प्रशासनाचे काम आहे. सभागृह चालवून चर्चा करून योग्य निर्णय घेवून कामकाज सुधारेल ही अपेक्षा सर्वांची आहे. त्या इमारत पाडण्यासाठीची रक्कम किती घेतली. रेकॉर्ड त्यांचेकडे असते चलन स्वत:ते भरून घेतात. अनाधिकृत कामाच्या बाबतीत बोलतो आहे. स्थायी समिती समोर वेळोवेळी अहवाल देण्याचे पालन का झालेले नाही. १० इमारती पाडल्यानंतर अनेक वेळा बैठक झालेल्या आहेत का माहिती देण्यात आलेली नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** एका तासात माहिती दिली जाईल सध्या माहिती उपलब्ध नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** किती डेव्हलपर्स आहेत किती इमारती पाडण्यात आल्या. मालक कोण आहेत किती होते. त्या जागेचा वाद किती दिवसापासून चालू होता. त्या इमारतीवरील मालमत्ता कर किती दिवसापासूनचा बाकी होता या बाबतची सर्व माहिती या सभागृहाला मिळणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** प्रशासकीय विभागाच्या संदर्भात स. सदस्य श्री. शिरसाठ यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा उपआयुक्त (म) यांनी करावा.

**उपआयुक्त (म) :** शहरातील हातगाडीवाले व फेरीवाले यांचेवर प्रशासकीय विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते. एखद्या ठिकाणी हातागडीवाले, फेरीवाले उभे असतील त्यांना हलवायचे झाल्यास ती कार्यवाही अचानकपणे त्यांना माहिती न होता करावी लागते. विशिष्ट वेळ देऊन कार्यवाही केली तर ते जागेवर दिसून येणार नाही. म्हणून रहदारीला अडथळा निर्माण होता. अशा ठिकाणच्या हातगाड्या / फेरीवाले यांना हटवायचे असेल तर त्या ठिकाणी अचानक जावून कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार ८ दिवसापूर्वीच गजानन महाराज मंदिर समोरील काही गाड्या जप्त ही करून आणलेल्या होत्या. त्या संदर्भीय शिष्टमंडळ मा. सभापतींना प्रत्यक्ष भेटले. शहराच्या ही हातगाड्या आहेत त्यांना महानगरपालिकेतर्फे परवानगी दिली जाते. मागील वर्षी पर्यंच्या ठेका दिला होता. बैठकीत ठराव झाल्या नुसार या वर्षीपासून असा निर्णय झाला की, झोनवाईज त्या हातगाड्यांना परवानगी देवून एका विशिष्ट ठिकाणी परवानगी देण्यात यवी म्हणून कार्यवाही होत आहे. तसेच फेरीवाले यांना सुध्दा विशिष्ट भागात फिरण्याबाबत परवानगी दिली जाईल. फेरीवाल्यापासून सुध्दा शहरातील वाहतुकीस त्रास होणार नाही हातगाडीवाले व फेरीवाले यांना कोणत्याही

प्रकारचे हॉकर्स झोन नाहीत. हॉकर्स झोन बाबत प्रशासनाच्या वतीने कार्यवाही चालू आहे. रहदारीला अडथळा होवून नये, यासाठी मा. आयुक्तांच्या निर्देशानुसार प्रकल्प संचालक प्र. अधिकारी उपआयुक्त आणि कार्यवाही अभियंता यांची एक समिती आहे. कार्यवाही सध्या प्रशासकीय स्तरावर चालू आहे. फेरीवाले / हातगाडीवाले यांचे पासून रहदारीस अडथळा निर्माण होत असेल तर ती वाहने/ हातगाडी जप्त करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** कार्यवाही केव्हा करता हा प्रश्न नव्हता मुळात कार्यवाहीच होत नाही. अतिक्रमण कातांना टप्या किंवा इतर लहान अतिक्रम काढतांना छायाचित्र वृत्तपत्रात येणे म्हणजे प्रशासकीय विभागाची जबाबदारी संपते असा अर्थ नाही. मोबाईल व्हॅनची सिस्टिम असेल तिचा वापर हा होत नाही. अतिक्रमण विभागाच्या ह्या व्हॅनने फिरते राहणे गरजेचे असून रस्त्यावर हागाड्या असू नये हे पाहण्याची जबाबदारी आहे ही कार्यवाही होतच नाही त्यामुळे वृत्तपत्रात फोटो येतात. महानगरपालिकेची यात बदनामी होते.

**श्री. इलियास किरमानी :** तापडीया नाट्यगृहाचा मुद्दा मी ६ महिन्यापासून उपस्थित करीत आहे. जाणून बुजून त्यांना नोटीस दिली त्यांनी स्थगिती आदेश आणले ते स्थगिती आदेश सुध्दा उठविण्यात आले. वृत्तपत्रात आले. अपील दाखल करण्यासाठी ६ तारीख दिलेली असून त्यापूर्वीचे कॅव्हेट दाखल होवून पोलिस गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे. हातगाड्यावर कार्यवाही होते. अनाधिकृत बांधकाम करणारे बिल्डरांवरही कार्यवाही का होत नाही. त्यांनी अनाधिकृत बांधकाम करणारे बिल्डरांवरही कार्यवाही का होत नाही. त्यांनी अनाधिकृत बांधकाम केले. पोलिस गुन्हा दाखल करू शकतो. यापूर्वी किती बिल्डरांनी बांधकाम केले. भोगवटा प्रमाणपत्र न घेता वापर सुरू केला. माहिती देण्याचे आदेशित केले होते. माहिती समोर आलेली नाही. यासाठी टाईम लिमिट द्यावे.

**श्री. माणिक साळवे :** जे अनाधिकृत बांधकाम झालेल्यास प्रशासकीय विभागानेच प्रोत्साहन दिले. विधी विभागास आजच्या आज या संदर्भात कॅव्हेट दाखल करण्याचे आदेशित करावे. दिल्ली गेट येथील रस्ता खुला करण्यात यावा.

**मा. सभापती :** कॅव्हेट तात्काळ दाखल करावे. मुदत निघून जायला नको. अशा प्रशासनास सूचना देण्यात येत आहे.

**श्री. इलियास किरमानी :** दिल्ली गेटच्या बाजुची जागा महानगरपालिकेने भूसंपादन केली. त्या लोकांना मोबदला दिला परंतु जागा त्यांचेच ताब्यात आहे आपण आदेश दिलेले होते काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** सहा. संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक न.र. :** दिल्लीगेट इतकी ६० फुट रुंद रस्ता पश्चिम बाज य रस्त्यावरील एकूण ५ मिळकती भूसंपादकीत केलेल्या असून त्या मोबदला म्हणून हिराखान फॅक्टरी रेखांकनातील खुल्या जागेतील भूखंडे देवून बांधकामास परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी हिराखान फॅक्टरी रेखांकनातील भूखंडाबाबत वाद निर्माण झाल्याने प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. करिता मिळकत धारकांनी दिल्लीगेट येथील भूसंपादित जागेचा वापर परत सुरू केलेला आहे.

**श्री. इलियास किरमानी :** स्थगिती आदेश रद्द झालेले आहे. संबंधित व्यक्ती यांनीच मा. आयुक्त शर्मा साहेब असतांना पत्र देवून कळविले की माझी जागा घेण्यात यावी.

**मा. सभापती :** या बाबतची माहिती नगर रचना विभागाकडे आहे का?

**सहा. संचालक न.र. :** विधी सल्लागार यांचेकडे माहिती उपलब्ध असते.

**मा. सभापती :** कोणतीही जागा ताब्यात घेतल्याशिवाय मोबदला देत नाही. संपूर्ण झालेली कार्यवाही बाबत सहा. संचालक यांचेकडे माहिती आहे का. तारीख सहित माहिती अपेक्षित आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** प्रशासकीय व नगररचना विभागावर आजची बैठक आयोजित केली. अमूक माहिती नाही नतर देतो. असे म्हणणे चूक वाटते. बैठक आयोजित केली कशासाठी उत्तर मिळत नसेल तर बैठक तहकूब करावी. आपल्या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. शहराच्या विकासासाठी स. सदस्यांना या महानगरपालिकेत निवडून दिले. उत्तरे मिळत नसेल तर योग्य नाही. स. सदस्यांना कामे नाही का? कामे काहीच होत नाही. नुसऱ्या बैठका होत आहे. वृत्तपत्रात येत आहे.

**मा. सभापती :** त्या भागात जाऊन पाहणी केलेली आहे का?

**सहा. संचालक (न. र.) :** पाहणी वगैरे केलेली नाही.

**मा. सभापती :** सिताराम गायकवाड यांना माहिती असेल ते प्रकरणे हाताळतात.

**सहा. संचालक (न. र.) :** न्यायालयाच्या स्थगिती आदेशाबाबत या विभागास माहिती नाही. विधी सल्लागार यांचेकडे माहिती मिळू शकते.

**मा. सभापती :** स. सदस्यांचे म्हणणे असे मालकाकडून जागा घेतली. मोबदला दिला अतिक्रमण झालेले आहे.

**सहा. संचालक (न. र.) :** जागेच्या बदल्यात जागा दिली जी जागा दिली ती त्यांना मिळालेली नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** काही उत्तर देवू नये रिझर्वेशन जागेचा प्रश्न उपस्थित केलेले नाही. दिल्ली गेटच्या बाजुला जो रस्ता जातो त्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. हॉटेलवाला यांनी स्थगिती आदेश आणलेले होते तो स्टे रद्द होवून सुध्दा दीड दोन वर्षे झाले तेथील लोकांची मागणी आहे जागा ताब्यात घ्यावी. मी स्वतः अधिकाऱ्यांना भेटलो. माहिती दिली. पत्र दिले तरी सभागृहात उत्तर मिळत नाही. सभा कशासाठी घेण्यात येते.

**सहा. संचालक (न. र.) :** या जागेची पाहणी करून ८ दिवसाच्या आत कर्यवाही करण्यात येईल.

**श्री. इलियास किरमाणी :** हेरीटेजच्या अंतर्गत ज्या वस्तु येतात त्या बाजुलाच बांधकाम परवानगी देता येते किंवा असे खुलासा घेण्यात यावा. आतापर्यंत किती इमारत बांधकाम परवानगी दिली. किती अंतर सोडून द्यावे त्याचे काय नार्मस आहे.

**सहा. संचालक (न. र.) :** याबाबत बिबीचा मकबरा व पानचक्कीसाठी ३० मी. पर्यंत परवानगी देता येत नाही. तसेच लेण्यासाठी सुध्दा ३०० मी पर्यंत व इतर गेट पासून ६५ मीटरपर्यंत अंतरावर परवानगी देता येत नाही. परवानगी घ्यायची झाल्यास सहा संचालक स्टेट आर्कालॉजीक्स यांची एन.ओ.सी. आवश्यक असते. तसेच फसिल (तटभिंत) पासून १५ मीटर अंतरापर्यंत परवानगी देता येत नाही.

**मा. सभापती :** जी देवडी आहे ती सुध्दा हेरीटेजमध्ये येते. आजुबाजूस इमारती झाल्या त्यास जबाबदार कोण

**सहा. संचालक (न. र.) :** २०-२२ जे स्थळ आहे त्याचे साठी रिटीक्शन आहे.

**श्री. ईलियास किरमाणी :** अशा ठिकाणी महानगरपालिकेतर्फे बोर्ड लावण्यात यावे. बोर्डावर सूचना लिहून संक्षिप्त माहिती लिहावी. अशा वास्तु जवळ नियमानुसार काही मिळकती येत असेल तर त्या भूसंपादन करून उद्यानासाठी वापर महानगरपालिकेस करता येईल. बोर्ड लावण्याची आवश्यकता आहे. एका रांगेत लोक घराचे बांधकाम करून निवास म्हणून वापर करीत आहे. दखल घेतली जावी.

**मा. सभापती :** हेरीटेज अंतर्गत जे २० घरे व इतर इमारती आहे त्या इमारत किंवा गेटच्या बाजुला महानगरपालिका तर्फे सूचना फलक लावून त्यावर सविस्तर माहिती लिहावी त्यांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**श्री.मधुकर सावंत :** शहरात अनधिकृत प्लॉटींग किती जागेवर झाले. किती खाजगी किती खुलासा करावा किती ठिकाणी बांधकाम चालू आहे.

**मा. सभापती :** ठिकाणी चालू होते अशी माहिती माहिती दिली होती. मागील वेळेस नारेंगांव येथील अनाधिकृत प्लॉटींगच्या संदर्भात जाहीर प्रकटन देवून तसेच कळविण्यास आदेशित केलेले होते.

**प्रशासकीय अधिकारी :** प्रारुप तयार केलेला आहे. आज देत आहोत. ३१ लोकांवर गुन्हे दाखल केलेले आहेत त्यात त्यापैकी १५ प्लॉट धारक व १६ लोकांवर जे अनाधिकृत बांधकाम करीत होते ते आहेत.

**श्री. मधुकर सावंत :** १५ लोक कोणते आहे नावे वाचून दाखववावी. शहरात अनेक ठिकाणी प्लॉटींग सर्रासपणे चालू आहे. खाजगी/सरकारी जमिनीवर प्लॉटींग होत आहे. यापूर्वी मी सर्वे न. ६४ च्या बाबतीत चर्चा केलेली होती. मुद्देसह माहिती दिली होती. किती जागा किती लोकांना दिली. किती रक्कम महानगरपालिकेत जमा झाली व कोणत्या व्यक्तीने जागा हडप केली त्याचा तपशील सुध्दा दिलेला होता. ज्या लोकांनी महानगरपालिकेच्या जागेवर स्वतःचे पी.आर. कार्ड तयार करून जागा हडप केली. त्यांचेसाठी वेगळे नियम लावण्यात यावे. त्याचे नावारील पी.आर. कार्ड रद्द करावे अशी मागणी केलेली होती. त्याबाबत काय कार्यवाही केली. दुसरा मुद्दा ज्या लोकांना जागा भाडे तत्वावर दिली होती त्या जागेच्या काही जागा त्यांचे ताब्यात आहे. अशा जागा महानगरपालिकेच्या ताब्यात द्याव्यात म्हणून मागणी केलेली होती. अद्यापपर्यंत कार्यवाही केलेली दिसून येत नाही. प्रशासकीय विभागास मी स्वतः पत्र दिले ८-१० दिवस झाले उपआयुक्त यांची सुध्दा भेट घेतली होती.

**उपआयुक्त (म.):** दुसऱ्यांच्या नावाने पी.आर.कार्ड बनविले असे २१ प्रकरणे आहेत ही प्रकरणे विधिज्ञामार्फत तपासून घ्यावे म्हणून आदेशित केलेले होते. त्यानुसार ॲड. उदवंत यांचेकडे विधि विभाग मार्फत संचिका दिलेल्या आहे. भागशः तपासणी झालेली आहे. ८ दिवसाचा आणखी वेळ मागवून घेतला. पूर्ण तपासणी करून रिपोर्ट देणार आहेत. तसेच याच प्रकरणात कॅव्हेट दाखल करण्याच्या सूचना होत्या विधी सल्लागार यांनी कॅव्हेट दाखल केलेले आहे. कॅव्हेट दाखल केल्याचे पत्र मालमत्ता विभागास दिल्याचे मला समजले. ८१ (बी) च्या नोटीसा उर्वरित ५ लोकांना देण्याच्या सूचना मी मालमत्ता

अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. नोटीसावर माझी स्वाक्षरी आहेत. कॅव्हेटसाठी थांबविले होते. कॅव्हेट दाखल झालेले आहेत. दोन्ही कार्यवाही स्तरावर असल्यामुळे ८१ (बी) च्या नोटीसची मुदत संपल्यानंतर कार्यवाही होईल व अतिरिक्त जी जागा घेतलेली आहे ती २ दिवसात प्रशासकीय अधिकारी कार्यवाही करतील.

**मा. सभापती :** धोकादायक इमारत बाबत स. सदस्यांनी माहिती विचारलेली आहे. लेखी स्वरुपात सर्व सदस्यांना मध्यान्हानंतर देण्यात यावी. दोन तासापासून या विषयावर चर्चा होत आहे. प्रशासकीय विभाग अतिक्रमण विषयावर चर्चा होत असतांना विविध मुद्द चर्चेला आले. नागरिकांच्या १७० तक्रारीवर १२९ प्रकरणे निकाली काढलेली आहे. नगरसेवकांची १९ प्रकरणापैकी १५ प्रकरणांवर कार्यवाही झालेली आहे. वरिष्ठाकडील ७५ प्रकरणे असून ५५ प्रकरणे निकाली काढलेली आहे. ३१ लोकांवर अनधिकृत प्लॉटींगवर कार्यवाही केली. आजपर्यंतची प्रचलित पध्दती अशी चालू आहे की, कोणी तरी निदर्शनास आणून द्यावे. त्यानंतर कार्यवाही केली जाते. स्वतःहून प्रशासकीय विभागाने कोठेही कार्यवाहीची केल्याचे नमूद केलेले नाही. सामान्य नागरिक / किंवा नगरसेवकांनी तक्रार द्यायची व आताच चर्चा झाल्याप्रमाणे ती ही एका विशिष्ट व्यक्तीवरच करायची ही बाब अत्यंत चुकीची गंभीर बाब आहे. स्वतःहून या विभागाने कार्यवाही करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. जी अनाधिकृत बांधकामे होतात त्याबाबत नियमानुसार लिगल ओपीनियन होऊनच कार्यवाही करणे गरजेचे आहे. तसेच धोकादायक इमारती पारदर्शकपणा ठेवूनच कार्यवाही करणे आवश्यक असून एका विशिष्ट व्यक्तीच्या/ बिल्डर्स/मालक यांची मर्जी ठेवूनच कार्यवाही होत असेल तर चुकीचे आहे. या करिता वरिष्ठांचे आदेश घेवूनच व खर्चसुध्दा वसूल करणे आवश्यक आहे. सर्व सदस्यांच्या भावना अशा आहेत की, अतिक्रमण होणेचे संख्येत भर कशी होईल व या शहरात शिस्त कशी लागेल. महानगरपालिकेकडे परवानगीसाठी लोक कसे येतील. या उद्देशाने काम करावे. या संपूर्ण चर्चा नंतर प्रशासकीय विभागाला अतिक्रमण विभागाचा आराखडा तयार करावा या सभागृहात सादर करावा. त्याच प्रमाणे स्वतंत्र विभागासाठी अतिक्रमण स्वतंत्र असा कर्मचारी अतिक्रमण बांधकामावर नियंत्रण करण्याकरिता नियुक्त करावे व त्यांचे काम व जबाबदारी त्यांचेवर निश्चित करण्यात यावी. होते असे की, सर्वच कर्मचारी व पोलिस ताफा घेवून एकाच गाडीतून इमारत पाडण्यासाठी जातात असे चित्र आहे ते बदलावे. व प्रत्येक झोनसाठी इमारत निरिक्षक व पोलिस कर्मचारी द्यावेत. त्यासाठी जास्तीचे पोलिस कर्मचारी पोलिस आयुक्त यांचेकडून मागविण्यात यावे. प्रशासनामार्फत जी कार्यवाही होणे आवश्यक आहे. आणि त्यादृष्टीने प्रशासकीय विभागाने काम करावयास पाहिजे. जे. जे. आदेश या सभागृहातर्फे दिले जातात अशा अधिकाऱ्यांवर कर्मचाऱ्यांवर कडक कार्यवाही होणे आवश्यक असून तसे आदेश देण्यात यावेत. प्रशासकीय विभाग सक्षम होण्याच्या दृष्टीने झोनचे सक्षमीकरण करण्याचा प्रस्ताव समोर येत आहे. त्याचे रुपांतर होईल त्या अनुषंगाने कार्यवाही होणे आवश्यक आहे. यानंतर नगररचना विभागावर चर्चा होईल. १५ मिनिटासाठी

सभा तहकूब करण्यात येत आहे. (वेळ दुपारी १.५० वाजता सभा पुन्हा २.३० वाजता सुरू.)

**मा. सभापती :** नगर रचना विभागाच्या संदर्भात चर्चा करण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** मागील बैठकीत मी मुद्दा उपस्थित केलेला होता माझ्या वॉर्डातील अर्थसंकल्पातील कामे वगळण्यात आली. घेतली नाही. नवीन कामे कशी समावेश करून घेणार त्याबाबत तरतूद केली किंवा नाही खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती :** टि.पी. विभागाशी संबंधित हा प्रश्न नाही. प्रत्येक विभागाचे जे प्रमुख आहेत. शहर अभियंता कार्यकारी अभियंता (पा.पु.) कार्यकारी अभियंता (विद्युत / ड्रेनेज) अति. शहर अभियंता या सर्व विभागाशी संबंधित विषय असून स्थायी समितीत या माध्यमापासून तरतूद उपलब्ध करून द्यावयाची आहे. कोणत्या कामाचा समावेश करायचा त्याचा प्रस्ताव दिला तर तसेच आदेश प्रशासनाला स्थायी समितीच्या माध्यमातून दिले जातील.

**श्री. संजय शिरसाठ :** टि. पी. विभागावर चर्चा सुरू झाली. सर्व तयारीनिशी अधिकारी आलेले असतील कोणताही प्रश्न विचारला गेला तर त्याचे उत्तर मिळेल अशी अपेक्ष आहे. आतापर्यंत अनेक जमिनी संपादित केल्या अशा किती प्रकरणे आहेत. त्यावर महानगरपालिकेची मालकी लागलेली आहे का? या संदर्भात खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती :** मी सभापती झाल्यानंतर नगररचना विभागाच्या संदर्भात २१ तारखेला आढावा बैठक घेतलेली होती. त्यात पाहिला मुद्दा असा होता की, कलम २७ नोटीसची प्रकरणे किती आहेत. आतापर्यंत काय कार्यवाही केली व जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडे किती प्रकरणे पाठविली. तसेच ज्या जमिनी भूसंपादन केलेल्या आहेत त्या पूर्ण रिकाम्या (मोकळ्या असावयास पाहिजे व रितसर मालमत्ता विभागाकडे हस्तांतर होवून नोंदणीकृत दस्तऐवज होवून महानगरपालिकेच्या नावाचे पी. आर. कार्ड होणे गरजेचे आहे. या बाबत संयुक्त कार्यवाही मालमत्ता व नगर विभागाने करणे अपेक्षित आहे. चालू आर्थिक वर्षात भूसंपादनाची जी प्रकरणे मंजूर केली प्रोग्रॅम तयार आहे जे की, प्राधन्याने कोणत्या जागा भूसंपादास करावयाच्या त्या अनुषंगाने किती प्रकरणाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच लिजवर ज्या नाल्यावरील जागा देण्यात आल्या त्या जागेवर नगर रचना विभागाशी संपर्क करूनच नकाशा प्रकाणे बांधकाम झाले किंवा कसे? एक दोन जागेवर बांधकाम परवानगी देण्यात आली त्या व्यतिरिक्त जास्तीचे बांधकाम झाले व त्याचा वापर सुध्दा बदललेला आहे. तसेच भूसंपादित केलेल्या जागा यावर तार फिन्सींग करण्याचा विषय सुध्दा चर्चेला घेतलेला होता. ज्या भागातील नागरिक बेटरमेंट चार्जेस भरतात तेथे सोयी सुविधा दिल्या पाहिजे. त्यांची माहिती सुध्दा चारही कार्यकारी अभियंता यांनी द्यावी असा निर्णय घेण्यात आलेला होता. बांधकाम परवानगी देताना N. A. भरल्याबाबत ची अट सक्षम अधिकाऱ्यांकडून ही अट लावण्यात यावी. अशा प्रकारचा कोणताच प्रस्ताव मंजूर झालेला नाही. कोणीतरी नविन अधिकारी आले त्यांनी तरी अट लावण्यास सुरुवात केली. तीच पध्दत सुरू आहे. N. A. ची शिथील करून परवानगी देण्याची कार्यवाही करावी म्हणून सूचना दिल्या त्याची

अंमलबजावणी झालेली नाही. जो निर्णय होतो त्यांनी रद्द केला पाहिजे. कोणाचीच मान्यता नाही अट टाकण्यात येते. परवानगी थांबून आहेत. महानगरपालिकेस येणारे उत्पन्न येत नाही. गुंठेवारीचा विषय सुध्दा घेतलेला होता. प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. जे बुकलेट तयार केले त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. TDR चा विषय घेतला होता. १३७ नुसार किती प्रकरणांच्या बाबत कार्यवाही झाली. शासनाकडे किती प्रकरणे प्रलंबित आहे किती मंजूर झालेले आहे. तसेच महानगरपालिकेच्या जागेवर ७५/२५% प्रमाणे किंवा ७०/२०% प्रमाणे जागेचा विकास करण्यासाठी दिले तो भाग नियमानुसार महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घ्यायचा व नगर रचना विभागा मार्फत जी परवानगी दिली जाते. ती सुलभ पध्दतीने कशी देता येईल. या संदर्भात प्रशासनामार्फत प्रस्ताव ठेवावा असे ठरले होते. तसेच सरकारी निमसरकारी कार्यालय होतात त्यांनी बांधकाम परवानगी घेणे गरजेचे आहे का? किती परवानगी महानगरपालिकेकडून घेतलेली आहे. बेटरमेंन्ट भरणा करणे शहर विकास निधी भरणा करणे, आवश्यक असेल परंतु असे कोठेच परवानगी घेतल्याचे नमूद केलेले दिसून येत नाही. सर्रासपणे बांधकाम सुरू आहे. त्याबाबत सुध्दा अशा RTP ॲक्ट नुसार सर्वेक्षण करून माहिती देण्याबाबत सुचनाकेल्या होत्या. महानगरपालिकेच्या इमारती ज्या आहेत त्याबाबत सुध्दा महानगरपालिकेच्या ॲक्टनुसार साईड मार्जीन सोडून कार्यवाही व्हावी असा प्लॅन करावा म्हणून प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेले होते. नगर रचना विभागाचे संगणकीकरण करणे, स्वतंत्र अभिलेख विभाग त्या विभागाच्या अंतर्गत असावे तसेच बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपका देताना आर्किटेक्टला सुध्दा नोटीस देवून कळवावयास पाहिजे. त्यांचेवर सुध्दा कार्यवाही होणे अपेक्षित आहे. यात नुसऱ्या परवाना धारकावर कार्यवाही होते. आर्कीटेक्ट हे पॅनलवरील असतात. त्यांचेवर सुध्दा कार्यवाही होणे गरजेचे आहे. इ. बाबत सखोला चर्चा होवून निर्देश दिले होते. या व्यतिरिक्त काही मुद्द स. सदस्यांचे असतील तर प्रश्न मांडावेत.

**श्री. इलियास किरमाणी :** आरक्षित जागा भूसंपादीत करण्यासाठी १००० कोटीची तदतूद आवश्यक आहे. एवढी मोठी रक्कम महानगरपालिकेकडे उपलब्ध होऊ शकते का? बुकलेट तयार केलेल्या संदर्भात ज्या जागा भूसंपादित करणे आवश्यक आहे. त्यासाठी समिती नियुक्त करावी. ज्या जागेचे पैसे देवू शकत नाही. त्याही जागा आरक्षित ठेवलेल्या आहेत. रक्कम भरणा करू शकत नसाल तर कशासाठी ठेवतो. त्या जागेची गरज नाही. ती का अडकून ठेवता.

**मा.सभापती :** स. सदस्यांनी विचारलेला प्रश्न योग्य आहे. प्राधान्यक्रम ठरवायचा आणि त्याच जागा भूसंपादित करायचा. बुकलेट मध्ये नमूद असेल तरी कालांतराने त्यात बदल करू शकतो. समिती गठण करण्याची मागणी केली सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला जाईल तो विषय सभागृहाचा नाही. N. A. ॲससिमेन्टची जी. आर. लावण्यात आली ती कोणच्या परवानगीने लावण्यास आलेली आहे. कोठेच असे नमूद नाही की बांधकाम परवानगी घेणाऱ्याने N. A. ॲससिमेन्ट करून आणून द्यावे N. A. लागू करण्याची अट कोणत्या सभेने मंजूर केली. मा. आयुक्तांची मंजुरी आहे का. सभागृहाने सभा

करण्याचा निर्णय घेतला का अंमलबजावणी होत नाही. स्थायी समितीने N.A. ची अट रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. उशीर का होत आहे. काय खुलासा करावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या पूर्वीच्या स्थायी समितीच्या बैठकीत परवानगी घेताना N. A. ची अट शिथील केलेली होती. N. A. चे रक्कम आकरली तरी ते महूसल विभागातच जमा होतात. संपूर्ण महाराष्ट्रात तीच पध्दत अहे. N. A. वसूल केला जातो. जे प्लॉट धारक परवानगी साठी येताता त्यांना N. A. ॲससिमेन्टन न केल्यामुळे परवानगी दिली जात नाही. अशी प्रकरणे किती आहेत. महानगरपालिकेची जबाबदारी नसेल तर ही बाब निदर्शनासस आणून देतो की, शहराला लागून जी वसाहत आहे ती १९७४ साली झाली. १९७४ शासनाने मंजुरी दिली त्यानंतर सिडकोने ती राबविली व N. A. ची अट शिथील केलेली होती. गेल्या ३ वर्षापूर्वी निकाला लागला की, N. A. चार्जेस हे दिल्या गेल्या पाहिजे म्हणून सिडकोचे खाते सुदा जिल्हाधिकारी यांनी बंद केले होते. सील केले होते. परस्पर वळत केले असेल. N. A. च्या बाबत उपआयुक्त (म) उपस्थित आहे ते सविस्तर खुलासा करतील.

**मा. सभापती :** N. A. ची अट कोणत्या नियमाने लावण्यात येते. कुणाच्या अधिकारात लावण्यात येते. खुलासा करावा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम प्रमाणे आकृषी परवानगी घ्यावी लागते.

**सहा. संचालक न. र. :** बांधकाम परवानगी देण्यापूर्वी N. A. ची प्रत घेतो. परंतु याबाबतीत मा. आयुक्तांनी असे निर्देश दिले की, इतर महानगरपालिकेची माहिती घेण्यात यावी. मागील २० वर्षापासून ही परंपरा चाळत आलेली आहे. N. A. ॲसेसिमेन्ट करून आणल्याशिवय परवानगी देत नाही.

**उपआयुक्त (म) :** अकृषीच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ११०.११७ ज्या तरतूदी आहे. कृषी जीमन जर आकृषी करावयाची असेल तर सक्षम अधिकारी जे जिल्हाधिकारी किंवा महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंजुरी आवश्यक आहे. त्या बाबतची पध्दत अशी की, विविध विभागाच्या परवानगी घेवूनच N. A. ची परवानगी दिली जाते. विशेषत: नगररचना विभागाच्या संदर्भात बोलतो. मंजुरी रेखंकनासह तो प्रस्ताव असेल तरच N. A. ची परवानगी दिली जाते. महानगरपालिकेने रेखांकन मंजूर करणे त्या आधारे N. A. ची परवानगी दिली जाते. N. A. ची दिल्यानंतर त्या संदर्भात जी वसूली असते. सेक्शन १७८,१८२ खाली वसूलीची पध्दत आहे. त्यानुसार नोटीसा देवून वसुली केली जाते. परंतु ले-आऊट मंजूर केल्यानंतर बांधकामासाठी अकृषीची अट नसावी असे मला वाटते.

**मा. सभापती :** ॲग्रीकल्चर लॅण्ड असले तर लॅण्डचे अकृषीचे करणे गरजेचे आहे असे माझे मत आहे बांधकाम परवानगी थांबविणे योग्य नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** जागा कोठेही असो अकृषीक करून घ्यावीच लागते.

**मा. सभापती :** ग्रुप हौसिंग साठी N. A. ची अट नसावी. उपजिल्हाधिकाऱ्याचा अभिप्राय आहे. वैयक्तिक जे भूखंड आहेत त्याचे सुध्दा बांधकाम परवनगी थांबविलेली आहे. N. A. ची अट लागू केली त्यामुळे अशी बांधकाम परवानगी देण्यासाठी किती प्रकरणे थांबविली आहे.

**सहा. संचालक न. र. :** एक खिडकी योजना अंतर्गत N. A. ची अकृषी परवानगी असली तरच प्रकरण होतो नसता नाही.

**मा. सभापती :** सभागृहाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी.

**श्री. इलियास किरमाणी :** जे ले-आऊट मंजूर केले जाते ते शहरापासून ५-१० किलो मिटरवर असतात. तेथे कोणत्या सुविधा नसतात. पाणी ड्रेनेज नसतांना कसे मंजुर करता. मयुरनगर वासियांचे हाल बेकार आहे. त्यासाठी ले-आऊट मंजूर करतांना तेथे पाणी पुरवठा ड्रेनेज व इतर सुविधा देऊ शकतो का? बिल्डर घरे बनवतात. लोकांना त्रास होतो. सर्व सुविधा देवू शकत असेल तर ले-आऊट मंजूर करावा अशी अट टाकण्यात यावी. नाही तर ले-आऊट धारकांकडून सुविधा पूर्ण करून देण्याबाबत लिहून घ्यावे तशी अट टाकावी.

**मा. सभापती :** विचारलेल्या प्रश्न बरोबर आहे. बऱ्याच भागातील नागरिक बेटरमेंट चार्जेस भरतात. तेथे सुविधा दिल्या जात नाही. त्यानंतर जनता न्ययालयात जाते. यासाठी ले-आऊट मंजूर करतांनाच जेव्हा महानगरपालिकेस शक्य होईल त्यावेळी सुविधा पुरविल्या जातील अशी अट टाकावी. शक्य नसेल तेथे ले-आऊट मंजूर करू नये. बेटरमेंट चार्जेस भरून द्यावे. जेणे करून ८-१० वर्षात सुविधा देवू शकु. असे स. सदस्यांचे म्हणणे आहे. एका प्रकरणात मा. न्यायालयाने बेटरमेंट चार्जेस घेतले परंतु सुविधा का दिल्या नाहीत म्हणून नोटीस काढलेली आहे.

**सहा. संचालक न. र. :** तशी अट ले-आऊला टाकून परवानगी दिली जाते.

**श्री. ईलियास किरमणी :** उदा. एखादा भाग ५-१० कि. मी. अंतरावर आहे. ले-आऊट मंजूर केले. बेटरमेंट चार्जेस भरणा झाला १०,०००/- येत असेल व त्या भागात सुविधा देण्यासाठी २५,०००/- खर्च येत असले तर ले-आऊटला मंजुरी देवून उपयोग नाही. यात महापालिकेचे नुकसारन होते. तत्पूर्वी हे विचारात घेणे गरजेचे आहे की, एखादा ले-आऊट मंजूर करतांना पाणी, ड्रेनेज व इतर सुविधा देण्यासाठी किती खर्च येतो तो खर्च विकास निधी पेक्षा जास्त येत असेल तर योग्य नाही. विकास निधी पेक्षा कमी येणे गरजेचे आहे. असेच ले-आऊला मंजुरी द्यावी. अशी माझी मागणी आहे.

**मा. सभापती :** तोच मुद्दा मी मांडतो आहे. ले-आऊट मंजूर करतांना जो करारनामा केला जातो. त्यात महापालिका अशा भागात सोयी नुसार सुविधा पुरवील अशी अट टाकावी. बेटरमेंट चार्जेस भरल्यानंतर परवानगी द्यावी लागते. परंतु करारनाम्यात तसे लिहून घ्यावे लागेल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** बेटरमेंट चार्जेस भरणा करून घेतल्यानंतर विकास योजने प्रमाणे ले-आऊटला मंजुरी देणे आवश्यक आहे. बांधकाम परवानगी देणे आवश्यक आहे. या शहरात मोठमोठ्या बिल्डरांच्या माध्यमाने इमारती झालेल्या आहेत ५०-६० फ्लॅट एका इमारतीत असतात. आताच अधिकाऱ्यांनी खुलासा केला की, रु.५/- बॉंड पेपर तसे लिहून घेतले जाते. परंतु ज्या उद्देशासाठी करारनामा केला तेथे त्याचा उद्देश सफल होत नाही तसेच उद्यान, पार्कीगची व्यवस्था ड्रेनेज लाईन टाकली जाईल. पाणी पुरवठा केला जाईल परंतु जेंव्हा विक्री होते. तेंव्हा सुविधांचा अभाव असतो व भोगवटा प्रमाणपत्रासाठी जेंव्हा संचिका येते तंव्हा संचिकेतील करारनामा गायब असतो. अशी परिस्थिती आहे. द्याव्या लागणाऱ्या सुविधांच्या बिल्डरांनी उपलब्ध करून दिल्या जात नाही. त्या भागाचे जे लोकप्रतिनिधी अडचणीत

येतात. अनेक ठिकाणी जलवाहिन्या जलनि:स्सारण वाहिन्या टाकावे लागते. व समस्या सोडवाव्या लागतात. काम करीत नाही असे म्हणताच येत नाही. अशा शहरात किती इमारती आहेत. जेथे सर्व सुविधा दिल्या जातात. किंवा दिल्या जात नाही. त्यासाठी ले-आऊटला मंजुरी दिली जाते. तेथे सर्व सुविधा दिल्या पाहिजे तेंव्हाच तेथील प्लॉट विक्री करण्यास परवानगी दिली पाहिजे अशी अट असावी. जेणे करून भविष्यात जनतेला निर्माण होणाऱ्यासमस्यांना सामोरे जावे लागणार नाही. जनता महापालिकेकडे येणार नाही. बिल्डरांनी ले-आऊट मंजूर करून घेतल्यानंतर तेथे सोयी सुविधा देतील यासाठी काय प्रयत्न करावयाचे ते प्रशासनामार्फत करावे जेणे करून जनतेला त्रास होणार नाही. निश्चित यात फेरबदल करावे लागत असतील ते करण्यात यावे. अशी माझी मागणी आहे.

**सहा. संचालक न. र. :** आताच सेल्फ डेव्हलपमेंटच्या प्रश्न उपस्थित झाला तशी परवानगी देतांना आपण सेल्फ डेव्हलपमेंट सोयी सुविधा कराव्या म्हणून परवानगी देत असतो. सर्व सुविधा पुरवायच्या असतात काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र होतात. त्यानंतर भोगवटा प्रमाणपत्रासाठी संबंधित व्यक्त येत असतात. परिस्थिती अशी असते की, एखादी व्यक्ती ले-आऊटला मंजुरी घेतो. बांधकाम करता त्यावेळेस काही लोक प्लॉटची ॲडव्हान्स बुकींग करतात त्यामुळे बरेच लोक भोगवटा प्रमाणपत्र मिळण्या आधीच ताबा घेतात गैरसोयी प्रश्न निर्माण यामुळे होतो.

**मा. सभापती :** फ्लॅट ओनर ग्रुप हौसिंग असेल. प्लॉट विक्री धारक असेल त्यांचेकडून ५/- रु. बॉंडवर लिहून घेतलेले सुविधा देवू म्हणून असे स. सदस्यांना प्रश्न आहे. माझ्या माहितीप्रमाणे प्लींथ कम्लेशनची अट आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही होते का?

**सहा. संचालक न. र. :** प्लींथ कम्लेशन आता तपासणी सुरू केलेली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आताच स. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केल्यानुसार पार्ट कम्लीशन घेतल्यास महापालिकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. असे वृत्तपत्रात जाहीर प्रगटन करू शकतो का?

**मा. सभापती :** बांधकाम परवानगी देण्यात येते. तेंव्हा त्या अटी शर्तीनुसार काम होते किंवा प्लींथ कम्लेशनची अट टाकतो तपासणी होते का?

**सहा. संचालक न. र. :** तपासणी आता सुरू केलेली आहे. २८ मे २००४ ला आदेश काढलेले आहे. प्लींथ चेकींग सुरू केली.

**मा. सभापती :** आता यापुढे तपासणी सुरू केली. यापूर्वी का नाही. बिल्डरांनी सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या नाही. नागरिकांच्या अशा तक्रारी येतात म्हणून पाहणी करा. सर्वेक्षण करावे. आजही चिखलात जावे लागते. लोकांची फसवणूक केली.

**सहा. संचालक न. र. :** शहरात जे अनाधिकृत बांधकाम होत आहे. तसेच परवानगी घेवून बांधकाम होते त्या संदर्भात मा. आयुक्त यांनी २८ मे २००४ रोजी आदेश काढले त्यात प्लींथ कम्पलेशन नमूद केलेले आहे. त्यानुसार प्लींथ कम्लेशनची तपासणी सुरू केलेली आहे.

**मा. सभापती :** प्लींथ तपासणी असल्याशिवाय बांधकाम परवानगी देत नाही का? प्लींथ कम्लेशन असल्याशिवाय पुढील बांधकाम परवानगी देवूच नये. तसेच स.

सदस्य श्री. शिरसाठ यांनी विचारलेला प्रश्न असा की, किती जमीनीचा मोबदला देवून त्या ताब्यात घेतलेल्या आहेत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शहरात बऱ्याच वस्त्यातील नागरिकांनी बेटरमेंट चार्जेस भरणा केले तेथे आजही सोयी सुविधा नाही. चिखलातून नागरिकांना जावे लागते. नागरिकांची एकप्रकारे फसवणूक होत आहे.

**श्री. प्रल्हाद निमगांवर :** गादीया विहार वसाहत होवून १५ वर्षे झाले. आजही डांबरी करणाचे काम झालेले नाही व इतरही सुविधा दिल्या जात नाही.

**मा. सभापती :** एकदा सेल्फ डेव्हलफमेंट प्रोजेक्ट परवानगी घेवून काम केल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्रासाठी कोणीच येत नाही. अशी स्थिती आहे. याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. परवानगी घेतात. सेल्फ डेव्हलपमेंटची कामे करीत नाही. ग्रुप हौसिंगमध्ये घरे तयार होतात. रो. हौसेस तयार होतात. विक्री होतात सुविधा देत नाही. नंतर महापालिकेकडे त्या नागरिकांची मागणी सुरू होते. भोगवटा प्रमाणपत्रासाठी येत नाही. अशा लोकांसाठी महापलिकेच्या मार्फत काय उपाय योजना राबविणार आहेत.

**श्री. मधुकर सावंत :** ९९% लोकांनी भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. वापर सुरू आहे. दुकाने फ्लॅट विक्री होतात. त्यांचे विरुध्द काय कार्यवाही करणार आहेत. यासाठी समिती गठीत करावी.

**मा. सभापती :** अशा लोकांवर कार्यवाही करण्यासाठी समिती गठीत करण्यात येते. या समितीत उपआयुक्त (म) सहा. संचालक नगर रचना, तसेच मुख्यलेखाधिकारी तसेच ४ स. सदस्य त्यात श्री. कोकाटे, श्री. शिरसाठ, श्री. किरमाणी, श्रीमती शाहीन गफार, यांचा या समितीत समावेश करण्यात येतो. १५ दिवसांत अहवाल सभा नसेल तरी स्थायी समिती सभापतीकडे सादर करावा असे आदेश देण्यात येते. परवानगी घेतली परंतु बांधकाम पूर्णतवाचे प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही अशा लोकांची यादी जेंव्हा स्थायी समितीची सभ्ज्ञा होईल तेंव्हा सविस्तर नकाशा सह बुकलेट तयार करून सर्व सदस्यांना देण्यात यावे. बऱ्याच जमिनीचे भूसंपादन केल्या महापालिकेने मोबदला दिला त्या अशा किती जमिनी महापालिकेच्या नावाने आहे जे, की सात बारा / पी. आर. कार्ड महापालिकेच्या नावाने आहे. तेसच जागा महापालिकेने घेतली मूळ मालकाचा ताबा आजही आहे. अशा किती जमीनी आहेत. याबाबतचा अहवाल देण्याबाबत मागील बैठकीतचा सूचना केलेल्या होत्या. त्याबाबत काय माहिती प्रशासनाकडे आहेत.

**श्री. इलियास किरमाणी :** श्री. सिताराम गायकवाड हे नगररचना विभागात आहे. त्यांना सर्व माहिती आहे ते उत्तर देण्यास सक्षम आहे.

**मा. सभापती :** २१ तारखेच्या बैठकीत मुद्दा उपस्थित केलेला होता. उत्तर देवू शकत नाही. खेदाने सांगावे लागते की माहिती असेल खुलासा करावा.

**सहा. संचालक न.र. :** पूर्वीच्या जमिनी संपादन केल्या त्यांची माहिती आमच्याकडे नाही.

**मा. सभापती :** उत्तर देतांना भान ठेवावे. राठोड म्हणून प्रश्न विचारलेला नाही. सहा. संचालक म्हणून प्रश्न विचारलेला आहे. आपण काय योजना केली. तो प्रश्न नाही. यापूर्वी ज्या लाखो रुपये देवून जागा घेतल्या त्याची आजची स्थिती काय आहेत.

**श्री. मधुकर सावंत :** अधिकाऱ्यांना काहीच माहिती नाही. सभा घेवून उपयोग नाही. अधिकारी गांभीर्य लक्षात घेत नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** विशेष सभा दोन विभागावर चर्चा व निर्णय आयोजित केली. ज्या जागा महापालिकेने भूसंपादीत केल्या त्याबाबत सर्व माहिती अे.डी.टी.पी. यांचेकडे आजच्या बैठकीत असणे आवश्यक होते. साधा प्रश्न विचारतो की, २०-२५ वर्षापासून महापालिकेचे झोन क्र. २ चे कार्यालय इमारतीमध्ये आहेत ती इमारत महापालिकेच्या मालकीची आहे का?

**सहा. संचालक न. र. :** याबाबत सर्व माहिती मालमत्ता विभागाकडे उपलब्ध होवू शकेल.

**श्री. संजय शिरसाठ :** मिळकत धारकाची जेंव्हा जागा ताब्यात होते तेंव्हा रजिस्ट्री करण्यास नगर रचना विभागाचे अधिकारी जात असतात. उपआयुक्त जातात रजिस्ट्रीच्या नंतर ती जागा हस्तांतर होते. त्यानंतर मालमत्ता विभागाकडे जाते. मालमत्ता विभागाकडे हस्तांतर झाल्यानंतर त्या जागेवर होणारा वापर बरोबर होतो. किंवा नाही हे बघण्याचे काम असते. साधा प्रश्न वसंतभूवन झोन क्र. २ ची इमारत महापालिकेच्या मालकीची आहे का?

**सहा. संचालक न. र. :** सदरची माहिती माझ्याकडे नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** आपल्या विभागाचे २५ अधिकारी येथे बसलेले असतील माहिती नाही तर कशासाठी ११.३० वाजेपासून सर्वांना बसवून ठेवले. थोड्या वेळाने का होईना खुलासा करावा.

**सहा. संचालक न. र. :** महापालिकेच्या मालकी हक्क नावाने नाहीत.

**श्री. संजय शिरसाठ :** २० वर्षापासून झोन ऑफिस आहे. भूसंपादनाची कार्यवाहीत नेमकी कोणती कार्यवाही या विभागाकडून होते. २० वर्षात महापालिकेच्या नावाने जागा करता आली नाही. तसेच विवेकानंद कॉलेजची जागा २० वर्षापूर्वी भूसंपादीत केली आजही महापालिकेचे नांव त्या जागेला नाही. टी. पी. विभागाचे काम काय असते. जागेची व्हॅल्युशन काढले जाते. मोबदला दिला जातो. रजिस्ट्री होते. जागा हॅडवर्क करतो. मोबदला दिला जातो. परंतु २०-२० वर्ष नांव त्या जागेला महापालिकेचे लागत नाही. वसंत भुवन जागा किती वर्षापूर्वी भूसंपादित केली होती त्याची माहिती देण्यात यावी सभापती यांनी आवर्जून सभा बोलवली. अनेक लोकांचे प्रश्न मार्गी लावावे हा उद्देश या मागचा आहे. जमीन महापालिकेच्या नावावर करायचीच नसेल तर भूंसापदन करण्याची गरज काय? शहानूरवाडी भागात ही जागा भूसंपादित केली. जेंव्हा विकास करायचा तेंव्हा सर्वसाधारण सभेत चर्चेला विषय आला तेंथे संपूर्ण जागेवर वसाहत झाली. सभागृहाने निर्णय घ्यावा. महापालिकेची ही इमारत सुध्दा महापालिकेच्या नावाने आहे का? वसंत भुवनची इमारत महापालिकेच्या नावाने आहेत का? खुलासा करावा.

**श्री. मधुकर सावंत :** झोन क्र. ४ जेथे औरंगाबाद महापालिकेचे कार्यालय व पाण्यांच्या टाक्या आहेत ती जागा महापालिकेच्या नावाने आहे का?

**श्री. संजय शिरसाठ, श्री. काशिनाथ कोकाटे :** आपण बोलविलेल्या सभेचे गांभीर्य अधिकारी लक्षात घेत नसेल तर सभा तहकूब करावी. माहिती नाही सर्रास उत्तर मिळते.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी खाली बसावे खुलासा घेतला जाईल.

**श्री. संजय शिरसाठ :** तत्कालीन महापौर श्री. विकास जैन यांचे कार्यालयात महापालिकेच्या ज्या महत्वाच्या ठिकाणच्या जागा बी.ओटी. पध्दतीने विकास करावयास द्यायच्या म्हणून प्रस्ताव होता त्याचे टेंडर निघाले. झोन नंबर ६, वसंत भुवन ही इमारत सुध्दा बी.ओ.टी. पध्दतीने विकास करण्यासाठी द्यायची होती.

मोठ मोठे आर्किटेक्ट आले. प्लॅन तयार करून दिला. परंतु वसंतभुवन ही इमारतच महापालिकेच्या नावावर नाही. म्हणून टेंडर रद्द झाले. २५ वर्षापासून महापालिकेचे कार्यालय आहे ती जागा महापलिकेच्या नावावर का नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे. याची माहिती नसेल तर इतर प्रश्न विचारण्याला अर्थ नाही. ही सभा तहकूब करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** ज्या विभागाच्या संबंधित ही बैठक बोलाविली प्रश्नाची उत्तरे मिळत नसतील तर ११.३० वाजेपासून बैठक चालू आहे. दिवस भराचे अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांचे सर्व कामकाज ठप्प आहे. या सभेमुळे कामकाजावर दुर्लक्ष झाले. नगररचना विभागाकडून सविस्तर उत्तर मिळत नसेल तर नगर रचना विभाग काय कामाकाज करते हा प्रश्न आहे. महापालिकेच्या हिताचे व वसुली वाढविण्याच्या दृष्टीने जे मोठे-मोठे निर्णय घ्यावयास पाहिजे ते या विभागामार्फत कार्यवाही होत नाही. मोठ-मोठ्या जागा महापालिकेने भूसंपादन केलेल्या आहेत. कोणत्याही अधिकारी ६ महिने असेल १२ महिने असेल सर्व जबाबदारी घेवूनच सक्षम अधिकारी म्हणून पदभार स्विकारला जातो हे विसरता येणार नाही. मला माहिती नाही असे उत्तर देणे अत्यंत चुकीचे आहे. या शहराचा विकास व मालमत्ता व भौगोलिक परिस्थिती पाहता सहा. संचालक नगररचना यांचेकडे फक्त भूसंपादनाचे काम देणे योग्य होईल. बांधकाम परवानगी देण्याचे काम शहर अभियंता यांचेकडे द्यावे व तशी नियमामध्ये सुध्दा तरतूद आहे. कामाची विभागाणी करणे गरजेचे आहे. एकाच वसाहतीत २०-२५ पिठाच्या गिरणीस परवानगी दिली परंतु एका दि. १०-०७-२००४ अर्ज केला त्या व्यक्तीकडून नियमानुसार पैसे भरून घेण्यात आले. परंतु अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना त्या व्यक्तिकडून पैसे मिळाले नाही म्हणून अद्याप परवानगी दिलेली नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** १५-२० पॉंईट आपण वाचुन दाखविले ज्याचा खुलासा पुढील बैठकीत म्हटल्यानंतर अर्थ नाही.

**सहा. संचालक न. र. :** मागील २५ वर्षापूर्वी जे काही झालेले आहेत त्या बाबतीत संचिका कार्यालयास उपलब्ध नाही. रेकॉर्ड विभागात सुध्दा उपलब्ध नाहीत.

**श्री. संजय शिरसाठ :** स्पष्ट्र उत्तर अधिकाऱ्यांनी दिल्याबद्दल अभिनंदन करते अशा किती संचिका गहाळ आहेत त्याचा खुलासा व्हावा. त्यानंतरच सभेचे कामकाज घ्यावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आताच अे. डी. टी. पी. यांनी खुलासा केला पदभार स्विकारतांना कोणकोणत्या संचिका ताब्यात घेतल्या त्याची जबाबदारी नव्हती का? याचा सुध्दा खुलासा व्हावा.

**श्री. संजय शिरसाठ :** किती संचिका गहाळ झालया कुणाच्या कार्यकाळात झाल्या त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. अे. डी. टी. पी. यांनी धाडसाने संचिका गहाळ असल्याचे सांगितले त्यांचे अभिंनदन करतो. एक जागृत अधिकारी स्पष्टपणे भूमिका मांडू शकतो आता गहाळ झालेल्या संचिका किती. वसंतभूवनच्या जागे बाबतची ही संचिका गहाळ झाली की काय? त्याचा ही स्पष्ट खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती :** २०-२५ वर्षापूर्वीच्या संचिका नाहीत असे स्टेटमेंट सहा. संचालक नगररचना यांनी केले या सभागृहात जेष्ठ स. सदस्य बसलेले आहेत. जर खरोखरच संचिका गहाळ असेल रेकॉर्डला नसेल, अशी माहिती उपलब्ध असेल

कोणत्या संचिका गहाळ झाल्या त्याचा खुलासा करावा. जबाबदार अधिकारी म्हणून आपण स्टेटमेंट केलेले आहे. चार्ज घेतांना सर्व जबाबदारी युक्त विशिष्ट प्रकारे चार्ज घेतला जातो हे सर्व नियम सदस्यांना माहित आहे. महापालिका ही जबाबदार स्वायत्त संस्था आहे. ही बातमी जनतेपर्यंत गेल्यास संचिका गहाळ होतात असे असेल तर चर्चा करायची कोणत्या मुद्यावर असा प्रश्न निर्माण होतो. जनतेसमोर महापालिकेची काही अस्था राहणार नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सभा तहकूब करावी कोणत्या संचिका गहाळ आहेत. जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

**सहा. संचालक न. र. :** माझे स्टेटमेंट असे की, २५ वर्षापूर्वीच्या संचिका मिळकत नाही. त्या गहाळ असू शकतात जेव्हा चार्ज घेतला जातो. तेंव्हा संचिका वगैरे नोंद करून घेतली जात नाही. आदेशाचे पालन होते. त्यानुसार चार्ज घेतला व दिला म्हणून सही होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** संचिकेची यादी घेतली जाते. तरच चार्ज घेतला जातो.

**श्री. संजय शिरसाठ :** वसंतभुवनची इमारत / जागा कुणाच्या नावावर आहे. कोणती जागा भूसंपादन होते. तेंव्हा महापालिकेचे अधिकारी रजिस्ट्री करण्यासाठी बरोबर असतात. त्यानंतर ती जागा महापालिकेच्या नावावर होते. नंतर मालमत्ता विभागाकडे हस्तांतर होते.

**श्री. ईलियास किरमाणी :** ज्या ज्या संचिका गहाळ आहेत त्या त्या संबंधित जे. जे. अधिकारी, कर्मचारी येत असतील पोलिसात गुन्हे दाखल करावे. सर्वांच्या बदल्या त्या विभागातून करण्यात याव्यात.

**श्री. मधुकर सावंत :** ज्या ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात संचिका गहाळ झाल्या असतील त्यांचेवर कडक कार्यवाही व्हावी. पोलिसात गुन्हे दाखल करावेत. जो पर्यंत ही कार्यवाही होत नाही तो पर्यंत सभा तहकूब करावी.

**सहा. संचालक :** २५ वर्षाचा रेकॉर्ड सादर करायचा त्यातील काही संचिका गहाळ असू शकतात संपूर्ण यादी तयार करण्यात वेळ लागेल.

**श्री. संजय शिरसाठ :** रजिस्ट्री करतांना टी. पी. विभागाचे अधिकारी जातात. वसंतभुवनची जागा महापालिकेच्या नांवे आहे का.

**सहा. संचालक न. र. :** पूर्वी जे भूसंपादन होते ते जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत एस. एल ओ. कडून पूर्ण कार्यवाही होवून ७/१२ किंवा सिटी सर्व्हेला नोंद होते.

**श्री. संजय शिरसाठ :** नगर रचना विभागाने कार्यवाही प्रस्तावित केल्यानंतर खाजगी वाटाघाटी करावयाची असेल तरी रजिस्ट्रीला जातो किंवा त्या विभागाकडून अमूक जागेची इतकी रक्कम घेते. त्यानुसार महापालिकेचे अधिकारी रजिस्ट्रीसाठी तेथे जातात. एस. एल ओ. जरी कार्यवाही करीत असेल तर महापालिकेने पैसे भरणा केलेले असतील वसंतभुवन ही जागा महापालिकेच्या नावावर आहे का?

**सहा. संचालक न. र. :** तपासून घ्यावे लागेल.

**श्री. काशिनाथ कोकाटे, सौ. शाहीन जफर, श्री. मधुकर सावंत, श्री. संजय शिरसाठ :** अधिकारी यांचेकडे उत्तर नाही. सभा तहकूब करावी. (त्याच वेळी स. सदस्य सभागृहाबाहेर जातात.)

**सौ. शाहीन जफर :** सभागृह चालवून उपयोग नाही. १० वेळेस प्रश्न करून उत्तर मिळत नाही.

**मा. सभापती :** स्टेटमेंट करतांना विचारपूर्वक केले पाहिजे. आता पुन्हा २ तारखेपर्यंत वेळ देण्यात येतो. २ तारखेला पुन्हा ही तहकूब सभा सकाळी ११.३० वाजता घेण्यात येईल. सभापती या नात्याने आदेशित करतो की, व विनंती करतो की, सभागृहात अर्धवट माहिती घेवून येवू नका. स. सदस्य सर्व माहिती निशी सभागृहात येतात. प्रशासनाकडे माहिती नसते. फार दुर्दैवाची बाब आहे. यामुळे स. सदस्य प्रशासनावर व माझ्यावर ही आरोप करतात. आजही सभा तहकूब करून २ तारखेला सकाळी ११.३० वाजता याच सभागृहात घेण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ०२-०८-०४ (दि. २९-०७-२००४ ची तहकूब सभा) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. (का. प. क्र. ११)**

**सोमवार दिनांक ०२ ऑगस्ट २००४ रोजी मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची (दि.२९-०७-२००४ ची तहकूब सभा) महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.४० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचेसह संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३) | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी | -//- |
| ४) | स. स. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर | -//- |
| ५) | स. स. सौ. शाहिन जफर महेमुद जफर | -//- |
| ६) | स. स. श्री. प्रल्हाद गणपतराव निमंगावकर | -//- |
| ७) | स. स. श्री. मोहन मेघावाले | -//- |
| ८) | स. स. श्री. मधुकर दामोधर सावंत | -//- |
| ९) | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| १०) | स. स. श्री. शेख मुनाफ शे. यासीन | -//- |
| ११) | स. स. श्री. सोपान भाऊराव पारे | -//- |
| १२) | स. स. श्री. भगवान दगडूजी रगडे | -//- |
| १३) | स. स. श्री. स. सलीम स. युसूफ | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती :** महापालिकेचे सुरक्षा रक्षक पै. मो. मोहसीन पिता मोहमंद महेबुब यांचे मौलाना आझाद संशोधन केंद्र येथे कर्तव्य बजावत असताना हृदय विकाराच्या झटक्याने पहाटे २.५० ते ३ वाजेच्या सुमारास दु:खद निधन झाले. वयाच्या ५२ व्यावर्षी त्यांचे निधन झाले ही फार दुर्दैवी घटना आहे. मी. स्वतः मा आयुक्त यांचेसह भेट दिली. प्रथम हे सुरक्षा रक्षक दवाखान्यात उपचारासाठी गेले होते. परंतु दवाखान्यात ॲडमीट न होता. रिसर्च सेंटरवर कोणीही नाही म्हणून पुन्हा परत ड्युटीवर गेले ते माजी सैनिक सुध्दा होते. त्यांना या सभागृहातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे.

(यावेळी पै. मो. मोहसीन पिता मोहम्मद महेबुब यांचे दु:खद निधनाबद्दल सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

परवा ज्या मुद्दावर ही सभा तहकूब झाली की संचिका गहाळ झालेल्या आहेत. त्याबाबत पुन्हा सविस्तर खुलासा होणे आवश्यक आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** गेल्या वेळीस नगररचना विभाग व प्रशासकीय विभागावर चर्चा करण्यासाठी विशेष बैठक बोलावली होती. मा. आयुक्तही कारणास्तव

उपस्थित नव्हते. मनपाच्या अधिकाऱ्यांशी जे मनात वाटेल तसे उत्तरे दिली. त्या बैठकीत सहा. संचालक नगर रचना श्री. राठोड यांनी धाडसाने विधान केले. धक्कादायक बातमी समजली की, चार्ज घेतांना फक्त कागदोपत्री चार्ज होतो. संचिकाची नोंद वगैरे घेवून चार्ज होत नाही. यावर त्यांनी असा युक्तीवाद मांडला की, या विभागामध्ये अनेक संचिका सापडत नाही. तपासणी केली तरी रेकॉर्ड विभागात सुध्दा उपलब्ध नाही. तत्पूर्वी त्यांना वसंत भूवनची इमारत मनपाच्या नावाने आहे का म्हणून प्रश्न विचारला ती इमारत आजही मनपाच्या नावाने नाही. उत्तर दिले संचिका गहाळ झाल्या असा खुलासा स. स. न. र. यांनी केला व किती संचिका गहाळ आहेत त्याची माहिती द्यावी. नसता सभा तहकूब करावी असा चर्चेचा विषय होता. त्यानंतर ४-५ दिवसांचा कालावधी गेलेला आहे. अधिकारी सर्व तयारी निशी आलेले असतील किती संचिका गहाळ आहेत. संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**सहा. संचालक न. र. :** वास्तविक त्या दिवसांचा मुद्दा वसंतभुवनच्या इमारतीचा होता तो मालमत्ता विभागाच्या संबंधित आहे. नगर रचना विभागाशी संबंधित नाही व संचिका गहाळ आहे. असे मी म्हटलेलेच नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** दिशाभूल नको, आपण काय उत्तर दिली. स. सदस्यांनी काय चर्चा केली याची सर्व ऑडीयो कॅसेट आपल्याकडे रेकॉडींग झालेली आहे. आपणांस ऐकविली जाईल. चुकून बोललो असे मान्य करावे. अधिकाऱ्यांना खोटे बोल पण रेटून बोल याची सवय झालेली आहे.

**सहा. संचालक न. र. :** अनावधाने कदाचित निघाले असेल. भूसंपादनाच्या बाबतचे जे प्रकरणे अपेडींग करणेसुरू आहे. ८५० मालमत्ता भूसंपादीत केलेल्या आहेत. कलम ७५ व उर्वरित पकरणात सिटी सर्वे ऑफिसमध्ये सुध्दा त्या मालमत्तेची मनपाच्या नावाने नोंद होण्यासाठी पाठपुरावा चालू आहे. सदर संचिका सोबत आणलेली आहे. पत्रव्यवहार केलेला आहे. सचिंका गहाळ झाल्याचे निष्पन्न झालेली आहे.

**मा. सभापती :** संचिका गहाळ नाही. याचा अर्थ सर्व रेकॉर्ड नगररचना विभागात आहे.

**मा. आयुक्त :** मागील इतिवृत्तावर बोलणे मी योग्य होणार नाही. परंतु मी रजेवरून आल्यानंतर सहाय्यक संचालक नगररचना यांचेशी मी चर्चा केली. त्या पूर्वी पासून मी सभागृहातर्फे येत असल्यामुळे मला जे योग्य वाटते ते या ठिकाणी नमूद करतो. जेंव्हा विशिष्ट संचिकेवर चर्चा होते ती उपलब्ध आहे किंवा नाही याचा खुलासा पहिल्यांदा होणे गरजेचे होते. सभागृहाने एखाद्या संचिकेबाबत माहिती विचारली त्या विषयाला धरून उत्तर देणे अधिकाऱ्यांकडून अपेक्षित आहे. संचिका गहाळ होणे किंवा न घेणे यात नेमकी कोणती संचिका व कुणाच्या काळात असा प्रश्न येतो. याबाबतचा प्रश्न विचारला असेल त्याप्रमाणे उत्तर देणे अपेक्षित होते. साजेद बिल्डर प्रकरणाची संचिका गहाळ आहे. त्याचा अहवाल शासनाला व प्रशासनाला सहाय्यक संचालक नगररचना यांनी दिलेला आहे. त्या दिवशी काय विषय होता हे मला माहित नाही. परंतु सहा. संचालक नगररचना यांनी विभाग प्रमुख म्हणून जबाबदारीने उत्तर द्यावीत. अनावधानाने देणे वगैरे हे कितपत योग्य आहे. माहिती उपलब्ध नसेल तर मला माहिती नाही. माहिती घेवून सांगेल असे उत्तर देणे योग्य होवू शकते. रेकॉर्ड विभाग संदर्भात आयुक्त म्हणून मी सूचना केलेल्या आहेत. सहा. संचालक नगररचना यांना

प्रामुख्याने आदेश दिलेला आहेत. त्यांचे विभागाच्या संचिका ज्या अभिलेखात जमा आहेत.त्या त्यांचे कर्मचारी / अधिकारी यांचे मार्फत जे मनपाने नियम केलेले आहेत. अभिलेख जतन करण्याचे त्यानुसार लावून घ्यावेत. सहा. संचालक नगररचना यांनी तोंडी अभिलेखातील संचिका त्यांचे विभागामार्फत कार्यालयीन संचिका लावण्याचे काम चालू आहे. परंतु अभिलेखातील संचिका बाबत कार्यवाही झालेली नाही. परंतु सूचना देण्यात आल्या की अभिलेख आपल्या विभागापुरता अद्यावत करून द्यावा. सहा. संचालक नगररचना यांनी त्यांचे विभागाच्या संचिका सर्व तपासणी करून घेतल्या व नाश करण्यासाठी पात्र आहे त्याची यादी करून घेतली. उर्वरित संचिका कर्मचाऱ्यांना आत पाठवून शोक घेऊन एकत्रित करणे शक्य होईल. त्यासाठी एक स्वतंत्र्य संचिकेवर मी सूचना दिलेल्या आहेत. ती माझ्याकडे आहे. अधिकाऱ्यांना सुध्दा कल्पना दिली आहे. नगररचना विभागाने महानगरपालिकेच्या जो अभिलेख कक्ष आहे. त्यात नगररचना विभागाचे संचिकाची पाहणी करून संचिका मागे-पुढे आल्या असतील त्या व्यवस्थित लावून घेण्यासाठी मी लेखी सूचना दिलेल्या आहेत. उपआयुक्त (म) च्या देखरेखीखाली ते काम होणार आहे. मागच्या सभेत जर विशिष्ट संचिकेबाबत स. सदस्यांना खुलासा हवा असेल तो सहा. संचालक नगररचना यांनी करावा. गहाळ झाल्या आहेत की नाही असे जनरल उत्तर न देता त्या विशिष्ट संचिकेबाबत उत्तर देणे अपेक्षित आहे. जेंव्हा शंका येते ही संचिका विभागात की मालमत्ता विभ्ज्ञाग असेल त्याची तपासणी करून उत्तर देणे आवश्यक आहे. स. सभासद प्रश्न विचारतात म्हणून उत्तर देणे हा विषय वेगळा आहे. संचिकेची कस्टडी ही अभिलेखामधील व विभागातल्या संचिका निश्चितपणे सांभाळणेची जबाबदारी अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना दिलेली आहे. त्यात कोणी टाळाटाळ करीत असेल तर रेकॉर्ड ठेवत नसेल तर त्या त्या कर्मचाऱ्यांवर निश्चितपणे कार्यवाही होणार आहे.

**मा. सभापती :** ज्या जागा मनपाने भूसंपादित केल्या परंतु मोबदला देवूनही त्या मुळ मालकाकडे आहेत. जागा घेतांना आपण मोबदला देतो रितसर कागदपत्र तयार करतांना ती जागा रिकामी असल्याचे तपासूनच ताब्यात घेतो. अशा किती जागा आहेत की, मोबदला देवून ही मुळ मालकाकडे आहेत. असा प्रश्न स. सदस्यांचा होता. आज असे निदर्शनास येते की, ज्या जमीन आहेत त्या मुळ मालकांच्याच नावाने आहेत.

**श्री. शिरसाठ संजय :** मनपाने आतापर्यंत किती जमीनी संपादित केल्या व किती ठिकाणी मनपाच्या नावावर रेकॉर्डवर आहे हा माझा प्रश्न होता. अनेक जागेवर मनपाचे नांव लागलेले नाही.

**श्री. भगवान रगडे :** वसंत भुवनची इमारत / जागा अद्याप मनपाचे नावे नाही. वृत्तपत्रात बातम्या आल्या की, मनपाच्या भोंगळ कारभार नगरसवेक या नात्याने स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करीत असताना अशा बातम्या येणे अत्यंत दु:ख वाटले. नगरसेवक म्हणून आपण काय काम करतो हे भेडसावल्या सारखे वाटले. हे कुणापर्यंत चालणार आहे. आज सुध्दा सरकारी जागा मनपाकडे हस्तांतरीत झाली. मनपाच्या नांवावर नाही. लाखो रुपये खर्च करून मोठमोठ्या इमारती झालेल्या आहेत. त्या इमारती सुध्दा मनपाच्या नावावर नाहीत. माझ्याच वॉर्डात ३०-३५ एकर जमीन मनपास देण्यात

आलेली आहे. त्या जागेवर काही लोकांनी प्लॉटींग करून विक्री केलेली आहे. झोपडपट्ट्या झालेल्या आहेत. ब्रिजवाडी भागात अडीच एकर जागेत मनपाची शाळा सभागृह पाण्याची टाकी इ. बांधकाम केलेले आहे. परंतु आजही मनपाच्या नांवे नाही.

**मा. सभापती :** नगररचना विभागाने जागा ताब्यात घेतली असेल तर. नावांवर करून घेण्याची जबाबदारी मालमत्ता विभागाची आहे. या दोन्ही विभागाने संयुक्त कार्यवाही करून ताबा घेतांना नगररचना व मालमत्ता विभागाचे दोन्ही अधिकारी सोबत असतात. दस्तऐवजी करून मोबदला देवून नांवावर करतात सविस्तर खुलासा घेता येईल. स. सदस्य श्री. शिरसाठ त्यांनी केलेल्या प्रश्नाचा खुलासा देण्यात यावा.

**मा. आयुक्त :** श्री. रगडे यांच्या प्रश्नाचा खुलासा असा की, गट क्र. ३० असून क्षेत्र २४ हेक्टर १९ आर. आहे. ७/१२ मनपाच्या नावाने लावण्यासाठी सिटी सर्व्हे कार्यालयाकडे कार्यवाही चालू आहे. श्री. शिंदे उपआयुक्त हे कार्यवाही करीत आहेत. ती गायरान जमीन आहे. त्या जागेवर विकास कामे झाली व वाचनालय कोठे करायचे याबाबत (डीटीपी) व उपआयुक्त (म) यांना लेखी सूचना दिलेल्या आहेत.

**सहा. संचालक न. र. :** स. सदस्य श्री. शिरसाठ यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत माहिती काढण्याची कार्यवाही चालू आहे. माहिती पूर्ण झाल्यावर देण्यात येईल.

**मा. सभापती :** लिजवर जागा दिली जाते. नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी दिली जाते त्यानुसार काय झाले? वापरात बदल होता किंवा काय हे तपासण्यासाठी जबाबदारी नगररचना विभागाची आहे. नियमांचे उल्लंघन झाले असेल तर ते सुध्दा पाहणे गरजेचे आहे. अशा मालमत्तेची माहिती असते का?

**सहा. संचालक न. र. :** विशिष्ट अशा प्रकरणात माहिती आवश्यक असेल तर ती काढून माहिती देता येईल. माहिती घेवून उत्तर देतो.

**श्री. संजय शिरसाठ :** सहाय्यक संचालक नगररचना हे विभाग प्रमुख म्हणून काम करतात. परंतु देण्यात येणारी उत्तरे बरोबर वाटत नाही. यास मा. आयुक्त सहमत नसतीलच. साधा प्रश्न आहे. मनपाने भूसंपादित केलेल्या व ज्या मोबदला देवून जागा ताब्यात घेतल्या अशा किती जागेवर मनपाचे नांव रेकॉर्डला लागलेले आहे. १९७८ साली विवेकानंद कॉलेजची जागा संपादित केली. १९८० ला करारनामा केला २५ वर्ष झाली आजही मनपाचे नांव लागलेले नाही. नगरसेवकांनी प्रशासनाला माहिती देवून जागृत करायचे. सदस्यांचे हे काम आहे का? प्रशासनाने प्रशासनाचे काम केले पाहिजे. शहरातील अशा किती मालमत्ता आहेत. सर्वेक्षण करण्याचे ठरले होते. मनपाच्या मालमत्तेची जपणूक करण्याचे काम मालमत्ता विभागाचे आहे. प्रश्न उपस्थित केला तर उत्तर मिळत नाही. या शहरात ओपन स्पेस दाखविली. उद्यान शाळा व इतर कामासाठी किती ठिकाणी जागा आरक्षित आहेत. त्याची माहिती समोर आली नाही. कोकणवाडी शाळेसाठी किती क्षेत्रफळ जागा आहे. ले-आऊट मंजूर करतांना १०% ओपन स्पेस किती आहेत या शहरातील बिल्डर / आर्कीटेक्ट यंच एक बैठक बोलवावी. मनपाच्या नियमानुसार दिलेल्या परवानगी नुसार जागेचा वापर होता का? किती जागा आहेत याची माहिती मिळेल. तसेच महापालिकेची प्रत्येक वार्डात किती व कोठे

जागा आरक्षित आहे. क्षेत्रफळ किती याबाबतची माहिती मिळेल. कामाला सुरुवात करावी. पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात यावी. किती जागा संपादन केल्या. किती जागेचे मनपाचे पी.आर. कार्डवर नांव आहे. एका व्यक्तीने शाळेच्या जागेवर रविवारचा आठवडी बाजार भरतो त्या भागाला लागूनच आठ खोल्या बांधलेल्या आहेत. व नोटीस चिटकवली की, बॅनर्स लावू नये. मनपाच्या रेकार्डवर सर्व आहे. खोल्या काढल्या तर कोर्टात जाईल स्टे मिळले या भितीपोटी दोन्ही तिन्ही विभाग मालमत्ता नगररचना व प्रशासकीय अधिकारी एकमेकांवर जबाबदारी टाकतात. व उत्तरे देण्याचे टाळतात. मनपाची मालमत्ता जपण्याचे काम प्रशासनाचे आहे. भविष्यात कोणतेही विकास काम करण्यास अडथळा येवून नये. शहानुरवाडी भागातील जागा संपादित केली. मुळ मालकाला पैसे दिले. आणि १००% जागेवर अतिक्रमण झालेले आहे. १०X१० जागा शिल्लक नाही. एका अधिकाऱ्याने अहवाल दिला की, सर्वसाधारण सभेने आम्हाला आदेशित करावे. आजही ती जागा मनपाच्या मालकीची आहे की नाही हा प्रश्न आहे. त्या साठी सर्व माहिती सभापतींकडे आल्यानंतर वृत्तपत्रात प्रसिध्द करता येईल व जनतेला कळेल.

**मा. आयुक्त :** सुरुवातीलाच खुलासा केला की, अभिलेख अद्यावत करण्याचे काम चालू आहे. मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार माझे मत स्पष्ट आहे की, डिटीपीने ते गांभीर्याने घेतलेले नाही. शेवटी प्रशासन एक आहे. महानगरपालिका एक आहे. आपेन स्पेसचा ४१८ जागा सर्व्हे झाला आहे. उपआयुक्त (म) यांचेकडे तो आहे. जागा संपादन केल्यानंतर कलम ७७ खाली असो किंवा भूसंपादन कायद्याखाली निवाडा झालेला असो. ताबा पावतीने पी.आर. कार्ड किंवा ७/१२ नुसार मनपाच्या नांवाने करावयाचे आहे. २००० पर्यंतचा सर्व्हे तयार आहे. २००० पासूनचा सर्व्हेण संगणकावर घेण्याचे काम उपआयुक्त तसेच मालमत्ता अधिकारी यांचेमार्फत चालू आहे. पाच झोनचे डाटा एंट्रीचे काम पूर्ण झालेले आहे. ८ दिवस द्यावे पूर्ण झोनचे काम करू असे त्यांचे म्हणणे आहे. पूर्ण झोनचे काम करून जी माहिती आहे ती संगणकावर घेवून अस्तित्वातल्या इमारती त्यांचे क्षेत्र, तो भाग, त्याचा उपयोग इ. तपासणी करता येईल. ज्या ज्या जागा मनपाच्या मालकीच्या आहेत त्या लिजवर दिलेल्या आहेत. त्यांचा वापर अटी शर्ती नियमानुसार होतो किंवा नाही. याबाबत टिपी विभाग व मालमत्ता अधिकारी यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. नगर परिषदेच्या काळात दिलेल्या मिळकती असतील. मनपाच्या कार्यकाळातही दिलेल्या आहेत. नजीकच्या दोन-तीन वर्षात दिलेल्या वर्षात दिलेल्या आढळुन येत नाही. ज्या दिल्या त्याचा वापर अनुज्ञेय आहे. का? मोकळ्या जागा ज्या मंजूर ले-आऊट मधील असेल अथवा नगर पालिकेकडून मनपाकडे आलेल्या त्या संपूर्ण जागेची माहिती ४१८ जागेची आहे. आणि संपादनाने घेतलेल्या जागेची ३८४ नोंद झाली आहे. पाच झोनची तपासणी झालेली आहे. आठ दिवसात गोषवारा सादर करता येईल या कामाची दखल प्रशासनाने घेतलेली आहे. सभागृहात जी भावना व्यक्त केली. त्यात नगररचना विभागाचा समन्वय असणे आवश्यक आहे. याचा आढावा उपआयुक्त (म) सभापतींना सादर करतील.

**मा. सभापती :** (१) माझ्या माहिती प्रमणे ४१८ प्रॉपर्टी व मालमत्ता विभागामार्फत जे झोनवाईज तपासणी चालू आहे त्या सर्व मालमत्तांचे एक बुकलेट तयार करून सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना द्यावेत तसेच
(२) मनपाच्या मालकीच्या व भूसंपादित केलेल्या जागा किती व आजची स्थिती काय आहेत. याबाबत मालमत्ता व नगररचना विभागाने टिप्पणी तयार करून सभागृहात सादर करावी तसेच (३) ज्या ज्या लोकांना लिजवर जागा दिल्या जेंव्हाही जागा दिली त्याच जागेत वापर होतो का? याची सुध्दा तपासणी होणे आवश्यक आहे. (४) मनपाच्या ओपन स्पेस मधील जागा त्या रिकाम्या आहेत का त्यावर अतिक्रमण आहे का? आजचे स्टेटस् काय आहे त्या मनपाच्या नावावर झालेल्या आहेत का? याची सुध्दा शहानिशा करावी (५) मालमत्ता अधिकारी व उपआयुक्त (म) यांचे मार्फत झोननिहाय जी ओपन स्पेसच्या बाबतीत माहिती घेण्याचे काम चालू आहे त्यांचे एक बुकलटे तयार करून १५ दिवसांत सादर करावे (६) सेल्फ डेव्हलपमेंटचे जी कामे होतात त्याची तपासणी सक्षम अधिकाऱ्यामार्फत होऊन सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. त्यानंतरच परवानगी दिली पाहिजे. कम्लेशन प्रमाणपत्र देतांना सर्व पाहणी करूनच दिले जावे. अशा सूचना देण्यात येतात. या पध्दतीचा अवलंब युपढे जो कोणी ले-आऊट मंजुरीधारक होतील त्यांचेसाठी लागू करावे असे आदेश या सभागृहात देण्यात येतात.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** प्रेरणानगर भागात ओपन स्पेसवर बांधकाम होते. न्यायालयात प्रकरण गेले आहे. २ लांखाची अर्थसंकल्पात तरतूद आहे.

**विधी सल्लागार :** ओपन स्पेसच्या बाबत न्यायप्रविष्ट प्रकरण आहे. जे नाथ प्रांगणाच्या संबंधी दाखल केलेले आहे. सद्यास्थिती कोणतेही स्थगितीचे आदेश वगैरे नाही. त्या जागेबाबत मालकीचा वाद न्यायप्रविष्ट आहे. परंतु मनपाकडे सध्या न्यायालयाचे काहीही आदेश नाहीत. तेथे काम करता येईल.

**श्री. निमगांवकर प्रल्हाद :** प्रेरणानगर मध्ये खुल्या जागेवर एका व्यक्तीने स्वतःच्या नावाने पी.आर. कार्ड तयार करून घेतले. म्हणून संरक्षित भिंत बांधावी म्हणून मागणी होती. नगररचना विभागाने पत्र दिले. संरक्षित भिंत बांधण्यात येवू नये वाद चालू आहे.

**शहर अभियंता :** प्रेरणा नगरची जागेला संरक्षित भिंत बांधण्याचे अंदाजपत्रक तयार केले होते. परंतु ती जागा दुसऱ्याच्या नावावर लागल्याने काम करता येत नाही.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** तपासणी करून सांगतो.

**कनिष्ठ अभियंता (श्री. उमाळकर) :** प्रेरणानगर या ले-आऊट मधील ओपन स्पेस अद्यापपर्यंत मनपाने हस्तांतर करून घेतली नाही त्या ले-आऊटमध्ये एक रिझर्वेशन होते. पूर्वीच्या मंजुरीनुसार ती जागा हस्तांतर केलेली आहे. पूर्वी मनपाची ले-आऊट मधील खुली जागा असे नांव होते. परंतु त्यानंतर त्या व्यक्तीने त्यांचे नाव त्या जागेवर लावून घेतले आहे. त्या व्यक्तीचे नांव रद्द करण्यासाठी १९९३ पासून सिटी सर्व्हे कार्यालयाकडे पत्र व्यवहार चालू आहे. नुकतेच आठ-दहा दिवसापूर्वी रद्द करण्याबाबत एक काही दिलेले आहे. अद्याप ती ओपन स्पेसची जागा हँडवर्क करून दिली नाही. ले-आऊटला तात्पुरता मंजुरी दिली आहे. आजुबाजूला सर्व इमारतीस परवानगी देवून बांधकाम झालेली आहेत.

**मा. आयुक्त :** दोन बाबतीत हे उत्तर चुकीचे होऊ शकते. माझ्या गेल्या वर्षभरापासून सूचना आहे. पहिली बाब अशी की, मालकी व ताबा असल्याशिवाय अंदाजपत्रक तयार करावयाचे नाही. अंदाजपत्रक तयार करतांना संबंधित अधिकाऱ्यांनी काळजी घेतली नाही. ही चूक आहे. इतरांना कामाला लावतात ते काम करू नये असा त्याचा अर्थ होत नाही जरी तात्पुरती ले-आऊटला मंजुरी असेल तरी ती जागा ताब्यात असणे गरजेचे आहे. ती आपल्याकडे घ्यायला हवी. नुसता पत्रव्यवहार करून चालणार नाही. मी जेंव्हा येथे आयुक्त म्हणून रुजू झालो तेंव्हाच मी सक्त सूचना दिलेल्या होत्या. अंदाजपत्रक तयार करतांना काळजी घेणे आवशकय आहे. नंतर सर्वांचा गैरसमज होतो. अंदाजपत्रक तयार करतांना मालमत्ता अधिकारी उपआयुक्त (म) यांना माहिती देणे आवश्यक होते की, अमुक ठिकाणी असे काम करण्याचे प्रस्तावित आहे. निर्णय द्यावे. यानंतर या बाबत दखल घ्यावी अशा सक्त सूचना देण्यात येतात.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** मेहर भागातील किती लोक न्यायालयात गेले खुल्या जागेचा वाद न्यायालयात सुरू आहे.

**मा. सभापती :** ले-आऊट मध्ये किती प्लॉट होते. बांधकाम परवानगी देवून बांधकाम झालेले आहे का? खुली जागा मनपाच्या नावावर तर बांधकाम कसे केले?

**कनिष्ठ अभियंता (श्री. उमाळकर) :** रिझर्वेशनची जागा संबंधिताने मनपास हस्तांतर केली. ओपन स्पेसची केलेली नाही. दोन रस्त्याच्या जंक्शनवरील ती जागा आहे. मनपाच्या नावाने करण्यासाठी १९९३ पासून सीटी सर्व्हे ऑफिस मध्ये पत्र व्यवहार चालू आहे. पूर्वी पी.आर. कार्डवर रेखांकनातील खुली जागा अशी नोंद होती.

**मा. आयुक्त :** सहा. संचालक न. र. यांना माझ्या सूचना गेलेल्या आहे. एकतर ले-आऊट अंतीम करावा नसता रद्द करावा. या शिवाय दुसरा पर्याय नाही. यामुळे मालकाची समजूत अशी होते की, एका ठिकाणी दिलेली आहे. दुसऱ्या ठिकाणी देण्याची गरज नाही. याकडे दुर्लक्ष होते व तात्पुरती मंजुरी देता येणार नाही. अडचणीचे होते त्यासाठी ले-आऊट अंतीम करावा लागेल व ते अंतीम करीत असतांना रिझर्वेशन कोणत ओपन स्पेस कोणती हे निश्चित केले पाहिजे. त्या प्रमाणे जे काम दुरुसती आहे ती सीटी सर्व्हे कार्यालयाकडून करून घ्यावी लागेल. पत्रव्यवहार करून हे काम होणार नाही. उपआयुक्त (म) शहर अभियंता व सहा संचालक न. र. यांनी याबाबत कार्यवाही करावी. आणखी १-२ प्रकरणी समोर येण्याची शक्यता आहे. त्याबाबतीत लगेच काळजी घ्यावी.

**श्री. प्रल्हाद निमगांवर :** मेहरनगर भागातील लोक न्यायालयात गेलेले आहे. खुल्या जागेचा वाद न्यायालयात चालू आहे. माहिती द्यावी.

**विधी सल्लागार :** मेहरनगरच्या ले-आऊट संबंधीच्या मोकळ्या जागेबाबत संरक्षित भिंत बांधु नये असा वाद होता मालकी घोषित केलेली नाही. महानगरपालिकेस मुभा आहे. तेथे काम करण्यास काहीही हरकत नाही.

**मा. आयुक्त :** कॅव्हेट दाखल करावे. विधी सल्लागारांना सूचना आहे. न्यायालयात जाणारे कोणी व्यक्ती विचारून जात नसतात.

**मा. सभापती :** शहर अभियंता यांनी विधिसल्लागार यांचेकडे संचिका पाठवावी. त्या अभिप्रायानुसार जी काही विकास करायचा तो तात्काळ सुरू करावा. सहा.

संचालक नगररचना यांना सूचना की, १९७ नोटीसचे १५ प्रकरणे आहेत. त्यात ३ प्रकरणे वादग्रस्त आहे. खरेदी सूचना होत नाही. उर्वरित प्रकरणे मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेले आहेत. ३ कोणती प्रकरणे आहेत ज्या आरक्षण व्यपगत आले.

**श्रीमती शाहीन जफर :** औरंगपुरा सरस्वती भुवन शाळेसमोर तापडीयाने पार्कीगच्या जागेत बदल केलेला आहे. वापरात बदल झाल्यास त्या जागेच्या संदर्भातील नकाशाची प्रत मला आवश्यक आहे.

**मा. सभापती :** अर्ज द्यावा प्रत दिली जाईल.

**श्रीमती शाहीन जफर :** तसेच कोतवालपुरा, भागात डॉ. टेकवानी यांना बांधकाम परवानगी दिली त्यास विकास खर्च न आकारता परवानगी कशी दिली.

**मा. सभापती :** सभागृहाचा निर्णय होता तसा प्रस्ताव सभागृहासमोर आलेला होत. जे जुने बांधकाम होते तेवढ्या जागेवर बांधकाम क्षेत्रासाठी सवलत दिलेली होती.

**श्रीमती शाहीन जफर :** समर्थनगर भागातील श्री. सरनाईक यांचे प्लॉटवर जाण्यासाठी रस्ता नाही. मनपाच्या जागेचा वापर करतात. त्यासही बांधकाम करण्यास परवानगी दिली त्याचाही खुलासा करण्यात यावा.

**उपअभियंता (श्री. देशमुख) :** बरीच प्रकरणे आहेत. तपासून स. सदस्यांना लेखी माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती :** १२७ जी प्रकरण आहे. त्यातील ३ प्रकरणे लॅप्स झाली. त्याबाबत खुलासा करावा.

**सहा. संचालक न. र. :** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ ज्या ३ प्रकरणात नोटीस लॅप्स झाल्या (१) ईटखेडा येथील गट क्र. ८४.८६ (२) मुस्तफाबाद येथील आरक्षण क्र. ८,९ प्राथमिक शाळा व प्ले ग्राउंड (३) कांचनवाडी सर्व्हे क्र. ११ हे अशी ३ प्रकरणे आहेत. ज्या खरेदी सूचना लागे होत नाही. त्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्या खरेदी सूचना आता ज्या २००१ मध्ये विकास योजना मंजुरी झाली त्यातील ३ प्रकरणे आहेत. विकास योजना मंजूर होवून १० वर्षांचा कालावधी झाला नाही. त्यामुळे त्या तीन प्रकरणाला नोटीस लागू होत नाही.

**मा. सभापती :** डी. पी. प्लॅननुसार १० वर्षे झाल्यानंतर एकतर ते आरक्षण मनपाने ताब्यात घ्यावे. किंवा मालकाने नोटीस द्यावी. जागा ताब्यात घेऊ शकत नाही. परंतु मिळकत धारक जागा ताब्यात घेण्याबाबत नोटीस देत आहे. अशा प्रस्तावाबाबत सर्वसाधारण सभ्झेत निर्णय घेतलेला होता. ज्यास १० वर्षे होवून गेले त्यास शासनाकडून परवानगी घेवून वेळ मागविण्याबाबत तसा काही प्रस्ताव प्रशासनाने तयार केलेला आहेत का?

**सहा. संचालक न. र. :** विकास योजना अंमलबजावणी एक प्रोग्राम तयार करून मा. उच्च न्यायालयात मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने सादर केले आहे. आत जो प्रश्न उपस्थित केला त्याचा आढावा घेता येईल.

**मा. सभापती :** रिझर्वेशनचा कालावधी १० वर्षापर्यंत असतो. त्या मुदतीत जागा भूसंपादित केली नाही तर संबंधित मालक नोटीस देतात नसता रिझर्वेशन म्हणून डिलीट होते. त्यानुसार मनपाने अशा जागा किती त्याचे बुकलेट तयार केले होते. १००० कोटी रुपये खर्च लागणार असे नमूद होते. परंतु त्या बुकलेटमधील आवश्यक त्याच जमीनी ताब्यात घेऊ परंतु त्या रिझर्वेशनची मान्यता वाढवून घेण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव किंवा सुधारित काय प्लॅन

तयार होतो त्यानुसार तात्काळ कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु काहीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तात्काळ अशा कार्यवाहीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असे सुचित करण्यात येते. मा. आयुक्त सर्व पदाधिकारी यांचे बैठकीत एक संयुक्त असा निर्णय होऊन शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत सर्व साधारण सभेत निर्णय घेतलेला होता. तसा निर्णय मा. महापौरांनी त्या सभेत दिलेला होता त्यासही १ वर्ष झालेला आहे.

**सहा. संचालक न. र. :** १० वर्षाचा कालावधी झाल्यानंतर संबंधित मालक नोटीस देवू शकतात. परंतु रिझर्वेशनचा कालावधी ठरलेला नाही. एकदा ठेवण्यात आलेले रिझर्वेशन रिवाईज डेव्हलपमेंट प्लॅन मध्ये घेता येते. त्याची अंमलबजावणी नियोजन प्राधिकरणाने करावयास पाहिजे.

**मा. सभापती :** रिझर्वेशनचा कालावधी वाढवून द्यावा अशा शासनास प्रस्ताव पाठवावयास पाहिजे. परस्पर नियोजन प्राधिकरण हे करू शकणार नाही.

**मा. आयुक्त :** विकास योजना जो पर्यंत अंतिमरित्या मंजूर होतो. उदा. २००१ मध्ये झाले. जो पर्यंत तो प्लॅन रिवाईज व फायनल होत नाही. तो पर्यंत ते कायम रहाते असा सांगण्याचा प्रयत्न अधिकारी करीत आहे. १० वर्षे आरक्षण जमीनीवर विकास केला नाही तर १२७ नोटीस ४९ नोटीस देवून कार्यवाही होवू शकते की १० वर्षे संपले काहीही विकास झाला नाही माझी जागा मला परत द्यावी. जर सभापतीयांचे सांगण्यानुसार सर्वसाधारण सभेत तसा काही ठराव चर्चा झाली असेल ते पहावे लागेल. सभापतीच्या बोलण्याचा अर्थ असा निघतो की, कायद्यात आपणाला दुरुस्ती सुचवावी लागेल. कारण आरक्षण जागेवर विकास करण्यासाठी मनपास अधिक मुदत आवश्यक आहे. पॉजीट्युब विचार करावा व त्या काही सूचना सर्वसाधारण सभेत चर्चेच्या निमित्ताने होईल किंवा ठराव दिला असेल तो पाहण्यात यावा नसता प्रस्ताव तयार करावा लागेल. आरक्षण जरी बदलत नसेल परंतु मूळ मालकास नोटीस देण्याचा हक्क प्राप्त होतो.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** नगररचना विभागाच्या काही संचिका गहाळ आहे. असा त्या दिवशी विषय झालेला होता त्याची थोडक्यात माहिती देण्यात यावी. आम्ही सभागृहात उशीरा आलेलो आहे.

**मा. सभापती :** आता आपण येण्याअगोदर अधिकाऱ्यांनी खुलासा केला. अशी बरीच प्रकरणे आहेत. रेकॉर्ड तपासणीचे काम चालू आहे. अनावधानाने बोललो असा खुलासा केलेला आहे. वेळ लागणार मालमत्ता विभाग आणि नगररचना विभाग संयुक्तपणे तपासणी करून कार्यवाही करून अहवाल देतील. मा. आयुक्तांनी सुध्दा तशा सूचना दिलेल्या आहे.

**श्री. सावंत मधुकर :** या शहरात मनपाच्या मालमत्ता किती ठिकाणी आहेत. या इमारतीत आपण बसलो ही जागा सुध्दा मनपाची आहे की नाही शंका आहे. परवाच्या बैठकीत मुद्दा उपस्थित झाला वसंतभुवन ही इमारत मनपाच्या नावाने आहे का तसेच क्रांती चौक झोन ४ ची जागा त्या ठिकाणी लाखो रुपये खर्च करून पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत. त्या सुध्दा मनपाच्या नावाने आहे की नाही. खेदाने सांगावे लागते. मनपाच्या मालमत्ता सांभाळ करण्यासाठी एक क्लर्क काम पाहतो यासाठी अधिकारी नियुक्त करावे व ४ अभियंते नेमावे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** संपूर्ण जागेची माहिती अधिकाऱ्यांना असते. जे उत्तर दिले ते द्यावयास नको पाहिजे.

**मा. सभापती :** अनावधानाने बोलले चुका कबूल केली. संचिका तपासणीचे काम चालू आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** नाथ प्रांगणाच्या जागेची संचिका आहे की नाही. त्या संचिकेचा शोध घ्यावा. वृत्तपत्रात बातमी होती.

**मा. सभापती :** विशिष्ट अशी संचिका असेल तर शोध घेतला जाईल. उर्वरित संचिका रेकॉर्ड तपासणीचे काम चालू आहे. तपासणी झाल्यानंतर नेमकी कोणत्या संचिका गहाळ आहेत, आढळून येत नाही. त्याची संपूर्ण माहिती १५ दिवसात देण्याचे आदेश दिलेले आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** नगररचना विभागाचा कामाचा व्याप मोठा झालेला आहे. सभागृहात उत्तर देवू शकत नाही.

**मा. सभापती :** मालमत्ता विभागाचा प्रश्न उपस्थित केलेला होता. प्र. अधिकारी म्हणून श्री. रामटेके यांना चार्ज दिलेला आहे. तसेच उपआयुक्त (म) हे सुध्दा काम पाहतात. त्यामुळे तांत्रिक उपअभियंता वगैरे देण्याची आवश्यकता वाटत नाही असे माझे स्वतःचे मत आहे.

**श्री. सावंत मधुकर :** नगर रचना विभाग सक्षम करणे आवश्यक आहे. किमान एस. एल. आर. मध्ये नगरभूमापन विभागात मिळकत नावावर करून घेणे असा. ७-८ कर्मचाऱ्यांचा एक ग्रुप तयार करून हा विभाग सक्षम करावा. नियुक्ती करा अथवा करू नये. माझे काहीही म्हणणे नाही. बिल्डरांनी सर्व जागा हडप केलेल्या आहे. त्यासाठी ८-१० कर्मचाऱ्यांची टीम तयार करून कामाची जबाबदारी सोपविण्यात यावी. जागा नांवावर करणे. पी.आर. बनविणे मनपाची मालमत्ता मनपाच्या ताब्यात असावी.

**श्री. संजय शिरसाठ :** साजेद प्रकरणे सर्वांना माहिती आहे. तो या मनपाचा एक कर्मचारी होता. त्यानंतर बिल्डर झाला. मनपाच्या एकूण ६ प्रकरणात त्यांनी परवानगी घेतलेली होती. त्या संचिका मनपात सापडत नाही. याबाबत शासनास सुध्दा माहिती पाठविली त्या संचिका सापडल्या का नसतील तर कोणावर कार्यवाही प्रस्तावित केलेली आहेत का?

**सहा. संचालक न. र. :** साजेद प्रकरणाच्या संचिका बाबत रेकॉर्ड विभागात तपासणी करण्याचे काम चालू आहे.

**मा. आयुक्त :** तपासणी दिर्घकाळ चालू राहील. मदतीला पोलिस विभाग सुध्दा आहे. उपआयुक्त (प्र) हे सुध्दा काम पाहत आहे.

**शाहीन जफर :** पोलिस विभागाकडून जो पोलिस कर्मचारी दिले त्याचे बदल्या करण्याबाबत कार्यवाही करणार होते. अद्याप बदल्या केलेल्या नाहीत.

**मा. आयुक्त :** कार्यवाही चालू आहे. पोलिस आयुक्त यांना मागणी केलेली आहे.

**उपआयुक्त (प्र) :** साजेद बिल्डर्सच्या बांधकामाच्या ज्या संचिका आहे. त्या जवळ २७ प्रकरणाची यादी ॲन्टी करप्शन कार्यालयाकडून मनपास प्राप्त झाली. ५ प्रकरणाची माहिती दिलेली आहे. उर्वरीत प्रकरणाची तपासणीची कार्यवाही ॲन्टी करप्शन डिपार्टमेंट मार्फत चालू आहे. मनपाच्या अभिलेख विभागामध्ये याबाबत जो एक संचिकेचा एका कर्मचाऱ्यांनी जो घोळ केलेला आहे. त्या कर्मचाऱ्यास निलंबीतही करण्यात आले होते. बाकीच्या संचिकेचा तपास चालू आहे. नगररचना विभागाकडून अभिलेख विभागात ज्या कर्मचाऱ्यांनी संचिका दिलेल्या आहेत. त्याचा पाठपुरावा करून त्यामध्ये जे

जे दोषी असतील त्यांची नावे प्रशासनाने मागविलेले आहे व संचिकेची पूर्ण कार्यवाही करून दिली नाही तर त्यांचेवर कार्यवाही प्रस्तावित होईल. ॲन्टी करप्शन डिपार्टमेंटची स्वतंत्र कार्यवाही करीत आहे.

**श्री. शिरसाठ संजय :** हे सविस्तर उत्तर होवू शकत नाही. ॲन्टी करप्शन विभागाने मनपास कळविले की २७ संचिकेची माहिती द्यावी. सभागृह किवा स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा द्यायला प्रशासनाला नकोसा वाटतो. साजेद प्रकरणात सर्वसाधारण सभेत स्थायी समिती सभेत चर्चा झाली. आजही गंभीर प्रकरण असतांना संचिकेचा शोध घेणे चालू आहे. ज्या कर्मचाऱ्यांकडे त्या संचिका होत्या त्यांचा मृत्यू झाला परंतु अधिकाऱ्यांनी त्यांचेवर पोलिसात गुन्हा दाखल करावा असे संचिकेत नमूद केले. अशी माझी माहिती आहे एका बिल्डरला पाठीशी घालण्यासाठी मृत्यू झालेल्या व्यक्तीवर गुन्हा दाखल होवू शकतो का? महानगरपालिकेच्या जागेसंबंधी जे काही बोलले जातात परंतु यास सर्वस्वी अधिकारी जबाबदार आहे. यात नगरसेवकांची बदनामी होते. जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेशित करावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** दि. २९-०७-२००४ रोजीची सभा प्रशासकीय विभाग व नगररचना विभागाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली होती. माहिती मिळत नाही. म्हणून सभा तहकूब करण्यात आली. २ तारखेला सभा आयोजित करावी म्हणून आपण निदेर्श दिले म्हणून आज सभा घेत आहोत व सर्व माहितीनिशी सभागृहात येण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश होते. परंतु अशी परिस्थिती असेल तर हे कामकाज करण्यात व वेळ घालविण्यात अर्थ नाही. मा. आयुक्तांनी खुलासा करते वेळेस सुचित केले की, एकत्रित व सार्वजनिक निर्णय घेण्याच्या दृष्टीने निर्णय घेतला पाहिजे काम करण्याची पध्दत सुधारली पाहिजे. त्यांचे मताशी मी सहमत आहे. नगररचना विभाग हा जबाबदार विभाग आहे. त्यांचे मार्फतच मालमत्ता विभागाकडे मालमत्ता हस्तांतर होतात. मालमत्ता वाढ झाली की, कर रक्कमेत वाढ होते व जकात नंतर मालमत्ता कर हे उत्पन्नाचे साधन आहे. त्यासाठी मनपा प्रशासन पदाधिकारी व सभागृहाने याबाबतीत वसुली जास्तीत जास्त होण्याच्या अडचण निर्माण होणार नाही असे वाटते. जकात व मालमत्ता कर याचेही विषयी हा विषय येतो. नगररचना विभागात कामाच्या बाबत जी काही दिरंगाई होत आहे. त्याबाबत जबाबदारी फिक्स करण्यासाची गरज आहे. असे माझे मत आहे. विभाग प्रमुख म्हणून सहाय्यक संचालक नगररचना असल्यामुळे त्यांचीच जबाबदारी आहे. जास्तीच्या कामामुळे कार्यवाही करण्यास त्यांना वेळ कदाचित मिळत नसेल. यापूर्वी मा. आयुक्तांनीच सर्वसाधारण सभेत मत व्यक्त केले होते की, सहा संचालक नगर रचना ह्या पदावर शासनाचेच अधिकारी असणे आवश्यक आहे. त्यांना कामाचा अनुभव असतो. पदवी संपादन केलेली असते. म्हणून अशा अधिकाऱ्याची मनपास आवश्यकता असते. सहा. संचालक नगररचना हे पद शासनाकडून मागविलेले आहे. माझ्यामते या शहराचा पाहता विकास जमीन भूसंपादन करणे, रिझर्वेशनचे प्रपोजल मंजूर करणे, ह्या सर्व बाबी अत्यंत व्यापक झालेल्या आहेत. नगरपालिकेपासून ते महानगरपालिकेच्या कार्यकाळापर्यंत संपूर्ण, संचिका रेकॉर्ड बघणे कठीण झालेले आहे. कायद्यामध्ये तरतूद आहे व कोणाकडून कोणते काम करायचे ते संपूर्ण

अधिकार मा. आयुक्तांचे आहेत. कामाची विभागणी झाली, व सहा. संचालक नगर रचना यांचेकडे फक्त ५०% जे भूसंपादनाचीच प्रकरणे हाताळणेचे काम दिले तर कामाबाबती येईल. याबाबत आयुक्त साहेबांशी चर्चा करून आपण निर्णय घ्यावा. दुसरी बाब निदर्शनास आणून देतो की, वेगवेगळ्या परिस्थितीत जेंव्हा त्वरीत काम करण्याची गरज असते. नगररचना विभागाकडून दिरंगाई होते. मा. आयुक्त यांनी जाधववाडी भागात विकास कामे करण्याचे कार्यकारी अभियंता आदेशित केलेले होते. सहा. संचालक नगररचना यांना सुध्दा विकास कामास अडथळा येणार नाही यासाठी आपण मदत करावी व जे अधिकार दिले त्याचा वापर करून जागेची मोजणी करून घ्यावी. कामे थांबविण्याची गरज नाही असे आदेश केलेले होते. परंतु अद्यापही नगररचना विभागाने संबंधित मालक सर्व्हे क्र. १५६,१५८ या संदर्भात कोणतीच कार्यवाही केलेली नाही. कामे करण्याची गरज आहे. आचार संहितेमुळे अडचण होऊ नये म्हणून सूचना दिलेल्या होत्या त्याची अंमलबजावणी सुध्दा झालेली नाही. एक महिन्यापूर्वीच सांगितलेले होते. ज्या ज्या १०-१५ वर्षापूर्वी जमीनी आरखित केलेल्या आहेत त्याची पर्चेस नोटीस दिल्यानंतर सुध्दा दखल घेतली जात नाही. म्हणून सर्व बाबी विचारात घेऊन काम विभागाने देण्याच्या दृष्टीने बांधकाम परवानगी व इतर काम शहर अभियंता यांचे मार्फत किंवा मा. आयुक्तांना जसे सोयीस्कर वाटेल त्यांचेकडे देण्यात यावे असे आपण आदेशित करावे.

**मा. सभापती :** सहा. संचालक नगररचना यांना सूचना की, दिनांक २१-०४-२००४ रोजी जेंव्हा मी बैठक घेतली तेंव्हा पुणे महानगरपालिकेत बां. प. देण्या संदर्भात तातडीन परवानगी देण्याची पध्दत आहे. त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत बांधकाम परवानगीची पध्दत सुरू करावी म्हणून मी सूचना केलेल्या होत्या. अद्याप कार्यवाही केलेली नाही. तसेच जनता दरबार मा. महापौरांचे अध्यक्षतेखाली घेण्याबाबत याच सभागृहात निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानंतर एक खिडकी योजना सुरू झालेली होती. पुणे मनपात कास्ट ट्रॅक सिस्टीम आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** काही उपाय योजना सुचविल्या तरी अधिकारी तसे करण्याच्या तयारीत नाही. सभागृहाची तीव्र भावना असेल त्यासाठी या विभागाचे काम विभागून द्यावे व या विभागाच्या चर्चेला पूर्ण विराम द्यावा. एकाच विषयावर चार-चार तास चर्चा करणे योग्य नाही. निर्णय अपेक्षित आहे.

**मा. सभापती :** निमसरकारी कार्यालय असेल, केंद्र शासनाचे असेल, सरकारी कार्यालय असेल त्यांनी मनपाची बांधकाम परवानगी घेणे आवश्यक आहे. शासनाचे इतर विभागाचे जे बांधकाम सुरू असतील जसे एम. एस. ई. बी. इन्कम टॅक्स विभाग, टेलिफोन विभाग, म्हाडा इ. असेल परवानगीसाठी येत नाही. सर्रास बांधकामे सुरू आहेत. मनपाचा महसूल बुडतो. विमानतळावर गेल्यावर आम्हाला विचारणा होते. त्यांना सुध्दा परवानगीची आवश्यकता आहे का? असे किती विभाग व कार्यालयाने मनपाकडून बांधकाम परवानगी घेवून कार्यवाही करणे कायद्यानुसार आवश्यक आहे. त्याचा अहवाल देण्याच्या सूचना केल्या होत्या.

**सहा. संचालक न. र. :** अशा प्रकरणात शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच केंद्र शासनाचे कार्यालये यांनी एम.आर.टी.पी. ॲक्ट कलम ५८ नुसार एक महिना आगोदर महानगरपालिकेस कळविणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** असे बांधकाम होत असतांना नगर रचना व प्रशासकी अधिकारी या दोन्ही विभागंनी बघितलेले नाही. काहीही कार्यवाही केलेली नाही. एखाद्या विभागचे बांधकाम चालू असेल परवानगी घेतली नसेल असे निदर्शनास आले तर त्या विभागास पत्र देवून कळविणे आवश्यक होते. एप्रिल महिन्यात मी सूचना केलेल्या होत्या. आजपर्यंत तपशील देत नाही खेद वाटतो.

**सहा. संचालक न. र. :** या विभागाची जबाबदारी परवानगी देण्याची आहे. प्रशासकीय विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

**मा. सभापती :** २१-०४-२००४ रोजी नगर रचना विभागासंबंधी जेंव्हा मी बैठक घेतली तेंव्हाच सूचना दिलेल्या होत्या. पाच महिने झाले. सभापतीच्या अमुक सूचना आहेत. प्रशासकीय विभागास कळविलेले आहे का? जबाबदारी झटकून टाकतात हे बरोबर नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सहा. संचालक न. र. यांना कितीही सूचना व कालावधी दिला तरी संपूर्ण काम होणे शक्यच नाही. आणखी एक बाब आपल्या निदर्शनास आणून देतो की, या शहराला लागूनच जाधववाडी परिसरात जी कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. त्यांचे जवळपास ६०७० कोटीचे कामे तेथे झालेली आहेत. त्यांचेच बाजुला १०X१० रामेश्वर जाधव यांनी परवानगी घेतली नाही तर पाडण्यात आले. आपण प्रत्यक्ष भेट दिली. डाव्या बाजुचे बांधकाम का निदर्शनास आले नाही. कृषी उत्पन्न बाजार समितीचे बांधकाम चालू आहे. नगररचना यांनी प्रशासकीय विभागाला तात्काळ पत्र द्यावे की, अमुक कार्यालयाने परवानगी घेतलेली आहे. ज्या कार्यालयाची परवानगी नाही ते ही कळवावे यादी घ्यावी. परवानगी असेल तर बांधकाम करण्यास हरकत नसावी.

**सहा. संचालक न. र. :** प्रशासकीय विभाग उपआयुक्त (म) यांचे अंतर्गत येतो.

**मा. आयुक्त :** वारंवार अशी चर्चा होवू नये म्हणून एम.आर. टी. पी. व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम या कायद्यानुसार पूर्ण माहिती घेवून मी आदेश दिलेले आहेत. त्यास अनुसरूनच कृपया या सभागृहाला उत्तर द्यावे. सहा. संचालक नगर रचना यांचे अधिनस्त जे उपअभियंता आहेत. त्याना प्लींथ पासून जबाबदारी दिलेली आहे. उपआयुक्त (म) पाहतील असे, सहा संचालक नगररचना आढावा घेवून त्याचा अहवाल काही वेळा माझ्यापर्यंत आलेला आहे. सहा. संचालक नगररचना यांना लेखी आदेश दिले. सर्व कर्मचारी या सभागृहात ओ. त्या आदेशाला धरूनच प्रशासकीय अधिकारी उपआयुक्तांनी उत्तर दिले पाहिजे. दुसरा मुद्दा असा की, शासकीय निमशासकीय किंवा केंद्र शासनाची इमारत असो प्लॅनिंग ऑथर्टी मनपा आहे. होत असलेले बांधकाम तपासण्याचे अधिकार आहेत. समारेच्या व्यक्तीने आपल्या नियमानुसार बांधकामा संदर्भात समाधान करावे. डिझाईन बरोबर आहे की नाही हे विभागाने तपासावे. १ महिन्यापूर्वी त्यांनी कळविले की नाही हे प्रशासकीय विभागाने पहावे. हे काम पाहतील असे म्हणून असे चालणार नाही हे उत्तर वेगळे होईल. कोणी काय काय करायचे याबाबत मी आदेश काढलेले आहे. वर्तमानपत्रात सुध्दा त्यांची प्रसिध्द झालेली आहे. त्यात

नगररचना व प्रशासकीय अधिकारी सुध्दा जबाबदार राहतील. त्या आदेशाच्या आधारेच या सभागृहात किंवा सर्वसाधारण सभेत उत्तर अधिकाऱ्यांनी देणे आवश्यक आहे. पूर्ण अभ्यास करूनच चे आदेश पारीत केलेले आहेत. त्याचा विचार करावयाचा झाल्यास केंद्र शासन असेल, राज्य शासन निमशासकीय संस्थेचे कार्यालय किंवा इतर इमारतींचे बांधकाम चालू असेल तर त्याची चौकशी करण्याचा अधिकार सहा. संचालक नगररचना व त्यांचे अंतर्गत येणारे सर्व अधिकारी यांना आहे. कारण माझ्या आदेशात प्लींथ पासून तपासणी करावे असे म्हटलेले आहे. येथे चर्चा होते तेंव्हा उत्तर देतात वेळ कमी पडतो. दुपारपर्यंत बाहेरील (साईटवरील) व दुपारी ३.०० वाजेपासून ६.०० वाजेपर्यंत कार्यालयात बसून काम करता येईल व अंतर्गत भाग आहे. परंतु बांधकाम परवानगी देणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयात बसून परवानगी देणे किंवा न देणे मर्यादित नाही. लेखी आदेश माझे झालेले आहे. कृपया करून ह्या पध्दतीने सहा. संचालक नगररचना यांनी उत्तर द्यावे.

**श्री. भगवान रगडे :** एम.आय.डी.सी. भागात मोठमोठ्या इमारती तयार होत आहेत. परस्पर विक्री होत आहे. रहिवाशी क्षेत्रासाठी ती जागा आहे की काय हे सुध्दा तपासण्याची गरज आहे. मोठमोठ्या इमारती होवून दुकाने काढण्यात आली. त्या भागात परवानगी मनपा मार्फत दिली जाते का? त्या भागात अे. पी. आय. कंपनी आहे एन-१ चा भाग येतो गरवारे स्टेडीयम आहे. त्या बाजुलाच मोठमोठ्या इमारती आहेत. सविस्तर खुलासा करावा.

**मा. सभापती :** आताच मा. आयुक्तांनी खुलासा केला. प्लानिंग ॲथॉरिटी महानगरपालिका आहे. चौकशी करण्याचे अधिकार आहे. त्यानुसार चौकशी करावी. प्रशासकीय विभाग वनगररचना विभागाने सयुंक्तरित्या कार्यवाही करणे आवश्यक आहे. विशिष्ट असे एखादे प्रकरणे असेल तर त्याबाबत उल्लेख करावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** स. सदस्यांचे मत आपण जाणून घ्यावे मर्यादित मुद्दा घेवूनच चर्चा करीत आहोत. स. सदस्यांनी जो प्रश्न विचारला तेवढाचा खुलासा अपेक्षित आहे. एम.आय.डी.सी. चिकलठाणा अे.पी.आय. कंपनी आहे. त्या कंपनीत जवळपास २००० कर्मचारी काम करीत होते. ती कंपनी बंद पाडण्याचे षडयंत्र व त्या जागेवर बांधकाम होवून व्यापारीकरण करण्याचे काम झालेले आहे. कर्मचाऱ्यांना नोकरी सोडावी लागली. बेरोजगार व्हावे लागले. त्या कंपनीच्या जागेवर कमर्शियल मार्केट बांधकाम झाले व झालेले बांधकाम हे मनपाच्या पाणीपुरवठा लाईन, ड्रेनेज लाईन, रस्त्यावर बांधण्यात आले त्या खर्चापोटी काही चार्जेस मनपाने घेतलेले आहेत का? त्याबाबतची संचिका मनपाकडे सादर झालेली होती का? त्या भागात शासनाने परवानगी दिली असेल किंवा नसेल तो भाग वेगळा आहे. मनपास या बाबतीत कोणते अधिकार वापरता येत होते. तशी परवानगी दिलेली आहेत का?

**सहा. संचालक न. र. :** एम. आय. डी. सी. भागात परवानगी देण्याचे अधिकार एम.आय.डी.सी. विभागालाच आहे.

**मा. सभापती :** परवानगी देण्याचे अधिकार नसेल तरी ज्या मनपा मुलभूत सुविधा देते अशा उदा. पाणीपुरवठा लाईन ड्रेनेज यावर बांधकाम होत असेल तर किंवा रचना असेल तर परवानगी घेणे आवश्यक आहे की नाही. एम. आर. टी. पी. ॲक्ट नुसार काय तरतूद आहे. खुलासा करावा.

**सहा. संचालक न. र. :** परवानगी देण्याचे अधिकार एम.आय. डी. सी. लाच आहे चार्जेस वगैरे घेणे हे प्रशासनाचे काम आहे. नगररचना विभाग संबंधित येत नाही.

**मा. सभापती :** मा. सभापतींच्या परवानगी ने बोलतो हे प्रकरण सादर झाले नसेल तर सादर करावे. या मुलभूत सुविधा ज्या कंपन्या वापरते त्यांनी मनपाची एन. ओ. सी. घेणे आवश्यक आहे. या सदंर्भात संबंधित एम.आय. डी. सी. चे अधिकारी यांचेशी चर्चा करून पत्र व्यहार करून कार्यवाही करू शकतो. मनपाचा काही संबंध नाही असे म्हटले तर उद्या त्या जागेचा काही वापर होवू शकेल जे उत्तर अधिकारी देतात. त्यानुसार उदा. देतो एम. आय. डी. सी. ने मला एखादा भूखंड दिला तो देण्यापुरता अधिकार आहे. परंतु इतर मुलभूत सुविधा देण्यासंदर्भात ज्या ज्या तरतुदी केलेल्या आहे. उदा. पाणी वापर होते, ड्रेनेज वापर होतो. रस्ता वापर होतो. त्यामुळे निश्चितच मनपाचा संबंध आहे. प्लँनिंग ॲथॉरिटी म्हणून नगररचना विभागाचा संबंध येणारच नगररचना विभागाचे अधिकारी यांना अडचण असेल तर संचिका माझ्याकडे सादर करावी. निर्णय घेता येईल.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** सहा. संचालक नगररचना यांचेंकडे कामाचा व्याप वाढलेला आहे. उत्तरे देत नाही ते सांगतात संबंध येत नाही. मा. आयुक्तांनी खुलासा केला. नगररचना विभागाकडील नगररचना अधिकारी यांना फक्त जागा भूसंपादनाचे कामे द्यावी असे माझे मत आहे. तरच कामे वेळेवर होतील अशी अपेक्षा वाटते.

**मा. सभापती :** पुन्हा एकदा विचारणा करून निर्णय घेता येईल पुणे महानगरपालिकेमध्ये फॉस्ट ट्रॅकास्टीम आहे. माझ्या समाधानासाठी तेवढा खुलासा करावा.

**सहा. संचालक न. र. :** याबाबत माहिती मागविण्यात आलेली आहे. ती माहिती आलेली आहे. सद्यःस्थितीत बांधकाम परवानगी प्रकरण एकही प्रलंबित नाही. त्यामुळे त्या सिस्टिमची आवश्यकता वाटत नाही हे माझे स्पष्ट मत आहे.

**मा. सभापती :** पुणे मनपात ही सिस्टीम का लागू केली त्यांचेकडे प्रकरणे प्रलंबित होते. म्हणून लागू केली काय? चुकीचा खुलासा करू नये. जी सिस्टिम पध्दत जाणून घेऊन या मनपामध्ये राबविता येईल का, या उद्देशाने मुद्दा उपस्थित केलेला होता.

**श्री. ईलियास किरमाणी :** सेल्फ डेव्हलपमेंटची कामे दिली जातात. परंतु १ वर्षात रस्ते खराब होतात. पुन्हा तो रस्ता दुरुस्त करावा म्हणून मनपाकडे मागणी होते. त्यासाठी त्या काम करणाऱ्या ठेकेदाराची सेक्युरिटी डिपॉझिट काय असते. गॅरंटी काय असते माझ्या मते असे नियम करावे कीमान ५ वर्ष सिक्युरिटी डीपॉझिट जमा असावे. आलेल्या कामाची क्वॉलिटीची तपासणी करणे शहर अभियंता यांनी प्रमाणित करावी.

**मा. सभापती :** जसे मनपाची जी कामे चालतात त्यावर मनपाचे अधिकारी जसे एम. बी. रेकॉर्ड ठेवतात, कार्यकारी अभियंता यांचे ५% तपासणी तसेच उपअभियंता यांचे १००% तपासणी करतात जे अंदाजपत्रक असेल त्यास सुध्दा सक्षम सभागृहासमोर सादर करून मान्यता घेवून त्यानंतरच तो काम झाले पाहिजे. सेक्युरिटी डिपॉझिट किमान ५% तरी असावी असे. स. सदस्यांचे मत आहे. एका कालावधीनंतर परत करावे.

**मा. आयुक्त :** या संदर्भात श्री. सोनी शहर अभियंता यांनी खुलासा करणे आवश्यक आहे. काही टक्के सेक्युरिटी डिपॉझिट घ्यावी व संपूर्ण विभागाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्रांवर पुढील कार्यवाही करावी अशी सूचना आहे.

**शहर अभियंता :** सेल्फ डेव्हलपमेंट मध्ये ले-आऊट मंजूर होतो. स्वतः मालक डेव्हलप करून मनपास हस्तांतर करतो ले-आऊट मंजूर झाल्यानंतर चारही कार्यकारी अभियंताकडे प्लॅन येतात. आम्ही अंदाजपत्रकेही योग्य स्पेसिफिकेशनस प्रमाणेच देतो. त्यासाठी ५% चार्ज सुध्दा करण्यात येतो. चार्जेस भरल्यानंतर परवानगी देतो व काम चालू असतांना सर्व सूचना दिल्या जातात की केंव्हा काम होणार त्याबाबत कळवावे ५% जेंव्हा आपण फिस घेतो तेंव्हा मनपाचे काम चालू असतांना नियंत्रण असतेच प्रत्येक विभागाचे कार्यकारी अभियंता उपअभियंता व इतर खालचे अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट देवून मनपाने मान्यता दिल्यानुसार काम होते की नाही हे तपासून घेणे आवश्यक असते. तपासणी केली जाते परंतु स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला १ वर्षात रस्ता खराब होतो. रस्ता खराब होण्यामागे कारण असे की सेल्प डेव्हलपमेंटचे काम केल्याशिवाय परवानगी देत नाही. सेल्फ डेव्हलपमेंट काम पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र घेतल्यावर बांधकाम परवानगी मिळते. ज्यावेळेस इमारतीचे बांधकाम होते तेंव्हा त्या रस्त्यावरून साहित्य खडी, रेती सिमेंट ने-आण करताना रस्ता खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी माझे स्वतः एक सबमीशन आहे की, ज्या ज्या ठिकाणी विकास होतो तेथे किमान ५०-६०-७०% विकास झाल्यानंतर त्या रस्त्यावर डांबरीकरण करून द्यावे. त्यामुळे रस्ता खराब होण्याचा प्रकार होणार नाही व डांबरीकरणाची रक्कम अनामत म्हणून ठेवावी.

**मा. सभापती :** कामाची जशी मनपाकडे नोंद असते तसाच प्रकारची सेल्फ डेव्हलपमेंटच्या कामाची तारीख वाईज नोंद असावयास पाहिजे. हस्तांतरण करीत असतांना संपूर्ण रेकॉर्ड मनपाकडे असणे आवश्यक आहे. असे माझे मत आहे. त्या पध्दतीने रेकॉर्ड ठेवले जात नाही. कार्यवाही व्हावी अशी स. सदस्यांची मागणी आहे.

**शहर अभियंता :** त्या पध्दतीने नोंद ठेवता येईल परंतु जो डेव्हलपर आहे व आर्कीटेक्टकडून तयार होणार नकाशे वगैरे सर्व कागदपत्र मनपाकडे सादर होणे आवश्यक आहेत. आपणाला करता येईल परंतु स्टाफ चा प्रश्न येईल.

**मा. सभापती :** मनपाची जी कामे होतात. त्या बाबतीत संबंधित विभागाचे मनपाचे इंजिनियर रेकॉर्ड ठेवतात त्याप्रमाणे सेल्फ डेव्हलपमेंटच्या कामाच्या बाबत सुध्दा त्यांचे आर्कीटेक्ट किंवा कागदपत्रावर अवलंबून न राहता जसे आपण ५% चार्जेस घेतो. पाईप लाईनचा प्रश्न असेल किंती पाईप लाईन टाकली कोणी पाईप किती व्यासाची टाकले, शिवाय जे पाईप वापरले त्यांचे रेकॉर्ड सुध्दा मनपाकडे असणे आवश्यक आहे. किंवा ड्रेनेज करिता विशिष्ट पाईप वापर केले असतील ते कोणत्या कंपनीचे आय. एस. आय. मार्कचे आहेत का? ५% चार्जेस घेतोच मनपाचे इंजिनिअरला त्या त्या भागात कामे असतात. आणखी एखादे काम वाढवून तपासणी करून घेत जातील संपूर्ण रेकॉर्ड मनपाकडे असावे.

**शहर अभियंता :** ह्या पध्दतीने नोंद ठेवता येईल. परंतु कर्मचारी वर्ग कमी पडेल. ही अडचण आहे.

**मा. सभापती :** पैठण रस्त्यावरील उड्डाणपूल शासनाने एकतर्फी मनपाकडे हस्तांतरण केला. भविष्यात घटना घडल्यास त्याबाबतचे काही रेकॉर्ड मनपाकडे नाही. अशा प्रसंगी काय करणार. आणखी काही काम करण्याची गरज पडल्यास कसे करणार म्हणून कोणत्या ही कामाचे रेकॉर्ड असणे अधिक सुलभ असते.

**शहर अभियंता :** ऑलरेडी त्या विभागाकडे याबाबत रेकॉर्ड आहे.

**मा. सभापती :** उदा. दिले एखादे ले-आऊट मंजूर केला तो हस्तांतरण केल्यानंतर काही विकास काम करण्याची गरज पडल्यास तेंव्हा मनपास हे रेकॉर्ड महत्वपूर्ण व मार्गदर्शन ठरेल असे माझे मत आहे. संबंधित आर्कीटेक्ट रेकॉर्ड दिल्यानंतर सुध्दा त्या कामाचा विकास कामाचे मनपाच्या रेकॉर्ड विभागाने सुध्दा त्या कामाचा विकास कामाचे मनपाच्या रेकॉर्ड विभागाने सुध्दा रेकॉर्ड ठेवणे गरजेचे आहे. राहिला मुद्दा कर्मचाऱ्यांचा. आहे त्याच कर्मचाऱ्यांकडून काम करावे. एखाद्या भागात दोन कामे चालू आहे. ड्रेनेज लाईन असेल, उद्यान असेल ते दोन्ही तपासणी एकदाच होऊ शकते. त्याची नोंद एका वेगळ्या रजिस्टरमध्ये नोंद करून जेंव्हा प्रमाणपत्र देण्यात येते तेंव्हा ते रेकॉर्ड त्या संचिकेला असावे.

**शहर अभियंता :** याबाबतीत माझी सम्मती आहे. मनपाचे रेकॉर्ड असणे आवश्यक आहे. कन्ट्रक्शन होत असतांना त्या मालकाच्या आर्कीटेक्ट कडून सुध्दा संपूर्ण कागदपत्र सादर होणे आवश्यक आहे. त्यामुळे रेकॉर्ड ठेवणे कठीण होणार नाही. विभागामार्फत जी तपासणी होते ते त्यांनी स्पेसिफिकेशन दिलेले असते. रस्ता असेल, ड्रेनेज लाईन इतकी आहे, याचे रेकॉर्ड घेत नाही.

**मा. आयुक्त :** असे असेल तर विभागाच्या तपासणीला अर्थच नाही. एखाद्या व्यक्तीला सेल्फ डेव्हलपमेंटचे काम दिले. त्यास १६-१८ महिने मुदत दिली. त्या कालावधीत तारीखवाईज त्यांनी काय काम केले हे प्रत्येक विभागाने ज्याचे त्यांची नोंद असणे आवश्यक आहे. एवढ्या प्रमाणात या स्टेजला काम तपासले पाहिजे. तपासणी होते. नोंद नाही तर तपासून न तपासून अर्थ काय?

**शहर अभियंता :** तपासणी होत होती परंतु रेकॉर्ड ठेवत नव्हते.

**मा. आयुक्त :** एखादा रस्ता स्पेसिफिकेशन नुसार झाला त्यानंतर भविष्यात काम करण्याची वेळ आली तर किती वेळा त्याचे काम झाले व काय अडचणी निर्माण झाल्या होत्या याचे रेकॉर्ड नसेल तर तपासणीला काहीच अर्थ नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शंका निर्माण होते. रेकॉर्ड ठेवायचे म्हणजे रस्त्याच्या कामास सुरुवात झाली तर रस्ता पूर्ण होईपर्यंत रेकॉर्ड की कायमस्वरुपी रेकॉर्डचा खुलासा करावा.

**श्री. ईलियास किरमाणी :** सेक्युरिटी डिपॉझिट एक वर्षानंतर परत करतो. त्यात वाढ करावी तीन वर्षे ठेवावे. जेणे करून काम व्यवस्थित होईल. कामाची प्रत चांगली असेल. हा गंभीर प्रश्न आहे. नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. होणारा विकास चांगल्या प्रतीचा व्हावा हीच माझी मागणी आहे. बोगस कामामुळे वारंवार तीच ती कामे करण्याची गरज पडते. इतर विकास ठप्प राहतो.

**मा. सभापती :** त्या त्या विभागाचे कार्यकारी अभियंता कामाची तपासणी करतात. काम योग्य झाले म्हणून प्रमाणपत्र दिल्या जाते. त्यानंतर सेक्युरिटी डिपॉझिट जास्त दिवस ठेवण्याचा प्रश्नच येत नाही. कायद्यातील तरतूदीप्रमाणे मा. आयुक्तांनी याबाबत निर्णय द्यावा.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** गादीया विहारचे १४ वर्षापूर्वी बांधकाम झालेले आहे. अद्ययावत तेथे डांबरीकरण नाही.

**मा. सभापती :** सेल्फ डेव्हलपमेंट बाबत कमिटी नियुक्त केली. अहवाल झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल १४ वर्ष त्रास सहन केला. मनपाच्या वतीने जेंव्हा कामे होतात ३% सेक्युरिटी डिपॉझिट ठेवण्यात येते व अंदाजपत्रक जास्त असेल तर ५% ठेवतो. यापेक्षा जास्त सेक्युरिटी डिपॉझिट ठेवण्याची तरतूद ॲक्टनुसार आहे का?

**सहा. संचालक न.र. :** सेल्फ डेव्हलपमेंट ले-आऊटला परवानगी देतो.

**मा. आयुक्त :** सेल्फ डेव्हलपमेंट हा मुद्दा नगर रचना विभागाशी संबंधित आहे. विकास मनपाने करायचा की स्वतः मालकाने करायचा ही नगररचना विभागाची पॉलिसी आहे. अमुक ही कामे संबंधित व्यक्तीने करावी. मनपाने करायची नाही. तर दुसऱ्याने केल्यावर त्यांची गॅरंटी काय हा मुळ प्रश्न उपस्थित झालेला आहे.

**सहा. संचालक न. र. :** सेल्फ डेव्हलपमेंट परवानगी देतांना भूखंड गॅरटी म्हणून ठेवतो किंवा बॅंक गॅरटी ठेवतो व जेंव्हा कामाचे पूर्णत्वाचे प्रमापणत्र दिल्याचे कार्यकारी अभियंत्याकडून प्रमाणपत्र आल्यानंतर ले-आऊटला अंतीम मान्यता देण्यात येते. त्यानंतर जी गॅरंटी आहे ती रिलीज करण्यात येते.

**श्री. इलियास किरमाणी :** ९०% लोक बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेत नाहीत.

**श्री. मधुकर सावंत :** तातडीची कामे म्हणून कलम ६७ (३) (क) अंतर्गत केलेल्या कामांची सभागृहात माहिती द्यावयास पाहिजे अशी माहिती सभागृहाला किती वेळा दिली. दिली नसेल तर का दिली नाही. खुलासा करावा.

**मा. सभापती :** नगर रचना विभागाच्या संबधित हा प्रश्न नसल्यामुळे रेग्युलर सभेत प्रश्न उपस्थित करावा.

**श्री. इलियास किरमाणी :** ज्या ज्या लोकांनी / बिल्डरांनी बांधकाम परवानगी घेतली. प्लॅट तयार केले. विक्री केले. कम्प्लीशन प्रमाणपत्र घेतले नाही. त्यामुळे मनपाचा कर बुडतो. अशा लोकांच्या बाबतीत प्रशासनाने काय कार्यवाही सुरू केलेली आहे.

**मा. सभापती :** या बाबत २६-०७-२००४ च्या बैठकीत समिती गठीत केलेली आहे. अहवाल येईल तेंव्हा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला जाईल.

**मा. आयुक्त :** कार्यवाही काही समाधानकारक नाही. परंतु कार्यवाहीला सुरुवात झाली आहे. सभागृहाला सांगण्यास हरकत नाही. भोवगटा प्रमाणपत्र न घेतलेल्या बिल्डरांच्या बाबत दोन वेळा चर्चा झालेली आहे. १८ प्रकरणे नगर रचना विभागाकडून प्रशासकीय विभागाला कळविण्यात आलेली असून प्रशासकीय विभागला सूचीत केले आहे. उर्वरित ९ प्रकरणाच्या बाबत कागदपत्र मिळाली नाही तर कार्यवाही होणार नाही. परंतु जास्तीत जास्त पुराव्यासह गुन्हे कसे दाखल होतील अशा सूचना केलेल्या आहेत.

**श्री. ईलियास किरमाणी :** तापडीयाच्या बाबत कॅव्हेट दाखल करण्याचे निर्देश आपण दिले होते ते दाखल झाले का? तीन दिवसापूर्वीच आदेश दिलेले आहेत.

**विधी सल्लागार :** तापडीयाच्या प्रकरणाच्या न्यायालयाचे स्थगिती आदेश कॅव्हेट झालेले असून कॅव्हेट दाखल करण्या संदर्भात पॅनलवरील वकीलांना कळविण्यात आलेले आहे. कॅव्हेट दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** २९-०७-२००४ च्या सभेत मालमत्तेच्या संदर्भात रेकॉर्ड असावयास पाहिजे. या मुद्यावरून गोंधळ झाला. संपूर्ण रेकॉर्ड व मालमत्तेची माहिती घेवून पुढच्या बैठकीत म्हणजेच आजच्या बैठकीत आढावा बैठक म्हणून नगररचना विभागावर सुरू झालेली होती. मनपाने संपादित केलेल्या किंवा ले-आऊटच्या माध्यमातून हस्तांतरीत झालेल्या खुल्या जागा जवळपास ४१८ आहेत त्याचे रेकॉर्ड आजही संपूर्ण माहिती प्राप्त नसल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे. गहाळ संचिका किती रेकॉर्डला किती यावे सुध्दा सहाय्यक संचालक नगररचना यांनी दिलेले नाही. म्हणून असा निर्णय घेण्यात येतो की, नगररचना विभाग व मालमत्ता विभाग यांनी येत्या सात दिवसांत मनपाने संपादित केलेल्या जागा व इतर हस्तांतरीत केलेल्या जागांचे बुकलेट तयार करून सभागृहाला सादर करावे. सेल्फ डेव्हलपमेंटची जी कामे आहेत मिळकत धारकांना किंवा ले-आऊट धारकांना परवनगी दिलेली हाती. त्यांनी आज इमारती उभ्या कलेल्या असून जी सेल्फ डेव्हलपमेंटची विकास कामे होती ती केलेली नाही असे या सभागृहाच्या निदर्शनास आल्यानंतर एक समिती गठीत केलेली होती. व माहिती घेऊन निर्णय होईल असे त्या दिवशीच्या सभेतच निर्णय घेण्यात आलेला होता. तसेच स. सदस्य श्री. सावंत यांनी उपस्थित केलेला मालमत्ता विभागा संबंधीचा मुद्दा या विभागाचे सक्षमीकरण करण्या संदर्भात आणखी कर्मचारी देण्याची आवश्यकता असेल तर प्रशासनाच्या माध्यमातून कार्यवाही करावी. १२७ च्या नोटीसची प्रकरणे दाखल होतात. एक तर रिझर्वेशन उठवावे किंवा मला मोबदला द्यावा अशी मागणी असते. रिझर्वेशनची आवश्यकता असेल व कालमर्यादा संपलेली आहे ती वाढवून घेण्यासाठी सर्वसाधारण सभेने ज्या सूचना दिल्या त्या अनुषंगाने तात्काळ शासनाकडे सादर करावे. (४) लिजवर दिलेल्या जागेचा वापर योग्य अटी शर्तीनुसार होतो. किंवा कसे. दिलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राचा वापर होतो का? अटी शर्तीचे करारनाम्याचे उल्लंघन केलेले आहे का? त्या बाबतची माहिती सुध्दा नगर रचना व मालमत्ता विभागाने ७ दिवसांचे आत सादर करावी. (५) शासकीय, निमशासकीय व इतर संस्थेची होत असलेली बांधकामे व झालेली बांधकामे ज्यास मनपाची परवानगी घेतलेली नाही अशा सर्व इमारतींची चौकशी करून दोन्ही विभागामार्फत संयुक्तपणे पाहणी करून अहवाल सादर करावा. (६) पुणे मनपामध्ये बांधकाम परवानगीसाठी फास्ट ट्रॅक सिस्टीम चालू आहे त्या प्रमाणे बांधकाम परवानगीसाध्ठी मनपास काही करता येतील का त्यासाठी प्रयत्न करावेत. (७) नगर रचना विभागातील कामाची विभागणी करून इतर मनपा प्रमाणे शहर अभियंता यांचेकडे बांधकाम परवानगी दिल्या जाते त्या पध्दतीने कार्यवाही करता येईल का याबाबत प्रशासनाला या माध्यमातून सूचना देण्यात येत आहे (८) सेल्फ डेव्हलपमेंटची कामे चालू असतात त्याचे रेकॉर्ड ठेवले जात नाही. मनपाच्या कामाचे रेकॉर्ड असतात त्याप्रमाणे सेल्फ डेव्हलपमेंटच्या कामाचे सुध्दा त्या त्या कार्यकारी अभियंता यांचे विभागाच्या अंतर्गत जी जी कामे येतात त्याचे रेकॉर्ड त्या त्या विभागाने ठेवावे व समाधानकारक काम झाल्यानंतर व ते हस्तांतर करून द्यावे. (९) मनपाच्या विविध कामाच्या संदर्भात सुरक्षा अनामत रक्कम ३% जी निविदा धारकाकडून घेतली जाते. धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात सर्वसाधारण

सभेपुढे ठेवावे. नगर रचना विभागाचे कामाचे विभाजन तात्काळ करण्या संदर्भात प्रशासनाने काय जे प्रयत्न करायचे ते करावेत. या शहरातील नागरिकांची कामे तातडीने घेण्याच्या दृष्टीने त्यांना दिलासा मिळेल योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा. सभा २५ मिनिटांसाठी तहकूब करण्यात येते.

**(वेळ दुपारी १.३० वाजता सभेला सुरुवात २.१५ वाजता )**

**श्री. मधुकर सावंत :** पावसाळा, उन्हाळा, हिवाळा, असेल तातडीचे कामे करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत टेंडर न काढता करण्यात आलेल्या कामांची माहिती महानगरपालिकेच्या कायद्यानुसार १५ दिवसांत स्थायी समितीसमोर येणे आवश्यक आहे. आतापर्यंत झालेल्या कामांची माहिती सादर करावी.

**मा. सभापती :** चारही कार्यकारी अभियंता यांना मी पत्र दिलेले आहे. येणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत सर्व कार्यकारी अभियंता यांनी झालेल्या कामांची यादी सादर करावी.

**मा. आयुक्त :** अतिशय चांगला प्रश्न उपस्थित केलेला आहे. वर्षवाईज संपूर्ण माहिती मिळेल. त्यात पाणीपुरवठ्याची जास्तीत जास्त कामे आहेत. सभागृहाला माहिती दिली जाईल यात शंका नाही. यापुढे सर्व कार्यकारी अभियंता यांना सुचना की, १५ दिवसांचे बंधन पाळावे.

**विषय क्र. ५९ :**

दिनांक २१-०७-२००४ (का. प. क्र. १०) रोजी संपन्न झालेल्या स्थायी सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** इतिवृत्तातील पान क्र. २३ वर विषय क्र. ५७ मधील परिच्छेद २९ वगळण्यात यावे. या दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २१-०७-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील पान क्र. २३ विषय क्र. ५७ 'परिच्छेद २९' वगळून इतिवृत्ता कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६० :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, नगर भूमापन क्र. १९६६० पदमपुरा या मिळकतीवर समावेशक आरक्षण संकल्पनेनुसार विकास परवानगी अनुज्ञेय करण्यात आली होती त्यानुसार महानगरपालिकेकरिता ६२६९.५० चौ. मी. क्षेत्रापैकी २५% म्हणजे १५६८ चौ. मी. क्षेत्राचा वेगळा भूखंडा करण्यात आला असून सदर भूखंडावर महानगरपालिकेसाठी (अ) भाजीमंडी (ब) दुकान केंद्र व (क) बहुउद्देशीय हॉल बांधणे अपेक्षित होते. तथापी मुळे बा. प. संचिकेत मनपासाठी बांधावयाच्या इमारतीचे मंजूर आरखडे आढळून आलेले नाहीत.

या प्रकरणी मिळकतीच्या मालकी हक्का संदर्भाने वाद मा. सर्वोच्च न्यायालयात गेला होता व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधितास ५३००० चौ. फुट बांधकाम मर्यादेपर्यंत बांधकाम करण्यात आले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशा संदर्भात महानगरपालिकेचे विधिज्ञ श्री. प्रविण मंडलिक यांचे अभिप्राय घेण्यात आले असता.

१. संबंधित अर्जदाराने मनपा सोबत केलेल्या करारनाम्या नुसार भाजीमंडी दुकान केंद्र व इतर बाबीचे झालेले १५८६ चौ. मी. चे बांधकाम तातडीने ताब्यात घेणे आवश्यक आहे. तसेच.

२. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अर्जदारास ५३०० चौ. फुट बांधकाम मर्यादेपर्यंत बांधकाम करण्यास बाह्य करणे आवश्यक आहे. असे अभिप्राय झाले.

या संदर्भाने अर्जदाराने सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून मनपाने मान्य केलेल्या स्कीम नुसार आम्ही आम्हास अनुज्ञेय केले त्या ५३०० चौ. फुट मर्यादेच्या २५ म्हणजेच १३२५० चौ. फुट बांधकाम मनपास हस्तांतरीत करण्यास तयार आहोत. भविष्यात आम्हास ५३०० चौ. फुटापेक्षा जास्तीचे बांधकाम करण्यास मा. न्यायालयाने परवानगी दिल्यास मान्य स्कीमनुसार त्या प्रमाणात मनपाचे उर्वरित बांधकाम करून देण्यास आम्ही तयार आहोत. करिता मनपाचे बांधकाम हस्तांतरीत करून घेण्याची विनंती केली. अर्जदार / विकासकाच्या विनंतीनुसार विधी विभागने मान्य केलेल्या मसुद्याप्रमाणे संबंधिताने तसे नोंदणीकृत हमीपत्र नोंदणी क्र. २५१८/२००२ दि. २१/१२/२००२ नुसार करून दिले आहे. आज स्थितीत मनपासाठी बांधण्यात आलेल्या बांधकामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. | तळघर | प्रस्तावित भाजीमंडी (३८ ओटे) | बांधीव क्षेत्र | ५९६.२२ चौ. मी. |
| ब. | तळमजला | दुकान केंद्र (२२ दुकाने) | बांधीव क्षेत्र | ४३४.७० चौ. मी. |
| क. | पहिला मजला | बहुउद्देशीय हॉल | बांधीव क्षेत्र | २२४.०६ चौ. मी. |
| | | | एकूण | १२५५.३६ चौ मी. |
| | | | | १३४०७.६७ चौ मी. |

विकास नियंत्रण नियमावली नियम १७.१२ नुसार तळघरात भाजी मंडई हा वापर अनुज्ञेय नाही. सदर तळघराची उंची २.७५ मी. पेक्षा कमी आणि २.४० मी. पेक्षा जास्त असल्यामुळे भाजी मंडईचा वापर करावयाचे झाल्यास सिलिंग टँक एवढी पंख्याची, लाईटची व्यवस्था भिंतीवर करण्यात आल्यास आणि भाजी विक्रेत्यांसाठीचे ओट्याची उंची ३० से. मी. (एक फुट) कमी ठेवल्यास वापर करणे योग्य होईल तथापी या बाबत सांगपांग विचार होवून म.न.पा. साठी बांधण्यात आलेल्या बांधकाम ताब्यात घेण्याबाबत निर्णय घेणे योग्य राहील.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मा. सर्वोच्च न्यायालयाचे काही निर्देश आहेत का? विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** सदरील प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे कुलवंतसिंग जयसिंग विरुध्द हनुमानादास टाकसाठी या प्रकरणात जागा मालकी संबंधी मा. उच्च न्यायालयात जे काही कागदपत्र सादर झाले ते न्यायालयचे कागदपत्र पाहून ५३००० चौ. फुटावर बांधकाम करण्यास मा. सर्वोच्च न्यायालयाने परवानगी अनुज्ञेय केलेली आहे. ५३००० चौ. फुट बांधकाम डिस्प्युट दिसून येत नाही. म्हणून तेवढ्या क्षेत्रापर्यंत मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

**मा. सभापती :** मनपाच्या ताब्यात जे बांधकाम घ्यायचे १३४०७-६७ चौ. फुट रितसर अशी बांधकाम परवानगी घेतलेली होती का? त्यांनी जी बा. प. घेतली व मनपाने जे क्षेत्र दाखविले त्याची परवानगी आहे का? अशा प्रकारची बा. प. देताना

ए. डी. टी. पी. उपआयुक्त (म) मुख्य लेखाधिकारी यांची समिति केलेली होती त्यांचे माध्यमातून हा प्रस्ताव सादर करावा असे माझे मत आहे.

**सहा. संचालक न. र. :** २५% जे खर्च टॉवर्सचे बांधकाम झाले. रितसर परवानगी घेतल्याचे नकाशे संचिकेत कोठेही नाही. प्रस्तावात उल्लेख केलेला आहे.

**मा. आयुक्त :** मा. सर्वोच्च न्यायालयाचा जो निर्णय झाला तो स्पष्ट आहे. सर्व प्रकरण तपासणी करून तो निर्णय दिलेला आहे. त्यानंतर त्यांनी बांधकाम परवानगी न पाहता आदेश दिला असा अर्थ निघू शकतो. परवानगी घेतली होती की नाही. त्या विभागात कागदपत्र सापडत नाही म्हणून विभागाचा दोष असू शकतो. न्यायालयाच्या आदेशास बाधा येणार नाही.

**मा. सभापती :** हा प्रस्ताव सुधारीत सादर करावा. समावेशक आरक्षणाच्या ७५-२५% संदर्भात जी समिती गठीत केली आहे यात शहर अभियंता (डि. टी. पी मुख्य लेखाधिकारी उपआयुक्त (म) या सर्वांच्या शिफारशीनुसार मा. आयुक्तांच्या शिफारशीनंतर पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**मा. आयुक्त :** भाजी मंडईवरच अभिप्राय पाहिजे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार समावेशक आरक्षणाच्या संदर्भात गठीत केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार मा. आयुक्तांच्या शिफारशीनंतर पुढील बैठकीत सुधारित प्रस्ताव ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६१ :**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, नगर भूमापन क्र. १७८२३ आणि १७८२४ पैकी भूखंड क्र. ८ व ७ पैकी सन्मित्र कॉलनी येथील भूखंडावर बांधकाम परवानगी प्रस्ताव दाखल झालेला आहे. सदरचा भूखंड हा मंजूर विकास योजना आराखड्यानुसार गावठाण (दाट लोकवस्ती) बाहेरील आहे. प्रचलित कार्यपध्दतीनुसार गावठाण बाहेरील ज्या मिळकत धारकाने आतापर्यंत कधीही त्याचे मिळकतीसाठी विकास खर्च भरण्याचा पुरावा उपलब्ध होत नाही अशा सर्व मिळकत धारकांकडून विकास खर्च भरणा करून घेण्यात येते. परंतु सदरील प्रस्तावातील मिळकत धारकांनी सदर मिळकतीवर १९७१ पूर्वीचे जुने बांधकाम असल्याने ते पाडून नवीन बांधकाम करावयाचे असल्याने विकास खर्च आकारण्यात येवू नये अशी विनंती केलेली आहे.

सदर प्रकरणात जुनी इमारत पाडून नवीन बांधकाम करणे प्रस्तावात आहे. अशाच प्रकारे यापूर्वी मा. आयुक्तांचे आदेशानुसार उपसंचालक नगररचना औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडून न. भु. क्र. २५९१ मो. खडकेश्वर या मिळकतीच्या विकास खर्चा बाबत अभिप्राय जा.क्र. विनिनि/विकास खर्च/उस/औ/७४८ दि. ०६-०४-०४ अन्वये अभिप्राय प्राप्त झाले आहे ते खालीलप्रमाणे.

"सदरची जुनी इमारत पाडून नवीन इमारत बांधावयाचे प्रस्तावित आहे. तसेच विकास खर्च हा एकदाच खुल्य भूखंडाार बांधकाम करते वेळीच वसूल करावयाचा असल्यामुळे पुनर्विकास करतांना घेणे योग्य होणार नाही असे या कार्यालयाचे मत आहे. तथापी सदरचे विकास खर्च हे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाचे अनुषंगाने घेण्यात येत असल्यामुळे याबाबत आपले स्तरावर सर्वकष धोरण ठरवून निर्णय घेणे उचित होईल. असे उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांनी कळविले आहे.

वरील अभिप्रायानुसार मा. स्थायी समिती समोर दि. २७-०५-०४ रोजी प्रस्ताव सादर केल्यानुसार चर्चा झाली व त्यावर सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. सदरच्या ठरावानुसार सदर मिळकतीचे न. भू. क्र. २५९१ मो. खडकेश्वर यांचे न. भू. कार्यालयाचे आलेखावर १९७१ साली अस्तित्वात असलेल्या बांधकामाने व्यापलेले भूखंडाचे क्षेत्रावर फकत विकास खर्च आकारणी सुट देण्यात येईल तसेच त्यानंतरच्या क्षेत्रावर आणि या भूखंडावर वाणिज्य अथवा तत्सम वापर केल्यास करिता मा. स्थायी समितीच्या वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाप्रमाणे विकास खर्च सन १९७१ मध्ये असलेल्या बांधकामा व्यतिरिक्त जागेवर विकास खर्च वसूल करावा म्हणून अर्थ होतो मात्र विकास खर्च आकारणी ही भूखंडाची एकूण क्षेत्रावर होत असते. तरी सदरच्या प्रस्तावाचा भूखंडा हा गावठाणा बाहेरील आहे. मात्र सदरचा रेखांकन हा जुनाच असूल त्याचे भूखंडावरील १९७१ मध्ये न. भु. नकाशावर बांधकाम झालेले आहे तसेच सदर संस्थेच्या भावात यापूर्वीच सर्व विकास करण्यात आलेला आहे.

करिता मा. उपसंचालक, नगररचना यांनी न. भू. क्र. २५९१ खडकेश्वर या मिळकतीच्या विकास खर्चा बाबत अभिप्राय दिलेला आहे. त्याचप्रमाणे न.भू.क्र. १७८२३ आणि १७८२४ पैकी ह्या भूखंडाची परिस्थिती आहे. म्हणून म. उपसंचालक नगररचना यांचे अभिप्राय लक्षात घेता नगर भूमापन नकाशानुसार बांधकाम अस्तित्वात होते. अशा व ज्या भूखंड धारकांना यापूर्वी बांधकाम परवानगी दिलेली आहे परंतु त्यांचेकडे विकास खर्च भरल्या बाबतची पावती आता उपलब्ध होत नाही. अशा भूखंडा धारकांना त्यांचे भूखंड परिसरातील विकास कामे पूर्ण झालेले असतील तर विकास खर्च वसुलीची सक्ती करणे योग्य वाटत नाही त्यामुळे अशा भूखंड धारकांकडून विकास खर्च न आकारणेचे धोरण निश्चित करणे योग्य होईल तथापी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. काशिनाथ कोकाटे :** गेल्या दोन बैठकीपूर्वी अशा प्रकारची परवानगी एका प्रकरणात देण्यात आली. त्यावेळी चर्चा घेवून अशा प्रकारचे बरेच प्रस्ताव येतील व यात मनपाचा महसूल बुडणार आहे अशी चर्चा झालेली होती. म्हणून निर्णय होत असतांना मनपाच्या हिताचे निर्णय घेणे आवश्यक आहे. १९७१ पूर्वीचे बांधकाम झालेले सापडत नाही हे सुध्दा तितकेच सत्य आहे. सर्वांना लागू होईल असा साधक-बाधक विचार करून निर्णय घेणे योग्य होईल

**मा. सभापती :** प्रस्ताव नमूद केलेले आहे अशा इमारतीवर विकास खर्च आकारणे बरोबर वाटत नाही. विकास खर्चाची किती रक्कम होते जेवढे जुने बांधकाम त्या जागेत होते तेवढ्या जागेपुरती मर्यादित राहील ह्या अटीवर मंजुरी देण्यात येते टेकेवाणी यांच्या प्रकरणात जसा निर्णय घेण्यात आला त्याच प्रध्दतीने याही प्रकरणात मंजुरी देण्यात येते.

**मा. आयुक्त :** उपसंचालक नगररचना यांचे समोर चर्चा झाली हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर येणे आवश्यक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक २७-०५-२००४ च्या सभेतील ठराव क्र. २० मध्ये जसा निर्णय झालेला आहे त्या प्रमाणे नगर भूमापन क्रमांक १७८२३ आणि १७८२४ पैकी भूखंड क्र. ८ व ७ पैकी सन्मित्र कॉलनी येथील भूखंडावर या मिळकतीचे मूळ नगर भूमापन आलेखावर १९७१ साली अस्तित्वात असलेल्या बांधकामने व्यापलेले भूखंडाचे क्षेत्रावर फक्त विकास खर्च आकारणीत सूट येईल तसेच त्यानंतरच्या

क्षेत्रावर आणि भूखंडावर वाणिज्य अथवा तत्सम वापर केल्यास विकास खर्च रक्कमेत कोणतीही सूट देय होणार नाही. असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | सभापती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | स्थायी समिती महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ०२-०८-०४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. (का. प. क्र. १२) सोमवार दिनांक ०२ ऑगस्ट २००४ रोजी मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ०२.४५ वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३) | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी | -//- |
| ४) | स. स. श्रीमती जयश्री किवळेकर | -//- |
| ५) | स. स. सौ. शाहिन जफर महेमुद जफर | -//- |
| ६) | स. स. श्री. प्रल्हाद गणपतराव निमंगावकर | -//- |
| ७) | स. स. श्री. मोहन मेघावाले | -//- |
| ८) | स. स. श्री. मधुकर दामोधर सावंत | -//- |
| ९) | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| १०) | स. स. श्री. शेख मुनाफ शे. यासीन | -//- |
| ११) | स. स. श्री. सोपान भाऊराव पारे | -//- |
| १२) | स. स. श्री. भगवान दगडूजी रगडे | -//- |

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** महानगरपालिकेतील मालमत्ता विभाग सक्षम करायला पाहिजे. रोजाबाग येथील शेतकी शाळात भाडेपट्ट्यावर दिलेली आहे. भाडेपट्ट्याची मुदत संपलेली आहे. जागा महापालिकेच्या मालकीची आहे. जागा ताब्यात घेऊन विकास करण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी :** तुर्त माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. माहिती घेवून सादर करतो.

**श्री. मधुकर सावंत :** दीड महिन्यापूर्वी भोडपट्ट्याची मुदत संपलेली आहे व परत भाडेपट्ट्याने देणे बाबत मागणी होत आहे.

**मा. सभापती :** या संदर्भात अर्ज आलेला असेल. सदर जागा परत भाडेपट्ट्याने द्यायची असेल तर सभागृहाला माहिती देण्यात यावी. भाडेपट्ट्याची मुदत संपूर्ण दीड महिना झाला असेल तर जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू करावी.

**श्री. भगवान रगडे :** मालमत्ता विभाग सक्षम करण्यात यावा. महानगरपालिकेकडे सरकारी जमिनी हस्तांतरण झालेल्या आहेत. भाग ७/१२ वर महानगरपालिकेच्या नावाची नोंद नाही. अशा जागांवर महानगरपालिकेतर्फे विकासही करण्यात आलेला आहे. इमारती बांधलेल्या आहे व बराच खर्च केलेला आहे. परंतु जागा ताब्यात नाही असे चित्र दिसते. महानगरपालिकेचे मालमत्ता अधिकारी हे कायम स्वरुपी राहत नाही. या पदाचा प्रभारी चार्ज सतत फिरत राहतो.महानगरपालिकेची एवढी मोठी संपत्ती आहे तरी पद प्रभारी का राहते हे कार्यालय सक्षम करण्यात यावे व कायमस्वरुपी पदस्थापना राहावी. १९८८ ला ब्रिजवाडी येथे शाळा बांधलेली आहे. आज ७/१२ वर नोंद नाही.

उद्या जर कोणी त्या जागेवर मालकी दर्शविली तरी आपण काही करू शकणार नाही.

**मा. सभापती :** स्थायी समिती मध्ये या पूर्वीच निर्णय घेण्यात आलेला आहे की, अशा जागा तात्काळ नावावर करण्यात आला असलेले मालमत्ता अधिकारी सक्षमपणे काम करतात. त्यांना आणखी तांत्रिक कर्मचारी तात्काळ देण्यात यावे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** वृत्तपत्रामध्ये सिडको हस्तांतरणाच्या बातम्या येतात. आम्ही येथे सिडको भागातील पाच सदस्य आहोत. सिडकोच्या वतीने विचारण्यात येते की, याबाबत खरी काय माहिती आहे. वृत्तपत्रात हस्तांतरण हा अनुकूलता आहे, अशा बातम्या येतात म्हणजे नेमके काय. मा. विभागीय आयुक्त यांचेशी काय चर्चा झाली. काय प्रश्न उद्‌भवलेत सिडकोची हस्तांतरण ही बाब सध्या तरी वादग्रस्त आहे खरे पाहिजे तर या संदर्भात चर्चा व्हायला नको.

**मा. सभापती :** मा. विभागीय आयुक्त श्री. भोगे यांनी रितसर निमंत्रण देवून बैठकाचे आयोजन केले होते. शहर सौंदर्यीकरण व सिडको हस्तांतरण सर्व पदाधिकारी यांना बोलावले होते. शहर सौंदर्यीकरणा बाबत अति. शहर अभियंता यांना निर्देशन देण्यात आलेले आहेत. सिडको हस्तांतरणाबाबत जोपर्यंत सिडकोच्या नगरसवेकांना विश्वासात घेणार नाही तोपर्यंत पुढे चर्चा होणार नाही. विकास कामाबाबत सिडकोचे व महानगरपालिकेचे अधिकारी दिलेले आश्वासन पूर्ण झालेले आहे का, करारनाम्याप्रमाणे सुविधा देण्यात आलेल्या आहेत का, संयुक्त पाहणी करून खर्चाचा आकडा समोर ठेवण्यात येईल. पाणीपुरवठ्याच्या संदर्भातील करारनामा झाला होता त्यावेळी २२ कोटी नाकारले होते. मा. वैद्य साहेबांनी पत्र दिले होते मा. विभागीय आयुक्त श्री. भोगे यांनी जो करारनामा झाला त्याप्रमाणे द्यावे लागेल अशी चर्चा झाली या संदर्भात समिती गठीत करून या सर्व बाबी समितीसमोर जातील यास आमची अनुकूलता आहे पण सर्व अटीनंतरच आणि सिडको हडकोचे नगरसेवकांना विश्वासात घेवूनच.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये सिडको नाट्यगृहासाठी ५० लाख ठेवण्यात यावे. महानगरपालिकेतर्फे बांधण्याचे ठरले. प्रकरण न्यायप्रविष्ट झाले. नाट्यगृह दुसरीकडे जाणार म्हणून काही लोक उपोषणाला देखील बसले निधी कुठून उपलब्ध होईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मराठवाडा पॅकेज नावाखाली महानगरपालिकेला सोडचार कोटी देण्याचे घोषणा झालेली एक कोटी सिडको नाट्यगृहाला मिळणार आहे. नाट्यगृहामध्ये बांधकाम महानगरपालिका करणार अशी भूमिका ठरली होती. मात्र ही जबाबदारी सिडको प्रशासनाची आहे. महानगरपालिका पदाधिकारी मा. आयुक्त प्रशासक व जॉईन एम. डी. सिडको, मा. पालकमंत्री यांचेशी चर्चा झाली विना मोबदला जागा महानगरपालिकेला द्यावी व महानगरपालिका बांधेल असा निर्णय झाला. यापूर्वी सिडकोने भूमीपूजन केलेले असून यावर ४० लाख खर्च झालेला आहे. त्यापैकी महानगरपालिकेने २५ लाखाचा चेक दिलेला आहे. त्यानंतर अनेक घडामोडी घडल्या २५ लाख परत घेण्याचे ठरले. सभागृहात चर्चा होवून चांगल्या वास्तु तज्ञामार्फत निविदा काढण्यात यावी. १४०० प्रेक्षक बसेल एवढ्या क्षमतेचे नाट्यगृह बांधण्यात यावे. परंतु पुढे कुठे माशी शिंकली काही कळायला मार्ग नाही.

शासनाचे पैसे हे कोणा एकाचे नाही. आम जनतेसाठी असून कुणाच्या हातासाठी नाही हे व एक कोटी नाट्यगृहासाठी मिळावे म्हणून मा. विभागीय आयुक्त यांना पत्र द्यावे. कमिटीस पालकमंत्री अध्यक्ष आणि जिल्हाधिकारी पालिका आयुक्त व विभागीय आयुक्त हे सदस्य आहेत. एक कोटी मिळण्यासाठी रितसर पत्र पाठविण्यात यावे. अशी विनंती आहे. मा. पालिका आयुक्त हे सदस्य आहेत. त्यांनी याबाबत पुढाकार घ्यावा.

**मा. सभापती :** या कामासाठी सहा कोटी खर्च येणार आहे. अर्थसंकल्पात फक्त ५० हजाराची तरतूद आहे. मरावाडा पॅकेज अंतर्गत एक कोटीची तरतूद ठेवलेली आहे. अधिक तरतूद करायची तर मा. पालकमंत्री यांना विनंती करावी लागेल. आता हे बांधकाम पी. डब्ल्यु डी कडे जाणार आहे.

**अति. शहर अभियंता :** सिडकोकडून अद्याप २५ लाख रुपये परत मिळाले नाहीत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम करण्याचा कुणाचा निर्णय आहे. २५ लाख रुपये आतापर्यंत सिडकोने वापरले पैशाचे काय झाले.

**मा. सभापती :** शासनाला पत्र देण्यात यावे.

**मा. आयुक्त :** मी रजेवर होतो. उपआयुक्त लेखी अहवाल देतीलच. मराठवाडा पॅकेज मा. पालकमंत्री व मा. मुख्यमंत्री यांच्या सल्ल्याने अंतिम झालेले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** बजेटमध्ये काही प्रमाणात तरतूद केलेली आहे. यापूर्वी २५ लाख रु. दिलेले आहे. एजन्सी का बदलली. मुळात त्यांना काम करायचे नाही असे दिसते. मा. मुख्य संचिवासोबत चर्चा झालेली आहे. या संदर्भात त्यांना लेखी कळविण्यात यावे आमच्या भावनेचा प्रश्न आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** कोर्टात प्रकरण चालू आहे.

**मा. सभापती :** मागील सर्वसाधारण सभा व इतर समित्याचे इतिवृत्त बांधण्यात यावे. क्रिडा संकुलाचे पदसिध्द सदस्य हे महापौर असावे अशी मागणी व्हावी.

**मा. आयुक्त :** गरवारे क्रीडा संकूल येथे क्रीडासंकूल ९ एकर जागेत प्रस्तावित केले होते. त्यात मा. आयुक्त, मा. सभापती, मा. महापौर यांचा समितीत समावेश होता. सुतगिरणी येथील वाद संपलेला आहे. क्रीडा संकूल समितीचे मा. विभागीय आयुक्त हे अध्यक्ष आहे व जितक्या संस्था आहेत ते सदस्य आहेत.

**मा. सभापती :** मा. महापौर हे सदस्य असावे तसे पत्र द्यावे.

**श्री. प्रल्हाद निमगांवर :** क्रीडा संकुलाच्या पाठीमागे काब्रानगर ही वसाहत आहे. काब्रानगर या वसाहतीला या भागातून रस्ता देण्यात यावा.

**मा. सभापती :** नियोजन प्राधिकरणावर महानगरपालिका आहे तेंव्हा हे प्रकरण परवानगीसाठी आपणाकडे येईलच तेंव्हा १२ मीटर व १५ मीटरचे रस्ते सोडावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** केंद्र सरकारची भावना मदत करण्याची आहे. चालढकल होते क्रीडा संकुल गारखेड्याला करण्यात येते. कशासाठी गारखेड्याला होते. सदर जागा क्रीडा संकलासाठी आरक्षित केलेली आहे का सर्वसाधारण सभेने ठराव करून पाठविलेले आहे का.

**मा. सभापती :** हस्तांतरण अंतिम टप्प्याच्या जवळ आलेले आहे. आजच्या बैठकीचे संदर्भ देवून मा. विभागीय आयुक्त यांना पत्र देण्यात यावे. सिडको व हडको वासीयांना दिलेले आश्वासन पूर्ण करण्या बाबत २२ कोटी रुपये पाणीपुरवठा

संदर्भात विकास कामाला लागणारा खर्च आणि सर्व साधारण सभा ज्यांना नियुक्ती करेल ती समिती चर्चेला जाईल असे कळविण्यात यावे.

**श्री. भगवान रगडे :** महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान कसे होत आहे हे निदर्शना आणून दिलेले आहे. हर्सूल तलाव येथे मासे पकडण्याचा ठेका देण्यात आलेला आहे. कार्य आदेशातील अटीचे उल्लंघन होत आहे. तळ्यात पाणी कमी आहे. त्यांना मासे पकडू देवू नयेत. असे आदेश द्यावे. दर दोनचार दिवसाला तो साडेबारा क्विंटल मासे विकतो. या प्रकरणांत काय कार्यवाही झालेली आहे.

**मालमत्ता अधिकारी :** प्रकरण मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले आहे. आपल्या तेथे सुरक्षा रक्षक नाही हे आता माहिती झाले आहे. सुरक्षा रक्षक ठेवण्यात येईल.

**मा. सभापती :** हर्सूल तलावावर सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे व रितसर गुन्हा नोंदवावा.

**मा. आयुक्त :** महानगरपालिकेच्या विरोधात निकाल आहे. आजच्या आज मा. उच्च न्यायालयाकडून निर्णय घेण्याची विधी सल्लागाराने कार्यवाही करावी.

**विधी सल्लागार :** रामतारा मत्स्य संघ यांनी घेतलेला ठेका रद्द करण्यात आलेला आहे व दुसरी निविदा काढण्यात आली. पूर्वीच्या ठेकेदाराला कनिष्ठ व वरिष्ठ न्यायालयाने स्थगिती दिली. तीन वर्षाचा करारनामा रद्द करण्याची कार्यवाही संदर्भात सर्व कागदपत्रे व फोटोग्राफ दाखल करण्यात आले.

**मा. सभापती :** पॅनलवरील आपले वकील हे आपले काम करतात की ठेकेदाराचे काम करतात. या प्रकरणात दुसरे वकील लावण्यात यावे.

**विधी सल्लागार :** अपीलाचा निकाल विरोधात गेला त्यामुळे निविदा रद्द करण्याची कार्यवाही योग्य होणार नाही.

**श्री. भगवान रगडे :** महानगरपालिकेने ठेका देतांना कोणत्या अटी व शर्ती लावलेल्या आहेत. पंपाजवळ पाणी कमी असल्या नंतर मासे पकडता येत नाही. ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली नाही. त्याचा खुलासा करण्यात यावा. यापूर्वी मालमत्ता अधिकारी श्री. रामटेके यांनी मासे पकडण्याचे जाळे धरले होते. त्यांचेवर पोलिस केस का केली नाही.

**मा. सभापती :** कार्य आदेशातील अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक आहे. अटी व शर्तीचे उल्लंघन झाले असल्यास आजच्या आज गुन्हा दाखल करावा.

**मालमत्ता अधिकारी :** सदर ठिकाणी सुरक्षा रक्षक व माझे कार्यालयातील इतर व्यक्तीची नियुक्ती करण्यात येईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सेल ॲडव्हारटाईज बद्दल माहिती देण्यात यावी.

**उपआयुक्त (म) :** सेल ॲड. प्रकरणात विधी सल्लागार यांचा अभिप्राय प्राप्त झाला आहे. जून २००५ पर्यंत तो सोडून जाणार नाही. करार रद्द करण्याची संचिका त्यांचेकडे पाठवायची आहे. न्यायीकदृष्टीने सदर संचिका तपासणे आवश्यक आहे. ४० लाख रुपये आपल्याकडे वळती करता येईल मा. आयुक्तांची परवानगी घेवून कार्यवाही करता येईल.

**मा. आयुक्त :** विधी सल्लागार यांचेकडून संचिका घेवून त्यातील अटी व शर्ती तपासावे लागेल. या संदर्भात जास्त चर्चा केली तर चर्चे आधारे कोर्टात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**श्री. मधुकर सावंत :** सन्माननीय सभापती, मी आज जनहिताच्या विषयावर आपल्या परवानगीने बोलू इच्छितो आपण स्वतः नागरी समस्या आणि जनहिताच्या

प्रश्नांवर नेहमी आक्रमक असता. एवढेच नाही तर आपणस अशा प्रकारच्या विषययाबद्दल अतिशय तळमळ असते आणि प्रशासन किंवा पदाधिकाऱ्यांमुळे सामान्य नागरिकांबरोबर कोणताही अन्याय घेवू नये याबाबत आपण नेहमीच दक्ष असता या सर्व गोष्टीमुळे मला व्यक्तिगत आपल्याबद्दल नेहमीच कौतुक आणि अभिमान वाटतो. म्हणूनच आपल्याकडून मला पूर्ण समर्थन मिळेल आणि सहकार्य मिळेल याची पक्की खात्री असल्यानेच आपल्यासमोर विषय मांडीत आहे.

सन्माननीय सभापती मी ज्या विषयावर बोलणार आहे, त्या विषयाचा इंग्रजीशी संबंध आहे मी इंग्रजी शिकलो नाही आणि समजत पण नाही म्हणूनच हा विषय मांडताना माझ्याकडून काही चूक झाली तर आपण तसेच उपस्थित सन्माननीय अधिकारीइव माझे सहकारी सदस्य यांची सुरुवातीला माफी मागतो. सन्माननीय सभापती जी महानगरपालिकेकडे करमूल्य निर्धारण करीता वेगळा विभाग आहे या विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी कार्यक्षमतेने महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे सर्वेक्षण करून सर्व मालमत्ता नियमानुसार कर आकारणी करावी अशी किमान अपेक्षा आहे. किंबहुना या विभागाचे तेच काम आहे. तरी देखील मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याचे काम महानगरपालिकेने खाजगी कंपनीला का दिले? अर्थात माझा प्रश्न याच कंपनीच्या कामाबाबत शंका असल्यामुळे आहे. महानगरपालिकेने "स्पेक" नावाच्या हैद्राबादच्या कंपनीला काही अटी व शर्तीनुसार उपरोक्त कामाचे कंत्राट दिले आहे. कंत्राटीकरिता ज्या अटी व शर्ती निश्चित केल्या आहेत त्या करिता जी पुस्तिका प्रसिध्द केली आहे त्याच्या पान क्र. २१ वर न्यायालयीन क्षेत्र महाराष्ट्र राज्य असे म्हटले आहे. माझ्या अल्पबुध्दी प्रमाणे न्यायालयीन क्षेत्र "औरंगाबाद" असे असावयास हवे असे वाटते. कारण सदरील कंपनी बाबत काही वाद उद्‌भवला तर महानगरपालिका सदरील वाद औरंगाबादच्या बाहेर नेणार का? आणि त्यासाठी अवाढव्य पैसा जनतेचाच वापरला जाणार का?

पान क्र. २ व ३ वर के. एल. व एन या अटी निर्देशित केल्या आहेत त्या सर्व अटीची पूर्तता होत आहे का? असल्यास त्याचा पुरावा सभागृहात सादर होईल का? पान क्र. ३ वरील अट क्र. २.२ नुसार सदरील कंपनीस सर्वेक्षणाचा जुना अनुभव आहे का? असल्यास कोणत्या महानगरपालिकेचा आहे? तसे प्रमाणपत्र पहावयास मिळेल का? पान क्र. ४ वरील अट क्र. २.४ नुसार सदरील कंपनीने महानगरपालिकेकडे अभियंते सर्वेक्षण आणि कारकून यांची एक सूची सादर केली आहे. त्यात ज्या व्यक्तींचे नावे आहेत त्याच व्यक्ती खरोखर सर्वेक्षणाचे काम करीत आहेत का? कारण माझ्या माहितीनुसार "स्पेक" कंपनीने याबाबत महानगरपालिकेची दिशाभूल केली आहे. कारण सर्वेक्षणाचे प्रत्यक्ष काम संभाजी नगरच्या आजुबाजूच्या ग्रामीण भागातील अल्पशिक्षित मुले करीत आहे. आणि जर माझे म्हणणे असत्य असेल तर २४ तासाच्या आत "स्पेक" कंपनीने महानगरपालिकेला सादर केलेल्या सूचीप्रमाणे सर्वच्या सर्व व्यक्ती सूचीत स्पष्ट केलेल्या शैक्षणिक पात्रतेच्या मान्यता प्राप्त प्रमाणपत्रासहित सभागृहासमोर "सुचिची सत्यता पटविण्यासाठी हजर करावेत. आणि या सर्वाची संख्या पान क्र. ४ वरील अटीनुसार एकूण ९०० असावी.

पान क्र. १४ वरील अटीनुसार कंत्राटीचा कालावधी व तीन महिन्यांचा आहे. प्रशासनाने दिलेल्या माहिती नुसार कंत्राटीचे काम दि. २६ फेब्रुवारी २००४ रोजी सुरू इझाले आहे. म्हणजेच सदरील काम सुरू होवून पाच महिन्यांचा काळ उलटून गेला तरी माझ्या माहितीनुसार फक्त विभाग क्र. ४ क्षेत्रातील काहीच मालममांचे सर्वेक्षण झाले आहे. म्हणजेच १/३ पेक्षा कमीच काम झाले आहे आणि हे ही काम संपूर्णपणे अर्धवट झालेले आहे. झालेल्या विलंबाबद्दल प्रशासनाने सदरील कंपनीला काय व केंव्हा विचारणा केली? त्याबाबत कंपनीचे कोणते स्पष्टीकरण झाले आहे.? याबाबत सभागृहास पूर्ण माहिती सादर झाली पाहिजे.

पान क्र. १५ वरील अट क्रमांक ५.४ नुसार सर्वेक्षण झालेल्या मालमत्तेवर २२० एम. एम. ७५ एम एम आकारची पाटी लावायची आहे. सर्वेक्षण पूर्ण झाले नसेल तर घर नं. प्लॉट नं. .. आदी माहिती कार्कर पेनने लिहावयाची आहे. सर्वेक्षण झालेल्या विभाग क्र. ४ मधील कोणत्या मालमत्तेवर अशा प्रकारच्या नोंदी झालेल्या आहेत.

पान क्र. १६ वरील अटींनुसार कंपनीने संगणकीय नोंदी करून द्यावयाच्या असून महानगरपालिकेचा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावयाचे आहे. कंत्राटीचे काम सुरू होवून १५० दिवस होवून गेल्यनंतरही सदरील अटींची पूर्तता झाली आहे का? असल्यास महानगरपालिकेचे कोणते कर्मचारी प्रशिक्षित झाले आहेत.?

कर मुल्य निर्धारण अधिकारी-२ यांनी आदेश जारी करून २०-०५-२००५ रोजी महानगरपालिकेच्या १८ कर्मचाऱ्यांनी सदरील कंपनीच्या कामावर नियंत्रण व देखरेख करावी असे म्हटले आहे. जेंव्हा या १८ कर्मचाऱ्यांची या कामावर नेमणूक झाली आहे त्यांनी नेमकी काय देखरेख केली? कोणते नियंत्रण ठेवले?

यानंतर माझा अतिशय महत्वाचा आणि हरकतीचा मुद्दा आहे. महानगरपालिकेच्या विभाग क्र. ४ हा महानगरपालिकेला सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे. या विभागातील एका प्रभागाचा मी प्रतिनिधी असल्याने अतिशय खात्रीने सांगाते की विभाग क्र. ४ मध्ये शेकडा ९० पेक्षा अधिक मालमत्तांचे बांधकाम महानगरपालिकेच्या सर्व नियमांनुसार झालेले आहे. त्यामुळे सुरुवातीलाच त्यांना मालमत्ता कर लावतांना काही त्रुटी किंवा दोष राहण्याची शक्यता नाही. तसेच या भागातील सन्माननीय नागरिक प्रामाणिकपणे महानगरपालिकेला कराची रक्कम जकात करतात. त्यामुळे या विभागावर मेहनत घेण्यापेक्षा विभाग क्र. १, २, असे विभाग आहेत की, यामधून महानगरपालिकेला "न गाय" उत्पन्न मिळते. या विभागाकडे जाणून बुजून का दुर्लक्ष केले?

मी सुरुवातीला म्हणल्यानुसार "स्पेक" कंपनीने अतिशय कमी शिक्षण झालेल्या मुलांकडून विभाग क्र. ४ मधील मालमत्तांचे सर्वेक्षण केले आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना यापुढे महानगरपालिकेकडून चुकीच्या साहित्याच्या आधारे व अर्धवट ज्ञानाच्या आधारे मालमत्ता कराची अवास्तव मागणी होईल अशी भिंती वाटते आणि असे झाले तर नागरिक वेळेवर नियमित कराची रक्कम अदा करतात. त्यांच्यावर अन्यायच होईल. एवढेच नाही तर माझ्यासारख्या लोकप्रतिनिधीला जनक्षोभास सामारे जावे लागेल.

म्हणून माझी मागणी आहे की, सन्माननीय सभापती जी आपण या सर्व बाबींवर गंभीरपणे विचार करून "स्पेक" कंपनीकडून जे नियमबाह्य व अवास्तव काम चालू आहे ते त्वरित थांबवून महानगरपालिकेच्याच कर्मचाऱ्यांकडून हे काम करून घ्यावे.

मी मांडलेल्या मुद्यांबाबत मला समाधानकारक आणि सत्यतापूर्वक उत्तर मिळाले नाही आणि माझ्या मागणीप्रमाणे सर्वेक्षणाचे खाजगी कंपनीला दिलेले कंत्राट रद्द केले नाही तर मला नाईलाजाने जनहित याचिकेद्वारे माननीय उच्च न्यायालयात न्याय मागावा लागेल.

धन्यवाद.

**कर मुल्य नि. :** दिनांक २६-०२-२००४ ला "स्पेक" कंपनीसह करार झालेला आहे करारात अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. आज रोजी झोन नं. ४ च्या ३१६८२ व आजपर्यंत ३८९३८ मिळकतीचा सर्वे झालेला आहे. टेंडर अटी व शर्तीनुसार निविदाच्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हतेबाबत पूर्ण माहिती घेवून सादर करण्यात येईल. दिनांक ३०-०७-०४ पर्यंत झोन नं. ४ चे ३८९३८ इतके मिळकतीचा सर्वे झाला असून आतापर्यंत एकूण ५८६१६ मिळकतीचा सर्वे झालेला आहे. कंपनीत मुले काम करतात परंतु ते अशिक्षित नाहीत. ५५ सर्वेअर ६८ हेल्पर इत्यादी मिळून १६५ लोकांची नेमणूक केलेली आहे व ४ टीम तयार केलेल्या आहेत.

**श्री. मधुकर सावंत :** मा. सभागृहाने मान्यता दिली तर मी अर्ध्या तासात बोलवू शकतो.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** त्रुट्या असतील तर दुरुस्त करव्यात.

**मा. सभापती :** निविदेच्या अटी व शर्तीचे उल्लंघन होत असेल तर पाहावे. मनपा कर्मचारी म्हणून जनतेला लुबाडण्यात येते. कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना सूचना देण्यात याव्यात. त्यांना ओळखपत्र देण्यात यावे. त्यांचेकडील स्टाफ हा प्रशिक्षित व अर्हता धारक आहे किंवा नाही हे तपासून पुढच्या बैठकीत माहिती देण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** १९९५ ला बिनतारी यंत्र घेण्यात आले होते. ९ पाणी पुरवठ्याला दिले होते व ९ जकात विभागाला दिले होते. मा. आयुक्त मा. व मा. सभापती, उपआयुक्त (म) जकात अधिक्षक यांच्या वाहणात देखील बिनतारी यंत्र बसविण्यात आले होते. आज का नाही.

**कार्यकारी अभियंता :** १९९५ ला बिनतारी यंत्र संच घेण्यात आले होते. पाणी पुरवठा येथील सदर संच चालू आहेत. जकात विभागातील बिनतारी यंत्राचा रिव्हयू घेतलेला आहे. भ्रमण दूरध्वनीमुळे वापर कमी झालेला आहे. तरी दुरुस्त करून घेत आहोत. येत्या दहा दिवसात दुरुस्ती होईल.

**सौ. शाहीन जफर :** शाळा उघडून सुमारे दोन महिने झालेले आहेत. ज्या ठिकाणी १०-१५ मुले आहेत. त्या ठिकाणी चार शिक्षक देण्यात येतात. पैठणगेट येथे तीन-चार शिक्षक आहेत. आणखी तीन शिक्षक आवश्यक आहेत. १५ जुनला शाळा सुरू झाली. शाळा दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार झालेले आहे काय? आरेफ कॉलनी येथील महानगरपालिकेच्या शाळेत तीन बहिणी एकाच शाळेत काम करतात. शिक्षणाधिकारी त्यांची बदली का करीत नाही.

**शिक्षणाधिकारी :** या संदर्भातील संचिका मी उपआयुक्त यांचेकडे व त्यानंतर कालच मा. आयुक्तांकडे सभा योजनाची कार्यवाही पूर्ण करून पाठविलेली आहे.

**मा. आयुक्त :** शिक्षणाधिकारी यांनी संचिका घेऊन जावी. स्वाक्षरी झालेली आहे. मुख्य लेखाधिकारी यांना इतर कामासाठी बाहेर पाठविलेले आहे. फर्निचर व इतर बाबतीत त्यांचेकडून खुलासा होईल.

**मा. सभापती :** शाळा एकत्रित करण्याचे निर्णय दोन-तीन दिवसात घेण्यात यावे व सदर प्रस्ताव विषय समिती समोर ठेवण्यात यावा. वसंत भवन व उस्मानपुरा येथे एक उर्दू व एक मराठीचे शिक्षक देण्यात यावे.

**श्री. संजय शिरसाठ :** मोहसीन अहमद यांची जागा शाळेसाठी भाड्याने घेतली आहे. त्या शाळेत फक्त १५ विद्यार्थी असून चार-पाच शिक्षक आहेत. शाळा एकत्रीकरणामध्ये याचाही विचार व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** विविध शाळेतील समस्यांबाबत आढावा घेत आहोत. विजेच्या डी. पी. बद्दल कार्यकारी अभियंता विद्युत यांच्यासह बोललो. परिपत्रक काढलेले आहे. कुठलेही ज्वलनशील वस्तु शाळेत असू नये शाळेबाहेर शिजविण्यात यावे. मुकूंदवाडी शाळेला भेट दिली तेथे वाघमारे म्हणून चौकीदार आहेत तेथील स्लॅबची गळती होते या संदर्भात मी अहवाल देतो.

**श्री. मोहन मेघावाले :** माझ्या प्रभागातील शाळेत जास्त मुले आहेत. दोन-तीन शिक्षकांची गरज आहे. काही शिक्षक पंधरा वीस दिवस रजेवर आहेत. महानगरपालिकेच्या शाळा सुरू होवून बरेच दिवस झालेले आहे. आणखी पुस्तकांचे वाटप झालेले नाही.

**मा. सभापती :** शिक्षकांच्या बदल्या झालेल्या असतील तर त्यांनी रुजू होणे गरजेचे आहे. आता पुन्हा फेरबदल करण्यात येवू नये.

**शिक्षणाधिकारी :** शालेय पुस्तक वाटप करण्याची कार्यवाही चालू आहे. तीन हप्त्यात पुस्तके प्राप्त झालेली आहे. सर्व मुख्याध्यापकांना शालेय पुस्तके देण्यात आलेली असून तीन दिवसात वितरीत करावे म्हणून सुचनाही देण्यात आलेल्या आहेत.

**सौ. शाहीन जफर :** शाळेला भेट देण्यात यावी व ज्या शाळा बंद करायच्या असतील तेथील विद्यार्थ्यांना जवळच्याच शाळेत स्थलांतर करण्यात यावे जसे औरंगपुरा असेल तर पैठणगेटला स्थलांतरीत करावे.

**शिक्षणाधिकारी :** शिक्षक समितीच्या बैठकीत प्रस्ताव येणार आहे.

**मा. सभापती :** समायोजनाची कार्यवाही आजच्या आज पूर्ण करण्यात यावी.

**मा. आयुक्त :** समायोजनाची टिपणी मंजूर केलेली आहे व संगणकावर तयार करावे अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**श्री. भगवान रगडे :** ब्रिजवाडी येथील शाळेची स्थिती कशी आहे ती पाहण्यात यावी. तीन महिन्यापूर्वी आदेश देण्यात आले होते. खिडक्या दरवाजे व इतर दुरुस्तीचे काम करावे परंतु अद्याप झालेले नाही.

**शहर अभियंता :** दहा लाखाची तरतूद होती त्यात बरीच कामे केलेली आहेत.

**श्री. भगवान रगडे :** निविदा कधी निघणार व दुरुस्ती कधी करणार.

**श्री. ईलियास किरमाणी :** मुलींना गणवेश देतांना ओढणी नाही. त्याची तरतूद करण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** दैनिक तरुण भारत वृत्तपत्रात बातमी आली ४० लाख हातोहात गेले कपड्यांच्या संदर्भात खुलासा व्हावा. २० लाखाचा कपडा पडून आहे. मग अशा बातम्या कशा आल्या.

**मुख्यलेखाधिकारी :** शनिवारी बातमी आली होती त्याचा खुलासा केला ती दुसऱ्या दिवशी छापून आली. चुकीची बातमी होती. गणवेश बद्दलच्या निविदा राज्यस्तरावर वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात आली. पुणे सकाळ औरंगाबाद येथे स्थानिक वृत्तपत्रातही प्रसिध्द झाली. पाच निविदा प्राप्त झाल्या एक निविदा उघडली नाही. दोन वेळेस वाटाघाटी करण्यात आली. जिल्हा परिषदेने जे दर मान्य केले त्याचा आधार होवून स्थायी समिती समोर सादर करण्यात आले. वीस लाख पडले. चुकीचे आहे. शर्ट सलवार व खाकी कपड्याचे गणवेश वजा करून ३९ लाखाचे खरेदीचे आदेश दिलेले आहेत.

**मा. सभापती :** मुलींच्या ओढणीबद्दल काय झाले.

**मुख्य लेखाधिकारी :** स्थायी समितीच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. इलियास किरमाणी :** रोडचे कामाबाबत आपले फोटो वृत्तपत्रात आलेले आहे ती वसाहत अधिकृत आहे किंवा अनाधिकृत आहे.

**अति. शहर अभियंता :** मा. आमदारांतर्फे जिल्हाधिकारी यांना आमदार निधीतून ५ लाख रुपयाची तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी मार्फत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. अरिहंतनगर भागात डांबरीकरण करून द्यावे ही वसाहत गुंठेवारी कायद्या अंतर्गत अंतर्भूत आहे व जिल्हाधिकारी यांना नाहरकत प्रमाणपत्रही दिलेले आहे.

**श्री. ईलियास किरमाणी :** अत्यंत वाईट बाब आहे. व्यक्ती समोर ठेवून कामे होतात. आमची निधी चालत नाही असे म्हणतात. मग आमच्या निधीचे आम्ही काय करावे. नाहरकत प्रमाणपत्र दिले. त्यामुळे काय फरक आहे. एकासाठी एक व एकासाठी एक असे प्रकार चालू आहेत. अशा वेळी आम्ही काय करावे.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** आम्हाला देखील अधिकार देण्यात यावेत. व आमच्या निधीचा देखील अशा कामासाठी वापर व्हावा.

**श्रीमती शाहीन जफर :** अनाधिकृत वसाहतीमध्ये आमचा स्वेच्छानिधी वापरण्याचा देखील आम्हाला अधिकार देण्यात यावा. चार वर्षे झाली कामे होत नाहीत.

**श्री. भगवान रगडे :** अनाधिकृत वस्तीमध्ये नगरसेवक स्वेच्छानिधीतून कामे करण्याबाबत पत्र दिल्यानंतर आमची कामे रद्द करण्यात येतात. कामे होत नाहीत परंतु आमदार / खासदार निधीतून अनधिकृत वसाहती मधून डांबरीकरणाची कामे हाती घेण्यात येतात. माझ्या वॉर्डात राजेंद्रनगर भागात मा. आमदार श्री. बागडे यांचा निधी वापरला. रस्ता तयार केला आम्ही मात्र नळ देखील देवू शकत नाही. ड्रेनेज लाईन दुरुस्त करू शकत नाही. आमदार / खासदार निधीला महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र लागते का? दोन्ही स्वेच्छानिधी मध्ये का फरक करण्यात येतो.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** माझ्या मते नगरसेवक, आमदार, खासदार स्वेच्छानिधीसाठी असलेली नियमावली सर्वांना समान आहे. नगरसेवकांना असलेला स्वेच्छानिधी एक तर कमी आहे व त्यांना आपआपल्या भागात देखभाली दुरुस्तीची कामे, जलवाहिनी ड्रेनेज लाईनची दुरुस्ती इ. परवानगी देण्यात यावी. नगर विकास विभागातील नगर रचना विभागाचे उपसचिव यांचेशी चर्चा झाली होती. मुद्दा गुंठेवारी लागू करण्या संदर्भात होता. दिनांक १६-०७-२००१ ला गुंठेवारी लागू झालेली आहे. व याच तारखेपासून अंमलबजावणी देखील सुरु झाली आहे. गरीबाच्या हिताचा निर्णय घेतलेला नाही. अनेक अटी टाकलेल्या आहेत. मोकळी जागा क्रीडांगण ९ मीटर

रुंदीचे रस्ते इत्यादी. १९९५ ते २००० पर्यंत युती सरकारने सर्व अनाधिकृत वसाहती अधिकृत करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी नगरपालिका / महानगरपालिका यांचा संपूर्ण निधी वापरला. १९९५-२००० एका भागात खंड मिळत मिळत होते. या सरकारने पिळवणूक केली. ९ मीटर रोड व खुली जागा कोठ मिळणार या संदर्भात महानगरपालिकेने ठराव पाहित केलेला आहे. अरिहंतनगर एका बाजुला व सर्वसामान्याचे प्रश्न सोडविण्यासाठी निधी वापरण्यास अडचणी येतात. मा. मंत्री आचारसंहितेचा भंग करतात त्यांना परवानगी दिली तशी आम्हालाही मिळावी. नाहरकत प्रमाणपत्र दिलेले असेल तर स. सदस्यांना देखील परवानगी दिली पाहिजे. प्रस्ताव पारीत करून घेतले पाहिजे मी माझा स्वेच्छा निधी का वापरू शकत नाही. त्यांनी कसे वापरले. पुंडलिकनगरची कामे अडकून पडले. किराडपुरा चिश्तिया कॉलनी, बारी कॉलनी, जयभवानी नगर, मिसरवाडी इ.अनेक भागात पाण्याचा प्रश्न आहे. शासन त्यांचेच आहे त्यांना याबाबतीत दिलेली सूट खपवून घेतली जाणार नाही. दबावाखाली नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. गंभीर बाब आहे. यापूर्वी सिडको नाट्यगृहाचे काम राज्यमंत्र्यामुळे रुकले आहे. या गोष्टी थांबावयास पाहिजे. आपले अधिकारी वापरावेत अंमलबजावणी करावी, एक कोटी नाट्यगृहासाठी ठेवले आहे बी ॲन्ड सी च्या माध्यमातून करण्याचे का ठरले निषेधार्थ बाब आहे.

**मा. आयुक्त :** आपण अभ्यास करून पाच मुद्यांवर मा. सचिवांना मा. तिवारी साहेब या संदर्भात मार्गदर्शन करतात. स्वेच्छानिधी बाबत उपआयुक्त महसूल यांनी हा निधी कसा वापरावा गुंठेवारी अंतर्गत सेवा सुविधा संदर्भात शासन नगर विकास विभागाकडून खुलासा घेण्यात यावा. आमदार निधीचे नियोजन विभाग हे जिल्हाधिकारी आहे. फार तर आपण वापरू नये असे ठरवता येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कोणालाही नाहरकत प्रमाणपत्र मिळाले नाही. एक कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम विभाग कडे जात आहे.

**मा. सभापती :** इतरांना कामे करण्यास मुभा दिली तर आपणाला देखील वापरता येईल का.

**अति. शहर अभियंता :** मी फक्त एका बाबतीत खुलासा केला आहे. अशा प्रकारची कामे दोन ठिकाणी झालेली आहेत आता हे जनरलाईज करायचे किंवा नाही. धोरण ठरवावे. ही कामे नवीन कामे नाहीत देखभाल दुरुस्तीची आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** आपले फोटो वृत्तपत्रात प्रसिध्द झालेले आहे. अनाधिकृत वसाहतीच्या कामाचे उद्‌घाटन करण्यात आले. त्यामुळे बातमीला महत्व प्राप्त झाले आहे. त्यावेळेसचे मा. सभागृहनेता श्री. राधाकृष्ण गायकवाड यांनी खासदार निधीतून कामासाठी पाठपुरावा केला. प्रशासनाने ठरविले करायचे नाही. म्हणून अरिहंतनगर मध्ये केले असल्यास सर्व प्रभागात करण्यात यावे. नाहरकत प्रमाणपत्र देतांना जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडे जातो. कोणाकडून काय काम करायचे जागा कोणाची आहे. ए. ओ. सी. द्यायचे या संदर्भात आपले अधिकारी उदासीन दिसतात स्वीय सहाय्यक येतो व ४० कामांची यादी घेऊन जाता काम करणे गरजेचे आहे. खासदार निधी वापरून पॅचवर्कची कामे केलेली आहेत का. रस्ता दुरुस्तीबद्दल काय झाले. रस्ता दुरुस्तीसाठी आमदार निधीचा वापर करता येत नाही. नवीन साठी

असतो. सर्वांना नियम लागू करा. ना हरकत प्रमाणपत्र देणे बाबतची घोषणा करण्यात यावी.

**मा. आयुक्त :** प्रशासनाने काम केलेले नाही. जिल्हाधिऱ्यांनी केलेले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिकेने नाहरकत प्रमाणपत्र दिले नसते तर काम करता आले नसते.

**श्री. संजय शिरसाठ :** अत्यावश्यक सेवाखाली गार्डनच्या जागेत घरे बांधू शकतात वापरात बदल होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शहरातील जनतेचे आमदारांनी वाटोळे केले. सत्तेचा खालच्या स्थरावर वापर केला सत्तेचा गैरवापर केला.

**मा. सभापती :** चार-पाच वर्षापासून अनाधिकृत वसाहतीमध्ये स्वेच्छानिधी आमदार/ खासदार या संदर्भात मुभा नव्हती. अरिहंतनगर भागात अनाधिकृत वसाहतीमध्ये नागरिकांच्या सोयीसाठी आमदार / खासदार निधीतून रुपये ५ लक्ष दिलेले आहे. इतर दोन ठिकाणी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे असे तीन ठिकाणी कामे झालेली असल्याचे स्पष्ट होते. आमदार / खासदार निधी वापरण्यासाठी जे निकष लावून नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले त्याच धर्तीवर नगरसेवक स्वेच्छानिधी वापरण्यात यावा. त्वरित कार्यवाही करण्यात यावी. सुतगिरणीच्या परिसरात विभागीय क्रीडा संकूलाचा वापर अनुज्ञेय आहे का जर असा वापर बदल असेल तर सभागृहासमोर असा बदल मंजूर करून घेणे अपेक्षित आहे का.

**सहा. संचालक न. र. :** दिनांक १८-०४-२००१ रोजी विकास योजना मंजूर झालेली आहे. विकास योजनेतील निवासी वापरामध्ये क्रीडा संकूल अनुज्ञेय आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम अन्वये सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर प्रारुप विकास योजना प्रसिध्द करून सूचना व हरकती मागविण्यात आल्या. सुनावणी देण्यात आली. कलम ३० खाली शासनास सादर केले व कलम ३१ अन्वये शासनाने मंजूर केले.

**मा. सभापती :** विकास योजना भाग नकाशा व शासन राजपत्राची प्रत देण्यात यावी.

**मा. आयुक्त :** असलेला विकसित झोन बदलणे अशी सभागृहाची धारण दिसते. कलम ३१ खाली निवासासाठी ठेवलेल्या भागात हा वापर अनुज्ञेय होतो.

**मा. सभापती :** विकास योजना नकाशामध्ये क्रीडा संकुलासाठी आरक्षण असते का?

**श्री. संजय शिरसाठ :** एम.आय.डी.सी. भागामध्ये ए. पी. आय. कंपनीचे औद्योगिक वापराचे वाणिज्य वापर करायचे किंवा नाही ते ठरवावे. सरकार गेल्यानंतर हे वाणिज्य वापर होईल. वापरामध्ये बदल होतो. अत्यावश्यक सेवा अंतर्गत निवासी वापर बदलत नाही.

**मा. सभापती :** वाणिज्य किती व रेसीडेन्सीयल किती. १०० टक्के निवासी वापरात १०० टक्के वाणिज्य वापर देयक होता का.

**श्री. संजय शिरसाठ :** अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे हे होत आहे. एका लोकप्रतिनिधी विरुध्द दुसरे लोकप्रतिनिधी अनाधिकृत विकास होणार आहे. निवासी वापरा मध्ये क्रीडा संकूल होत आहे. सर्वांची चौकशी होवू द्या. जे जबाबदार असतील त्यांचेवर योग्य ती कार्यवाही होईल. उपस्थित केलेल्या प्रश्नांचे गांभीर्य लक्षात घेवून नंदलाल समितीतर्फे चौकशी करण्यात यावी.

**मा. सभापती :** क्रीडा संकूलकरिता नियोजन प्राधिकरण महानगरपालिका आपल्यकडे नकाशे यावेत या संदर्भात दक्षता घेण्यात यावी. नाहरकत प्रमाणपत्रासाठी

सक्षम प्राधीकरणाकडे येणे आवश्यक आहे. १००% निवासाची १००% वाणिज्य १०० टक्के वाणिज्याची १०० टक्के निवास वापर देता येते का. दबावाखाली येवू नका. सामान्याला जो नियम आहे तोच लागू करा. वापर बदलायचे असेल तर सक्षम सभेची मंजुरी घ्यावी. या संदर्भात चौकशी करून व अभ्यास करून खुलासा करावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** विषय क्र. ६० या संदर्भात १९७१ पूर्वीचे गावठाण त्यास विकास कर लावण्याची आवश्यकता नाही नियमाने करायचे असते. जो सर्वसाधारण नियम आहे. तोच लागू करावा. स्थायी समिती पुढे आणण्याची काय आवश्यकता एकाला एक आणि एकाला एक असे धोरण चालणार नाही.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** सुतगिरणीने दोन एकर जागा विकली व त्यास कुंपन भिंतही केलेली आहे.

**विषय क्र. ६२ :**

उपआयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहर वासीयांना विविध स्वरुपाच्या प्राथमिक सेवा सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रामध्ये आठ विभागीय कार्यालयाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या विभागीय कार्यालयामार्फत शहरातील साफ-सफाई करणे, करांची वसुली करणे जन्म-मृत्यूची नोंद करणे व तशी प्रमाणपत्रे वितरीत करणे समाज मंदिरे नागरिकांना भाड्याने उपलब्ध करून देणे इत्यादी स्वरुपाची कामे पाहिजे जातात.

विविध कामांसाठी निविदा काढणे, एजन्सीज ठरविणे देखभाल दुरुस्तीचे कामे करणे व त्यावरती नियंत्रण ठेवणे आदी कामे सद्यस्थितीत केंद्रीय पध्दतीने मुख्य कार्यालयातून केली जातात. पर्यायाने शहर वासीयांना मुलभूत सेवा सुविधासाठी व तक्रार निवारणासाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात चकरा माराव्या लागतात. शहराचा वाढता विस्तार पाहता मूलभूत सेवा सुविधा पुरविण्याच्या कामांचे विकेंद्रीकरण होवून अशी कामे विभागीय कार्यालयामार्फत होणे आवश्यक आहे. ही बाब पाहता महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयांची रचना नव्याने खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे.

नागरी सेवा सुविधा पुरविणे, करांची वसुली करणे, विविध प्रकारची प्रमाणपत्र व परवाने देणे, अनाधिकृत बांधकामावरती लक्ष ठेवणे, विभागीय कार्यालयातील कामकाजावर नियंत्रण ठेवणे आदी कामांसाठी खालील प्रमाणे शाखा असाव्यात

**(अ) अतांत्रिक शाखा**
**(ब) तांत्रिक शाखा**

**(अ) अतांत्रिक शाखा :-**

विभागीय अधिकारी हे शाखेचे प्रमुख राहतील. रुपये २५,०००/- पर्यंतचे फुटकळा कामे मंजुरीचे प्रशासकीय अधिकार व रुपये २५,०००/- पर्यंतचे वेतन व देयक पारीत करण्याचे अधिकार विभागीय अधिकारी यांना राहतील. विभागीय अधिकारी यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली विभागीय कार्यालयातील खालील उपविभाग राहतील.

**१) अस्थापना शाखा :-** या शाखेमार्फत खालील प्रमाणे कामे पार पाडली जातील.

१) विभागीय कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांचे सेवाभिलेख अद्यायावत ठेवणे.

२) विभागीय कार्यालयात कार्यरत वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना ३० दिवसापर्यंतच्या अर्जित रजा व नियमित वेतनवाढीची प्रकरणे विभागीय अधिकाऱ्यांसमोर मंजुरीस्तव ठेवणे.
३) कर्मचाऱ्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल अद्यायावत करून मुख्य कार्यालयात अस्थापना विभागाकडे पाठविणे.
४) जन्म-मृत्यू परवाने वितरीत करणे व त्यांचे अभिलेख अद्यायावत ठेवणे
५) बीफ-मटन शॉप्स यांना पशुधन विभागामार्फत वितरीत करण्यात आलेले परवाने विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून वितरीत करणे.
६) शिस्तभंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी प्रकरणे मुख्य कार्यालयातील अस्थापना विभागाकडे सुपर्त करणे.

उक्त प्रकारची कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येतो.

| | | |
|---|---|---|
| कार्यालय अधिक्षक | - | १ |
| वरिष्ठ लिपीक | - | १ |
| कनिष्ठ लिपीक | - | २ |
| चतुर्थश्रेणी कर्मचारी | - | ३ |

**२) लेखा शाखा :-** या शाखेमार्फत खालील प्रमाणे कामे पार पाडली जातात.

१) विभागात दैनंदिन स्वरुपात जमा होणारा कर व इतर स्वरुपाच्या रक्कमांची विहित रजिस्टर्स मध्ये नोंद घेणे.
२) झालेल्या खर्चाच्या शिर्षनिहाय नोंद ठेवणे.
३) कॅश रजिस्टर्स दैनंदिन स्वरुपात अद्यायावत करणे व त्यावर विभागीय अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे.
४) दैनंदिन स्वरुपात जमा झालेल्या रक्कमा दैनंदिन स्वरुपात मुख्यलयातील लेखा विभागात जमा करणे व खर्चाची अद्यायावत माहिती लेखा विभागास कळविणे.
५) रु. २५,०००/- पावेतोच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांची A-१ व रेटलिस्ट मंजुरीचे अधिकारानुसार प्राप्त करणे व त्यांचे प्रस्ताव व देयके उप अभियंता यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी करून ती प्रशासकीय मंजुरीस्तव विभागीय अधिकारी यांच्याकडे पाठविणे.
६) कामे पूर्ण झालेल्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांच्यासंचिका लेखा परिक्षणासाठी मुख्य लेखा परिक्षक यांचेकडे पाठविणे.
७) विभागीय अधिकारी यांनी मंजूर केलेली देयके अदा करणे व त्यांचा हिशोब ठेवणे.
८) मासिक पगार देयके तयार करणे व पगार वितरण करणे तयाचा हिशोब ठेवणे.
९) मुख्यालय लेखा विभागाकडून प्रतीसह विभागाकरिता लागणारी रकमेची मागणी नोंदवून प्राप्त करून घेणे व खर्चाचा ताळमेळ मुख्य लेखाधिकारी यांना सादर करणे.
१०) लेखा विषयक अभिलेखे जतन करणे.

लेखा विषयक कामकाज पार पाडण्यासाठी या शाखे अंतर्गत खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग असेल.

| | | |
|---|---|---|
| उपलेखापाल | - | १ |
| रोखपाल | - | १ |

कनिष्ठ लिपीक - १

**३) कर आकारणी वसुली :-** या शाखेमार्फत खालील प्रमाणे कामे पार पाडली जातात.

१) विभागांतर्गत नव्याने बांधण्यात आलेल्या इमारती तसेच वाढीव बांधकामांवरती करांची आकारणी करणे. प्राप्त आक्षेपावरती सुनावणी घेणेसाठी प्रकरणे कर निर्धारक व यांचे समोर ठेवणे.
२) मालमत्ता व पाणीपट्टी कर मागणीच्या वार्षिक नोटीसा मालमत्ता धारकांना देणे.
३) करांची वसुली करणे.
४) थकबाकी धारकांच्या मालमत्ता जप्त करणे, नळ कनेक्शन खंडित करणे.
५) आलेल्या वसुलीची दैनंदिन माहिती मुख्य कार्यालयात कळविणे.
६) विभागांर्गत समाजमंदिरे भाड्याने देणे व भाडे वसूल करणे.
७) अभिलेख अद्ययावत ठेवणे.
८) विभागांतर्गत महानगरपालिकेच्या सर्व स्थावर व जंगम मालमत्तेचे अभिलेखे ठेवणे व सर्व मालमत्ता संरक्षित ठेवणे.

उक्त कामे पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्ग असेल.

**कर आकारणी**

कनिष्ठ अभियंता - १
दुय्यम आवेक्षक - १
चुतर्थ श्रेणी कर्मचारी - १

**कर वसुली**

वरिष्ठ लिपीक / कर निरिक्षक - ३
कनिष्ठ लिपीक - ३
चतुर्थ श्रेणी कर्मचारी - ३

**४) अनाधिकृत बांधकामे :-** या शाखेमार्फत खालील प्रमाणे कामे पार पाडली जातील.

१) विभागांतर्गतच्या मनपाच्या खुल्या जागांची नोंद ठेवणे व अशा जागांवर अतिक्रमणे होणार नाहीत याबाबत खबरदारी घेणे.
२) विना परवानगा बांधकामे अतिक्रमणे, करणाऱ्यांविरुध्द नियमानुसार कार्यवाही करणे, गुन्हे दाखल करणे, अनाधिकृत बांधकाम, अतिक्रमित बांधकाम मु. प्रा. अधिनियम १९४९ व एम.आर. टी. पी. ॲक्ट १९६६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणे.

उक्त कामे पार पाडण्यासाठी खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग असेल.

उपलेखापाल - १
रोखपाल - १
कनिष्ठ लिपीक - ५

**५) साफसफाई :-** शहराच्या दैनंदिन साफसफाईसाठी प्रत्येक विभागात १ जेष्ठ स्वच्छता निरिक्षक व ३ स्वच्छता निरिक्षक असावेत. रस्त्यांची साफसफाई ड्रेनेजची साफसफाई यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणकानुसार कर्मचारी वर्ग विभागीय कार्यालयांना यापूर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**विभागीय अधिकारी यांना विभागीय कार्यालयातील दैनंदिन स्वरुपाची कामे पार पाडता यावीत यासाठी खालीलप्रमाणे आर्थिक व प्रशासकीय अधिकार देण्यात यावेत.**

**आर्थिक अधिकार :**

१) विभागांतर्गत येणारे रस्ते, जलनिःसारण वाहिन्या, पाणी पुरवठ्या वाहिण्या यांची देखभाल व दुरुस्तीच्या रु. २५,०००/- पर्यंतच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देणे व कामाची देयके अदा करणे.
२) रु. २५,०००/- मर्यादेपर्यंतचे धनादेश विभागीय अधिकारी व उपलेखापाल यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणे.

**प्रशासकीय अधिकारी :**

१) विभागाअंतर्गतच्या वर्ग ३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या ३० दिवसापर्यंत अर्जित रजा व वैद्यकीय रजा मंजूर करणे.
२) विभागाअंतर्गतच्या वर्ग ३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या नियमित वार्षिक वेतनवाढी मंजूर करणे.
३) नव्याने बांधण्यात आलेल्या व वाढीव मालमत्ता वरती कराची आकारणी करणे व त्यास कर निर्धारक व संकलक यांची मान्यता घेणे.
४) कर आकारणी वरील प्राप्त आक्षेपावरती सुनावणी घेण्यासाठी प्रकरणे कर निर्धारक व संकलक यांचेकडे सादर करणे.
५) थकबाकी दाराविरुध्द जप्तीची कार्यवाही करणे.
६) अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, यांच्याविरुध्द कारवाई करणे.
७) झोन क्षेत्रातील महानगरपालिकेचे स्थावर व जंगम मालमत्ता सांभाळणे

**ब) तांत्रिक शाखा :-**

उाअभियंता हे या शाखेचे प्रमुख राहतील. उपअभियंता यांच्या मार्फत खालील कामे पार पाडली जातील.

१) विभागांतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, जलनिःसारण वाहिण्या, यांची देखभाल व दुरुस्ती करणे.
२) यासाठी रु. २५,०००/- पावेतोची अंदाजपत्रके तयार करणे व त्यास तांत्रिक मान्यता देणे कामाची तपासणी करणे प्रशासकीय मान्यतेस्तव संचिका विभागीय अधिकारी यांचेकडे पाठविणे.
३) झालेल्या कामांची देयके तयार करणे व अदायगीसाठी विभागीय आयुक्त यांचेकडे वर्ग करणे.
४) विभागांतर्गतची पद पथावरील विद्युत दिव्यांची देखभाल करणे.

तांत्रिक स्वरुपाची कामे पार पाडण्यासाठी खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग असेल.

| | | | |
|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता | - | २ | |
| दुय्यम आवेक्षक | - | ३ (रस्ते-१, पापु-१, व जलनि-१ ) | |
| विद्युत लाईनमन | - | १ | |
| चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | २ | |

तांत्रिक शाखेमार्फत विद्युत देखभाल व दुरुस्तीची कामे पाहिली जाणार नाहीत तर केवळ पदपथा वरील विद्युत दिव्यांची देखभाल पाहिली जाईल.

**उपअभियंता यांना दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी खालील प्रमाणे अधिकार प्रदान करण्यात येईल.**

विभागाअंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, ड्रेनेज लाईन्सची रु. २५,०००/- पावेतोची देखभाल व दुरुस्तीच्या कामांची अंदाजपत्रके तयार करणे व त्याला तांत्रिक मान्यता देणे.

प्रदान केलेल्या प्रमुख अधिकाराबाबत कार्यवाही :

१) उपअभियंता व विभागीय अधिकारी यांना दिलेले आर्थिक अधिकार हे अंदाजपत्रकामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या देखभाल / दुरुस्तीच्या तरतूदीच्या अधिन राहतील
२) आर्थिक बाबीवर नियंत्रण राहणे करिता दर पंधरा दिवसाला मुख्य लेखाधिकारी यांचेमार्फत तपासणी करण्यात येईल.
प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. संजय शिरसाठ :** प्रशासनाने चांगला निर्णय आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या बद्दल अभिनंदन. परंतु झोन सक्षमीकरण नावाखाली मागेच सर्वसाधारण सभा, स्थायी समिती समोर वारंवार मागणी झाली. विभागीय अधिकाऱ्यांना अधिकार नाहीत. आठ पैकी तीन अतिरिक्त कार्यभारात काम पाहतात. पाच विभागीय अधिकाऱ्यांपैकी चार ची चौकशी चालू आहे. स्थायी समिती, सर्वसाधारण सभेपमुढे प्रस्ताव ठेवण्यात यावा, तहसीलदार, नायब तहसीलदार यांना प्रतिनियुक्तीवर बोलवावे. जर अधिकार दिले तर ते करण्यासाठी सक्षम आहेत का या प्रस्तावात विभाग आयुक्त यांचा उल्लेख नाही झोनल ऑफिसर व त्यांचे अंतर्गत कर्मचारी वृंद हा मोठा विषय आहे. हे समजून घेणे आवश्यक आहे. पुढील बैठकीत ठेवणे योग्य होईल.

**श्री. ईलियास किरमाणी :** उपअभियंता झोनला गेले, विद्युत विभागाचे कर्मचारी झोनला गेले तर कार्यकारी अभियंता यांचेकडे काय राहणार आहे. नागपुर प्रमाणे चौकशी सुरू होईल. विभागीय अधिकारी तक्रारीचे निवारण करीत नाही. प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**मा. आयुक्त :** मी येण्यापूर्वी पासून सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा व अर्थसंकल्पामध्ये देखील सक्षमीकरण करावे याबाबत चर्चा चालू होती. तसेच

संघटनेने अध्यक्ष यांनी देखील विनंती केलेली आहे. याबाबतच चर्चा करून निर्णय घेण्यात यावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिकेचे दैनंदिन काम जनतेचे प्रश्न व समस्या सोडविणे. झोनचे सक्षमीकरण महानगरपालिकेने पूर्वीदेखील योजना राबविलेली आहे. सुरत पॅटर्नचा प्रयोग केला. झोनला झोनल कमिशन म्हणून वर्ग-१ चे अधिकारी दिले होते. विभागीय अधिकारी यांना पाच हजार खर्च करण्याचा अधिकार दिला होता. कनिष्ठ अभियंता, कर्मचारी फर्निचर घेणार मग अंमलबजावणी होणार. कार्यकारी अभियंता, शहर अभियंता, अति. शहर अभियंता, प्रकल्प संचालक, झोनल कमिशनर म्हणून काम करतात. पाच हजार चे अधिकार दिलेले असतांना सुरत पॅटर्न मध्ये त्याची अंमलबजावणी झालेली नाही. प्रशासनाने कसे काम करावे हे ठरविण्याचा अधिकार आयुक्तांचा आहे. आयुक्तांनी ठरविणे तर आम्हाला अधिकार नाही. हरकत नाही. प्रस्ताव आला अनेक अडचणी येत असतात रुपये ५ हजार चे अधिकार दिले त्याचे काय झाले. सविस्तर प्रस्ताव ठेवल्यास प्रत्येक झानेचे आधुनिकीकरण होणार त्यासाठी अर्थसंकल्पात काय तरतूद आहे. कर्मचाऱ्यांची सविस्तर माहिती समोर ठेवलेली आहे. विभागीय अधिकारी यांना प्रशासकीय अधिकारी यांची कामे दिलेली आहे. प्रशासकीय अधिकारी यांचेकडील ६ इमारत निरिक्षक २०-२२ पोलिस शिपाई देखील प्रशासकीय अधिकारी यांचेकडे आहे. चेलीपुरा येथील अतिक्रमण हटवितांना दगडफेक झ ाली. सभागृह पुढे विषय झाला. एक इमारत निरिक्षक देणार संपूर्ण नियंत्रण कसे होईल. पोलिस संरक्षण कसे देणार, जबाबदारी काय राहणार त्यांचे गोपनीय अहवाल कोण देणार. प्रशासकीय अधिकारी, विभागीय अधिकारी वि़ा उपअभियंता वाहने कोठून आणणार जेसीबी काय व्यवस्था होणार पुन्हा एकदा तपासून घेण्यात यावे. परवाने देणे, मटन विक्री, दुकानाचे लायसन दुकानाचे परवाने आज एका ठिकाणी आहे. ज्यांना गरज आहे ते तिथपर्यंत येतात. झोनला दिले तर रोज पेपरला द्यावे लागेल. या दिवशी दुकाने बंद करावी. विद्युत तांत्रिक कर्मचारी गाडीची संख्या लाईनमन, गाडी पाहिजे, गाडीचे समन्वय कसे करणारयाबद्दल टिका टिपणी नाही. निर्णय घेणे अडचणीचे आहे. उपअभियंताची नियुक्त करणार. १८ उपअभियंता आहे. २ विद्युत, २ यांत्रिकी, २ नगररचना असे ६ अभियंता झा ालेत. ४ कार्यकारी अभियंता असून ८ झोनल, ८ उपअभियंता गेले फक्त चारच शिल्लक राहातात. २५ ते ३० कोटीची कामे प्रस्तावित आहेत. ही कामे कोण पाहणार, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांचा आकृतीबंध कार्यक्रम व्यवस्थितीरित्या करण्यात यावा. तुर्त एक झोन पुरते करण्यात यावे त्याचा परिणाम चांगला व्हावा. जनतेचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मा. आयुक्त :** महापालिकेच्या धोरणाबाबत उल्लेख झालेला आहे. आपल्याकडून प्रस्ताव ठेवण्याा बाबत सुचविण्यात आले आहे. हा महानगरपालिकेच्या धोरणाचा भाग आहे मा. सभागृहाने दिलेले निर्देशन आहेत.

**श्री. काशिनाथ कोकाटे** : हा विषय तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

**मा. सभापती :** सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**श्री. प्रल्हाद निमगांवर :** झोन नं. ४ चे विभाजन लवकर करावे. या झोन मध्ये १८ वॉर्ड आहेत.

**मा. आयुक्त :** प्रशासन देखील याबाबतीत गंभीर आहे. पुढच्या बैठकीत ठेवू

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६३ :**

मुख्य समन्वयक संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान तथा प्रकल्प संचालक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, शासन निर्णय नारिवअ/२००३/प्र.क्र.१८/पापु-२१/दिनांक २४-१२-२००३ नमूद केल्याप्रमाणे संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियांना अंतर्गत मिळालेल्या बक्षीसाचा विनियोग कशा प्रकारे करावा याबाबत मार्गदर्शन केलेले आहे. औरंगाबाद मनपाला रु. ५.०० लाखाचा पुरस्कार मिळालेला असून त्याचा विनियोग कशा प्रकारे व्हावा याबाबत चर्चा करून निर्णय घेणेसाठी प्रकरण स्थायी समिती समोर ठेवण्यात येत आहे.

**बक्षिसाच्या रकमेचा विनियोग करण्याची पध्दती.**

१) महानगरपालिकेमधील प्रशासकीय वॉर्डाला अथवा त्या महानगरपालिकेला बक्षीस मिळाल्यास. ते संबधित महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या नावे दिले जाते. असे असले तरी, त्या बक्षीसाच्या रकमेचा विनियोग बक्षीस मिळालेल्या संबंधित क्षेत्रासाठीच होणे आवश्यक आहे. याकरिता संबंधित महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा बोलावून त्या सभेत बक्षीसाच्या रकमेच्या विनियोग बाबत निर्णय घेण्यात यावा. बक्षिसाच्या रक्कमेचा विनियोग खालील अटीच्या आधीन राहून करता येईल.

अ) बक्षिसाच्या रकमेपैकी कमाल २% पर्यंत रक्कम (रु. १०,०००/-) बक्षिस समारंभासाठी आयोजित करावयाच्या कार्यक्रमावर व आनुषांगिक बाबींवर खर्च करता येतील.

ब) बक्षिसाच्या रकमेच्या ५% पर्यंत रक्कम रु. (२५,०००/-) स्वच्छतेशी निगडीत बाबींच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी संबंधित क्षेत्रात खर्च करता येईल.

क) बक्षीसाच्या रकमेच्या ५% पर्यंत रक्कम (रु. २५,०००/-) या अभियानाच्या अनुषंगाने संबंधित क्षेत्राच्या प्रशासकीय व कार्यालयीन बाबीसाठी खर्च करता येतील.

ड) बक्षिसाच्या रकमेच्या कमाल १५% पर्यंत रक्कम (रु.७५,०००/-) संबंधित क्षेत्रातील रहिवाशांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी, खर्च करता येतील असा वैयक्तिक लाभ महिला, विद्यार्थी, युवक व नागरी स्वच्छता योजनेत उत्कृष्ठ काम करणाऱ्या नागरिकांना देण्याचा निर्णय स्थायी समिती घेवू शकेल. वैयक्तिक लाभाच्या योजनेत नागरी स्वच्छतेशी निगडीत बाबी जशा की, पिण्याचे पाणी शुध्दता तपासणी उपकरणे पुरविणे, सफाई उपकरणे, नागरी सुविधांसाठी आवश्यक वस्तू अशा तत्सम स्वरुपाचे असावे. शक्यतो वैयक्तिक लाभ रोख रकमेत देण्याचे टाळावे. रोख रकम देण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतल्यास तो एकूण १५% मर्यादेच्या आंत व प्रति लाभार्थी रु. ३००/- पेक्षा जास्त असू नये.

इ) उर्वरित रक्कम संबंधितास क्षेत्रातील स्वच्छतेशी निगडी सार्वजनिक कामांकरिता खर्च करण्यात यावी यात पाणी शुध्दता तपासणी उपकरणे, किटकनाशक खरेदी, ड्रेनेज

(अंतर्गत व रस्त्यांच्या बाजुची) कचराकुंड्या, वृक्षारोपन, पाणी स्त्रोत स्वच्छता, सार्वजनिक शौचालये बांधकाम / दुरुस्ती /देखभाल व तत्सम बाबींचा समावेश करता येईल.

२) स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करणे. घेण्यात आलेल्या निर्णयानुसार खर्च करून त्यांचे हिशोब ठेवणे व स्थायी समितीला अहवाल सादर करणे. आणि संबंधित यंत्रणांना याबाबत आवश्यक व इतर माहिती सादर करण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्राच्या प्रशासकीय प्रमुखाची आणि अध्यक्षांची राहील.

३) तिसऱ्या फेरी अंतर्गत ज्या प्रशासकीय वॉर्डाची बक्षिसाठी निवड करण्यात आलेले आहे. त्याचे करिता बक्षिसाची रक्कम ठरल्यानुसार खर्च होत आहे. हे पाहण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्तांची राहील व चौथ्या फेरी अंतर्गत बक्षिसांसाठी निवड करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या बाबतीत बक्षिसाची रक्कम ठरल्यानुसार खर्च होत आहे हे पाहण्याची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्तांची राहील.

४) वरील अनुषंगाने महानगरपालिका आयुक्तांनी आपल्या महानगरपालिकेमधील स्थायी समितीचे सदस्य, संबंधित क्षेत्राचे प्रशासकीय प्रमुख आणि अध्यक्षांची विशेष सभा बोलावून आवश्यक मार्गदर्शन व सूचना कराव्यात.

परिच्छेद १(अ) प्रमाणे प्रकल्प संचालक-१ (ब) प्रमाणे अरोग्य वैद्यकीय अधिकारी,१ (क) प्रमाणे उपआयुक्त (प्र)१ (ड) प्रमाणे विभाग ४ व ६ साठी घंटागाड्या खरेदी करणे, १ (इ) प्रमाणे भांडार अधिक्षक तसेच परिच्छेद २ प्रमाणे उपआयुक्त (प्र) यांनी संपूर्ण खर्चाचा हिशोब ठेवावा. व स्थायी समितीला अहवाल द्यावा. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय/नरिवअ/२००३/प्र.क्र.१८/पापु-२१/ दिनांक २४-१२-२००३ नमूद केल्याप्रमाणे संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियाना अंतर्गत मिळालेल्या बक्षिसाचा विनियोग करण्याबाबत शासनाने केलेल्या मार्गदशनाप्रमाणे औरंगाबाद मनपाला मिळालेल्या रक्कम रुपये ५.०० लाखाचे पुरस्काराचा विनियोग करणे करिता परिच्छेद १ (अ) प्रमाणे प्रकल्प संचालक (ब) प्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी, १ (क) प्रमाणे उपआयुक्त (प्र)१ (ड) प्रमाणे विभाग ४ व ६ साठी घंटागाड्या खरेदी करणे, १ (इ) प्रमाणे भांडार अधिक्षक तसेच परिच्छेद २ प्रमाणे उपआयुक्त (प्र) यांनी संपूर्ण खर्चाचा हिशोब ठेवावा. व स्थायी समितीला अहवाल द्यावा. या प्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४ :**

उपआयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा व्यापारी संकूल सादिया मार्केट पैठणगेट औरंगाबाद येथील तळघर पोलिस वाहतुक शाखा, औरंगाबाद शहर यांनी मागणी केल्याप्रमाणे भाडे तत्वावर देणे आहे. महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील एकूण क्षेत्र फळापैकी ७९२९३ चौ. मी. जागा पोलिस वाहतुक शाखा, औरंगाबाद शहर यांना रु. १,३३,३७८/- प्रती माह भाडे आकारून महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीस अधिन राहून तात्पुरत्या स्वरपातील महिन्याच्या कालावधीसाठी करारनामा करून तसेच रु. ५/-

प्रती चौ. मी. प्रती माह याप्रमाणे सेवा शुल्क तसेच मालमत्ता कर व इतर कर नियमाप्रमाणे भरणा करून मागणी केलेली जागा भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. व्यापारी संकूल सादिया मार्केट, पैठणगेट येथील तळघर पोलिस वाहतुक शाखेस ७९२.९३ चौ. मी. जागा द्यायची आहे. रु. १,३३,३७८/- प्रतिमहा भाडे आणि करारनामा करून तसेच रु. ५/- प्रति चौ. मी. प्रति माह सेवाशुल्क आकारण्याचा प्रस्ताव आहे. त्यांना फक्त ५/- रुपये प्रति चौ. मी. प्रतिमहा सेवाशुल्क आकारून तीन महिन्याकरिता भाडे माफ करून नाममात्र रु. १/- भाडे घेवून देण्यात यावे. शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत राहणे गरजेचे आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या संदर्भात मा. आयुक्तांना सर्व अधिकार देण्यात यावेत.

**मा. सभापती :** मागील अनुभव आपण लक्षात घेता सादिया मार्केट मधील जे गाळे आहेत त्याच्या दोन-तीन वेळा निविदा काढून सुध्दा कोणीही घेतलेले नाही शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत राहील.

**श्री. संजय शिरसाठ :** काही भाडे ठेवावे. महापालिकेच्या आर्थिक हिताचा प्रस्ताव आहे. भाडे कशासाठी कमी करायचे? ३००० ते ३५००/- प्रतिमाह भाडे येते.

**मा.आयुक्त :** यात प्रशासनाचे स्पष्ट मत आहे. त्यात बदल होणार नाही. प्रस्तावावर जो निर्णय देण्याऱ्याचा सन्मान करू. परंतु प्रशासनाला भिती हिच आहे की, तीन महिन्याकरिता पुरते राहणार नाही ते तीस वर्षासाठी राहतील.

**मा. सभापती :** माझ्या मते वाहतुक शाखेला वाहने दिली. वायरलेस सेट दिले, क्रेन दिले, शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत राहावी हे मनपाचे कर्तव्य आहे. तीन महिन्याकरिता रु. १/- नाममात्र भाडे आकारण्यात यावे.

**श्री. संजय शिरसाठ :** मनपाच्या हिताचे काही निर्णय आपल्याला घ्यावे लागतील. सहा महिन्यापासून माझ्या वॉर्डात वाहतुक सिग्नल चालू नाही. कॉन्स्टेबल मिळत नाही. मनपाकडे असलेले पोलिस कर्मचाऱ्यावर ४० लक्ष रुपये खर्च करतो. मनपाच्या हिताचा निर्णय घ्यावा. असा निर्णय घेतला तर महानगरपालिकेचे दिवाळे निघेल. यामध्ये योग्य निर्णय घेण्यात यावा.

**मा. सभापती :** निर्णय घेतलेला आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** ठिक आहे. माझे मत नोंदवून घ्यावे. जो निर्णय घ्यायचा तो घेण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार मनपा व्यापारी संकूल सादिया मार्केट पैठणगेट औरंगाबाद येथील तळघर पोलिस वाहतुक शाखा, औरंगाबाद शहर यांनी मागणी केल्याप्रमाणे भाडेतत्वावर देण्यास एकूण क्षेत्रफळापैकी ९१२.९३ चौ. मी. जागा पोलिस वाहतुक शाखा औरंगाबाद शहर यांना नाममात्र रु. १/- (एक रुपया) प्रती माह भाडे आकारून महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीस अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात तीन महिन्याच्या कालावधीसाठी करारनामा करून तसेच रु. ५/- प्रती चौ. मी. प्रतीमाह याप्रमाणे सेवाशुल्क तसेच मालमत्ता कर व इतर कर नियमाप्रमाणे भरणा करून मागणी केलेली जागा भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५ :**

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मे. धूत मोटार्स, अदालत रोड, औरंगाबाद यांनी कंपनीसाठी आयात मालावर जकात कर भरणा करण्यासाठी चालू खाते उघडण्यासाठी परवानगी मागितली आहे. औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४चे नियम २५ नुसार चालू खात्याची सवलत देण्याची तरतूद आहे.

मे. धूत मोटार्स, अदालत रोड, औरंगाबाद यांची जानेवारी २००३ ते डिसेंबर २००३ या कालावधीतील जकात कर भरणा केल्याची रक्कम रुपये १३,१९,१५७/- इतकी आहे. तरी खालील अटी शर्तीच्या अधिन राहून चालू खातेची परवानगी देण्यात येईल.

१) सदर कंपनीकडून रु. ६,००,०००/- बिनव्याजी अनामत ठेवणे.
२) शहराबाहेर विक्री केलेल्या वाहनाचे विक्रीच देयके निवडणूक ओळखपत्रे मासिक विवरण पत्रासोबत जोडणे बंधनकारक राहील.
३) प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेच्या आत विक्री केलेल्या वाहनाचे विवरणपत्र व शहराबाहेर विक्री केलेल्या वाहनधारकांचे निवडणूक ओळखपत्र धनादेशासह सादर करणे बंधनकारक राहील.
४) मनपा हद्दिमध्ये आयात केलेल्या वाहनाची कागदपत्रांची तसेच औरंगाबाद शहराबाहेर विक्री केलेल्या वाहनांच्या कागदपत्रांची तसेच इतर माहिती आवश्यकता भासेल त्यावेळी जकात अधिकारी यांना तपासणी साठी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.
५) आयात वाहनांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर जकातीची देयक रक्कम कमी भरणा केल्याचे आढळून आल्यास व ती रक्कम भरणा न केल्यास अनामत ठेव रकमेतून ती वळती करून घेण्यात येईल. तसेच अनामत रक्कम अपुरी असल्यास आयात वाहनांची अटकावणी करून किंवा मालमत्तेची विक्री करून जकात कराची रक्कम वसूल करण्यात येईल.
६) आयात वाहनावरील मासिक विवरणपत्रात काही अनियमतता आढळून आल्यास चालू खातेची सुविधा रद्द करण्यात येईल.
७) वरील अटी शर्तीचा भंग झाल्याचे जकात अधिकाऱ्यांचे निदर्शनास आल्यास अनामत अदा करून, चालू खाते सुविधा बंद करण्यात येईल व नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
८) वर दर्शविलेल्या अटी शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहेत.

वरीलप्रमाणे मे. धूत मोटार्स, अदालत रोड यांना वरील अटी व शर्तीच्या अधिन राहून चालू खात्याची सुविधा देणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. संजय शिरसाठ :** मे. धूत मोटार्स हे महानगरपालिकेकडे नियमित सर्व करांचा भरणा करतात. त्यांना जकात चालू खातेची सवलत देण्यास मान्यता देण्यात यावी. बिनव्याजी अनामत रक्कम ६ लक्ष ऐवजी ३ लक्ष इतकी करण्यात यावी.

**मा. सभापती :** सदर कंपनीकडून रु. ६ लक्ष ऐवजी ३ लक्ष बिनव्याजी अनामत ठेवण्यात यावी. बाकी अ.क्र. २ ते ८ च्या अटी शर्तीस अधिन राहून जकात चालू खाते उघडण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे. धूत मोटार्स, अदालत रोड, औरंगाबाद यां कंपनीसाठी आयात मालावर जकात कर भरणा करण्यासाठी प्रस्तावातील अ.क्र. १ च्या अटीमध्ये नमूद केलेली र. रु. ६ लक्ष ऐवजी रु. ३,००,०००/- (तीन लक्ष रुपये) बिनव्याजी अनामत ठेवण्यात यावी या दुरुस्तीसह इतर अ.क्र. २ ते ८ या अटी शर्तीस अधिन राहून जकात चालू खाते उघडण्याची परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ६६ :**

कार्यकारी अभियंता (पापु) महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, एन-११ मनपा शाळाने नवजीवन कॉलनी पर्यंत १००,१५०,२००,२५० मी. मी. व्यासाची ए. सी. व सी. आय. जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे.

एन-११/सी-४, एन-११/ ई सेक्टर व जी सेक्टर या भागाचा पाणी पुरवठा हरिसिध्दी पाण्याच्या टाकीवरून करण्यासाठी एन-११ मनपा शाळेपासून ते नवजीवन कॉलनी पर्यंत २५० मी. मी. व्यासाची मुख्य सी. आय. जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे व अंतर्गत १००,१५०,२०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे आवश्यक असल्यामुळे सदरील भागातील ए. सी. व सी.आय. जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट जिवन प्राधीकरण यांचे दरसूची २००४-०५ अन्वये अंदाजपत्रक र. रु. १०,२८,८००/- चे तयार करण्यात आले असून या कामावर होणारा खर्च अर्थसंकल्प २००५-०५ मधील पृष्ठ क्र. १५२ व अ.क्र. २४ वरील ८.५० लाख आणि प.क्र. १५३ व अ.क्र. ५७ वरील ३.०० लाख असे एकूण रु. १०,२८,८००/- चा खर्च होणार आहे. सदरील कामासाठी मा. आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

तरी एन-११ मनपा शाळा ते नवजीवन कॉलनी पर्यंत १००,१५०,२०० व २५० मी.मी. व्यासाची ए. सी. व सी. आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाकरिता अ.क्र. रक्कम रु. १०,२८,८००/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-११ मनपा शाळा ते नवजीवन कॉलनी पर्यंत १००,१५०,२०० व २५० मी. मी. व्यासाची ए. सी. व सी. आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १०,२८,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७ :**

श्री. बी. एम. अंभोरे क. लिपीक म. व .बा. क. समिति (नगर सचिव विभाग) यांनी कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/२००४/३९१ दिनांक १७-०३-०४ अन्वये त्यांची रोखण्यात आलेली देयक वेतनवाढ पूर्ववत चालू करणे बाबत सादर केलेल्या अपीलवर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** अपील मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. बी. एम. अंभोरे क. लिपीक म. व .बा. क. समिति (नगर सचिव विभाग) यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांची कार्यालयीन आदेश क्र.

मनपा/अस्था-१/२००४/३९१ दिनांक १७-०३-०४ अन्वये रोखण्यात आलेली देयक वेतनवाढ पूर्ववत चालू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** श्री. के. एस. नवले, दैनिक वेतन लघुटंकलेक, नगरसचिव विभाग यांना उच्च लघुलेखक, लघुलेखक लघुटंकलेखक या पदापैकी रिक्त झालेल्या पदावर वेतनश्रेणी लागू करून सेवेत कायम करणे बाबत त्यांनी दिलेल्या विनंती अर्जानुसार मंजुरी देण्यात येते.

स. सदस्यांकडून अर्थसंल्पातील लेखाशिर्ष बदलणे बाबत प्राप्त झालेले प्रस्ताव अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे बाबत प्राप्त झालेले प्रस्ताव अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे तसेच विविध कामांसाठी सुधारित तरतूद उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेले विविध प्रभागातील नविन कामे तसेच लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव पुढील प्रमाणे आहेत. स. स. श्री. भगवान रगडे (वॉर्ड क्र. ७) नविन कामे समाविष्ट करणे. स. स. श्री. नासेरखान अ. रहेमान खान कुरैशी (वॉर्ड क्र. ६१)- लेखाशिर्ष बदलणे, स. स. श्रीमती सलमान बानो मिर मो. अली स्वीकृत सदस्या यांचे त्रिवेणीनगर, युनुस कॉलनी येथील ड्रेनेज लाईन बदलणे बाबत आणि मनपा शाळेतील विद्यार्थीनींना गववेशासोबत ओढणी देणे बाबत. स. स. श्री. किशोर तुळशीबागवाले (वॉर्ड क्र. ७८)- लेखाशिर्ष बदलणे स.स. ॲड, सौ. सुवर्णा चंद्रात्रे (वॉर्ड क्र. २४)- लेखा शिर्ष बदलणे, स. स. श्री. रावसाहेब पाटील औताडे (वॉर्ड क्र. ५)- लेखाशिर्ष बदलणे स.स. श्री. मुनाफ शे. यासीन (वॉर्ड क्र. ७५)- लेखाशिर्ष बदलणे, वॉर्ड क्र. २८ मधील अजिक्य हौ. सोसायटी कांचनवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे व सेप्टीक टँक बनविणे, वॉर्ड क्र. ३९ मध्ये डांबरीकरण करणे. नविन कामाकरिता लागणारी तरतूद व वाढीव रक्कम तांत्रिकदृष्ट्या रद्द होणाऱ्या कामातून व बचतीतून वाढीव तरतूद उपलब्ध करणे या प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देण्याचा निर्णय होते.

स. सदस्य श्री. रावसाहेब औताडे पाटील (वॉर्ड क्र. ५) यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार श्रीमती कासाबाई वैजिनाथ औताडे ह्या विद्युत प्रवाह असणाऱ्या मुख्य विद्युत वाहिनी तुटून त्यांचे अपघाती निधन झालेले आहे. त्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांना महापालिकेतर्फे ३० हजाराची आर्थिक मदत देण्यात यावी. त्यास मंजुरी देण्यात येते.

**निर्णय :** नगरसचिव विभागात दैनिक वेतनावर कार्यरत असलेले लघुटंकलेखक श्री. के. एस. नवले यांची पात्रता विचारात घेऊनच प्रशासनाने गठीत केलेल्या प्रशासकीय समितीने त्यांची लघुटंकलेखक या पदावर १९९७ ला नियुक्त केलेली आहे. गेल्या सात वर्षापासून त्यांनी केलेली सेवा विचारात घेता व लघुटंकलेखक या पदावर निवड समितीने केलेली नियुक्ती ग्राह्य धरून उच्चश्रेणी लघलेक/ लघुलेखक/ लघुटंकलेखक यापैकी रिक्त असलेल्या पदावर वेतनश्रेणीवर कायमस्वरुपी नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनो तात्काळ कार्यवाही करावी.

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणे, काही कामासाठी असलेली तरतूद अपुरी असल्याने सुधारित आर्थिक तरतूद करणे संबंधाने ज्या कामाकरिता सुधारित वाढीव आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. अशा कामांकरिता अतिरिक्त शहर अभियंता यांनी तांत्रिकदृष्ट्या रद्द होणारी कामे तसेच इतर कामाचे होणाऱ्या बचतीमधून वाढीव तरतूद उपलब्ध करून या कामाकरिता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतूद | | सुधारित कामाचे नांव व सुधारित आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|
| ७ | ब्रिजवाडी येथे वाचनालय बांधणे- | ५ लक्ष | नवीन काम |
| | ब्रिजवाडी येथे दगडी संरक्षित भिंत बांधणे- | ७ लक्ष | नवीन काम |
| | नारेगांव येथील आ. बसैय्ये बंधू यांचे निधीतून बांधलेल्या सभागृहास व खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे- | ३ लक्ष | नवीन काम |
| | नारेगांव येथील स्मशानभूमीत जाण्याकरिता डांबरी रस्ता करणे- | २.५० लक्ष | नवीन काम |
| | उत्तम जाधव कमान नं. १ पासून ते मधुकर ढगे यांचे घरापर्यंत कॉँक्रीट रोड करणे- | ७ लक्ष | नवीन काम |
| | ब्रिजवाडी येथे स्मशानभूमीत महिलांना बसण्याकरिता शेड बांधणे | १ लक्ष | नवीन काम |
| ६१ | सिल्लेखाना कब्रस्तान विकसित करणे (पान क्र. ११७) | ३ लक्ष | समतानगर कब्रस्तान विकसित करणे ३.०० लक्ष |
| स्वीकृत सदस्य | त्रिवेणीनगर युनुस कॉलनी येथील ड्रेनेज लाईन बदलणे- (रक्कम दर्शविलेली नाही.) मनपा शाळेतील विद्यार्थीनींना गणवेश सोबत ओढणी देणे. | | नवीन काम |
| ७८ | चौराह ते मोतीकारंजा अर्ध गोलाकार गटार | | लाकुड मंडी येथे अर्ध गोलाकार गटार बांधणे. |
| २४ | विकास योजने अंतर्गत संरक्षण अ.क्र. ३५ प्रभाग क्र. २४ बिजलीनगर येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या ऐवजी..... | २ लक्ष | स्वानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेतील खुल्या जागेत जिम्नॅशियन हॉल बांधणे-४ लक्ष (लेखाशिर्ष- विकास इमारती, शाळा, दवाखाने) |
| ५. | पृ.क्र. १२३ अ.क्र.-२ हर्सूल येथील सुलभ शौचालयाची दुरुस्ती करणे | १ लक्ष | फुलेनगरी बौध्द विहार पर पत्रे- १ लक्ष |
| ७५ | पा.क्र १३५ अ.क्र. ११ जुना बायजीपुरा बारी कॉ. भागात कॉँक्रीट रस्ते करणे-३ लक्ष पा.क्र. १३६ अ.क्र. ४३ वॉर्ड क्र. ७५ मधील विविध भागात कॉक्रीट रस्ते तयार करणे १.५० लक्ष पा.क्र. १३७, अ.क्र.६८ प्रभाग क्र. ७५ टाकळकर सो. सा. परिसरात कॉँक्रीट करणे-२.५० लक्ष = एकूण ७.०० लक्ष | ७ लक्ष | |

| | | | |
|---|---|---|---|
| | बारी कॉलनी येथे दगडी गटार बांधणे-२ लक्ष यातून १ लक्ष ओ. टी. साठी देण्यात आलेले आहे. उर्वरित १ लक्ष ची तरतूद वळती करून | | बारी कॉलनी अंतर्गत ड्रेनेजचे काम करणे-१ लक्ष |
| | जसवंतपुरा ते बारी कॉलनी येथे दगडी गटार बांधणे २ लक्ष (पृ. क्र. १७४ अ.क्र. ४) या कामाचे अ. प. १ लक्षचे झाल्यामुळे बचत होणारी १ लक्ष रक्कम वळती करावी. | | कैसर कॉलनी दवाखाना येथे ऑपरेशन थिएटर तयार करणे व इतर कामे करणे-१ लक्ष |
| २८ | १) पृष्ठ क्र. १४१ अ.क्र. ६८ प्र.क्र. ३१ विविध रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे-१२५० लक्ष या रकमेतून र. रु. ३.५० लक्ष वळती करण्यात यावेत. | | नवीन काम :- अजिंक्य हौ. सोसायटी, कांचनवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे व सेप्टीक टँक बनविणे ६.५० लक्ष |
| | २) पृष्ठ क्र. १६९ क्र. २२ दत्तनगर भागात ड्रेनेज लाईन टाकणे-३.०० लक्षचे काम रद्द करण्यात यावे | | |
| ३९ | वॉर्ड क्र. ३८ येथे डांबरीकरणाचे काम करणे - ३ लक्ष | | वॉर्ड क्र. ३९ येथे डांबरीकरणाचे काम करणे -३ लक्ष |

स. सदस्य श्री. रावसाहेब औताडे पाटील (वॉर्ड क्र.५) यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार श्रीमती कासाबाई वैजिनाथ औताडे ह्या विद्युत प्रवाह असणाऱ्या मुख्य विद्युत वाहिनी तुटून त्यांचे अपघाती निधन झालेले असल्याने त्यांना सहानुभूतीपूर्वक ३०,०००/- रुपये आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घांषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ११-०८-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक ११ ऑगस्ट २००४ रोजी मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०४.२० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १. स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २. स. स. श्री.शे.इलियास किरमाणी | -//- |
| ३. स. स. श्री. प्रल्हाद गणपतराव निमगांवकर | -//- |
| ४. स. स. श्री. मोहन मेघावाले | -//- |
| ५. स. स. श्री. मधुकर दामोधर सावंत | -//- |
| ६. स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | -//- |
| ७. स. स. श्री. सोपान भाऊराव पारे | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : अगोदर चर्चा घेण्यात येत आहे. त्यानंतर विषय पत्रिकेवर चर्चा होईल.

**श्री. मधुकर सावंत :** मागील बैठकीत मी ६७ (क) ३ प्रमाणे टेंडर न काढता करण्यात आलेल्या कामाची माहिती या सभेला देणे आवश्यक आहे. अशी मागणी केलेली होती. त्याबाबतीत प्रशासनाला यादी सादर करण्याचे आदेश केले होते. यादी सभागृहासमोर सादर झालेली आहे का?

**मा. सभापती** : टेंडर न काढता झालेल्या कामाची माहिती व त्याची यादी ॲक्टनुसार स्थायी समितला सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार शहर अभियंता यांचे मार्फत झालेल्या कामाची यादी आलेली आहे. त्याची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी. तसेच अति. शहर अभियंता यांनी सुध्दा सन २००३-०४ या आर्थिक वर्षात व २००४-०५ या वर्षात झालेल्या कामाची यादी दिलेली आहे. प्रती सुध्दा सर्व सदस्यांना देण्यात येतील. पाणी पुरवठा विभागाने एकूण १७ कामाची यादी दिलेली आहे. तसेच जलनि:सारण विभागाची ३ कामाची यादी सादर झालेली आहे. सर्व सदस्यांना प्रती दिल्या जातील जात जवळपास ४० कामाची यादी ६७ क (३) खाली जी कामे झाली त्याची यादी दिलेली आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** शहरात बऱ्याच भागात रस्त्यावर खड्डे पडलेले आहे. वृत्तपत्रात फोटो येत आहेत. लाईट बंद आहे. ठिकठिकाणी कचरा साचलेला असल्याचे दिसून येते. शासनाला त्याबाबत खंत नाही. अधिकारी निवांत आहे. मा. आयुक्त सुट्टीवर गेलेले आहे. अशी माहिती मिळाली. उपआयुक्तांची सुध्दा बदली झालेली आहे. बऱ्याच संचिका मंजुरीविना प्रलंबीत पडलेल्या आहत. यावर कोण सहया करणार. खुलासा घेण्यात यावा कोणास अधिकार दिलेले आहेत.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** अधिकाऱ्यांना एका कामासाठी १० वेळेस भेटावे लागते. हो-हो म्हणतात कामे करीत नाही. संचिका ज्या त्या विभागातच थांबून राहतात.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** मा. आयुक्त सुट्टीवर गेलेले आहेत का. खुलासा करण्यात यावा.

**उपआयुक्त (प्र.) :** मा. आयुक्त आज मध्यान्हापूर्व सुट्टीवर गेलेले आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** रजेच्या काळात मा. आयुक्तांच्या जागेवर कोण काम करणार आहे. कोणास अधिकार दिलेले आहेत.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांनी त्यांची रजा शासनास दिलेली आहे. शासनाने रजेच्या कार्यकाळात कोणी काम करायचे त्या संदर्भात आदेश दिले आहे किंवा नाही याची माहिती आलेली नाही. आजच्या सभेच्या कामकाजापुरते उपआयुक्त (म) हे काम पाहतील. उदयापर्यंत कोणास तरी चार्ज देतील.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** आचार संहिता लागण्याची शक्यता आहे. त्यापूर्वी कामाचे कार्यादेश देण्यात यावे कामे सुरु करावे.

**मा. सभापती :** ज्या निविदा प्रसिध्द झाल्या कार्यवाहीसाठी प्रलंबीत असतील. त्या बाबतीत मान्यता घेवून कार्यवाही करण्यात यावी. मा. आयुक्त रजेवर गेले तरी विकास कामावर कोणतीही परिणाम होणार नाही याची दखल घ्यावी. रस्त्यावर खड्डे पडल्याबाबत आपण मुद्दा उपस्थित केला. अति. शहर अभियंता यांनी एकूण ६ झोनची पाहणी केलेली आहे. कार्यवाही सुरु केलेली आहे. या बाबतीत कार्यकारी अभियंता (विदयूत) यांनी सुध्दा शहरात ज्या ज्या भागात पथदिवे बंद आहेत. त्या भागात पाहणी करुन मटेरियल पुरवठा करुन कार्यवाही करावी.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** आपण आदेश करतात परंतु त्यांचे पालन होत नाही.

**अति. शहर अभियंता :** सध्या पावसाचे दिवस आहे. कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. १५ दिवपासून सतत पाऊस सुरु आहे. डांबरीकरण करणे आवश्यक आहे. जेथे जास्त प्रमाणात मोठमोठे खड्डे पडलेले होते तेथे मुरुम टाकुन खड्डे भरुन घेतलेले आहे. १ महिन्यात संपूर्ण झोनमधील पुर्नडांबरीकरणाची जी जी कामे आहेत ती पूर्ण होतील.

**मा. सभापती :** अर्थसंकल्पात जी जी कामे नमुद केलेली आहे. ती तात्काळ घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** सुतगिरणी गारखेडा परिसरात रस्त्यावर मोठमोठ खड्डे पडलेले आहेत. माहिती देवूनही कार्यवाही होत नाही.

**श्री. मधुकर सावंत :** सुतगिरणी गारखेडा परिसरात रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. माहिती देवूनही कार्यवाही होत नाही.

**मा. सभापती :** शहरातील मोठमोठे खड्डे ज्या ज्या भागात असतील तेथील पाहणी करुन व त्या रस्त्याची डांबरीकरणाची कामे असतील तरी करण्याची कार्यवाही व्हावी व इतर खड्डे बुजविण्यात यावे.

**अति. शहर अभियंता :** स. स. श्री निमगांवकर यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे सदरील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी तरतुद आहे. काम होणार आहे. अगोदर कृती आराखडा तयार होईल त्याप्रमाणे कामे हाती घेतली जातील.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** नुसती कार्यवाही होईल असे म्हणून वेळ वाया घालवू नये किती दिवस लागतील कालावधी निश्चित करावा. त्याप्रमाणे खुलासा करावा.

**श्री. मधुकर सावंत :** माहिती प्रमाणे गेल्या ४ वर्षात शहरातील अनेक डागडूजीची कामे केलेली दिसून आले नाही. अमरप्रीत हॉटेल समोरील रस्ता नवीन तयार केला. ४ वर्षापासून त्या रस्त्यावर दुरुस्तीचे काम केलेले दिसून येत नाही.

**अति. शहर अभियंता :** या रस्त्याचे काम रस्ते विकास महामंडळामार्फत घेणार आहे. निविदा काढण्यात आलेली आहे. मुंबई येथील कार्यालयाशी या संदर्भात कार्यवाही केलेली आहे. अमरप्रीत हॉटेल ते बीडबायपास पर्यंत हा रस्ता आहे.

**मा. सभापती** : याबाबत मुंबई कार्यालयाशी संपर्क करुन कार्यवाही कोणत्या स्तरावर आहे. याबाबत पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी. तसेच महानगरपालिका हद्दीतील ज्या ज्या रस्त्यांची कामे होणार आहे. त्याची सुध्दा माहिती सभागृहाला देण्यात यावी. तसेच रस्त्यावरील अनेक पथदिवे बंद असल्याचे स. सदस्यांनी सुचना केलेल्या आहेत. मटेरियल नसल्याचे वारंवार सांगितल्या जाते हे बरोबर नाही. केव्हा मटेरियल मागविणार आहात. कार्यवाही करणार आहात.

**कार्य. अभियंता (वि.) :** १-२ दिवसात वर्क ऑर्डर दिली जाईल. त्यानंतर मटेरियल पुरवठा महानगरपालिकेकडे होईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** गेल्या १५ दिवसापासून महापालिकेच्या कामाविषयी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द होत आहे. एकाच वेळी ३०-३० कामाचे निविदा प्रसिध्द झालेल्या आहे. त्यानुसार प्रत्यक्षात किती विकास कामांना सुरुवात झालेली आहे. सन २००४-०५ या आर्थिक वर्षात दोन आचार संहितेचा कालावधी जाणार आहे. येणाऱ्या दोन-तीन दिवसात विधानसभेची आचारसंहीता लागू होवू शकते. यात शंका नाही. यापूर्वीचे तातडीने लक्ष देवून कामे सुरु करावी. निविदा प्रसिध्द ज्या पध्दतीने वेगाने होत आहे. परंतू त्या पध्दतीने व वेगाने होत आहे. परंतु त्या वेगाने त्या त्या कामांना सुरुवात झालेली दिसून येत नाही. काही ठिकाणी कामे सुरु झालेले असतील परंतु चारही कार्यकारी अभियंता यांचे विभागअंतर्गत येणाऱ्या विकास कामाच्या निविदा प्रसिध्द झालेल्या आहेत. निविदेची अंतीम मान्यता झालेली असेल तर वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत का? याबाबत खुलासा अपेक्षीत आहे.

**मा. सभापती** : बऱ्याच संचिका माझ्या माहिती प्रमाणे मा. आयुक्तांकडे वाटाघाटीसाठी पडून आहेत. किती कामांच्या बाबतीत निविदा काढण्यात आलेल्या आहे. किती सादर केलेल्या आहेत. एजन्सी फिक्सींगसाठी स्थायी समिती समोर यावयाची कामे किती आहे. एजन्सी फिक्सींगसाठी प्रस्ताव येत नाही म्हणून कामास सुरुवात होत नाही. चारही कार्यकारी अभियंत्यांना समिती मार्फत सुचना करण्यात येत आहे की, अशा किती जागा प्रलंबीत आहे की, निविदा प्रसिध्द करण्यासाठी मा. आयुक्तांची सही स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रलंबीत किंवा एजन्सी फिक्सींगसाठी मंजूरी नाही किंवा वाटाघाटीसाठी आहे. सर्वसाधारण सभेने ज्या प्रमाणे अर्थसंकल्प मंजूर केला त्या प्रमाणे नमूद केलेल्या कामाबाबत अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढुन वर्क ऑर्डर देणे आवश्यक आहे. निविदा प्रसिध्द झाल्यानंतर पुढील कार्यवाही होवून वर्क ऑर्डर देणे आवश्यक आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येते. संचिका तयार होते. बऱ्याचशा संचिकेवर चर्चा करावी पाहणी करावी म्हणून रिमार्क येतात. प्रत्येक संचिकेमागे नगरसेवकांना फिरावे लागते. आचार संहिता लागण्याची

शक्यता आहे. ८-१० दिवसात विकास कामे होतील शंका वाटते. लेबर कॉलनीच्या एका कामासंदर्भात त्यावर चर्चा करावी असा शेरा दिले. १५ वर्षापासून काम झालेले नाही. दु:ख वाटते. असा शेरा येणे बरोबर नाही.

**मा. सभापती** : चारही कार्यकारी अभियंता यांना आदेशीत करण्यात येते की, विकास कामे त्या त्या विभागातील जे कार्यकारी अभियंता यांना २.५० लक्ष पर्यंत रक्कमेच्या आतील कामे करण्याचे अधिकार आहे. अशा कामाबाबत जाहीरात प्रसिध्द कार्यवाही करावी जेणे करुन आचारसंहितेच्या अगोदर वर्क ऑर्डर देवून कार्यवाही होईल.

**श्री. मधूकर सावंत :** मा. आयुक्त रजेवर गेलेले आहे. त्यांचा चार्ज तात्काळ कोणाला देण्यात यावा. कोणालाही अधिकार दिले नाही. तात्काळ विभागीय आयुक्तांना कळवावे. संचिकेवर सध्या होतील सर्व कामे मार्गी लागतील.

**मा. सभापती** : लेबर कॉलनी येथील रस्त्या संदर्भात मा. आयुक्तांनी पाहणी करुन घ्यावी म्हणून रिमार्क आहे असे स. सदस्यांचे म्हणणे आहे. आता जे आयुक्त येतील त्यांनी पाहणी केली नाही तर काम तसेच थांबवून राहता कामा नये अशी सभागृहाची मागणी आहे. अशा संचिकेवर रिमार्क आले असतील तर नवीन आयुक्त आल्यानंतर त्या संचिका काढाव्यात.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** ठराविकच स. सदस्यांच्या वॉर्डातीलच संचिकेवर सध्या होतात असे १०,१५ वॉर्ड आहेत. काही सदस्यांच्या वॉर्डात कामेच झालेली नाही.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** एखादया कामाच्या संदर्भात पाहणी करावी म्हणून रिमार्क आलेला असेल व प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर संचिका मंजूर घेण्यास का अडचण येते. पुन्हा चर्चा करावी म्हणून रिमार्क येतात.

**श्री. भाऊसाहेब ताठे** : जे प्रभारी आयुक्त येतील ते संचिकेवर सहया करतील का? हाही प्रश्न निर्माण होतो पाहणी करणार नाही. कोणतीही कामे आता होत नाही असे वाटते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कामे करण्याबाबत ताळमेळ नाही. आचारसंहितेचे दिवस समोर येत आहे. विशेष वार्डात कामे होतात. असा भाग नाही. कार्यकारी अभियंता यांचे विभागामार्फत निविदा उदयापर्यंत निघतील. १३ तारखेपर्यंत काढलेल्या सर्व निविदा फायनल होवून यापुढे जेव्हाही बैठक होईल त्या बैठकीत मंजूरीसाठी मागविण्यात याव्यात. मा. आयुक्तांचा चार्ज कोणत्यातरी अधिकाऱ्याकडे देतीलच स्थायी समितीचा निर्णय मा. आयुक्तांच्या निर्दशनास आणून द्यावा व जेवढया निविदा प्रसिध्द झालेल्या आहेत. त्या सर्व कामाचे वर्क ऑर्डर देण्यात यावे. निश्चितपणे जनतेसाठी विकास कामे होण्याच्या दृष्टीने कार्यवाही व्हावी. ज्या निविदा आणखी उघडल्या असतील त्याही स्थायी समिती समोर तात्काळ मंजूरीसाठी याव्यात. त्यास स्विकृतीसह मंजूरी दयावी. कोणती बाधा येणार नाही. सर्व स. सदस्यांच्या वॉर्डात कामे होतील. यात शंका नाही.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** झोन क्र. ४ चे विभाजन करावे म्हणून कार्यवाही होत नाही. विभाजन केल्यास वसूलीत वाढ होईल. अंमलबजावणी ताबडतोब करावी अशी मागणी आहे.

**मा. सभापती** : अर्थसंकल्पात विकास कामांची नावनिशी तरतुद आहे. जे जे स्थायी समितीच्या मान्यतेने कामे होतील मंजूरी आवश्यक आहे. मा. आयुक्त यांनी रितसर येत्या १३ तारखेपर्यंत ज्या ज्या कामाच्या बाबतीत निविदा प्रसिध्द

केलेल्या आहेत. अशा सर्व कामाचे एजन्सी फिक्सींगचे प्रस्ताव स्थायी समिती समोर पाठवावे. सर्व विकास कामे याच वर्षात पार पाडली पाहीजे. अशी कार्यवाही प्रशासनास करावयाची आहे. मा. आयुक्त रजेवर गेले म्हणून कामे थांबविता येणार नाही. किती निविदा देण्याच्या बाकी आहेत. किती कामाच्या निविदा काढल्या व अंतीम घेऊन स्थायी समिती समोर किती कामाच्या एजन्सी फिक्सींगचे प्रस्ताव येणे बाकी आहे. एजन्सी फिक्सींग घेऊन कार्यादेश देण्याचे किती बाकी आहे. याबाबतचे सविस्तर माहिती प्रशासनाने १३ तारखेला दुपारी ३.०० वाजता बैठक होईल त्या बैठकीत ठेवावी असे आदेश करण्यात येतात. एन-७ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मागविले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कै. वसंतराव नाईक यांचा पुतळा तयार आहे. पुतळा बसविण्याची कार्यवाही प्रशासनामार्फत होणार होती अदयाप झालेली नाही. आचार संहिता लागल्यानंतर पुन्हा तीन महिने ते काम होऊ शकणार नाही. कै. वसंतराव नाईक यांच्या पुतळयाचे अनावरण रितसर घेण्याबाबत येत्या १५ दिवसाच्या आत कार्यवाही व्हावी अशी मागणी आहे. उर्वरीत ज्या काही सोयी सुविधा करावयाच्या त्या करता येतील. एन-७ भागात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्याबाबत महानगरपालिकेकडे एन. ओ. सी. मागविण्यात आलेली आहे. एन. ओ. सी. दिल्यानंतर प्रस्ताव शासनास पाठवावा लागतो. शासनाकडून मंजूरी येते. तेव्हा कार्यवाही होईल. या संदर्भात प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी. कै. वसंतराव नाईक यांचा पुतळा बसविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच झोन क्र. ४ चे विभाजन करण्यासंदर्भातही प्रशासनाने ताबडतोब पावले उचलावी.

**उपआयुक्त (म) :** झोन क्र. ४ चे विभाजना संदर्भात मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय घेतलेला आहे. चर्चा मा. आयुक्तांनी मान्यता घ्यावी लागेल. त्यासाठी आवश्यक लागणारा कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे. मा. आयुक्तांची मान्यता झाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** झोनचे सक्षमीकरण घेणे गरजेचे आहे. झोन क्र. ४ चे विभाजन करण्यासंदर्भात मा. आयुक्तांची मान्यता घेवून प्रशासकीय पातळीवर काय जी तात्काळ कार्यवाही करता येत असेल ती करण्यात यावी.

**श्री. ईलीयास किरमानी :** थर्डपाटी इन्सेपक्शन केव्हा घेतले जाते. तेव्हा थर्डपार्टी इन्सपेक्शन होते तेव्हा स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागते. ठेकेदारावर अन्याय होतो आहे असे वाटते. स्थायी समितीची मान्यता किती रक्कमेपर्यंत होवू शकते तसा रितसर प्रस्ताव स्थायी समिती समोर आला पाहीजे. महानगरपालिकेच्या फंडातून रक्कम दिली जाते. ठेकेदारावर ती रक्कम लावू नये.

**शहर अभियंता :** मुदत संपलेल्या संचिका मा. आयुक्तांकडे सादर केलेल्या आहे. अगोदर कामांना मंजूरी झालेली होती. याबाबत विधी सल्लागार यांचेकडे सल्ला घ्यावा लागेल.

**मा. सभापती :** थर्ड पार्टी इन्सपेक्शन करण्याबाबत प्रशासन निर्णय घेऊ शकते का? अशी कार्यवाही कायम करावयाची असेल तर, तसा प्रस्ताव स्थायी समिती समोर यावयास पाहीजे कमी दराच्या निविदेस ही अट लादण्यात येवू नये.

**श्री. इलियास किरमाणी :** तापडीया नाट्यगृहाबाबत आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : मागील बैठकीत संदर्भात कॅव्हेट दाखल करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

**विधी सल्लागार :** तापडीया नाट्यगृहाच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. दिवाणी न्यायालयाचे जैसे थे चे आदेश आहेत. कॅव्हेट दाखल केलेले आहे. अंतीम सुनावणी पर्यंत जैसे थे चे आदेश दिलेले आहेत.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** प्रेरणानगर येथील महानगरपालिकेच्या जागेवर बांधकाम होत आहे. जागा महानगरपालिकेच्या नावावर नाही.

**मालमत्ता अधिकारी :** या संदर्भात तपासणी केलेली आहे. नगररचना विभागाकडून ती जागा मालमत्ता विभागाकडे हस्तांतरण करण्यात आलेली नाही. नगररचना विभागाकडे माहीती असेल.

**सहा. संचालक न. र. :** प्रेरणानगर रेखांकनातील खुली जागा मुळ जमिन मालकाने महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन दिलेली नाही. तथापी मिळकत पत्रिकेवर रेखांकनाची खुली जागा अशी नोंद होती या प्रकरणी सन १९९३ पासून नगर भूमापन अधिकारी यांचेकडे महानगरपालिकेच्या नावांवर पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तथापी महानगरपालिकेशी संदर्भ न करता नगर भूमापन अधिकारी यांनी खाजगी मिळकत धारकाचे नांव मिळकती पत्रिकेवर लावलेले आहे. या प्रकरणी अपील करण्यास्तव प्रस्ताव विधी विभागास पाठविण्यात आला आहे.

**सभापती** : ले-आऊट मधील खुली जागा आहे. ताबा महानगरपालिकेचा नाही. महानगरपालिकेने मोबदला दिला महानगरपालिका प्रशासनाने आतापर्यंत का नाव लाऊन घेतले नाही.

**विधी सल्लागार :** काल परवाच माझ्याकडे त्याबाबतचे कागदपत्र आलेले आहे. जे आहे ते अपूर्ण आहे. ले-आऊट मंजूरी व इतर संपूर्ण कागदपत्र संचिकेत असणे आवश्यक आहे. संपूर्ण कागदपत्र मिळाल्यावर तपासणी करुन अहवाल सादर करण्यात येईल.

**सहा. संचालक न. र. :** जे कागदपत्र नाही ते तपासून घेऊन संपूर्ण माहीती देण्यात येईल.

**मा. सभापती** : ओनरशिप संदर्भातील कागदपत्र असतील. ती सर्व विधी सल्लागार यांचेकडे पाठवावे. जी कागदपत्रे त्या जागेच्या संदर्भात आवश्यक आहे. ती टी. पी. विभागाने दयावे. त्या जागेबाबत नोंदणी कृत दस्तऐवज उचललेला असेल तेही कागदपत्र देण्यात यावे.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** महानगरपालिकेच्या अनेक ठिकाणी खुल्या जागा असते. सर्वेक्षण करावे. बऱ्याच भागात अतिक्रमण झालेले आहे.

**मा. सभापती** : महानगरपालिकेच्या ओपनस्पेसच्या जागा किती आहेत. त्यांचे सर्वेक्षण करुन पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** सर्वेक्षणाचे काम सुरु केलेले आहे. जसेजसे सर्वेक्षण होत राहील तशी माहिती सादर करण्यात येईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** ५-६ बैठकीत होर्डींग बाबत चर्चा झालेली होती. आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे.

**मा. सभापती** : संबंधिताचा करार रद्द करणार होते. प्रशासनाने खुलासा करावा. सध्या संचिका कोठे आहे.

**मालमत्ता अधिकारी :** मुख्यलेखाधिकारी यांचेकडे संचिका आहे.

**मा. सभापती** : मुख्यलेखाधिकारी यांनी तात्काळ होर्डींग्ज बाबतची संचिका मा. आयुक्तांकडे पाठवावी. करारनामा रद्द करावा. सेक्युरिटी डिपॉझीट आहे. त्यातून महानगरपालिकेची रक्कम वसूल करावी.

**मुख्यलेखाधिकारी :** सेल ॲड संदर्भातील संचिका माझ्या विभागात प्राप्त झालेली आहे. यात महानगरपालिकेच्या तोटा किती होतो हे तपासले जाणार आहे. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होवू नये म्हणून ज्या अटी शर्ती दिल्या होत्या त्याचे पालन होणे आवश्यक आहे. प्रशासनाने पूर्ण कार्यवाही केलेली आहे. संचिकेत ज्या नोंदी होत्या त्यानुसार कार्यवाही झाली की नाही ते तपासण्या करण्यासाठी २ दिवस लागतील. महानगरपालिकेच्या पूर्ण रक्कम संबंधिताकडून वसूल केली जाईल. ४०-५० हजार पर्यंत एक एक होर्डींग आहेत. उदयाच संचिका मा. आयुक्तांकडे पाठविण्यात येईल.

**श्री. सोपान पारे :** श्री. रवि देशमुख, क. लिपीक (दैनिक वेतन) यांना कामावर घेऊन जेष्ठता यादीत समावेश करण्याबाबतचे आदेश आपण मागील बैठकीत देण्यात आलेले होते. त्यांचे नाव जेष्ठता यादीत घेण्यात आलेले होते. त्यांचे नाव जेष्ठता यादीत घेण्यात आलेले आहे का? खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : या संदर्भात कार्यालयीन टिप्पणी प्रशासनाच्या माध्यमातून स्थायी समितीला सादर करण्यात आलेली आहे. श्री. रविंद्र देशमुख यांना महानगरपालिकेच्या सेवेत दैनिक वेतनावर घेण्याबाबत दिनांक २१-०७-२००४ च्या स्थायी समितीच्या बैठकीत निर्णय घेतलेला होता व त्यांनी महानगरपालिकेच्या अस्थापनेवर क. लिपीक म्हणून काम केलेले आहे. जेष्ठता यादीत त्यांचे नाव २८ क्रमांकावर आहे. म्हणून त्यांचे नाव जेष्ठता यादीत घेण्यात यावे व त्याचा अहवाल पूढील बैठकीत सादर करावा म्हणून निर्देश देण्यात आले होते. त्यांना मुदतवाढ देण्यासंदर्भात दिनांक १०-०४-२००३ च्या अर्जानुसार संचिका सादर करण्यात आली होती. तथापी त्यावर काहीच निर्णय प्रशासनाने घेतलेला नाही. या प्रकरणाची संचिका मा. आयुक्तांकडे दोन वेळेस मुदत वाढ मिळण्यासंदर्भात मंजुरीसाठी गेली असता संबंधित अर्जदार यांची दिनांक १०-०९-१९९८ पासूनचा सेवापट सादर करण्याचे आदेशीत केले होते. श्री. रविंद्र देशमुख यांना मुदतवाढ देण्याबाबतची कार्यवाही अंतर्गत असलेली संचिका सादर केलेल्या संचिकेसोबत जोडण्यात येवून दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांचे सेवापट तयार करीत नसल्याबाबत सादर करण्यात आले आहे. या सभागृहाने दिनांक २१-०७-२००४ रोजीच्या स्थायी समितीमध्ये जे निर्देश दिले होते. सहाय्यक आयुक्त-१ श्री. जाधव यांनी सभागृहात टिप्पणी सादर केलेली आहे. टिप्पणी अंती व जो अहवाल सादर केला तो लक्षात घेता विशेष बाब म्हणून स्थायी समितीच्या कक्षेत कामाची निकड आणि गरज लक्षात घेता रविन्द्र देशमुख यांना दैनिक वेतनावर ६ महिन्यासाठी पदस्थापना आदेश देण्यात येते. तसेच त्यांचे नांव जेष्ठता यादीत समाविष्ट करण्याबाबत तात्काळ कार्यवाही प्रशासनाने करावी असे आदेश करण्यात येत आहे.

**श्री. ईलीयास किरमाणी :** शहागंज भागातील हिंदी विदयालय ते सरदार वल्लभाई पटेल रस्त्यावर दुभाजकाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. या रस्त्यावर दुभाजक बांधल्यास वाहतूकीस अडथळा निर्माण होईल. शहागंज येथे

रमजानचे महिन्यात मीना बाजार सुध्दा भरत असतो. फार पूर्वी पासून मेटॅडोर व इतर वाहने येथे उभी राहतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होईल. म्हणून स्टेट टॉकीज समोरील रस्त्यावर रस्ता दुभाजक टाकण्यात येवू नये अशी विनंती आहे. तेथील बरेचसे व्यावसायिक व नागरीकांची देखील तशी मागणी आहे.

**अति. शहर अभियंता :** वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी रस्ता दुभाजक टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

**मा. सभापती** : अनेक वर्षापासून त्या ठिकाणी मेटॅडोर तसेच इतर चारचाकी वाहने उभी राहतात. त्याची तेथे पुर्वी पासून पार्कींग आहे. जनतेच्या सोयीसाठी निर्णय घ्यावा लागेल. सन्माननीय सदस्यांनी तशा भावना व्यक्त केलेल्या आहेत.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** प्रशासकीय जे मत होते ते अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे. तेथील वस्तुस्थिती व जनतेची गरज लक्षात घेता या शहरात असे फार कमी रस्ते आहे की, जैसे फुटपाथ आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला फुटपाथ बांधलेले आहे. पुन्हा रस्ता दुभाजक टाकल्यास दीड मीटर जागा लागेल त्यामुळे रस्ता कमी होणार आहे. हा डी. पी. रस्ता आहे. याची कल्पना आहे. तरी सुध्दा जनतेची गरज लक्षात घेता या रस्त्यावर दुभाजक टाकण्यात येऊ नये. त्यास स्थगिती घ्यावी. तसेच या सबंधी वाहतूक पोलीस विभागास सुध्दा कळविण्यात यावे.

**मा. सभापती** : या कामाच्या बाबतीत जनतेची सोय, गरज लक्षात घेता तेथील जे वाहतुकदार आहे. त्यांचे सोयीकरीता म्हणजेच जनतेच्या सोयीसाठी शहागंज येथील हिंदी विदयालय ते सरदार वल्लभभाई पटेल पुतळयापर्यंतच्या रस्त्यावर जे दुभाजक टाकण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. तात्काळ सदर काम रद्द करण्यात यावे असे आदेश स्थायी समितीच्या माध्यमातून देण्यात येतात.

**विषय क्र. ६८ :**

मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन वित्त विभागाने शासन निर्णय क्र. मभवा/११०४/प्र. क्र. ५/सेवा-९/मुंबई दि. १९ जुलै २००४ पासून राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतनावर दयेय असणाऱ्या एकूण महागाई भत्यापैकी मुळ वेतनाच्या ५०% एवढा महागाई भत्ता त्यांच्या मुळ वेतनामध्ये विलिन करण्यात यावा व या बाबतची कार्यवाही खालील प्रमाणे करण्यात यावी.

दिनांक ०१-०८-२००४ रोजी राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या ६१% एवढा महागाई भत्ता सध्या अनुज्ञेय आहे. तेव्हा राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांचे वेतनपत्रक तयार करतांना त्यांच्या मूळ वेतनाच्या ५०% एवढा महागाई भत्ता त्यांच्या मूळ वेतनामध्ये दि. ०१-०८-२००४ पासून विलीन करण्यात यावा. मात्र तो वेतनपत्रामध्ये प्रत्यक्षात मुळ वेतनामध्ये न दर्शविता. महागाई वेतन (Dearness Pay (DP) म्हणून स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा. सदर महगाई वेतन (Dearness Pay (DP) वेतनावरील भत्ते, संयुक्त बदली अनुदान (Transfer Grant) शासकीय निवासस्थानाचे अनुज्ञाप्ती शुल्क (Licence Fee) C. G. H. S. ची मासिक वर्गणी, भविष्य निर्वाह निधी वर्गणी आणि अनुज्ञेय भत्यांच्या परिगणनेसाठी मुळ वेतनामध्ये विलिन केल्याचे गृहीत धरुन त्याप्रमाणे परिगणना करण्यात यावी. तथापी सदर महागाई वेतन (Dearness Pay (DP) हे रजा प्रवास सवलतीसाठी (L.T.C.) किंवा दौऱ्यावर असतांना किंवा बदली झाली

असल्यास दयेय होणाऱ्या प्रवास भत्ता/दैनिक भत्ता (T.A./D.A.) अथवा शासकीय निवासस्थानाची अनुज्ञेयता ठरवितांना विचारार्थ घेण्यात येऊ नये. या बाबीच्या परिगणनेसाठी संबंधित अधिकारी/कर्मचारी याचे फक्त मुळ वेतन विचारार्थ घेण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणेची अंमलबजावणी केल्यास मासिक रु. १७.०० लाख इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २००४-०५ या आर्थिक वर्षात वेतन व भत्ते साठी ठेवण्यात आलेल्या तरतुदीतूनच हा खर्च भागविण्यात येईल त्यासाठी वाढीव तरतुद करण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या अस्थापेनवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना फायदे देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर

**मा.सभापती** : आजच्या बैठकीतील सर्व प्रस्तावास स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. महागाई भत्ता देण्या संदर्भात इतर महानगरपालिकेत काय परिस्थिती आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** नियमाप्रमाणे प्रस्ताव आला असला तरी किती महानगरपालिकेमध्ये अंमलबजावणी झालेली आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** तशी माहिती इतर महानगरपालिकेकडून घेतलेली नाही. यासाठी अर्थसंकल्पात १०% आर्थिक तरतूद केलेली असते.

**मा. सभापती** : शासनाचे निर्देश आहेत. त्यामुळे प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ०१-०८-२००४ रोजी त्यांच्या मुळ वेतनाच्या ६१% एवढा महागाई भत्ता सध्या अनुज्ञेय आहे. मनपा अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतनपत्रक तयार करतांना त्यांच्या मुळ वेतनाच्या ५०% एवढा महागाई भत्ता त्यांच्या मुळ वेतनामध्ये दि. ०१-०८-२००४ पासून विलिन करण्यास शासन निर्णयानुसार फायदे देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र. १८ गजानन महाराज मंदीर ते त्रिमूर्ती चौक (हेडगेवार हॉस्पीटल पर्यंत) रुंदीकरण फुटपाथ डांबरीकरण करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००२-०३ च्या दरसुची रक्कम रुपये ११,८९,५३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च २००४-०५ या आर्थिक वर्षात नवीन डांबरीकरण या लेखा शिर्षकाखाली करण्यात येणार आहे.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ११,८२,५३०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. १८ गजानन महाराज मंदीर ते त्रिमूर्ती चौक (हेडगेवार हॉस्पीटल पर्यंत) रुंदीकरण फुटपाथ डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ११,८२,५३०.०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७० :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र. पद्मपुरा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००२-०३ च्या दरसुची रक्कम रुपये १४,९८१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च २००४-०५ या आर्थिक वर्षात पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात येणार आहे.

**संवाद :**

**मा. सभापती** : मंजूर करण्यात येत आहे त्वरीत निविदा प्रस्तावति कराव्यात.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** यापूर्वी केव्हा डांबरीकरण झालेले होते त्याची सुध्दा तपासणी झाली पाहीजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पद्मपुरा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १४,९८,१००.०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५ :**

मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मा. आयुक्त यांची मान्यता दिनांक २६-०७-२००४ अनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या शाळेतील व विभागीय कार्यालयातील नादुरुस्त फर्निचर दुरुस्त करणे आहे. त्यास्तव मा. आयुक्त यांची मान्यता दिनांक १५-०३-२००४ अनुसार उप अभियंता श्री. अफसर सिध्दकी यांचे अधिपत्याखाली एकूण ११ गट बनविण्यात आले. ज्यामध्ये ११ अभियंत्याची व ११ समुह समन्वयकाची नेमणूक करण्यात आली पैकी श्री. एम. एम. खान शाखा अभियंता यांनी अदयाप पावतो अहवाल दिलेला नाही. इतर १० गटांनी जो अहवाल दिलेला आहे. त्यानुसार एकुण ७० शाळेतील व ५ विभागीय कार्यालयातील नादुरुस्त फर्निचर दुरुस्तीसाठी प्रत्यक्ष पाहणी करुन खालील प्रमाणे अंदाजपत्रक सादर केले आहे.

| अ. क्र. | अभियत्यांचे नांव | एकुण शाळा/विभागीय कार्यालय | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस. एस. चामले | शाळा ८ विभागीय कार्यालय क्र. १ | रु. १,३२,२३७.०० |
| २ | श्री. अरुण मोरे | शाळा ८ | रु. १,२०,०७७.०० |
| ३. | श्री. खान अ. फारुक | शाळा ६ विभागीय कार्यालय क्र. २ | रु. २,७९,०४६.०० |
| ४. | श्री. बी. के. परदेशी | शाळा ८ विभागीय कार्यालय क्र. २ | रु. २,०७,४१५.०० |
| ५. | श्री. इखलास अहमद सिद्दीकी | शाळा ८ विभागीय कार्यालय क्र. ६ | रु. २,०३,९०७.०० |
| ०६. | श्री. एस. ओ. पवार | शाळा ७ विभागीय कार्यालय क्र. ८ | रु. १,३३,७२९.०० |
| ०७. | श्री. एन. व्ही. भाले | शाळा ६ विभागीय कार्यालय क्र. ४ | रु. ९७,२५०.०० |
| ०८. | श्री. एस. बी. राठोड | शाळा ८ | रु. १,३६,३९८.०० |
| ०९. | श्री. एम. एम. खान | अहवाल अप्राप्त | |
| १०. | श्री. के. पी. पवार | शाळा ७ | रु. २८,८५०.०० |
| ११. | श्री. के. एस. काटकर | शाळा ४ | रु. २,५४,५४५.०० |
| | | **एकुण रु.** | **रु.१३,९३,४४६.००** |

उपरोक्त प्रमाणे एकुण ७० शाळेतील व ५ विभागीय कार्यालयातील नादुरुस्त टेबल/खुर्च्या/आलमाऱ्या डयूवेल डेस्क साहीत्य दुरुस्तीसाठी रु. १३,९३,४४६/- एवढा अंदाजीत खर्च येणार आहे. सदरील फर्नीचर दुरुस्तीसाठी अंदाजपत्रकीय तरतुद आहे.

**संवाद :**

**श्री. मधूकर सावंत :** अतिशय चांगला प्रस्ताव या सभागृहासमोर आलेला आहे. उपअभियंता श्री. अफसर सिध्दीकी यांचे नियंत्रणाखाली ११ कर्मचारी नियुक्त केले होते. त्यापैकी १० कर्मचाऱ्यांनी अहवाल सादर केला या ११ कर्मचाऱ्यापैकी श्री. एम. एम. खान यांनी अहवाल दिलेला नाही का दिला नाही. माझ्या माहिती प्रमाणे त्यांनी खोडसाळ भावनेतून हा अहवाल मुद्दामहून दिलेला नाही. त्यांना शिक्षा म्हणून दंड का आकारण्यात येवू नये.

**उपअभियंता** : या संदर्भात दुरुस्ती होण्याची शक्यता आहे, हा अंतीम नाही. २९ मे २००४ रोजी सर्व अहवाल दिले आहे. एम. एस. खान यांना पत्र देण्यात आलेले होते. कर आकारणी विभागात त्यांना काम देण्यात आले होते ते सर्वेक्षण करुन अहवाल देवू शकले नाही.

**श्री. मधुकर सावंत :** गरीब लोकांची मुले महानगरपालिकेच्या शाळेत जातात. जाणीव ठेवावी कामचुकार अधिकाऱ्यांवर कार्यवाही होणे अपेक्षीतच आहे. त्यांना ५००/- दंड आकारण्यात यावा तसे रुलींग आपण द्यावे. हेतू परस्पर त्यांनी अहवाल दिलेला नाही.

**श्री. इलीयास किरमाणी :** स. सदस्य पोटतिडकीने प्रश्न मांडतात. प्रस्तावातच नमूद केले. त्यांनी अहवाल दिला नाही. चर्चेची दखल श्री. एम. एम.खान यांनी दखल घेऊन त्यांचे वर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : श्री. एम. एस. खॉन यांचेकडून समाधानकारक उत्तर मिळत नसेल व अहवाल देत नसतील तर प्रशासनाने त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करावी.

**श्री. मधुकर सावंत :** ११ अधिकाऱ्यांनी सर्वेक्षणाचे काम दिले होते. त्यापैकी सर्व अधिकाऱ्यांकडे इतर विभागातच अतिरिक्त चार्ज असतांना त्यांनी अहवाल दिले. फक्त एम. एम. खॉनच का अहवाल देऊ शकलो नाही. दंडात्मक कार्यवाही करावी रुलींग दयावे.

**मा. सभापती** : प्रशासन याबाबत चौकशी करेल उत्तर समाधानकारक नसेल तर प्रशासन कार्यवाही करेल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** चौकशी प्रश्न येतोच कुठे प्रस्तावात नमूद आहे. त्यांनी अहवाल दिला नाही. एका अर्थाने त्यांचेवर जी जबाबदारी सोपविली तरी त्यांनी पार पाडली नाही. त्यांचेवर काय कार्यवाही करायची हा अधिकारच या सभागृहाला आहे. त्यानुसार निर्णय घ्यावा आताच खुलासा आला उपअभियंता यांनी त्यांना पत्र दिले तर ते काम करण्याच्या मनस्थितीत नाहीत का?

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. समाधानकारक उत्तर जर देत नसतील तर प्रशासन त्यांचेवर कार्यवाही करेल.

**श्री. मधुकर सावंत :** एक कामचुकार अधिकारी आहे. स्पष्ट प्रस्तावावरुन दिसून येते. जबाबदारी सोपविली पार पाडत नाही. हा काही स. सदस्यांचा प्रस्ताव नाही. प्रशासकीय प्रस्ताव आहे. गरीब जनतेची मुले महानगरपालिकेच्या

शाळेत शिक्षण घेतात आणि ९०-९०% शाळेत फर्निचर व इतर साहित्य व सोयी सुविधा देण्याची/करण्याची आवश्यकता आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** झाने क्र. ७ मध्ये फर्निचर नाही. प्रस्तावात सुध्दा तेथे फर्निचर पाहीजे म्हणून नमूद नाही कोणी नागरीक गेला, नगरसेवका गेले तर बसण्यास खुर्च्या नाहीत.

**उपअभियंता न. र. :** ठीक आहे मी स्वत: जावून झोन क्र. ७ मध्ये पाहणी करतो. जे जे साहीत्य आवश्यक आहे. ते यामध्ये नमूद केले जाईल.

**मा. सभापती** : ठीक आहे. उपअभियंता श्री. सिध्दीकी यांनी झोन क्र. कार्यालयात जाऊन जे साहीत्य तेथे आवश्यक आहे ते या प्रस्तावानुसार नमूद करावे. श्री. एम. एम. खॉन यांना पुन्हा देण्याची कार्यवाही करावी म्हणून कळवावे. त्यांना दिलेली जबाबदारी त्यांनी निश्चितपणे पार पाडली नसेल तर प्रशासनाने चौकशी करुन तसा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. १४,६५,०००/- या रक्कमेस (संदर्भा जा. क्र./मनपा/भांडार/२००४/२६९ दिनांक ०२-०९-२००४ मंजूरी देण्यात येते. प्रस्ताव सादर.

**ठराव :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या शाळेतील व विभागीय कार्यालयातीन नादुरुस्त फर्निचर दुरुस्त करणेच्या कामासाठी एकूण ७० शाळेतील व ५ विभागीय कार्यालयातील नादुरुस्त टेबल/खुर्च्या आलमाऱ्या/डयूवेल डेस्क इ. साहित्य दुरुस्तीसाठी सुधारीत रक्कम रु. १४,६५,४४६/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नक्षत्रवाडी मनपा जागेवर शाळेसाठी नविन इमारत बांधणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००२-०३ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये १९,९९,९११/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यात मा. आयुक्त महोदय, यांनी मुळ संचिकेतील पान क्र.९ परिच्छेद क्र. २४ व २६ च्या एकूण ३ मुद्दे मधील अटीच्या राहुन दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात अ. क्र. २२ पान क्र. ११६ वर रुपये १०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली असून, चालू वित्तीय वर्षातील १०.०० लक्ष रुपये खर्चास मान्यता राहील.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १९,९९,९११/- कार्योत्तर मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नक्षत्रवाडी मनपा जागेवर शाळेसाठी नविन इमारत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १९,९९,९११/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३ :**

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला अहे की, चिकलठाणा येथील नवीन व्यापारी संकुलामधील एकूण ७ दुकाने ३० वर्षाच्या भाडेतत्वावर देणेबाबत कार्यालयातर्फे जाहीर निविदा सुचना दि. ०५-०६-२००४ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात येवून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. दुकान क्र. १ क्षेत्रफळ १३.७५ आधारभुत भाडे रु. १५८०/- प्रतिमाह

यामध्ये दुकान क्र. १ करीता एकूण ४ कोऱ्या निविदा विक्री झाल्या असून, १ सिलबंद निविदा प्राप्त झाली आहे. श्री. सर्जेराव गाजरे यांची एकाच निविदा प्राप्त झाली असून, त्यांनी आधारभूत भाडे रक्कम रु. १५८०/- प्रतीमाहपेक्षा जास्त रक्कमेची रु. २०२१/- प्रतीमाह असा दर दिला आहे.

१. दुकान क्र. २ क्षेत्रफळ १३.७५ आधारभुत भाडे रु. १५८०/- प्रतिमाह

दुकान क्र. २ करीता एकूण २ कोऱ्या निविदा विक्री झाल्या आहेत. या निविदेमध्ये श्री. साहेब सर्जेराव गाजरे यांची एकच सीलबंद निविदा प्राप्त झाली असून, आधारभुत रक्कम रु. १५८०/- प्रतीमाह पेक्षा जास्तीचा दर रु. १७५१/- असा आहे.

३. दुकान क्र. ३, ४, ५, ६ व ७ या पाच दुकानासाठी एकही कोरी निविदा विक्री झालेली नाही.

तरी अनुक्रमांक १ व २ प्रमाणे निविदा महानगरपालिकेचे विहीत अटी शर्तीच्या अधिन राहून मान्य करण्यास्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील नवीन व्यापारी संकुलामधील दुकाने ३० वर्षाच्या भाडेतत्वावर देण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी आधारभूत भाडेपेक्षा जास्तीची असलेली दुकान क्र. १ साठी श्री. सुभाष सर्जेराव गाजरे यांची प्रती माह रु. २०२१/- आणि दुकान क्र. २ साठी श्री. साहेब सर्जेराव गाजरे यांची प्रतीमाह रु. १७५१/- या दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. उर्वरीत दुकान क्र. ३ ते ७ ही पाच दुकाने भाडेतत्वावर देण्याकरीता तात्काळ पुनर्निविदा काढाव्यात असे सर्वानुमते ठरले.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४ :**

अग्निशमन विभागासाठी फायर एक्सटेंशन लॅटर खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता मा. आयुक्तांनी दि. ०२-१०-२००२ रोजी दिलेली आहे. तसेच सर्वसाधारण सभेने विषय क्र. ४/२ दि. १८-१२-०२ नुसार मान्यता दिलेली आहे. प्रशासकीय मान्यतानंतर राज्यस्तरीय वर्तमानपत्रातुन जाहीर निविदानुसार तीन निविदा विकल्या पैकी दोन निविदा प्राप्त झाल्या.
१. ब्रिजवाशी हायटेक उदयोग लि. मुंबई (२) फायर एस्केप इंजिनियरिंग मुंबई निविदा अटीतील पुर्तता एकाच निविदाधारकाने केल्याने एकच निविदा उघडली. एकाच निविदेमुळे फेर निविदा राज्यस्तरीय वर्तमानपत्रातुन देवून दर मागविलेले आहेत. त्यानुसार कमी दराची निविदा फायर एस्केप इंजिनियरींग कॉरपोरेशन मुंबई यांची आहे. मा. आयुक्तांनी दि. २४-

०५-२००४ रोजी चर्चा अंती ३% दर एकूण रु. ४२,६८०/- कमी केलेले आहे. सध्या अग्नीशमन दलातील ४ लॅडर पंधरा वर्षापूर्वीचे असून, त्यांचे आयुष्य संपलेले आहे. फायर लॅडरची अत्यंत आवश्यकता आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | १०.५ मीटर | ०८ नग | किंमत रु. ८४,३९०/- | एकूण रु. ६,७५,१२०/- |
| २. | १५.३२ मीटर | ०५ नग | किंमत रु. २,०५,६४०/- | एकूण रु. १०,२८,२५०/- |

उपरोक्त दरानुसार फायर एक्स्टेशन लॅडरच्या १३ नगाची एकुण किंमत रु. १७,०३,३२०/- खर्च येणार आहे. त्यासाठी आर्थिक तरतुद रु. ५०/- लाख ठेवलेली आहे. फायर एस्केप इंजिनियरिंग कॉरपोरेशन मुंबई यांनी दोन फायर एक्स्टेशन लॅडर टेस्टींगसाठी एक वर्षापूर्वी अग्निशमन दलात जमा केलेल्या आहेत. उपरोक्त कंपनीने फॅक्टरी तपासणी वेळी अग्रीम टेस्टींग साहीत्य आयातीसाठी देण्याची विनंती केली आहे.

करीता फायर एस्केप इंजीनियरींग कार्पोरेशन मुंबई यांच्याकडुन फायर एक्स्टेशन लॅडर १९ नग रु. १७,०३,३२०/- खरेदी करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागासाठी फायर एक्सटेंशन लॅडर खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार कमी दराची निविदा फायर स्केप इंजीनीयरींग कार्पोरेशन मुंबई यांची असल्यामूळे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | १०.५ मीटर | ०८ नग | किंमत रु. ८४,३९०/- | एकूण रु. ६,७५,१२०/- |
| २. | १५.३२ मीटर | ०५ नग | किंमत रु. २,०५,६४०/- | एकूण रु. १०,२८,२५०/- |

या दरानुसार फायर एक्स्टेशन १३ नग मे. एस्केप इंजिनियरींग कार्पोरेशन मुंबई यांचेकडून उपरोल्लेखीत दराने खरेदी करण्यास तसेच याकरीता लागणाऱ्या एकूण र. रु. १७,०३,३२०/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र. ३० पैठणरोड उड्डाण पुलाखालील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी र. रु. ९,३७,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सन २००८-२००५ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित कामासाठी शहरी भागात रस्त्याचे पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षाखाली रु. ५.०० लाख एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर रस्ता अत्यंत खराब झालेला असून, सदर रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे गरजेचे आहे. " नविन डांबरीकरण करणे " लेखा शिर्षाखाली प्रभाग क्र. ३३ मनीषा कॉलनी समाधान कॉलनी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे (अ. प. रक्कम रु. ३.०० लाख) व प्रभाग क्र. ३० मध्ये विविध भाग येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे (अं. प. रक्कम रु. १.५० लाख) येथील अस्तित्वातील रस्त्याची स्थिती चांगली असल्यामुळे सदर कामे रद्द करुन या कामाची तरतुद प्रस्तावित कामाकरीता वळती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ३० पैठणरोड उड्डाण पुलाखालील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,३७,९००/- चे अंदाजपत्रकास तसेच अर्थसंकल्पात ५ लक्ष तरतुद असल्यामुळे या कामासाठी नवीन डांबरीकरण करणे लेखाशिर्षाखाली प्रभाग क्र. ३३ मनीषा कॉलनी समाधान कॉलनी येथील रस्त्याचे व प्रभाग क्र. ३० मध्ये विविध भाग येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे (अ.प. रक्कम रु. ३.०० लाख व प्रभाग क्र. ३० मध्ये विविध भाग येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे ही कामे रद्द करुन या कामाची तरतुद प्रस्तावित कामाकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, १००% विकास खर्च भरलेल्या नाथपुरम अजिंक्य, राघवेंद्र हौ. सोसायटी इत्यादी व दत्तनगर भाग येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचा समावेश महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००४-२००५ मध्ये नविन डांबरीकरण या लेखाशिर्षामध्ये केलेला आहे. (पान क्र. १३ व अ. क्र. १/९३ आर्थिक तरतुद रु. ४.०० लक्ष) या कामाचे लेखाशिर्ष बदलून नवीन डांबरीकरण ऐवजी शहरी भागात रस्त्याचक पुनःडांबरीकरण करणे या लेखा शिर्षामध्ये समावेश करण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १००% विकास खर्च भरलेल्या नाथपुरम अजिंक्य, राघवेंद्र हौ. सोसायटी इत्यादी व दत्तनगर भाग येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे लेखाशिर्ष बदलुन नविन डांबरीकरण ऐवजी शहरी भागात रस्त्याचे व पुनः डांबरीकरण करणे या लेखा शिर्षामध्ये समावेश करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, खालील दर्शविलेल्या कामाच्या नावांसमोर कामासाठी लागणाऱ्या रक्कमेनुसार इतर कामातून अर्थ तरतुद वळती करणे लेखाशिर्ष वळते करणे इत्यादी बाबी मंजूरीच्या विचारार्थ सादर.

| अ. क्र. | कामाचे नांव | उपलब्ध आर्थिक तरतुद | कामासाठी लागणारी अं. प. रक्कम | वळती करण्यात आलेली किंवा प्रस्तावित लेखाशिर्ष अ. क्र./जा. क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | सेंट्रल नाका ते रोशनगेट रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे. | ५.०० लक्ष | २४.१९ लक्ष | नविन डांबरीकरण मध्ये पा. क्र. १३० अ. क्र. २ नुसार पार्वती को. ऑप हौ. सो. व श्रीकृष्णनगर हर्सुल येथील डांबरी करणासाठी अनुक्रमे ५ लक्ष रु. ५ लक्ष असे एकूण १० लक्ष वळती करणे तसेच पा. क्र. १३२ अ. क्र. ४१ प्रमाणे साईनगर एन-६ सिडको येथे म्हाडा कॉलनी विविध ठिकाणी डांबरीकरण | श्रीकृष्णनगर व पार्वती हौ.सो. येथे घरे झालेली नसल्यामुळे सदर ठिकाणी पुढील वर्षी डांबरीकरण करण्यात येईल. तसेच साईनगर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | करणेसाठी ठेवलेली रु. ५ लक्ष वळती करणे तसेच उर्वरीत ४.२० लक्ष पुनःडांबरीकरण मधील इतर कामातील बचतीमधून वळती करणे. | म्हाडा कॉलनी येथील रस्त्याची स्थिती चांगली असल्यामुळे हे काम पुढील वर्षी करता येईल. |
| २. | प्रभाग क्र. ३४ सतीष मोटर्स ते विवेकानंद चौक रस्त्याचे पुनःडांबरी करण करणे. | ५ लक्ष | ९.९२ लक्ष | नवीन डांबरीकरण मध्ये पा. क्र. १३१ अ. क्र. ३६ नुसार बाराभाई ताजिया ते म. ज्योतीबा फुले पुतळयापर्यंत डांबरीकरण करणे र. रु. २ लक्ष वळती तसेच पुनःडांबरीकरण मध्ये पा. क्र. १३८ अ. क्र. १३ नुसार सांस्कृ. मंडळ ते खडकेश्वर वाचनालय रस्त्याचे डांबरीकरण करणे रु. ३ लक्ष वळती | दोन्ही रस्त्याची स्थिती चांगली असल्यामुळे सदरील काम पुढील वर्षात घेण्यात येईल. |

**संवाद :**

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कामासाठी लागणारी अंदाजपत्रकीय रक्कम २४.२९ लक्ष दिलेली आहे. श्रीकृष्णनगर हर्सुल येथील डांबरीकरणासाठी रक्कम वळती करण्याचा प्रस्ताव समोर आलेला आहे. हर्सुल रस्त्याचे काम सा. बा. विभागामार्फत होते. मयुरपार्ककडे जाणारा होणे गरजेचे आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** हर्सुल येथील रस्त्याचे काम करण्यात येऊ नये.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** यात पारदर्शकता ठेवून काम करावे अशी विनंती आहे.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. ताठे यांचेशी चर्चा करुनच या कामाबाबत संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** हर्सुल भागाकडे जाणारा रस्ता हा डी. पी. प्लॅन मधील मंजूर रस्ता आहे. मयुरपार्क येथील रहिवाश्यांनी बेटरमेंट चार्जेस आहेत. त्या भागात २ ते २.५० लाख जनता राहत आहे. कामाच्या बाबतीत उदघाटन करण्यात येते. आजची स्थिती अशी आहे. पावसाळयाचे दिवस असल्याने चिखल असतो. वाहनातून उत्तरल्यानंतर अर्धा कि. मी. लोकांना पायी जावे लागते. डी.पी. प्लॅननुसार रस्ता होणे आवश्यक आहे. रस्ता होत नाही. तोपर्यंत तेथील नागरीकांना सोयी सुविधा देणे अडचणीचे होते. प्रथम डीपी प्लॅननुसार रस्ता करण्यात यावा. भविष्यात जर आगीची घटना घडली तर अग्नीशमन विभागाची गाडी तेथपर्यंत जाऊ शकणार नाही. अशी स्थिती आहे. तेथील नागरिकांचा विचार करावा.

**अति. शहर अभियंता :** रस्ता ताब्यात नाही. तेथे नऊ सोसायटीज झालेल्या आहेत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सर्व्हे नं. १५४, १५६, १६० संदर्भात पर्चेस नोटीस नुसार कार्यवाही करता येते. अदयापपर्यंत कार्यवाही का केली नाही. आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. मयुरपार्क भागात भविष्यात काही अनुसुचित घटना घडल्यास कोण जबाबदार राहील. २५ लक्ष रुपये ड्रेनेज लाईनचे कामासाठी तसेच लाईट व इतर व्यवस्था करण्यात येतील म्हणून उदघाटन केले नारळ फोडले असे असतांना प्रशासनाने अदयाप कामाला सुरुवात केलेली नाही.

पर्चेस नोटीस नुसार दोन दिवसात कार्यवाही होऊ शकते. आपण आपल्या अधिकारात मंजूर करावी.

**मा. सभापती** : प्रशासनास काय अडचण आहे. खुलासा करावा.

**सहा. संचालक न. र. :** संयुक्त मोजणी करणे आवश्यक आहे. तरच काम करता येईल.

**मा. सभापती** : विशिष्ट असे काम लक्षात घेवून तातडीने कार्यवाही का करण्यात आलेली नाही? त्वरीत कार्यवाही केली असती तर आजपर्यंत जागेची मोजणी झाली असती. ताबडतोब ज्या काही बाबींची आवश्यकता आहे. त्याची कागदपत्र पुरवावी व सत्वयर म्हणजे तात्काळ मोजणी करणे आवश्यक आहे. मोजणी करुन घेण्यात यावी व कामाला सुरुवात करावी.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** जागा संपादन केलेली आहे. संबंधितांनी रक्कम घेतलेली आहे. १० वर्षात कार्यवाही करण्यात आलेली नाही. आता संयुक्त मोजणी करावी लागेल असे उत्तर देणे बरोबर नाही. चर्चा करायची कशासाठी?

**मा. सभापती** : यासंबंधी येत्या १३ तारखेच्या बैठकीत अहवाल द्यावा लेखी अहवाल उपलब्ध होत असेल तर, उपआयुक्तांनी दयावा. तात्काळ जागेची मोजणी करुन तेथील कामाचा प्रस्ताव आणावा. या प्रस्तावाच्याबाबत स. सदस्य श्री. ताठे यांचे समाधान झाले तर लेखी संमती प्राप्त झाल्यानंतरच प्रस्तावानुसार काम करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ. क्र. १ सेंट्रल नाका ते रोशनगेट रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता लागणारी रु. २४.१९ लक्ष अंदाजपत्रकीय तरतुद उपलब्ध व्हावी तसेच अ. क्र. २ प्रभाग क्र. ३४ सतीश मोटार्स ते विवेकानंद चौक रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे यासाठी लागणारी ९.९२ लक्ष तरतुद उपलब्ध व्हावी. याकरीता त्या-त्या नावाचे नावांसमोर रकाना क्र. ५ मध्ये दर्शविल्यानुसार इतर लेखाशिर्षामधून रक्कम वळती करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

परंतू अ. क्र. १ च्या कामाकरीता हर्सुल आणि एन-६ सिडको येथील ज्या कामांच्या रक्कमा वळती करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्यासंबंधित सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेवून, त्यांच्याशी चर्चा करुन रक्कम वळती करण्या संदर्भात संबंधित नगरसेवकांकडून लेखी संमती प्राप्त झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात यावी. या अटीवर मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : प्रशासनामार्फत गाळे भाडे तत्वावर देण्यासंदर्भात प्रस्ताव प्राप्त आहेत. तसेच वाचनालयासाठी जागा भाडयाने घेण्याचा प्रस्ताव आहे. स. सदस्यांकडून अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलणे बाबतचे प्रस्ताव प्राप्त आहेत. अर्थसंकल्पातील लेखशिर्ष बदलणे तसेच विविध कामासाठी सुधारीत तरतुद उपलब्ध करुन देण्याचे अनुषंगाने स. सदस्यांकडून प्राप्त झालेले विविध प्रभागातील नवीन कामे तसेच लेखाशिर्ष बदलणे बाबतचे सर्व प्रस्तावांना मंजूरी देण्यात येते. ऐनवेळचे सर्व प्रस्तावांना स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ७८:**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.चेलीपूरा येथील न. भू. क्र. १०,३३९ सार्वजनिक मस्जीद, व्यवस्थापक मराठवाडा वक्फ बोर्ड या कार्यालयाच्या इमारतीमधील १०X२० आकाराचा हॉल मनपा वाचनालयासाठी रुपये ९००/- प्रतीमाह भाडे

प्रमाणे घेणे आहे. या व्यतिरक्त मिळकत धारकाने मालमत्ता कर व पाणीपट्टी व मनपाचे इतर कर कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील. तसेच महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून वाचनालयासाठी भाडयाने घेणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, .चेलीपूरा येथील न. भू. क्र. १०,३३९ सार्वजनिक मस्जीद, व्यवस्थापक मराठवाडा वक्फ बोर्ड या कार्यालयाच्या इमारतीमधील १०x२० आकाराचा हॉल रुपये ९००/- प्रती माह भाडे प्रमाणे महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून मनपा वाचनालयासाठी भाडयाने घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९ :**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ८० फूट रूंद रस्ता उत्सव मंगल कार्यालय ते अमरप्रीत हॉटेल या रस्त्याने न. भू. क्र. १४८१३ ही मिळकत बाधित असून, बाधित क्षेत्र संयुक्त मोजणीनुसार ३९९७.५ चौ. मी. आहे. सदर बाधित क्षेत्र संपादनासाठी भूसंपादनाची कार्यवाही विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांचे मार्फत सुरु असून, त्यांनी मोबदल्यांच्या २/३ रक्कम रुपये १.५० कोटी महानगरपालिकेस मागणी केलेली आहे. सबब प्रकरणात विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक यांचे मार्फत सुरु असून, त्यांनी मोबदल्यांच्या २/३ रक्कम रुपये १.५० कोटी महानगरपालिकेस मागणी केलेली आहे. सबब प्रकरणात विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचे मार्फत भुसंपादन करावयाची झाल्यास २.२५ कोटी लागेल. करीता सदर बाधित क्षेत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७७ अन्वये खाजगी वाटाघाटीने संपादन करावयाचे ठरविले असून, देण्यात येणाऱ्या मोबदल्यातून विकास नियंत्रण नियमावलीनुसार सर्व वजावटी जाता रु. ८०,३६,९१९/- ( ऐंशी लाख छत्तीस हजार नऊशे एकोणावीस) मोबदला दयेय्य होईल. तसेच उक्त बाधित क्षेत्र खरेदीखत करुन घ्यावयाचे आहे. त्यासाठी (खरेदी खतासाठी) रुपये ११,९९,२५०/- (रुपये अकरा लाख नव्यानऊ हजार दोनशे पन्नास) अपेक्षीत आहे. प्रकरणात विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांच्या मार्फत भुसंपादन केल्यास महानगरपालिकेस आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे वरील प्रमाणे खाजगी वाटाघाटीने भुसंपादन कार्यवाही करण्याचे ठरविले आहे.

करीता वरील प्रमाणे मिळकत धारकाने मोबदला रक्कम मान्य केल्यास खरेदीखत करुन मोबदला देणेबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ८० फूट रूंद रस्ता उत्सव मंगल कार्यालय ते अमरप्रीत हॉटेल या रस्त्याने न. भू. क्र. १४८१३ ही बाधीत मिळकतीचे एकूण बाधित क्षेत्र ३९९७.५ चौ. मी. खाजगी वाटाघाटीने संपादन करण्यास तसेच देण्यात येणाऱ्या मोबदलातुन विकास नियंत्रण नियमावलीनुसार सर्व वजावटी जाता रुपये ८०,३६,९१९/- (ऐंशी लाख छत्तीस हजार नऊशे टोकन वीस) मोबदला संबंधितास दोन टप्यात देण्यास त्याच प्रमाणे उक्त बाधित क्षेत्राच्या खरेदी खतासाठी लागणाऱ्या रुपये ११,१९,२५०/- (रुपये अकरा लाख नव्यानऊ हजार दोनशे पन्नास) च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८० :**

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला की, अध्यक्ष स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा व क्रिडा मंडळ औरंगाबाद यांनी मो. छत्रपतीनगर गारखेडा येथील सांस्कृतीक सभागृह भाडेतत्वावर मिळावे म्हणून विनंती अर्ज केलेला आहे. त्या अनुषंगाने सदर संस्थेची सर्व कागदपत्रे तपासणी केली. सदर संस्थेस अंतर्गत खेळांचे प्रशिक्षण व क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणे करीता भाडेतत्वावर सभागृह देणे योग्य राहील. सदर संस्थेस प्रतीमाह रुपये ९,२७१/- (नऊ हजार दोनशे एकहात्तर रुपये) भाडे आकारण्यात येईल. तसेच सेवाशुल्क रु. ५/- प्रती चौरस मीटर प्रतीमहा घेणे योग्य त्याच प्रमाणे मालमत्ता कर व इतर कर नियमाप्रमाणे होणे योग्य. सदर सभागृह महानगरपालिकेच्या प्रचलित अटी व शर्ती अनुसार तीन वर्षाच्या भाडे करारनाम्यावर देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** छत्रपतीनगर गारखेडा येथील सांस्कृतिक सभागृह बांधल्यापासून मनपास आजपर्यंत काहीच उत्पन्न मिळालेले नाही. ही संस्था अंतर्गत खेळांचे प्रशिक्षण देणे व क्रिडा स्पर्धांचे आयोजनासाठी या हॉलचा वापर करणार असल्यामुळे मासिक भाडे ९,२७१/- ऐवजी ९००/- रुपये प्रतिमहा करण्यात यावे.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी सुचना केल्यानुसार प्रतिमहा रुपये ९००/- भाडे आकारण्यात यावे. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा व क्रिडा मंडळ औरंगाबाद यांना छत्रपतीनगर गारखेडा येथील सांस्कृतीक सभागृह संस्थेस प्रतिमहा रुपये ९,२७१/- ऐवजी प्रतीमहा रु. ९००/- भाडे आकारणी करण्यास तसेच सेवा शुल्क रु. ५/- प्रती चौरस मीटर प्रति महा, मालमत्ता व इतर नियमाप्रमाणे घेवून महानगरपालिकेच्या प्रचलित अटी व शर्तीनुसार तीस वर्षाच्या भाडे करारनाम्यावर देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१ :**

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सचिव साधना आयडीयल मल्टी एज्युकेशन सोसायटी ऑफ औरंगाबाद भिमपूरा, उस्मानपुरा येथील अभ्यासिका केंद्र भाडे तत्वावर मिळावे म्हणून विनंती अर्ज केला आहे. त्या अनुषंगाने सदर संस्थेची सर्व कागदपत्रे तपासणी केली. सदर संस्थेचे शैक्षणिक कार्यासाठी सदरचे अभ्यासिका केंद्र भाडेतत्वावर देणे योग्य राहील. सदर संस्थेस प्रतिमहा रुपये १७१०/- भाडे आकारण्यात येईल. तसेच सेवा शुल्क रु. ५/- प्रति चौरस मीटर प्रतिमहा घेणे योग्य. त्याप्रमाणे मालमत्ता इतर कर नियमाप्रमाणे घेणे योग्य. सदर अभ्यासिका केंद्र महानगरपालिकेच्या प्रचलित अटी व शर्ती अनुसार तीस वर्षाच्या भाडे करारझाल्यावर देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सचिव, साधना आयडीयल मल्टी एज्युकेशन सोसायटी ऑफ औरंगाबाद यांना भिमपूरा, उस्मानपूरा येथील अभ्यासिका केंद्र प्रतिमहा रुपये १७१०/- भाडे आकारुन तसेच सेवाशुल्क रु. ५/- प्रति चौरस मीटर प्रतिमहा आणि मालमत्ता व इतर कर नियमाप्रमाणे घेवून सदर अभ्यासिका केंद्र महानगरपालिकेच्या प्रचलित अटी व शर्ती

अनुसार तीस वर्षाच्या भाडे करारनाम्यावर देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार ४५ मीटर रुंद रस्ता आंबेडकरनगर सिडको ते पिसादेवी या रस्त्याचे सर्व्हे क्र. १२३/पैकी मौजे हर्सुल ही मिळकत अंशतः बाधीत असून बाधित क्षेत्र असून बाधित क्षेत्र ७८०.९० चौ. मी. आहे.

मिळकत धारकाने उक्त बाधित क्षेत्र सोडून उर्वरीत क्षेत्रावर मंजूरी प्रस्ताव दाखल केलेला असून, या कार्यालयाने मिळकत धारकास तात्पुरते रेखांकन मंजूरी दिलेली असून तात्पुरते मंजूरीनुसार मिळकत धारकास जमीन विकास शुल्क बँकेत जमा केला असून, विकास खर्च उक्त ४५ मीटर रुंद रस्त्याने बाधित क्षेत्राच्या मोबदल्यात समायोजित करुन होणेसाठी विनंती अर्ज केला आहे. त्यानुसार मिळकत धारकास वरील बाधित क्षेत्राचा मोबदला सर्व वजावटी जाता रुपये ३,२९,००३/- (रुपये तीन लाख एकोणऐंशी हजार तीन फक्त) निश्चित केला आहे. तरी मिळकत धारकाकडून विकास खर्च रुपये ३,०८,२८०/- (अक्षरी रुपये तीन लाख आठ हजार दोनशे ऐंशी फक्त) आकारणी केलेली आहे. सबब वरीलप्रमाणे मोबदला रक्कम घेवून विकास खर्च वजा जाता (३,७९,००३-३,०८,९८०=रुपये ७०,७९१/-) मिळकत धारकास द्यावे लागतील. तत्पुर्वी बाधित क्षेत्र मिळकतधारकाने नोंदणीकृत दस्तऐवज करुन ७/१२ वर महानगरपालिकेचे नांव लावून देणे बंधनकारक आहे. अंतीम रेखांकनाच्या वेळी होणाऱ्या संभाव्य क्षेत्र बदलास अधिन राहून मोबदला समयोजीत करण्यात येईल.

करीता वरील प्रमाणे विकास खर्च समायोजीत करुन उर्वरीत मोबदला हितसंबंधितास देणेबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार ४५ मीटर रुंद रस्ता आंबेडकरनगर सिडको ते पिसादेवी या रस्त्याचे सर्व्हे क्र. १२७/पैकी मौजे हर्सुल या बाधित मिळकतीचे बाधित क्षेत्र ७८०९० चौ. मी. क्षेत्राचा मोबदला सर्व वजावटी जाता रुपये ३,७९,०००/- (रुपये तीन लाख एकोणऐंशी हजार तीन फक्त) निश्चित केल्यानुसार मिळकत धारकाकडून विकास खर्च रुपये, ३,०८,२८०/- (अक्षरी रुपये तीन लाख आठ हजार दोनशे ऐंशी फक्त) वसुल करावयाचे असल्याने वरील प्रमाणे मोबदला रक्कम घेवून विकास खर्च वजा जाता (३,७९,००३-३,०८,९८०=रुपये ७०,७२३/-) मिळकत धारकास बाधित क्षेत्र मिळकत धारकाने नोंदणीकृत दस्तऐवज करुन ७/१२ वर महानगरपालिकेचे नांव लावून दिल्यानंतर अंतीम रेखांकनाच्या वेळी होणाऱ्या संभाव्य क्षेत्र बदलास अधिन राहून मोबदला समायोजित करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३ :**

सर्वसाधारण सभेने उपआयुक्त, प्रकल्प संचालक, उदयान अधिक्षक नगरसचीव संचालक (प्राणी संग्राहालय) या पदाकरीता पुढील वेतनश्रेणी रु. १०६५०/- ते १६५००/- मंजूर करुन विभाग प्रमुख म्हणून मान्यता प्रदान केलेली आहे. सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपआयुक्त, प्रकल्प संचालक, उदयान अधिक्षक नगरसचीव संचालक (प्राणी संग्राहालय) या पदाकरीता पुढील वेतनश्रेणी रु. १०६५०/- ते १६५००/- ही वेतनश्रेणी लागू करण्यास तसेच सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांकडून अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे बाबत प्राप्त झालेले प्रस्ताव. अर्थ संकल्पातील लेखाशिर्ष बदलणे तसेच विविध कामांसाठी सुधारीत तरतुद उपलब्ध करुन देण्याचे अनुषंगाने सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेले विविध प्रभागातील नविन कामे तसेच लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव पुढील प्रमाणे आहेत. स. स. श्री. काशिनाथ कोकाटे वॉर्ड क्र. ४९, श्री. किशोर शिंदे (पाटील) वॉर्ड क्र. ३८ नवीन कामाकरीता लागणारी तरतुद व वाढीव रक्कम तांत्रिकदृष्ट्या रद्द होणाऱ्या कामातून व बचतीतून वाढीव तरतूद उपलब्ध करणे या प्राप्त असलेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देण्याचा निर्णय होते.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामाचे लेखाशिर्षात बदल करणे, काही कामांसाठी असलेली तरतुद अपुरी असल्याने सुधारीत आर्थिक तरतुद करणे संबंधाने ज्या कामाकरीता सुधारीत वाढीव आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. अशा कामांकरीता तांत्रिकदृष्ट्या रद्द होणारी कामे तसेच इतर कामांचे होणाऱ्या बचतीमधून वाढीव तरतुद उपलब्ध करुन या कामाकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| वार्ड क्र. | कामाचे नांव अर्थसंकल्पातील तरतुद | सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद |
|---|---|---|
| ४९. | प्रभाग क्र. ४९, एन-७ म्हाडा कॉलनी येथे मोकळया जागेत संरक्षित भिंत बांधणे-२लक्ष (पृ. क्र. १२३ अ. क्र. ५१) | वॉर्ड क्र. ४९ मध्ये वृक्षारोपण करणे. २ लक्ष. |
| | गल्ली क्र. ११ येथे कॉक्रेटींग करणे-२ लक्ष (पृ. क्र. ११३ अ. क्र. ४४) | एन-७, एफ सेक्टर येथील खुल्या जागेत कॉक्रेटींग करणे-२ लक्ष |
| | वॉर्ड क्र. ४९ मध्ये डांबरीकरण करणे-४ लक्ष मधून २ लक्ष कॉक्रेटींगसाठी वळती करणे. | वॉर्ड क्र. ४९ येथे कॉक्रेटींग करणे-२ लक्ष<br>वॉर्ड क्र. ४९ येथे डांबरीकरण करणे-२ लक्ष |
| ३८. | पृष्ठ क्र. १४१ अ. क्र. ७५-वॉर्ड क्र. ३८ मध्ये विविध ठिकाणी पुन:डांबरीकरण करणे-३ लक्ष | वॉर्ड क्र. ३९ मधील डांबरीकरणासाठी रु. ३ लक्ष वळती करणे. |

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १३-०८-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक १३ ऑगस्ट २००४ रोजी मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह "येथे दुपारी ०३.४० वाजता "वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३. | स. स. श्री. शेख इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ४. | स. स. श्रीमती जयश्री किवळेकर | -//- |
| ५. | स. स. श्री. प्रल्हाद गणपतराव निमगांवकर | -//- |
| ६. | स. स. श्री. मधुकर दामोधर सावंत | -//- |
| ७. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | -//- |
| ८. | स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान | -//- |
| ९. | स. स. श्री. शे. मुनाफ शे. यासीन | -//- |
| १०. | स. स. श्री. सोपान भाऊराव पारे | -//- |
| ११. | स. स. श्री. भगवान दगडूजी रगडे | -//- |

**संवाद :**

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** १ तारखेपर्यंत मा. आयुक्त येणार नाही. रजा दिली. आचार संहिता लागण्याची शक्यता आहे. विकास कामे होणार नाही. सभागृहात नुसती चर्चा होते. कामे होत नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** स्थायी समितीची सभा आयोजीत केली. गेल्या ४-५ दिवसापासून मा. आयुक्त दिसत नाही. आजच्या सभेला सुध्दा नाहीत. मा. सभापतींची परवानगी घेतली असेल. बरीच विकास कामे प्रलंबीत आहे. पावासाळयाचे दिवस आहे. अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. मा. आयुक्त नाही कारण काय सांगितलेले आहे. खुलासा व्हावा. कोणत्याही आयुक्तांनी यावे. आपल्या मर्जीप्रमाणे निघून जावे. शासनाकडे मागणी करावी की, आयुक्त अचानक रजेवर गेले, आयुक्त दयावे म्हणून विना आयुक्त ही महापालिका चालते आयुक्त जर नसेल तर स्थायी समितीची बैठक घेण्यात येवू नये. आयुक्तांच्या निषेधार्थ आम्ही सर्व सदस्य मिळून ही सभा तहकूब करण्याची मागणी करत आहोत. आपण मा. विभागीय आयुक्तांकडे ताबडतोब मागणी करावी आम्ही सर्व सदस्य डायस समोर धरणे धरणार आहोत.

(यावेळी सभेला आयुक्त आवश्यक आहे तर सभा घ्यावी म्हणून स. सभासद मागणी करतात. डायस समोर बसतात मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

**मा. सभापती** : कृपया स. सदस्यांना विनंती की, डायस समोर कोणीही बसू नये. आपल्या प्रश्नाचा खुलासा केला जाईल. कृपया सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**श्री. संजय शिरसाठ :** महापालिकेस बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. यामागे षडयंत्र रचले जात आहे. आयुक्त या महापालिकेत राहू नये. म्हणून प्रयत्न केले जातात. आयुक्त जो पर्यंत येत नाही. तो पर्यंत सभा घेवू नये.

**मा. सभापती** : आपल्या भावनाशी मी सहमत आहे. आयुक्त रजेवर गेले तर दुसरे अधिकारी यांना चार्ज देणे गरजेचे होते. ०३ दिवसापासून या महापालिकेस आयुक्त नाही. शासनाने कोणाकडे तरी चार्ज द्यावयास पाहीजे होता. प्रशासनामार्फत काय पाठपुरावा झाला. स. सदस्य पोटतिडकीने सभागृहात बोलतात बरीच कामे प्रलंबीत आहे. मान्यतेसाठीच्या संचिका, वाटाघाटी करण्याच्या संचिका असतील एजन्सी फिक्सींगच्या असतील त्यासाठी आयुक्तांची आवश्यकता आहे. अशी परिस्थिती असेल तर, शासनाचा कारभार निषेधार्थ आहे. उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा. आयुक्त रजेवर गेले तर पदभार कुणाकडे घ्यायचा शासनाची जबाबदारी होती. प्रशासनाच्या वतीने काय प्रयत्न करण्यात आले.

**उपआयुक्त (प्र.) :** ११ तारखेपासून आयुक्त रजेवर गेलेले आहेत. १२ तारखेला या संदर्भात मी मंत्रालयात संपर्क साधलेला आहे. पर्यायी व्यवस्था करीत आहोत. आज चर्चा होणार आहे. अर्ध्या तासापूर्वीच मी पून्हा चर्चा केलेली आहे.

**मा. सभापती** : आयुक्तांनी रजा दिली. रजा दिल्यानंतर व चार्ज न देता रजेवर जाता का? चार्ज कुणाकडे देणार याबाबत विचारणा केली जाते.

**उपआयुक्त (प्र.)** : मा. सचिव यांचेशी चर्चा केली. पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे. म्हणून उत्तरे मिळाले अर्ध्या तासाच्या आत फॅक्स येईल असे सांगण्यात आले.

**मा. सभापती** : उपआयुक्त (प्र) यांनी मंत्रालयात मा. सचीव नगर विकास विभाग यांचेशी चर्चा केलेली आहे. उपआयुक्त पदावर कोणते अधिकारी नियुक्त करुन घ्यावे म्हणून शासनाचे आदेश वैगेरे आहेत का? खुलासा करावा.

**श्री. संजय शिरसाठ :** रजा मंजूर न होता. रजेवर मा. आयुक्त जाऊ शकतात का?

**उपआयुक्त (प्र.) :** श्री. हिरे मनोहर यांची महापालिकेच्या उपआयुक्त पदावर रुजू करुन घ्यावे, म्हणून शासनाकडून पत्र मिळाले. सध्या या महापालिकेत उपआयुक्त पदावर दोन अधिकारी काम करतात. एक उपआयुक्त (म) म्हणून श्री. शिंदे व उपआयुक्त (प्र.) म्हणून मी स्वतः उपआयुक्तांचे कोणतेही पद रिक्त नाही. म्हणून अदयापपर्यंत श्री. हिरे यांना रुजू करुन घेतलेले नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** रजा मंजूर न होता आयुक्त सुट्टीवर गेले कसे, असे करता येते का? १ तारखेपर्यंत ते येणार नाहीत तर कोणतीच विकास कामे होणार नाही असे वाटते. जो पर्यंत आयुक्त येत नाही. तो पर्यंत आम्ही डायस समोरुन उठणार नाही.

(याच वेळी स. सभासद डायससमोर बसून मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

**मा. सभापती** : आयुक्तांनी त्यांची रजा शासनाकडे दिलेली आहे. महापालिकेने ठराव घेतलेला आहे की, उपआयुक्त पदावर वर्ग-२ चे अधिकारी घेण्यात येवू नये.

या ठरावाबाबत शासनास कळवावे. सर्व स. सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**श्री. संजय शिरसाठ :** आयुक्त या महापालिकेस नाही. प्रवेशद्वारासमोर मोर्चा आलेला आहे. त्यांना कोण उत्तर देणार आहे. शासनाने कुणाकडेच चार्ज दिलेला नाही. खेद वाटतो.

**उपआयुक्त (प्र.) :** नगर विकास विभागाचे उपसचिव श्री. माळवदकर यांचेशी मी चर्चा केली. सभागृहाच्या भावना कळविल्या महापालिकेचा आयुक्त पदाचा पदभार सिडकोचे मुख्य प्रशासक मा. श्री. विजय सौरभ यांचेकडे देणार असल्याचे समजले. १५-२० मिनिटात फॅक्स पाठवितो म्हणून कळविले.

**श्री. संजय शिरसाठ :** जो पर्यंत महापालिकेस आयुक्त देत नाही. तोपर्यंत सभा घेण्यात येवू नये. आयुक्त नाही. म्हणून आज बरेचसे अधिकारी सभागृहात उशीरा आलेले आहे. आयुक्त असते तर वेळेवर उपस्थित असते.

**मा. सभापती** : आपण निषेधाची नोंद घेऊन भावना शासनापर्यंत पोहचविलेल्या आहेत.

**श्री. भगवान रगडे :** स. सदस्यांचा साधा प्रश्न आहे. आयुक्त रजेवर गेले तर संचिकेवर सध्या कोण करणार बऱ्याच कामाच्या निविदा निघालेल्या आहेत. एजन्सी निश्चित करण्याच्या संचिका प्रलंबीत आहे. आचारसंहिता लागू झाल्यास होणारी कामे होणार नाही. सर्व चर्चेचा विचार करुन ताबडतोब शासनास कळवून प्र. चार्ज द्यावा. म्हणून मागणी करावी.

(याच वेळी सर्व डायससमोर बसलेले सभासद उठून सभागृहाबाहेर जातात.)

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** फॅक्स येणार होता. प्र. चार्ज दिलेला आहे का खुलासा करावा.

**श्री. संजय शिरसाठ :** नसता सभा तहकूब करावी.

**मा. सभापती** : सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. प्रशासनामार्फत प्रयत्न चालू आहे. शासनाकडून लवकरच फॅक्स येईल. आचारसंहिता लागल्यास जी होणारी कामे सुध्दा होणार नाही. १५-२० मिनिटात शासनाकडे पदभार सोपविण्याबाबत फॅक्स प्राप्त होणार आहे. अशी माहिती आताच प्रशासनाकडून मिळाली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आयुक्त रजेवर जात असतांना कोणत्यातरी अधिकाऱ्याकडे चार्ज दिला जातो. यावेळेसच का कोणाकडे चार्ज दिलेला नाही. रजा मंजूर न होता रजेवर जाता येते का?

**मा. सभापती** : आयुक्त श्री. जोशी साहेब हे ३१ तारखेला रजेवर गेले. चार्ज कुणाकडे ही दिलेला नाही. रजा मंजूर करतानांच शासनाने कोणाकडे तरी चार्ज देणे आवश्यक होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या शहराचा विकास होवू नये. षडयंत्र कुणीतरी करीत आहे. जनहिताचे निर्णय होत असतांना आडकाठी आणण्याचा प्रयत्न होत आहे. आयुक्त रजेवर जात असतांना स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागते. शासनाकडे रजा दिली असली तरी शासनाने या महापालिकेचे हित लक्षात घेतले नाही चार्ज कुणाकडे दिला नाही. म्हणून आम्ही निषेध करतो.

(याचवेळी पून्हा स. सभासद मा. सभापती यांचे डायससमोर बसतात.)

**मा. सभापती** : आपणा सर्वांच्या भावना रास्त आहे. मी सहमत आहे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** दिर्घकालीन रजेवर जात असतांना चार्ज कोणाकडे देणे गरजेचे असतांना व तसे नियमावलीत असतांना चार्ज न देता रजा दिली. परंतू विकास कामांना त्यामूळे खीळ बसलेली आहे. ८-१० दिवसांत आचार

संहिता लागणार आहे. कामे कशा पध्दतीने मंजूर होतील माहिती नाही. सभागृहाला अधिकार नाही. उपआयुक्तांना सुध्दा तसे मंजूरी देण्याचे अधिकार नाही.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** रजा घेण्यासंदर्भात कायदयात काय तरतूद आहे. उपआयुक्त उपस्थित आहे, त्यांना सर्व माहित आहे. मा. आयुक्त कोणाच्या तरी दबावाखाली रजा देवून गेलेले आहे. अशी माहिती आमच्याकडे आहे. हे बरोबर की चूक सत्य खुलासा करावा. या शहराचा मोठया प्रमाणात विकास होतो. मा. जोशी साहेबांनी चांगले काम करीत आहे. शहराचा विकास थांबवला जावा म्हणून कुणाच्या तरी दबावाखाली तरी ते रजेवर गेलेले आहे. असे माझे मत आहे.

**मा. सभापती** : विना आयुक्त महापालिकेचे विकास कामकाज कसे करता येतील. आयुक्त रजेवर जाऊन ३-४ दिवस आले तरी सुध्दा चार्ज कुणाकडे दिलेला नाही हे धोरण बरोबर वाटत नाही. नियमानुसार पदभार दयावयास पाहीजे की नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** आयुक्त यांना कुणाचा दबाव होता. खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** कुणाच्या दबावाखाली रजेवर गेले का? याचा खुलासा प्रशासन करु शकणार नाही. परंतू आयुक्त हे खाजगी कामासाठी गेल्या ११ तारखेपासून ते रजेवर आहे. आयुक्त यांनी रजा शासनाकडे पाठविली आहे. रजा मंजूर करणे किंवा मंजूर झाल्यानंतर चार्ज कुणाकडे देणे ही शासन आखत्यारीत बाब आहे. सभागृहाच्या १० मिनिटापूर्वीच शासनास कळविलेल्या आहेत.

**श्री. शेख इलियास किरमाणी :** निविदा संदर्भातील संचिका कोण मंजूर करणार आहे. रजा मंजूर झालेली आहे का?

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** विकास कामासंदर्भातील संचिका कोण मंजूर करणार आहे. रजा मंजूर झालेली आहे का? खुलासा करावा.

**श्री. संजय शिरसाठ :** राजकीय दबाव त्यांचेवर आलेला वाटतो. त्यांची रजा आजही मंजूर नाही असे वाटते.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** स्थायी समितीचे जे अधिकार आहे ते वाचन करुन दाखवावे. मला खात्री आहे. बेजबाबदारपणे ते रजेवर जाणार नाही. कुणाच्या तरी दबावाखाली गेलेले असावेत.

**मा. सभापती** : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. आयुक्त महापालिकेचा पदभार सिडकोचे प्रशासक मा. श्री. विजय सौरभ यांचेकडे देण्यात येत आहे. अशी माहिती हाती आलेली आहे.

(याच वेळी सर्व सदस्य आपआपल्या जागेवर येवून बसतात.)

**श्री. संजय शिरसाठ :** गेल्या चार दिवसापासून महापालिकेस आयुक्त नाही. एक आयुक्त रजेवर गेल्यानंतर त्यांचे जागेवर चार्ज देण्यासंदर्भात सभागृहात मागणी करुन स. सदस्यांना धरणे धरावे लागते. दुर्देव आहे. तेव्हा शासन काळजी घेते. आयुक्त या शहरात आहेत. कुणाच्या दबावाखाली रजेवर गेलेले आहेत. तसेच ०५ मिनिटात फॅक्स येतो म्हणून मा. सभापती महोदय आपण म्हटले ०५ मिनिटाचीच सभा सुरु करावी.

**मा. सभापती** : ०५ मिनिटात शासन स्तरावरुन चार्ज देण्याबाबत फॅक्सची प्रत न झाल्यास सभा तहकूब करुन चर्चेला सुरुवात करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** दिड महिन्यापूर्वी महापालिकेच्या शाळेतील विदयार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा त्यांची गुणवत्ता या संदर्भात चर्चा झालेली होती. शहरात संपूर्ण भागात

महापालिकेच्या शाळा आहेत. त्या शाळेमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील स्लम भागातील कामगार वस्तीतील गरीब लोकांची मुले शिक्षण घेतात. या सर्व विदयार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याची जबाबदारी महापालिकेची असून, विदयार्थ्यांना २ गणवेश देणे तसेच शाळेच्या काही इमारतीच्या दुरुस्तीच्या कामा संदर्भात अहवाल मागविला होता. या शहराचा व्याप मोठा झाला असून, पडेगाव ते चिकलठाणा ते हर्सुल गांव ते सातारा परिसर पर्यंत या शहराची हद्द झालेली आहे. १८ खेडीचा समावेश या शहरात झालेला आहे. जी खेडी महापालिका हद्दीत आली त्याचा विकास महापालिका करणार होते. अर्थसंकल्पात तरतूद ठेवली जाते. हर्सुल भागात महापालिकेची शाळा आहे. त्या शाळेची अवस्था बघितली अत्यंत वाईट आहे. यंत्रे गंज लागलेले शाळेच्या हॉलमध्ये पाणी साठलेले दिसून येईल त्यामुळे इमारतीची भिंत कोसळू शकते. जिवित हानी होवू शकते यास जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होतो. दीड महिन्यापूर्वी चर्चा होवूनही आजही जैसे थे स्थिती आढळून येईल. शिक्षण समितीचे सभापती भेट देण्यास गेले असता त्या शाळेला गावकऱ्यांनी कुलूप लावलेले दिसले. प्रशासनाला सर्व काही माहीत असून, सुध्दा वेळीच कार्यवाही होत नसेल तर, चर्चेला व आपल्या निर्णयाला अर्थ नाही. इतरही भागातील शाळांची परिस्थिती अशीच आहे. बांधकामे व दुरुस्तीची कामे तात्काळ करण्याची गरज आहे. हर्सुलच्या शाळेच्या संदर्भात अहवाल सभागृहात ठेवावा. अशा परिस्थितकडे का सामोरे जावे लागते. प्रत्यक्ष सभागृहाला माहिती होणे गरजेचे आहे. व तेथील शाळा दुरुस्तीचे काम तात्काळ करुन विदयार्थी शाळेत कसे जातील याची दक्षता घेण्यात यावी.

**मा. सभापती** : दिड महिन्यापूर्वीच याच सभागृहात महापालिकेच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्यादृष्टीने शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करण्यासंदर्भात प्रश्न सर्वच सदस्यांनी मांडलेला होता. ज्या किरकोळ दुरुस्त्या असतील त्या तात्काळ करण्यात याव्यात म्हणून निर्णय घेतलेला होता. हर्सुल येथील कालचाच प्रसंग श्री. जावरे साहेब यांनी सांगितलेला आहे. गावकऱ्यांचे म्हणणे असे की, कामाला सुरुवात करावी. कामाला सुरुवात केलेली आहे व इतर शाळांवरही गावकऱ्यांनी कुलूप वैगेरे लावण्या इतपर बाब न येता इतर शाळेचे पण काम तात्काळ हाती घेण्यात यावे. शिक्षण सभापती स. श्री. नासेर खॉन अ. रहेमान खॉन कुरैशी यांनी अनेक शाळांना भेटी दिल्या ते सभागृहाच्या पत्रकार कक्षात बसलेले आहेत व महापालिकेच्या शाळेवर त्यांनी प्रत्यक्ष भेटी दिल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष ज्या ज्या समस्या दिसून आल्या त्याबाबत त्यांनी त्यांचे मत या सभागृहात व्यक्त करण्याची विनंती केलेली आहे. स. सदस्यांचे समंती असेल तर, त्यांना सभागृहात येण्याची परवानगी देण्यात येईल.

(याचवेळी सर्व सदस्य संमती देतात, व शिक्षण सभापती श्री. नासेरखान, अ. रहेमान खॉन कुरैशी हे सभागृहात प्रवेश करतात व सभापतींच्या परवानगीने ते त्यांचे मत व्यक्त करतात.)

**मा. सभापती (शिक्षण समिती)** : शिक्षण समिती सभापती या नात्याने दोन शब्द या सभागृहात व्यक्त करु इच्छितो व सर्व स. सदस्यांच्या संमतीने मा. सभापती यांनी सभागृहात येण्याची परवानगी दिली. त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त

करतो. आजच सकाळी मी हर्सुल येथील शाळेला प्रत्यक्ष भेट दिली. दयनीय अवस्था झालेली दिसून आली. तसेच इतर भागातील शाळांना मी सभापती झाल्यापासून भेटी दिल्या किराडपूरा मराठी/उर्दू दोन्ही शाळांची अवस्था बरोबर नाही फर्निचर नाही. विदयार्थी फरशीवर बसतात. किराडपूरा येथील एका शाळेच्या खोलीला वस्ती छत नाही. यापुढे शाळेच्या इमारतीसाठी जास्तीत जास्त अर्थसंकल्पात तरतुद असावी. हर्सुल शाळेची परिस्थिती बघितल्यावर हे सर्व लक्षात येण्या सारखे आहे.प्र. शिक्षणाधिकारी श्री. जावरे साहेबांनी सुध्दा बऱ्याच शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. चिकलठाणा सिल्लेखाना येथील शाळेची सुध्दा दुरावस्था झालेली आहे. शाळेची स्थिती भविष्यात अशी होवू नये व ज्या दुरुस्तीला आलेल्या आहेत त्या शाळांची दुरुस्ती करुन विदयार्थ्यांना शिक्षण घेण्यास कामे सुरक्षितता मिळेल याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. यात महापालिकेची बदनामी घेत आहे. सभागृहात चर्चा घेवून ०२ महिने झाले, दुर्लक्ष केले. कोणतेही काम शाळेच्या बाबतीत सुरु केलेले नाही. बऱ्याच शाळेत शौचालय नाही. मुले-मुली एकत्र मुतारी मध्ये जातात स्वतंत्र असावेत मुंबई पुणे महापालिकेच्या शाळात प्रवेशासाठी रांगेत उभे असता परंतू औरंगाबाद महापालिकेच्या प्रत्येक शाळेतून दरवर्षी पालक शाळा सोडण्याची प्रमाणपत्राची मागणी करतात. आता पर्यंत शिक्षण विभागाकडे उद्दीष्ट किती ठेवण्यात आले. खर्च किती झाले व खर्च झालेला नसेल तर त्वरीत कामांना सुरुवात करावी व बजेट ठेवले नसेल तर इतर हेड मधून वळती करुन घेवून कामास सुरुवात करावी अशी शिक्षण सभापती या नात्याने मागणी करतो जे की भविष्यात गरीब मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

**मा. सभापती** : मागील बैठकीत चर्चा झाली त्या वेळेस किरकोळ दुरुस्तीची जी शाळेच्या इमारतीची कामे असतील ती करण्याचा निर्णय घेतलेला होता.

**शहर अभियंता :** देखभाल दुरुस्तीसाठी १० लक्षची तरतुद आहे. परंतू ती रक्कम त्रोटक स्वरुपाची असून, सर्वच शाळांचे दुरुस्तीचे काम होत नाही. शाळेच्या इमारतीसाठी दरवर्षी किमान बजेटमध्ये ४० लक्षची तरतूद ठेवणे आवश्यक आहे. बजेट पुरेसे नसल्यामुळे सर्वच ठिकाणचे काम करता येणार नाही. किरकोळ व आवश्यक एखादया ठिकाणचा दुरुस्ती करणे आवश्यक आहे अशी कामे करता येतील. किमान आणख १८-२० लक्षचे बजेट तरतूद उपलब्ध करुन दिल्यास कार्यवाही करता येतील.

**मा. सभापती** : तसा प्रस्ताव संबंधित अधिकारी यांनी सादर करावा.

**श्री. संजय शिरसाठ :** महानगरपालिकेच्या शाळांच्या इमारतीची दुरावस्था संदर्भात शिक्षण सभापती तसेच इतर स. सदस्यांनी दुर्दशा वाईट आहे. म्हणून मत व्यक्त केले. त्यावर अधिकारी सांगतात बजेट कमी पडते. ४० लक्ष किमान रक्कम असावी. माझ्या वार्डात १० लक्षची विकास कामे करण्यासाठी तरतूद केलेली आहे ती वळती करुन महानगरपालिकेच्या शाळांसाठी दुरुस्तींच्या कामांस खर्च करावी. त्या संदर्भात लवकरच मी तसे पत्र कार्यकारी अभियंता यांना सादर करतो. त्यांना तसा प्रस्ताव या सभागृहासमोर मंजुरीसाठी सादर करावा.

**श्री. भगवान रगडे :** ब्रिजवाडी येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीची दुर्दशाबाबत चर्चा झालेली होती. आपण आदेश केले. शिवाय आपण शाळेला प्रत्यक्ष

भेटही दिली. आनंद वाटला. शाळेच्या इमारतीचे काम तात्काळ व्यवस्थित व्हावे म्हणून आपण आदेश केले. अदयापपर्यंत काम सुरु केलेले नाही. त्या शाळेत १२००-१३०० विदयार्थी संख्या आजही आहे. सर्व गरीब लोकांचे मुले मुली शिक्षण घेतात. शाळेत शिक्षक संख्या कमी असून वारंवार मागणी करुनही शिक्षक दिले जात नाही. शाळेच्या हॉलमध्ये खड्डे पडलेले असून, विदयार्थ्यांना बसणे अवघड होते. तास सहन करावा लागतो. अशी परिस्थिती समोर असतांना आपण भेट दिली. त्यानंतर प्रशासनास आदेशीत केले तरी काम झालेले नाही. १५ ऑगस्ट पूर्वी गणवेश वाटप करणार होते. त्याबाबत ही माहिती दयावी.

**मा. सभापती** : आताच स. सदस्य यांनी त्यांचे वार्डासाठी १० लक्ष विकास कामाची तरतुद ठेवलेली ती शाळेच्या इमारतीसाठी वापरण्याची संमती दिली. शहर अभियंता यांनी तसा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करावा. मुख्यलेखाधिकारी यांनी या संदर्भात निविदा काढाव्यात. ब्रिजवाडी येथील शाळेच्या इमारतीचे काम प्राधान्याने करण्यात यावे.

**शहर अभियंता** : ब्रिजवाडी शाळेच्या इमारतीच काम करण्यासंदर्भात वर्क ऑर्डर दिलेली आहे. काम सुरु होईल.

**प्र. शिक्षणाधिकारी** : ज्या शाळेच्या विदयार्थी संख्या विचारात घेता जेथे शिक्षण देणे आवश्यक आहे तेथे शिक्षक दिले जातील. समायोजन करण्याचे काम चालु आहे. प्रस्ताव ठेवलेला आहे.

**मुख्यलेखाधिकारी** : १५ ऑगस्टपूर्वी गणवेश वाटप होणे आवश्यक होते. परंतू वाटप होतील असे प्रयत्न केले जातील.

**मा. सभापती** : मा. आयुक्त श्री. जोशी यांची रजा शासनाने मंजूर करुन श्री. विजय सौरभ सिडको प्रशासक यांचेकडे प्र. आयुक्त म्हणून चार्ज दिलेला आहे. त्यांना प्रत मिळालीच असेल ते लवकरच रुजू होतील.

**श्री. भाऊसाहेब ताठे** : सिडकोचे प्रशासक या महानगरपालिकेच्या प्र. चार्ज म्हणून काम करतील का. विचारणा करुन घ्यावी.

**मा. सभापती** : शासनाचे आदेश आहेत. त्यांना रुजू व्हावे लागेल. शाळेच्या इमारती दुरुस्त करण्याबाबत ज्या ज्या इमारती अत्यंत दुरावस्था झालेल्या आहेत. धोकादायक अशा इमारती माझ्या माहिती प्रमाणे ३०-३५ शाळा असतील तेथे देखभाल दुरुस्तीचे काम तात्काळ करणे आवश्यक आहे. अशा शाळांच्या बाबतीत प्रस्ताव सादर करावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे** : माझ्या माहिती प्रमाणे नारेगाव येथील शाळेच्या इमारतीचे काम करण्यास स्वतंत्र बजेट होते. तसेच हर्सुल शाळेची शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच किराडपुरा क्र. १ ची शाळा व ज्या ज्या शाळांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्या त्या शाळांची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे** : पावसाळयाचे दिवस आहे हे लक्षात घेवून त्वरीत दुरुस्ती व्हावी ही विनंती आहे.

**मा. सभापती** : पावसाळयाचे दिवस आहे. धोकादायक अशा इमारतीचे दुरुस्तीची कामे तात्काळ प्रशासनाने हाती घ्यावी.

**श्री. भगवान रगडे** : डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी म्हटले होते. शिक्षण हे वाहिनीचे दूध आहे. परंतू त्या शब्दाचा अर्थ लक्षात घेता त्याप्रमाणे शिक्षण दिले जात नाही.

शाळेला सुट्टया लागण्याची वेळ येत आहे. शाळेत शिक्षक नाही म्हणून सुरुवातीपासून मागणी करावी. शिक्षक देत नाही.

**मा. सभापती** : शिक्षणाधिकारी यांना सुचना देण्यात येतात की, भगवान रगडे यांचे वार्डातील शाळेत ताबडतोब आवश्यक ते शिक्षक कर्मचारी वर्ग देण्यात यावा.

**श्री. मधुकर सावंत :** या सभागृहात महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारती कशा असाव्यात व शैक्षणिक दर्जा कसा सुधारता येईल या संबंधी सर्वच स. सभासद पोटतिडकीने प्रश्न मांडतात आपण रुलींग देतात. परंतु कार्यवाही होत नाही. सर्व शाळेच्या इमारतीचे सर्वेक्षण करावे. ज्या ज्या शाळेत फर्निचर नाही व इतर काय अडचणी आहेत. या बाबतचे ते सर्वेक्षण होते. एम. एम.खॉन यांनाही काही शाळांचे सर्वेक्षण करण्याचे काम दिले होते. त्यांनी सर्वेक्षण करुन दिले नाही. मुख्याध्यापकांना पैशाची मागणी केली त्यांना शिक्षा म्हणून ५००/- रु. दंड आकारण्यात यावा. अशी माझी मागणी आहे. त्यांनी कामात हलगर्जीपणा दाखविला. ज्या शाळेत फर्निचर नाही त्याचा अहवालाच प्रशासनाकडे पोहचला नाही अशा अधिकाऱ्यांच्या विरुध्द मी निषेध व्यक्त करतो. गरीब लोकांची मुले महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेतात. कार्यवाही करण्याचे आदेश द्यावे नसता मी डायससमोर बसतो आहे.

**मा. सभापती** : अहवाल प्राप्त करण्याबाबत त्यांना सुचना दिली जाईल. पुन्हा १६ तारखेला बैठक घेत आहोत.

**श्री. संजय शिरसाठ :** एम. एम. खॉन यांची यापूर्वीच पाणी पुरवठा विभागात बदली केलेली होती. ते रुजू का झाले नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** संबंधित एम. एम. खॉन यांची बदली झालेली होती. परंतू संबंधित विभाग प्रमुख यांनी त्यांना कार्यमुक्त केले नव्हते.

**श्री. संजय शिरसाठ :** ज्या विभाग प्रमुखांनी त्यांना कार्यमुक्त केले. त्यांचेवर कार्यवाही होणे आवश्यक आहे. एकीकडे प्रशासकीय कारण दाखवून बदल्या केल्या जातात. विभाग प्रमुख कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करत नसेल तर आदेश देऊन उपयोग काय? त्यांना चिरीमिरी मिळाले ते त्या विभागातून जाण्यास तयार नसतात असे माझे मत आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** एम. एम. खॉन यांनी बदली यापूर्वीच केलेली आहे. त्यांना कार्यमुक्त करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. वसूलीच्या कामामुळे विभाग प्रमुखांनी त्यांना थांबवून ठेवले होते. २८ तासांच्या आत कार्यमुक्त करण्याबाबत सूचना करण्यात येतील जर कार्यमुक्त झाले नाही तर त्यांचेवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** हर्सुल रोड लगत असलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये पाणी घेण्यासाठी हरी सिध्देश्वर कॉलनी पासून पाण्याची पाईप लाईन क्रॉस टाकली जाणार होती. जागेची अडचण निर्माण झाली व वादाचा प्रश्न पडल्यामुळे सहा. संचालक यांना ३६ मीटर जागेच्या संदर्भात मोजणी करण्याचे आदेशीत केलेले होते. मयूर पार्क भागात पाणी पूरवठा करण्यासंदर्भात जो ऐनवेळचा प्रस्ताव होता या बैठकीत अहवाल मागविलेला होता आपल्याकडे सदर झाला असेल तर वाचून दाखववावा.

**मा. सभापती** : जागेची मोजणी करुन अहवाल देण्याच्या सुचना दिलेल्या होत्या.

**सहा. संचालक (न.र.) :** ३६ मीटरचा रस्ता मोजणी संदर्भात आपण सुचना केल्या त्यानुसार आणि शिघ्र म्हणून संचिका हातोहात मुख्यलेखाधिकारी यांचेकडे दिलेली आहे.

**मा. सभापती** : उपआयुक्त (म) यांनी मंजूरी दिलेली आहे. आताच माहिती मिळाली.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** ३७ (३) खाली तातडीने काम हाती घेण्याचा निर्णय दिलेला होता. त्या भागात काही घटना घडल्यास अग्निशमन दलाचे वाहन जाऊ शकणार नाही. अशी स्थिती आहे.

**मा.सभापती** : मोजणी झाल्यानंतर भुसंपादनाच्या बाबत प्रस्ताव केव्हा सादर करणार आहे. श्री. देशमुख उपअभियंता यांनी त्या कामासाठी नियुक्ती केलेली होती.

**सहा. संचालक (न.र.) :** या संचिकेत मुख्यलेखाधिकारी यांचे आदेश आलेले आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** एडीटीपी यांचेकडे कामाचा व्याप वाढलेला आहे. प्रत्येक वेळेस तोच तो प्रश्न सभागृहात उपस्थित होऊनही दुर्लक्ष होते. ले-आऊट मंजूर करणे. बांधकाम मंजूरीच्या संचिका असतात. त्या तात्काळा मंजूर होतात. अशा संचिकेलाच का उशीर लागतो.

**मा. सभापती** : सहा. संचालक नगररचना हा विभाग सक्षमीकरण करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करावा. प्रशासनास आदेश करण्यात येतात. आताच चर्चा झाल्यानुसार सदर जागेची मागणी तात्काळ करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** विविध विषयावर या सभागृहात चर्चा होते. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेवून मा. सभापती आदेश करतात. परंतू प्रशासन त्यांची अंमलबजावणी करीत नाही. या शहराचे हद्दीत जवळपास १५९ अनाधिकृत वसाहती आहेत. तेथील जनतेचे अनेक समस्या असून नागरीक त्रस्त आहे. प्रत्येक व्यक्तीला कोणकोणत्या सुख सुविधा देणे गरजेचे आहे. याची जाणी आपण सर्वांना आहे. ११८ वस्त्या गुंठेवारी कायदयात बसवावी शासनाचे निर्देश आहे. या संदर्भात सर्वसाधारण सभा व स्थायी समितीच्या सभेत सखोल अशी चर्चा झालेली आहे. गुंठेवारी कायदा अंमलात आणण्यासाठी ज्या पध्दतीने यंत्रणा वापरावयास पाहीजे होती त्या पध्दतीने काम आलेले नाही. अंमलबजावणी झाली असती तर शासनास सुध्दा मोठा महसूल जमा झाला असता आणि ज्या समस्या निर्माण झाल्या किंवा होत राहणार आहे. त्या निर्माण झाल्या नसत्या पावसाळयाचे दिवस असून रस्ते व्यवस्थित नाही. लाईट व्यवस्था नाही. त्या वस्त्यात पाणी दिले जात नाही. चिखल मोठया प्रमाणात दिसून येईल. एखादया कामगारांना मुख्य रस्ता सोडून १/२ कि. मीटर पायी जायचे असेल तर सायकल दुसऱ्यांच्या घरी ठेवून पायदल जावे लागते. दुचाकी/चारचाकी वाहनांचा तर प्रश्न येत नाही. अश स्थिती आहे.वेगवेगळया भागातील शिष्टमंडळ यांनी आपली प्रत्यक्ष भेट घेतली त्यांनी त्यांची मागणी आपणा समोर तसेच प्रशासनासमोर मांडलेली आहेत/निवेदने दिली गुंठेवारी कायदयाची अंमलबजावणी झाली तर ज्या समस्या निर्माण होतात. त्यामध्ये खूप फरक पडेल व नागरीकांना सुध्दा दिलासा मिळेल असे माझे मत आहे. तशा सूचना प्रशासनास आपण दयाव्यात. बऱ्याचशा भागातील ले-आऊट मंजूर केले तेथील नागरीकांनी बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे. सुविधा दिल्या जात नाही. विविध कराच्या माध्यमातून महानगरपालिकेस उत्पन्न मिळालेले आहे. परंतू त्या वस्तीतील

नागरीकांसाठी ज्या नगरच्या भागातील जनतेची बेटरमेंट चार्जेस भरलेला आहे. कोणतेही काम अदयाप त्या भागात नाही अशी परिस्थिती राहील्यास भरणा करणारे लोक बेटरमेंन्ट चार्जेस भरणार नाही. लोकांनी ५-५ हजार प्रत्येक घरातील नागरीकांनी भरणा केले पैसे जमा करुनही सुविधा दिल्या जात नाही हे योग्य नाही. किमान त्या भागातील नागरीकांसाठी रस्ता तरी करण्यात यावा.

**मा. सभापती** : राजेन्द्र नगर भागातील नागरीकांनी बेटरमेंट चार्जेस भरलेले असतील व ते ले-आऊट मंजूर असेल तर सोयी सुविधा देण्यात याव्यात.

**सहा. संचालक न. र. :** पाहणी करुन कार्यवाही करण्यात येईल. तसा खुलासा नंतर देण्यात येईल. त्या ले-आऊटला १९९८ मंजूर दिली असे दिसून येते. दुय्यम प्रत म्हणून स्वाक्षरीची प्रत आहे. यात १९ भूखंड दिसून येतात.

**मा. सभापती** : १६ तारखेला बैठक आयोजीत करणार आहोत. त्या बैठकीत सविस्तर माहिती देण्यात यावी. गुंठेवारी कायदयाची अंमलबजावणी करण्या संदर्भात प्रशासनाने कार्यवाही करावी बऱ्याचदा मोर्चे आलेले आहे. काही शिष्ट मंडळ येवून माझी भेट घेतली त्यांनी प्रशासनाही निवेदन सादर केलेले आहे. गुंठेवारी संदर्भात झालेल्या कार्यवाही बाबत सविस्तर अहवाल १६ तारखेच्या बैठकीत सादर करावा.

**श्री. भगवान रगडे :** यापूर्वी मी चर्चेला विषय घेतला होता. झोपडपट्टी भागात अनेक गरीब होतकरुन नागरीक राहातात. त्यांना एक दिवसाआड पाणी देण्याऐवजी कमी वेळ का होईना परंतू दररोज पाणी सोडवावे. जे हे नागरीक गरीब बसून जास्त वेळ पाणी सोडवूनही त्यांचेकडे पाणी साठविण्यासाठी काहीच नये त्यामुळे पाणी वाया जाते. त्यांची मुले पाणी भरण्यासाठी शाळेत न जाता घरी राहतात. आई वडीलांना मोलमजूरीसाठी जावे लागते. अशी परिस्थिती असल्याने दररोज कमी वेळ पाणी दिले तरी चालेल अशी विनंती मी केलेली होती. प्रायोगिक तत्वावर एका भागात सुरु करावे. आपण आदेश दिले होते. त्याची अंमलबजावणी प्रशासनाने केलेली आहे का कोणत्या भागात सुरु केलेली आहेत.

**मा. सभापती** : झोपडपट्टी भागात दररोज पाणी दयावे व इतर भागात देवू नये असा भेदभाव करता येणार नाही. पाणी साठा लिफ्ट करण्यास प्रशासनास अडचण येत आहे. म्हणून दररोज पाणी देण्यास प्रशासनाची अडचण आहे.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** पाणी पुरवठयाच्याबाबत माझ्या माहितीप्रमाणे असे करता येणार नाही. सध्या पाणी लिफ्टींग करण्याची क्षमता कमी झालेली आहे. त्या संदर्भात प्रस्ताव मंजूर झालेला आहे. संपूर्ण काम झाल्यानंतर जवळपास १५ एम.एल. डी. पाणी वाढणार आहे. एम. जी. पी. चे काम चालू आहे. केवळ स्लम भागासाठी असे दररोज पाणी देता येणार नाही. सर्वच भागात एक दिवसा आडच पाणी पुरवठा चालु आहे.

**श्री. भगवान रगडे :** गेल्या बैठकीत चर्चा झाली. कार्यवाहीचे आदेश दिले आता उत्तर मिळाले असे करता येणार नाही. याचा अर्थ दलीत वस्तीतील लोकांवर अन्याय होतो आहे. माझा प्रश्न लक्षात घ्यावा. झोपडपट्टी भागात राहणारे लोकांकडे त्या भागात अर्धातास पाणी सोडले तर साठविण्यासाठी भांडे नसतात. त्यामुळे पाणी वाहून जाते. अर्धातास ऐवजी कमी वेळ पाणी दररोज दयावे अशी माझी मागणी आहे.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. रगडे यांच्या भावना लक्षात घेऊन स्लम भागात दररोज कसे पाणी देता येईल. यासाठी प्रशासनाने उपाय योजना करावी. प्रायोगिक तत्वावर एका भागात प्रयत्न करुन पाहावा देता येत नसेल तर सर्वच स्लम भागातही मोहीम राबवावी. स. सदस्य रगडे यांचे वार्डात प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी सुरु करावी. विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**विषय क्र. ८४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, टायगर ठेवणेसाठी नविन पिंजरे बांधणेच्या कामाचे सा. बा. विभागाच्या सन २००२-२००३ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. ८,३९,५६१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त महोदयांनी दि. ०५-०८-२००४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अ. क्र. १ पृष्ठ क्र. १०५ वर रु. ५.०० लक्ष व अ. क्र. १ पृष्ठ क्र. १०३ वर रु. २.८० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ८,३९,५६१/- मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टायगर ठेवणेसाठी नविन पिंजरे बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ८,३९,५६१/- चे अंदाजपत्रकास तसेच सादर कामासाठी सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अ. क्र. १ पृष्ठ क्र. १०५ वर रु. ५.०० लक्ष व अ. क्र. १ पृष्ठ क्र. १०३ वर रु. २.८० लक्षची तरतुद या कामासाठी वापरण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**मा. सभापती** : ऐनवेळचे सर्व प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहेत.

**विषय क्र. ८५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या १०० द. ल. लि. क्षमतेच्या नवीन योजनेतील एकुण बारा गाळण हौदापैकी यावर्षी दोन गाळण हौदांची दुरुस्ती सदर गाळण हौद नादुरुत असल्यामुळे करणे आवश्यक आहे.

सदर कामाकरीता औरंगाबाद पाणी पुरवठा योजना जायकवाडी स्थापत्य कामे करणे अंतर्गत ठेवलेल्या निधीमधुन रुपये १३,९९,०६७/- चे अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर अंदाजपत्रक मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव ठेवण्याची शिफारस मा. आयुक्तांनी केली आहे. सदर अंदाजपत्रक स्थापत्य कामे अंतर्गत रुपये २,७०,७६७/- ची तरतुद करण्यात आली असून, पीव्हीसी नोझल्स व स्टेम्सचा पुरवठा करणे करीता रुपये ११,२२,०००/- ची तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर काम चांगल्या प्रकारे व माणकाप्रमाणे होणे करीता स्थापत्य कामाची रुपये २,७०,७६७/- ची वेगळी निविदा करण्यात येईल. त्याचप्रमाणे पीव्हीसी नोझल्स व स्टेम्सचा पुरवठा करण्याकरीता रुपये ११,२०,०००/- ची वेगळी निविदा मागविण्यात येईल. सबब रक्कम रुपये १३,९९,७६७/- चे काम दोन वेगवेगळया निविदा मागवून केल्यास काम ठरलेल्या कालावधीत व माणकाप्रमाणे होईल.

तरी अं. प. रक्कम रुपये १३,९२,७६७/- चा प्रस्ताव उपरोक्त प्रमाणे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या १०० द. ल. लि. क्षमतेच्या नवीन योजनेतील एकुण बारा गाळण हौदांची दुरुस्ती करणेच्या कामासाठी (स्थापत्य कामे रु. २,७०,७६७+पीव्हीसी नोझल्स व स्टेम्स पुरवठा रु. ११,२२,०००/-) तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १३,९९,२७६७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल गावाचा पाणी पुरवठा हा तेथील विहीराच्या जलसाठयावर अवलंबून आहे. उन्हाळयाचे दिवसात विहीरीचे पाणी संपते. त्यामुळे उन्हाळयात हर्सुल गावास टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागतो. हर्सुल गावास पुरेसेपाणी मिळत नसल्याने बऱ्याच वेळेस तेथील नागरीकांनी रस्ता रोको अशा प्रकारची आंदोलने केली आहे. करीता हरसिध्दी जलकुंभापासून ते हर्सुल गावापर्यंत ३०० मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे आवश्यक असून, सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १०,९६,९२०/- चे महाराष्ट्र नविन प्राधिकरण यांची दरसूची २००४-०५ नुसार तयार करण्यात आले असून, या कामावर होणारा खर्च अर्थसंकल्प २००४-०५ चे पृष्ठ क्र. १५२ अ. क्र. २८ आणि अ. क्र. २७ मधील २५.०० लाख तरतुदीतून करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रक मा. स्थायी समितीच्या मंजूरीस्तव ठेवण्याची शिफारस मा. आयुक्तांनी केली आहे.

करीता हरसिध्दी जलकुंभापासून ते हर्सूल गावापर्यंत ३०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १०,९६,९२०/- चा प्रस्ताव उपरोक्त प्रमाणे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हरसिध्दी जलकुंभापासून ते हर्सुल गावापर्यंत ३०० मी .मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १०,९६,९२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा यंत्रणेत पाच उपविभाग असून, शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी या पाच विभागांना एकमेकांच्या संपर्कात राहावे लागते. शहरातील पाणी पुरवठा वितरण, जलवाहिन्यांची पंप मशिनरीची देखभाल दुरुस्ती तसेच पाणी पुरवठा योजने अंतर्गत जायकवाडी उपसा केंद्र ढोरकीन पंपगृह, फारोळा जलशुध्दीकरण केंद्र, नक्षत्रवाडी संतुलन जलकुंभ, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र तसेच शहर भागातील वितरण करणारे विविध क्षमतेचे जलकुंभ तसेच पंप हाऊस येथे पाणी पुरवठयाची स्थिती जाणुन घेण्यासाठी तांत्रिक कर्मचारी यांना जावे लागते. यापैकी मोजक्याच ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने दूरध्वनी दिलेले आहेत.

जलवाहिनी फुटणे, गळती होणे, पंपना दुरुस्ती पंप हाऊस वरील विदयुत पुरवठा खंडीत होणे. इत्यादी महत्वाच्या कामी दुरुध्वनी अभावी संबंधित अभियंत्यास वेळेवर संपर्क होत नाही. तरी पाणी पुरवठा विभागातील संपुर्ण तांत्रिक कर्मचारी हे एकमेकांच्या संपर्कात राहतील तसेच कामात सुसूत्रता येऊन पाणी पुरवठयाविषयी नागरीकांना अधिक चांगली सेवा देता येईल. व कार्यक्षमतेने काम करता येईल. याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी टिप्पणीत नमूद केल्यानुसार याबाबत धोरण ठरवून निर्णय घ्यावा लागणार आहे. इतर काही महानगरपालिकांमध्ये अशा प्रकारची सुविधा पाणी पुरवठयातील कर्मचाऱ्यांना देण्यात आली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी या पाच विभागांना एकमेकांच्या संपर्कात राहणेसाठी या विभागातील दुय्यम आवेक्षक/कनिष्ठ/शाखा/सहाय्यक अभियंता, उपअभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांना समुह भ्रमण दूरध्वनी (Group Mobile) देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे मनपातील इतर महत्वाचे विभागांचे ज्या ज्या विभाग प्रमुखांना आणि त्यांचे सहाय्यक अभियंता/कर्मचारी यांना भ्रमण दुरध्वनीची आवश्यकता असेल त्यांना देखील समुह भ्रमण दुरध्वनी (Group Mobile) देण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सध्या महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काही अटींवर मांस विक्री परवाना देण्यात येतो.

मांस विक्री परवाना मिळणेकरीता सध्या कार्यालयात अर्ज प्राप्त होत असून नविन मांस विक्री परवाना देण्याकरीता खालील नवीन अटी समाविष्ठ करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**नविन अटी :**

१. पक्के बांधकाम असलेल्या जागेमध्ये (दुकान) नविन मांस विक्री परवाना देण्यात येईल.
२. टपरीमध्ये परवाना देण्यात येणार नाही.
३. नविन परवाना प्राप्तीसाठी दुकान असलेल्या जागेचा चालु वर्षाचा महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरणे आवश्यक राहील.
४. वादग्रस्त जागेवर परवाना देण्यात येणार नाही.
५. शांतता व सुव्यवस्था राखणेच्या दृष्टीने पोलीस आयुक्त यांचे नाहरकत प्रमाणपत्र नवीन मांस विक्री करता परवाना आवश्यक राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात नविन मांस विक्री परवाना देण्याकरीता खालील दर्शविल्यानुसार नविन अटी समाविष्ठ करुन नियमानुसार आलेल्या अर्जाची छाननी करुन मांस विक्री परवाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**नविन अटी :**

१. पक्के बांधकाम असलेल्या जागेमध्ये (दुकान) नवीन मांस विक्री परवाना देण्यात येईल. मात्र चिकन विक्री परवान्याकरीता ही अट शिथील करण्यात यावी.
२. टपरीमध्ये परवाना देण्यात येणार नाही. (मात्र चिकन विक्री परवान्याकरीता ही अट शिथील करण्यात यावी.)
३. नविन परवाना प्राप्तीसाठी दुकान असलेल्या जागेचा चालु वर्षाचा महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरणे आवश्यक राहील.
४. वादग्रस्त जागेवर परवाना देण्यात येणार नाही.
५. शांतता व सुव्यवस्था राखणेच्या दृष्टीने पोलीस आयुक्त यांचे नाहरकत प्रमाणपत्र नवीन मांस विक्री करता परवाना आवश्यक राहील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९ :**

मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की. मा. स्थायी समितीचे प्रस्ताव क्र. ४२ दिनांक २१-०७-२००४ अन्वये आदेशित केल्याप्रमाणे प्राणी संग्राहालयासाठी बीफ निविदाधारक श्री. शेख खलील शेख चाँद यांनी दिलेले बीफ भाव रुपये २०.०० कमी करुन सन २००४-२००५ या वर्षासाठी (३१-०३-२००५ पर्यंत) रुपये १६.९० प्रति किलो पुरवठा करण्याची तयारी दिनांक ०३-०८-२००४ रोजी दर्शविल्यामुळे मा. स्थायी समितीच्या आदेशाप्रमाणे श्री. शेख खलील शेख चाँद यांना दिनांक ०४-०८-२००४ पासून रुपये १६.९० प्रति किलो या दराप्रमाणे सन २००४-२००५ या वर्षाकरीता बीफ पुरवठयासाठी आदेश देण्याच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्राणी संग्राहालयासाठी बीफ निविदाधारक श्री. शेख खलील शेख चाँद यांनी दिलेले बीफ भाव रुपये २०.०० कमी करुन सन २००४-२००५ या वर्षासाठी (३१-०३-२००५ पर्यंत) रुपये १६.९० प्रति किलो पुरवठा करण्याची तयारी दर्शविल्यामुळे त्यांना दिनांक ०४-०८-२००४ पासून रुपये १६.९० प्रति किलो या दराप्रमाणे सन २००४-२००५ या वर्षाकरीता बिफ पुरवठयासाठी आदेश देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांकडून अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे बाबत प्राप्त झालेले प्रस्ताव अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे तसेच विविध कामासाठी सुधारीत तरतुद उपलब्ध करुन देण्याचे अनुषंगाने सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेले विविध प्रभागातील नविन कामे तसेच लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव पुढील प्रमाणे आहे. स. स. श्री. रतनकुमार पंडागळे वॉर्ड क्र. ४०, लेखाशिर्ष बदलणे स. स. श्री नासेरखान कुरैशी वॉर्ड क्र. ६१ लेखाशिर्ष बदलणे. मा. उपमहापौर सौ. साधना सुरडकर वॉर्ड क्र. २१ लेखाशिर्ष बदलणे. नविन कामाकरीता लागणारी तरतुद व वाढीव रक्कम तांत्रिकदृष्ट्या रद्द होणाऱ्या कामातून व बचतीतून वाढीव तरतूद उपलब्ध करणे या प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देण्याचा निर्णय होते.

**निर्णय :** सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ठ असलेल्या कामाचे लेखाशिर्षात बदल करणे. काही कामांसाठी असलेली तरतुद अपुरी असल्याने सुधारीत आर्थिक तरतुद करणे संबंधाने ज्या कामाकरींता सुधारीत वाढीव आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. अशा कामाकरीता तांत्रिकदृष्ट्या रद्द होणारी कामे तसेच इतर कामांचे घेणाऱ्या बचतीमधून वाढीव तरतुद उपलब्ध करुन या कामाकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद | | सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद | |
|---|---|---|---|---|
| ४० | वॉर्ड क्र. ४० स्लम विभागात कॉक्रेटींग करणे | ३.०० लक्ष | स्लम विभागामार्फत जयभीम नगर घाटी येथे द्वारगेट तयार करणे. | २.०० लक्ष |
| | | | अतिरिक्त शहर अभियंता विभागामार्फत मो. किलेअर्क येथे सोनवणे यांच्या घराजवळ कॉक्रेटींग करणे. | १.०० |
| २१ | खिवंसरा पार्क येथे क्रिडा संकुल बांधणे (जा. क्र.१४४) वळती करुन | १० लक्ष | शहर अभियंता विभागामार्फत खिंवसरा पार्क येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | १० लक्ष |
| ८१. | अर्थसंकल्प पृष्ठ क्र. १५५ अ. क्र. ७८ | १.४० लक्ष | वॉर्ड क्र. ६१ सिल्लेखाना येथे बोअर (हायवे) बसविणे | १.०० लक्ष |
| | अर्थसंकल्प पृष्ठ क्र. १५६ अ. क्र. १२१ नुतन कॉ. ते बडा तकीया रंभापुरा येथे जलवाहिन्या टाकणे | २ लक्ष | वॉर्ड क्र. ६१ सिल्लेखाना येथे बोअर (हाफसे) बसविणे | २.०० लक्ष |

**मा. सभापती** : कामगार शक्ती संघटना, महानगरपालिका औरंगाबादचे अध्यक्ष आणि दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या २७ तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षरीतील निवेदन प्राप्त झालेले आहे ते पुढील प्रमाणे : शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक मभवा-११०२/प्र. क्र. २२/सेवा-२ दिनांक १६ ऑक्टो २००३ च्या शासन निर्णयानुसार महापालिकेतील वर्ग-३ व वर्ग-४ च्या दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनुक्रमे रु. १००/- व रु. ८०/- ऐवजी वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु. १६३/- व वर्ग-४ संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु. १३७/- दैनिक वेतनवाढ देण्यात यावी.

**निर्णय** : मंजुरी देण्यात येते. कामगार शक्ती संघटनेतर्फे सभागृहात निवेदन प्राप्त झालेले आहे. वर्ग-३ व वर्ग-४ च्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे दैनिक वेतनवाढ करण्यासंबंधी प्रशासनाने तपासणी करुन योग्य तो निर्णय घ्यावा, असे सर्वानुमते ठरले.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १६-०८-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १६ ऑगस्ट २००४ रोजी मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०४.०५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १. स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | स. सभासद |
| २. स. स. श्री. माणिक साळवे | -//- |
| ३. स. स. श्री. शेख इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ४. स. स. श्रीमती जयश्री किवळेकर | -//- |
| ५. स. स. श्री. प्रल्हाद गणपतराव निमगांवकर | -//- |
| ६. स. स. श्री. मोहन मेघावाले | -//- |
| ७. स. स. श्री. मधुकर दामोधर सावंत | -//- |
| ८. स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | -//- |
| ९. स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान | -//- |
| १०. स. स. श्री. सोपान भाऊराव पारे | -//- |
| ११. स. स. श्री. भगवान दगडूजी रगडे | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : चर्चा अगोदर घेण्यात येईल त्यानंतर विषय पत्रिकेवर विषय घेण्यात येईल.

**श्री. माणिक साळवे :** विधान सभेची आचार संहिता काही दिवसानंतर लगेचच लागणार आहे. विकास कामे प्रलंबीत आहे. मा. आयुक्तांनी किती दिवसाची रजा घेतलेली आहे. खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : मा. आयुक्त श्री. जोशी साहेब रजेवर गेलेले आहे. आयुक्त पदाचा पदभार सिडकोचे मुख्य प्रशासक मा. श्री. विजय सौरभ यांचेकडे दिलेला आहे. १३ तारखेला शासनाचे तसे आदेश प्राप्त झालेले आहे आज मा. आयुक्त हे प्रशासकीय कामानिमित्त बैठकीला गेलेले असल्याचे त्यांनी मा. महापौर व मा. सभापती यांना कळविलेले आहे. व त्यांचे जागी सभेचे कामकाज पाहण्यासाठी शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपआयुक्त यांनी काम पाहावे असे पत्रात म्हटले आहे.

**श्री. माणिक साळवे :** सुट्टीवर गेलेले आहेत का?

**मा. सभापती** : रजेवर नाही कार्यालयीन कामानिमित्त गेलेले आहेत. सिडकोचे मुख्य प्रशासक मा. श्री. विजय सौरभ यांचेकडे अतिरिक्त पदभार दिलेला आहे.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** क्रिडा संकुलनाचे काम सुरु होणार आहे. सपाटीकरण करणार असे बातमी ऐकावयास आली. महानगरपालिकेची एन. ओ. सी. घेतलेली नाही. काम सुरु करता येते का?

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता (श्री. वझे) :** तेथील क्रिडा संकुलास मा. सहाय्यक संचालक नगररचना शाखा कार्यालय, औरंगाबाद विभागामार्फत जमीन वापरा संबंधाने नाहरकत पत्र जिल्हा अधिकारी तथा सदस्य सचिव औरंगाबाद यांना दिले असे समजते.

**श्री. संजय शिरसाठ :** जागा कुणाचीही असो महानगरपालिका हद्दीत येते. एन. ओ. सी. घेणे आवश्यक आहे.

**उपअभियंता (श्री. वझे ) :** कोणत्याही शासकीय, निमशासकीय कार्यालयास जमिनीचा विकास करावयाचा झाल्यास अशा विकास कामास सुरुवात करण्यापूर्वी तीस (३०) दिवस अगोदर नियाजन प्राधिकरणास नियोजीत नियमाचा संपूर्ण तपासणीसह कागदपत्रासह व आराखडयावर लेखी कळविणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : या संदर्भात यापूर्वी चर्चा झालेली होती. रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे असे म्हटले होते.

**उपअभियंता** : कळविणे आवश्यक आहे. एन. ओ. सी. दयावयास पाहिजे खाजगी जागेवर विकास करावयास असेल तर परवानगी घ्यावी लागते.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** कालच एका वस्तीत बांधकामे झालेली आहे परवानगी घेतलेली नाही. महानगरपालिकेला त्याची माहिती नसते.

**मा. सभापती** : या संदर्भात श्री. वझे यांनी पाहणी करुन ०२ (दोन) दिवसात अहवाल माझ्याकडे सादर करावा.

**श्री. प्रल्हाद निमंगाकवर :** नाथ प्रांगण येथील बांधकाम दोन दिवसात सुरुवात करु म्हणून म्हटले होते.

**शहर अभियंता** : काम चालु केलेले आहे काम करावयास गेले असता थांबविण्यात आले. टी. पी. विभागाने स्पष्ट दिले होते. डिमार्करेशन केलेले नाही. टी. पी. विभागाने क्लिअर करुन दिले आता पुन्हा कामास सुरुवात होईल.

**मा. सभापती** : क्रिडा संकुलास महानगरपालिकेची एन. ओ. सी. असणे आवश्यक आहे त्या शिवाय ते काम होता काम नये. एन. ओ. सी. होणे गरजेचे आहे. उद्घाटन झाले परंतू प्रत्यक्षात कामास सुरुवात झालेली नाही.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** माझ्या वार्डात समोरील दक्षिण भागात पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. परंतु तेथील लोकांना सध्या नळ कनेक्शन घेऊ नका असे सांगण्यात येते. याचे कारण काय. ६०-७० द्वारे आहेत. २ वर्षाचा कालावधी झाला त्या नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. त्यांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. ही पाईप लाईन महानगरपालिकेने हस्तांतर केलेला नाही का?

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** जो मुद्दा आताच उपस्थित केला तेथील पाहणी करुन तात्काळ कार्यवाही केली जाईल.

**मा. सभापती** : २ बैठकीपूर्वी म्हणजेच १३ तारखेच्या दरम्यान कामाच्या ४५० निविदा काढण्यात आलेल्या आहेत. कामांना प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे की, नाही झालेली असेल तर किती कामांना सुरुवात झाली. कोणत्या भागातील याबाबत माहिती सभागृहाला देण्यात आलेली नाही. कोणत्या वार्डात कामे चालु आहे. स. सदस्यांना सुध्दा माहिती नाही. मा. आयुक्तांच्या सहीसाठी किती संचिका प्रलंबीत आहे. लेखा विभागात किती संचिका विकास कामाच्या आहेत. विदयूत विभागाचे बजेट संपलेले नाही वेगवेगळया झोन मधील लहान कामे सुध्दा होत नाही. साधा बल्ब टयूब वॉर्डात लावण्यात येत नाही. अशी परिस्थिती आहे. आतापर्यंत किती मटेरियल खरेदी केले, केबल वायर खरेदी केले का आतापर्यंत शहरात ३ व्यक्तीचा लाईट विभागाच्या

दुर्लक्षामुळे मृत्यू झालेला आहे. सर्वसाधारण सभेत तसेच स्थायी समिती सभेत आदेशीत करण्यात आले की, डी. पी. उघडया असतील ना दुरुस्त असतील त्या दुरुस्त कराव्यात. चिकलठाणा विभागात कोणते कर्मचारी विदयूत विभागाचे काम करतात. त्यांना ताकीद दयावी. झोन ७ मध्ये एन-७ भागातील सुध्दा काही गाळे धारक यांनी विदयूत कनेक्शनची मागणी केली. तसेच उघडया डी. पी. संदर्भात दोन बैठकापूर्वीच चर्चा झालेली होती. अर्थसंकल्प कामाच्या होती. अर्थसंकल्प कामाच्या नावानिशी मंजूर केलेला आहे. कामाची आजची स्थिती काय असा प्रश्न होतो. विद्युत विभाग वर्षभरात लाईटचे साहित्य खरेदी करु शकत नाही. शहरात अनेक भागात उघडया डी. पी. आहेत. खुलासा करावा.

**कार्य. अभि. (ड्रे/वि) :** विद्युत विभागासाठी यावर्षात टयूब व लाईट व सोडीयम व्हेपर दिवे यासाठी १० लक्षची तरतूद आहे. सर्वसाधारण सभेची मान्यता आली. निविदा मंजूरीच्या स्टेजला आहेत. १-२ दिवसात वर्क ऑर्डर देण्यात येतील. सन २००४-०५ या वर्षासाठी संपूर्ण मटेरियलसाठी ४८ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. २५ लक्ष टायमरसाठी निविदा मंजूर झाली. उर्वरीत २० पैकी १० लक्षची निविदा मंजूर झालेली असून, लवकरच कार्यादेश देण्यात येतील.

**मा. सभापती** : आचार संहितेच्या अगोदर कामे व्हावीत अशी सभागृहाची मागणी आहे त्या पध्दतीने कार्यवाही करण्याची गरज आहे. किती कामे प्रलंबित आहेत.

**कार्य. अभि. (ड्रे/वि) :** विदयुत विभागाच्या संदर्भात एकही संचिका प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबित नाही. जलनिःसारण संदर्भात कामाचे विविध ठिकाणचे कार्यादेश केलेले आहेत. त्यापैकी २ कामे रद्द केलेली आहेत. एकूण ६९ कामाच्या निविदा काढलेल्या आहेत. ३० कामे बाकी आहेत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** विदयुत विभागाच्या हलगर्जीपणामुळे या शहरात तीन लोकांचा बळी गेला. ज्यावेळेस घटना घडल्या सभागृहात चर्चा झाली. त्यावेळेसच संबंधित विभागास स्पष्ट अशा सुचना केलेल्या होत्या. शहरात अनेक ठिकाणी उघडया डी. पी. आहेत. त्याचा बंदोबस्त केलेला नाही. काही पोल रस्त्यात येतात ते साईडला घेणे गरजेचे आहे.

**कार्य. अभि. (ड्रे/वि) :** महानगरपालिकेच्या क्षेत्रात जे येते. याबद्दल कार्यवाही होईल. सिंगल डी. पी. वर डिस्ट्रीब्युशन बॉक्स आवश्यक आहे. त्याची तरतूद नाही. तेच कामे प्रलंबीत आहे. एम. एस. ई. बी. विभागाचे ते काम होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** विद्युत विभागाचे अधिकारी काम करीत नाही. कमर्शियल वापरासाठी विदयुत पुरवठा करावयाचा आहे. ते गाळे धारकांना विदयुत पुरवठा करण्याचे काम महानगरपालिकेचे की एम. एस. ई. बी. चे होते.

**कार्य. अभि (ड्रे/वि) :** एम. एस. ई. बी. विभागाचे ते काम आहे. मा. आयुक्तांबरोबर त्या संदर्भात बैठक सुध्दा झालेली होती या संदर्भातील संचिका मा. आयुक्तांकडे आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** अधिकाऱ्यांना काम करावयाचे नसेल तर उडवाउडवीची उत्तरे द्यावयाचे असेल तर बरोबर नाही. एम. एस. ई. बी. विभागाची जबाबदारी होती. असे लेखी उत्तर मला अधिकाऱ्यांनी द्यावे. त्यानुसार माझ्या स्तरावर मला जी कार्यवाही करायची ती मी करेल. म्हाडा कॉलनी रायगड नगर भागात उघडया डी. पी. आहेत. ही जबाबदारी महानगरपालिकेची नाही का? तसेच लेखी दयावे.

**मा. सभापती** : स. सदस्य पोटतिडकीने चर्चा करतात. सत्य खुलासा सभागृहात अपेक्षीत असतो.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सर्वच भागात जवळपास बल्ब टयूब बंद आहेत. एक ते दीड महिन्यापासून काही भागातील पथदिवे बंद असल्याचे आढळून येतात.

**कार्य. अभि. (ड्रे/वि) :** चार एजन्सीकडून दर निश्चित होवून आलेले आहे. वाटाघाटी करावयाचे बाकी आहे. मटेरियल मागविण्याबाबत तात्काळ कार्यवाही होईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** अधिकारी कामे करीत नाही. रायगड नगर प्रतानगर, म्हाडा कॉलनी भागातील डी. पी. महानगरपालिकेच्या संबंधित विभागाशी संबंधित आहे. उपअभियंता क. अभियंता सब-ओव्हरसियर कामे करतात.

**कार्य. अभि. (ड्रे/वि) :** उदया आपल्याकडे बैठक आहे. त्या बैठकीत माहिती देण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** दररोजचा रिपोर्ट येतो. कोणत्या भागात कोणती कामे घेतात म्हणून सभा असतांना सभेच्या दिवशी सर्व माहितीसह अधिकाऱ्यांनी येणे आवश्यक आहे. माझ्या माहिती प्रमाणे सर्व माहिती अधिकाऱ्यांनी आहे. परंतू उत्तर देण्यास टाळाटाळ करतात.

**उपअभियंता - २ (वि.) :** स. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात R (आर)-२७ येथील घराजवळील डी. पी. बाबत तक्रार आलेली आहे. त्यानुसार दुरुस्त करण्याबाबत कार्यवाही होत आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एखादया भागातील लाईट गेल्यास जबाबदार कोण महानगरपालिका की एम. एस. ई. बी. खुलासा करावा.

**उपअभियंता (श्री. बनकर) :** महानगरपालिकेची जबाबदारी आहे. उघडी डी. पी. असेल तर कार्यवाही तात्काळ होते. चुकून कोठे असेल तर तक्रार आल्यानंतर कार्यवाही होते.

**मा. सभापती** : एम. एस. ई. बी. च्या ज्या ज्या भागात डी. पी. आहेत. त्यांना त्या संदर्भात तात्काळ कळविण्यात यावे. स. सदस्य यांनी जी माहिती विचारली त्यांना लेखी माहिती देण्यात यावी.

**श्री. सोपान पारे :** विदयुत विभागाची दोन कामे कमी करण्यात आली ती कोणती खुलासा करावा.

**मा. सभापती** : स. सदस्य यांना लेखी खुलासा देण्यात यावा. आता विषय पत्रिका घेण्यात येत आहे.

**विषय क्र. ९० :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.वि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. शहानूरवाडी भागातील शांकुतल नगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी अर्थसंकल्प २००४-२००५ मधील पृष्ठ क्र. १७६ अ. क्र. ७ नुसार २.०० लाख तरतुद ठेवलेली आहे. परंतू सदर कामाचे अंदाजपत्रक रुपये ४.०० लाख रुपये असून, सदर काम करणे आवश्यक असल्यामुळे मा. उपमहापौर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मनपा/उपमहापौर/२००४/२००५ दि. ०९-०८-०४ अन्वये सुचित केल्यानुसार अर्थसंकल्प पृष्ठ क्र. १७६ अ. क्र. ६ (१) वर ज्ञानेश्वर नगर येथील नाला ट्रेनिंग कामाकरीता ठेवण्यता आलेल्या र. रु. ५.०० लाख तरतुदीपैकी उपरोक्त कामासाठी रु. २.०० लाख वर्ग करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहनूरवाडी भागातील शांकुतल नगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी अर्थसंकल्प २००४-२००५ मधील पृष्ठ क्र. १७६ अ. क्र. ७ नुसार २.०० लाख तरतुद ठेवलेली आहे. परंतू सदर कामाचे अंदाजपत्रक रुपये ४.०० लाख रुपये ४.०० लाख रुपये असल्याने व काम करणे आवश्यक असल्यामुळे अर्थसंकल्प पृष्ठ क्र. १७६ अ. क्र. ६ (१) वर ज्ञानेश्वर नगर येथील नाला ट्रेनिंग कामाकरीता ठेवण्यात आलेल्या र.रु. ५.०० लाख तरतुदीपैकी उपरोक्त कामासाठी रु. २.०० लाख वर्ग करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचा प्रस्ताव

**विषय क्र. ९१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहर अभियंता विभागातील इमारती बांधकाम या उप विभागातील लेखाशिर्ष विकास इमारती शाळा दवाखाने अंतर्गत अर्थसंकल्प सन २००४-०५ मध्ये खालील कामाचा समावेश करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र. ३३ कोकणवाडी येथे संत तुकाराम हॉस्टेल शेजारी शाळा बांधणे | १० लक्ष |
| २. | प्रभाग क्र. ५३ येथे हॉल बांधणे | ०५ लक्ष |
| ३. | पैठणगेट येथे शौचालय तोडून शाळा बांधणे | १० लक्ष (स्पील ओव्हर) |
| ४. | टाऊन हॉल मनपा नवीन इमारती मध्ये न्यायालयासाठी व्यवस्था करणे. | ०६.५० लक्ष |
| ५. | दिल्ली गेट मनपा क्वार्टर दुरुस्ती करणे. | ०२.५० लक्ष (काम रद्द करणे आहे.) |
| | तसेच स्लम विभागातील शिर्षक नवीन कॉक्रीट रस्ते मधील कामे | |
| ६. | प्रभाग क्र. ९ लायन्स क्लब कॉलनी येथे कॉक्रीट करणे | ०१ लक्ष |
| ७. | प्रभाग क्र. ४० किलेअर्क येथे कॉक्रीट रस्ते तयार करणे. | ०३ लक्ष |

उपरोक्त सर्व कामे तांत्रिककारणामुळे करता येणे शक्य नाही. सदरील कामासाठी ठेवण्यात आलेली तरतुद ही सदरील कामे करता येणे शक्य नसल्याने इमारत देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षकामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. जेणे करुन तरतुद प्राप्त झाल्यास नागरीकांच्या व स. नगरसेवकांच्या मागणीनुसार तक्रारीचा निपटारा करता येईल व विभागातील अत्यावश्यक दुरुस्तीची किरकोळ कामे त्वरीत पूर्ण करता येतील. करीता प्रकरण विकास इमारती व शाळा दवाखाने या लेखाशिर्षकांतर्गत ठेवण्यात आलेली रक्कम रुपये १३.०० लक्ष देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकांतर्गत ठेवण्यात यावी व देखभाल दुरुस्ती व नवीन कॉक्रींट रस्ते या शिर्षकाची कामे रद्द करुन त्यांची एकूण २५ लक्ष रुपये देखभाल दुरुस्ती करीता ठेवण्यात येवून खालील मनपा शाळा दुरुस्ती व इतर कामे करण्यासाठी तरतुद रु. २५.०० लक्ष उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणे करुन विविध शाळा तात्काळ दुरुस्ती करता येईल.

| अ. क्र. | विभाग क्रमांक/शाळेचे नांव | तरतुद रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | झोन क्र. १ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.५० लक्ष |
| २. | झोन क्र. २ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | १.५० लक्ष |
| ३. | झोन क्र. ३ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.०० लक्ष |
| ४. | झोन क्र. ८ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.०० लक्ष |
| ५. | हर्सुल शाळा येथे पत्रे बसविणे व किरकोळ दुरुस्ती | २.५० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ६. | हर्सुल शाळा येथे संडास युरिनल बांधणे | १.०० लक्ष |
| ७. | झोन क्र. ४ व ६ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | ४.०० लक्ष |
| ८. | झोन क्र. ५ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.५० लक्ष |
| ९. | झोन क्र. ७ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.५० लक्ष |
| १०. | पीर बाजार येथील शाळांची विशेष दुरुस्ती | २.५० लक्ष |

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : शहर अभियंता यांनी विविध शाळांचे इमारतीचे देखभाल दुरुस्तीच्या कामाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यात १० लक्ष

**स. सदस्य** : श्री. शिरसाठ यांचे वॉर्डातील विकास कामाची रक्कम वळती करणे बाबत नमूद केले आहे. इतर हेड मधून रक्कम वळती करुन शाळा दुरुस्तीचा खर्चास २५ लक्ष खर्चाचा प्रस्ताव आहे. मान्यता देण्यात येते.

**श्री. संजय शिरसाठ** : १० लक्ष तरतुद करुन दिली आता तांत्रिक अडचण दाखवू नये. नविन शाळा करावयाच्या असल्यास वेळ लागतो. या खर्चातून शाळेची देखभाल दुरुस्तीची कामे करावयाची आहेत. अभियंता यांनी तातडीने मा. आयुक्त यांची मंजूरी घेवून कामास सुरुवात करावी.

**मा. सभापती** : ६३ (३) नुसार मा. आयुक्त अधिकारात मंजूरी घेऊन तात्काळ कामे सुरु करण्यात यावी. यानंतर स. सदस्य श्री. किरमाणी तसेच स. स. श्री किरमाणी तसेच स. स. श्री. निमगांवकर यांचे लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्ताव आहे. त्यासही मान्यता देण्यात येते. स्विकृतीसह प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर अभियंता विभागातील इमारती बांधकाम या उप विभागातील लेखाशिर्ष विकास इमारती शाळा दवाखाने अंतर्गत अर्थसंकल्प सन २००४-०५ मध्ये समाविष्ट असलेली तसेच स्लम विभागातील शिर्षक नवीन कॉक्रींट रस्ते मधील प्रस्तावात दर्शविलेली जी कामे तांत्रिक कारणामुळे करता येणे शक्य नाही. अशा कामासाठी ठेवण्यात आलेली तरतुद ही सदरील कामे करता येणे शक्य नसल्याने इमारत देखभाल दुरुस्ती व नवीन कॉक्रींट रस्ते या शिर्षकाची कामे रद्द करुन त्यांची एकूण २५ लक्ष रुपये देखभाल दुरुस्ती ठेवण्यात येऊन खालील दर्शविल्याप्रमाणे मनपा शाळा दुरुस्ती व इतर कामे करण्यासाठी रु. २५.०० लक्ष रुपये देखभाल दुरुस्ती ठेवण्यात येऊन खालील दर्शविल्याप्रमाणे मनपा शाळा दुरुस्ती व इतर कामे करण्यासाठी रु. २५.०० लक्ष तरतुद ठेवण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

| अ. क्र. | विभाग क्रमांक/शाळेचे नांव | तरतुद रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | झोन क्र. १ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.५० लक्ष |
| २. | झोन क्र. २ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | १.५० लक्ष |
| ३. | झोन क्र. ३ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.०० लक्ष |
| ४. | झोन क्र. ८ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.०० लक्ष |
| ५. | हर्सुल शाळा येथे पत्रे बसविणे व किरकोळ दुरुस्ती | २.५० लक्ष |
| ६. | हर्सुल शाळा येथे संडास युरिनल बांधणे | १.०० लक्ष |
| ७. | झोन क्र. ४ व ६ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | ४.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ८. | झोन क्र. ५ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.५० लक्ष |
| ९. | झोन क्र. ७ अंतर्गत विविध शाळांची दुरुस्ती | २.५० लक्ष |
| १०. | पीर बाजार येथील शाळांची विशेष दुरुस्ती | २.५० लक्ष |

तसेच शाळा दुरुस्तीचे कामे तातडीने करणे गरजेचे असल्यामुळे मा. आयुक्तांचे अधिकारात ६७ (३) (क) अंतर्गत निविदा न मागविता तात्काळ करण्यात यावीत. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**श्री. सोपान पारे :** नजिकच्या काळात गणेशात्सव नवरात्र उत्सव तसेच दसरा आणि दिवाळीसारखे सण येत असून नगरसेवकांचे स्वेच्छानिधीतून आवश्यकतेप्रमाणे व मागणी नुसार सिडको-हडको भागात तसेच शहरी भागात त्यांचे स्वेच्छानिधीतून विदयुत पथदिवे लावणे, फिक्चर बसविणे, जी. आय. पोल लावणे इत्यादी कामे करण्यास मंजूरी देण्यात यावी. तसा निर्णय सभागृहात घेण्यात यावा व संबंधित कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांना योग्य ते आदेश व्हावेत.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या सुचनेनुसार सिडको-हडको तसेच शहरी भागात स. नगरसेवकांचे स्वेच्छानिधीतून विदयुत पथदिव्यांची कामे करण्यास मान्यता देण्यात येते.

**निर्णय** : आगामी काळात येणारे गणेशोत्सव नवरात्र उत्सव तसेच दसरा आणि दिवाळीसारखे सण येत असल्यामुळे सन्माननीय सदस्यांचे स्वेच्छानिधीतून आवश्यकतेप्रमाणे व मागणी नुसार सिडको-हडको भागात तसेच शहरी भागात स. सदस्यांचे स्वेच्छानिधीतून विद्युत पथदिवे लावणे, फिक्चर बसविणे, जी. आय. पोल लावणे इत्यादी कामे करण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले. संबंधित कार्यकारी अभियंता उपअभियंता यांनी तात्कळ स. सदस्यांचे मागणीनुसार कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांकडून अर्थसंकल्पातील लेखाशीर्ष बदलणेबाबत प्राप्त झालेले प्रस्ताव अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे तसेच विविध कामांसाठी सुधारीत तरतुद उपलब्ध करुन देण्याचे अनुषगाने स. सदस्यांकडून प्राप्त झालेले विविध प्रभागातील नवीन कामे तसेच लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव पुढील प्रमाणे आहेत.

स. स. श्री किशनचंद तनवाणी, श्री. रावसाहेब औताडे, श्री. प्रल्हाद निमंगावकर, श्री. इलियास किरमाणी श्री. अ. कादर अ. हफिज यांचेकडून लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. नवीन कामाकरीता लागणारी तरतुद व वाढीव रक्कम तांत्रिकदृष्ट्या रद्द होणाऱ्या कामातून व बचतीतून वाढीव तरतूद उपलब्ध करणे या प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देण्याचा निर्णय होते.

**निर्णय** : सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पातील समाविष्ठ असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणे काही कामांसाठी असलेली तरतुद अपुरी असल्याने सुधारीत आर्थिक तरतुद करणे संबंधाने ज्या कामांकरीता सुधारीत वाढीव आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. अशा कामाकरीता तांत्रिकदृष्ट्या रद्द होणारी कामे तसेच इतर कामांचे होणाऱ्या बचतीमधून वाढीव तरतूद

उपलब्ध करुन या कामाकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पीय तरतुद | सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद |
|---|---|---|
| ८२. | प्रभाग क्र. ८२ गुलमंडी भागातील विविध गटारींची दुरुस्ती करणे-५ लक्ष (पृ. क्र. १७४ अ. क्र. ७२) | गुलमंडी भागातील पावसाचे पाणी, सांडपाणी वाहून जाण्यासाठी आर. सी. सी. पाईप गटार करणे - लक्ष |
| ०५. | प्रभाग क्र. ५ हर्सुल गांव येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे-३ लक्ष (पृ. क्र. १३० अ. क्र. १६) वळती करणे | शहर अभियंता विभागाकडे स्लम मधील काम करणे-३ लक्ष |
| १७. | प्रेरणानगर गारखेडा खुल्या जागेत संरक्षित करणे -०२ लक्ष (पृ. क्र. १२१ अ.क्र. १४) वळती करणे | वार्ड क्र. १७ लक्ष्मीनगर गारखेडा येथील खुली जागा संरक्षित करणे-०२ लक्ष |
| ०४ | प्रभाग क्र. ४ येथील विविध गल्यांमधील रस्त्याचे डांबरीकरण करणे-०२ लक्ष (पृ. क्र. १३० अ. क्र. १५) | शहर अभियंता विभागामार्फत हर्षनगर स्लम येथे कॉंक्रींट करणे-०२ लक्ष |
| | प्रभाग क्र. ४ येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे ०५ लक्ष (पृ. क्र. १३२ अ. क्र. ४५) वळती करणे. | शहर अभियंता विभागामार्फत गितानगर स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करणे-०५ लक्ष |
| ३९ | भडकल गेट प्रभागातील काजीवाडा भागात २५ मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे-२ लक्ष (जा. क्र. १५९ अ. क्र. ११२) मधून १ लक्ष रुपये वळती करणे. | वॉर्ड क्र. ३२ मधील काजीवाडा, भडकलगेट येथे अर्धगोलाकार गटार बांधणे-०१ लक्ष |
| ३१ | प्रभाग क्र. ३१ हमालवाडा येथील विविध गल्यात फरशी बसविणे- २ लक्ष | बनेवाडी स्मशानभूमी विकसित करुन सुशोभीकरण करणे-२ लक्ष |
| | प्रभाग क्र. ३१ विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे १२.५० लक्ष मधून १.५० लक्ष वळती करणे. | म्हाडा कॉलनी बन्सीलाल नगर येथील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. १.५० लक्ष |

**मा. सभापती** : शहरातील पथदिव्यांचे देखभाल दुरुस्तीकरीता अर्थसंकल्पातील तरतुद अपुरी असल्यामुळे व सदरील काम प्राधान्याने करणे गरजेचे असल्यामुळे खालील दर्शविल्यानुसार अर्थसंकल्पातील कामांची तरतुदी रक्कम देखभाल दुरुस्ती करीता वळती करण्यास स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देण्याचा निर्णय घेते.

**निर्णय** : शहरातील पथदिव्यांचे देखभाल दुरुस्तीकरीता अर्थसंकल्पातील तरतुद अपुरी असल्यामुळे व सदरील काम प्राधान्याने करणे गरजेचे असल्यामुळे खालील दर्शविल्यानुसार अर्थसंकल्पातील कामांची तरतुद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| पृष्ठ क्र. | अ. क्र. | कामाचे नांव व अंदाजपत्रकीय तरतुद रक्कम |
|---|---|---|
| १८२ | १३ | नारेगाव विदयुतीकरण - १.०० लक्ष |
| | १४ | मसनतपुर विदयुतीकरण - १.०० लक्ष |
| १८३ | २ | अधिकृत वसाहती जी आय पोल लावणे-३.५० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| १८४ | ५ | छ. शिवाजी महाराज पुतळा फवारे-१.०० लक्ष |
| १८५ | १ | पोल शिफ्टींग-५.०० लक्ष |
| | २ | पोल शिफ्टींग-५.०० लक्ष |
| १८५ | २ | जयनगर हॉल विदयुतीकरण-०.५० लक्ष |

**सुधारीत कामाचे नांव व तरतुद**

रकाना क्र. ३ मध्ये दर्शविलेली कामे रद्द करुन एकूण १७.०० लक्ष रुपये देखभाल दुरुस्ती या कामाकरीता वळती करण्यात यावेत.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १९-०८-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक १९ ऑगस्ट २००४ रोजी मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०४.१५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १. स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | स. सभासद |
| २. स. स. श्री. शेख इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ३. स. स. श्रीमती जयश्री किवळेकर | -//- |
| ४. सौ. शाहीन जफर महमुद जफर | -//- |
| ५. स. स. श्री. मधुकर सावंत | -//- |
| ६. स. स. श्री. प्रल्हाद गणपतराव निमगांवकर | -//- |
| ७. स. स. श्री. मोहन मेघावाले | -//- |
| ८. स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | -//- |
| ९. स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान | -//- |
| १०. स. स. श्री. सोपान भाऊराव पारे | -//- |
| ११. स. स. श्री. शे. मुनाफ शे. यासीन | -//- |
| १२. स. स. श्री. भगवान दगडूजी रगडे | -//-. |

**संवाद :**

**श्रीमती जयश्री किवळेकर :** स्थायी समिती सभागृहाच्या गेटवर अडवण्याचे कारण आपणास समजलेच असेल. आपण सभेचे आयोजन करतात ही चांगली बाब आहे. परंतु सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कोणती कामे झालेली आहे. कामाचा स्टेज काय आहे. आता आचार संहिता लागणार आहे. मा. आयुक्तांच्या सह्या झाल्यानाही तर काम होणार नाही. स्थायी समितीने दिलेल्या आदेश संदर्भात काय अंमलबजावणी झाली आहे. सभागृहात रुलींग देण्यात येतात. झालेल्या चर्चेला काहीच महत्व नाही काय. सभागृहात प्रवेषाच्या वेळी अडवण्याच्या मागील भावना काय आहेत. त्या लक्षात घ्या. आम्ही जनतेच्या कामासाठी झगडतो. जर कामे झाली नाही. तर दाद कुठे मागायची. प्रशासनाने काय कार्यवाही केली. तो अहवाल घ्यावा. सिडकोचे मुख्य प्रशासक यांचेकडे आयुक्तांचा कार्यभार आहे. ते जर थांबत नसतील तर काय करावयाचे आहे ते ठरविण्यात यावे. नसता सभा तहकूब करण्यात यावी. आपण आदेश दयावे. विकास कामाला गती मिळाली पाहिजे.

**श्रीमती शाहीन जफर, सौ. रशीदा बेगम :** कामे होत नसतील तर स्थायी समिती सभेत बसल्यास अर्थ नाही. आचारसंहिता तोंडावर आली आहे. कामे तातडीने व्हायला पाहिजे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** मा. आयुक्त उपस्थित नाहीत. उपआयुक्त नाहीत. चर्चा करुन अंमलबजावणी होत नसेल तर अर्थ नाही. सभा घेण्यात येऊ नये.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** आमच्या संचिकांवर सह्या करणारे अधिकारी पाहिजेत. अधिकारी नसेल तर काहीही फायदा नाही. लवकरच आचारसंहिता लागणार आहे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** स्थायी समितीच्या तातडीच्या बैठकी लावण्यात आले. आदेश देण्यात आले, निर्णय घेण्यात आले काय, काय कामे झालेली आहेत खुलासा व्हावा.

**सौ. रशिदा बेगम :** सर्वच स. सदस्यांच्या वार्डात कामे व्हावी आयुक्त रजेवर गेले. सह्या कोण करणार आहे.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या भावना रास्त आहेत. मी देखील सहमत आहे. अंमलबजावणी काय झाली आत्मपरीक्षणाची गरज आहे. विशिष्ट विषयावर विचारणा केली तर उत्तर घेण्यात येईल. महापालिका आयुक्त १० तारखेपासून रजेवर आहेत व आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सिडकोचे मुख्य प्रशासक यांचेकडे सोपविण्यात झालेला आहे. आताच माहिती मिळाली की, ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाच्या सभेला जाणार आहेत. मा. आयुक्त यांच्या स्थरावर शेरा दिलेले किती प्रकरणे आहेत. अतिरिक्त शहर अभियंता श्री. सोनवणे यांनी माहिती दिलेली आहे. २२ कामांची यादी दिली. पाणीपुरवठयाचे एकूण प्रलंबित कामे सरासरी वीस प्रकरणे प्रलंबीत धरल्यास ८० प्रकरणे होतात. भांडार व औषधी खरेदीचे सुमारे १०० संचिका प्रलंबित असल्याचे अहवालानुसार स्पष्ट दिसते. दर वाटाघाटीसाठी देखील प्रलंबित आहेत. प्रकरणात विशिष्ट शेरा दिलेला आहे. ही सर्व कामे आचारसंहितेपूर्वी व्हावी. यासाठी तळमळ चालु आहे. या संदर्भात बैठकही लावण्यात येते. आर्थिक तरतूद लेखाशिर्ष बदलणे. इ. कामे अशा ४५० संचिका मंजूर झाल्या कार्यआदेशही झाले. किरकोळ कामासाठी प्रलंबीत आहे. जसे २ अनामत रक्कम भरणे इत्यादी उपआयुक्त श्री. कांबळे यांनी खुलासा करावा. विकास कामांना खीळ बसू नये. श्री. जोशी साहेब रजेवर गेल्यानंतर किती कामे झालेले आहेत. आयुक्तांनी आयुक्तांच्या दालनातच काम करावे. ही कामे अतिरिक्त असली तरी १० एप्रिल २००४ पासून जेवढे आदेश झालेले असतील त्याचा अहवाल दिनांक २३ तारखेला होणाऱ्या बैठकीत सभागृहात सादर करावा.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** स. सदस्यांच्या भावना काय आहे. समजून घेतल्या पाहिजे. त्यामुळे गैरसमज होणार नाही. सभागृहाने चांगले निर्णय घेतले. जनतेच्या हिताचे निर्णय झालेत. १०० संचिका प्रलंबीत आहे. स. सदस्य आपल्यावर आरोप करीत नाहीत.

**उपआयुक्त (प्र.) :** मा. आयुक्तांसह सकाळी चर्चा झालेली आहे व मा. सभापतींनी देखील चर्चा केलेली आहे. चारही कार्यकारी अभियंत्यांना तातडीचे कामे देण्यात आलेली आहेत. मा. आयुक्त, मा. विभागीय आयुक्तांच्या बैठकीसाठी गेलेले आहेत. ते सभेला येणार आहेत. त्यांचे समक्ष चर्चा करता येईल. मा. सभापतींनी दिलेल्या सुचनेप्रमाणे २३ तारखेच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या संदर्भात माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती** : दिनांक २३-०८-२००४ रोजी आयोजीत होणाऱ्या स्थायी समिती सभेची कार्यक्रम पत्रिका २२ तारखेपर्यंत वितरीत करण्यात यावी. सभा ३० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (सभा तहकूबीचा वेळ दुपारी ४.३० वाजता व सभेला पुन्हा सुरुवात दुपारी ५.३० वाजता)

सभा सुरु होतानांच महानगरपालिकेचे सुरक्षा रक्षक स्व. प्रभाकर वेलदोडे यांचे अपघाती निधन झाल्याबद्दल श्रध्दांजली देण्याचे राहून गेलेले आहे. सर्वांना विनंती करण्यात येते की, श्रध्दांजलीसाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहावे. (यावेळी सुरक्षा रक्षक स्व. प्रभाकर वेलदोडे यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** मा. आयुक्तांना विनंती करण्यात येते की, त्यांनी दररोज एक-दोन तास महानगरपालिकेमध्ये असावे. आज धरणे दिले म्हणून व सभागृहात प्रवेश रोखण्यात आला म्हणून हजर झाले आहेत अशी भावना निर्माण होते. ८० संचिका चर्चेसाठी प्रलंबीत आहे. चर्चा कोणाबरोबर करणार. मा. आयुक्तांनी महानगरपालिकेत जास्तीत जास्त वेळ दयावा.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांनी कामे करण्यास सुरुवात झालेली आहे. आचार संहितेच्या कालावधीत कामे व्हावे. ही सदस्यांची भावना मा. आयुक्तांच्या लक्षाम आली आहे.

**श्रीमती शाहीन जफर :** महानगरपालिकेत आयुक्त नसतील तर प्रश्न कसे सुटतील. आपणांकडे जो पर्यंत आयुक्त पदाचा पभार आहे. तोपर्यंत दोन-चार तास महानगरपालिकेमध्ये यावे अशी विनंती आहे. १०० पेक्षा जास्त संचिका प्रलंबीत आहेत. कामे कसे व्हावे. वॉर्डामध्ये कामे करावे लागतात. दोन-तीन तास महानगरपालिकेत आलात तर आम्ही आभार व्यक्त करु.

**श्री. भगवान रगडे :** शहराचा विकास व्हावा व विकास कामे व्हावे म्हणूनच सभा घेण्यात येते. याबद्दल अभिनंदन. खंत वाटतो की, चार-पाच दिवसाला सभा घेण्यात येत, आदेश देण्यात येतात. परंतु किती कामे झाले. तीन महिन्यापासून मी सतत एका कामाबद्दल बोलतो. माझे काम कोणत्या स्तरावर आहे. मी देखील महानगरपालिकेचा एक विश्वस्त आहे. माझे ब्रिजवाडी येथील वाचनालय बांधण्याचे संदर्भात कडक आदेश देण्यात यावे. नगररचना विभागाला काय अभिप्राय द्यायचा त्यांनी द्यावा परंतू वाचनालयाची इमारत उभी राहायलच पाहिजे. १००% दलीत वस्ती आहे. अर्थसंकल्पात नोंद केलेली आहे. दुसऱ्या अर्थसंकल्पात नोंद गायब झाली. निविदा कशी काढणार काय कार्यवाही झाली याचा खुलासा करण्यात यावा. या संचिकेचा निकाल लागल्याशिवाय पुढील कार्यवाही करु नये. शहर अभियंता व सहाय्यक संचालक नगर रचना यांना आदेश दिलेले होते. आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देणे बाबतच्या सुचना केलेल्या होत्या. दोन्ही अधिकारी नाही. उपअभियंता यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता (ई) :** संचिकेमध्ये असे आदेश आहेत की, पी. आर. कार्ड नावाने करण्यात यावे रस्त्याने बाधीत आहे. किंवा कसे नगररचना विभागाकडून स्पष्ट करुन घ्यावे. त्यानंतरच काम करण्यात यावे.

**मा. सभापती** : या भागात इतरही इमारती झालेल्या आहे. ही संचिका जुनी आहे. संचिकेवर ३० जून २००३ ची तारीख दिसून येते. १७-१२-२००३ अन्वये मान्यता झालेली दिसते नगररचना विभागाचे नकारात्मक धोरण दिसते.

**श्री. भगवान रगडे :** तीन महिन्यापूर्वी आदेश देण्यात आले होते की, ताबडतोब मोजणी करा, घटनास्थळी जा. त्याच ठिकाणी आमदार बसैय्ये बंधू यांचे निधीतून सभागृहा बांधलेले आहे. वाचनालयाबाबतची संचिका सन २०००/- पासून चालू आहे. अदयाप काम झालेले नाही.

**मा. सभापती** : सदर कामाचे अंदाजपत्रक २,४९,९९२/- सादर झालेले दिसते. सदर भागात विकास योजनेत क्रिडांगण प्राथमिक शाळा व उदयान असल्याचे दिसते. झोपडपट्टी आहे. आरक्षणाच्या बाहेर बांधण्यात यावे. तत्कालीन सिटी इंजिनियर यांनी १७-१२-२००३ ला अभिप्राय दिलेला आहे. ७-८ महिने झाले मोजणीची कार्यवाही झालेली नाही.

**श्री. भगवान रगडे :** मी नगरसेवक असून, माझ्या कामासाठी इतका वेळ लागत आहे. तर सर्वसामान्यांचे काय हाल होत असतील आपण तीन महिन्यापूर्वी आदेश दिले होते. नगरसेवक असतांना या कामासाठी चार वर्षापासून पाठपुरावा करतो. काम होत नाही.

**मा. सभापती** : सदर प्रकरणात मा. आयुक्तांनी मोजणी झाल्यावर झोपडपट्टीत असेल तर आरक्षणात येत नसेल तर, असे शेरे आहेत. त्यामुळे अडचण निर्माण होते. स्लमच्या हद्दी बघाव्यात. यापूर्वी सदरील जागेत जे निकष लावून शाळा बांधली. मुतारी बांधली तसे निकष लावून वाचनालय देखील बांधण्यात यावे.

**श्री. भगवान रगडे :** सदर संचिका सन २००० मध्ये सुरु झालेली आहे.

**मा.सभापती** : आजच्या सभेला शहर अभियंता श्री. सोनी हजर नाहीत. तरी या कामासाठी अडीच लाख तरतूद ठेवण्यात येते. स्थायी समितीचा निर्णय संचिकेत लावून अंदाजपत्रक तयार करुन नियमानुसार निविदा काढून पुढील कार्यवाही करावी.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** मा. प्रभारी आयुक्त यांचे या सभागृहात स्वागत आहे. प्रलंबीत संचिका आचारसंहिते पूर्वी निकाली काढाल अशी अपेक्षा आहे. यापूर्वी संचिका प्रलंबीत असल्याबाबत मुद्दा निर्माण झाला होता. आदेशाचे पालन न करणे इ. बाबत सदस्यांनी विचारणा केली आहे. तसेच चार महिन्यापूर्वी हरीत क्रांतीचे प्रणेते मा. वसंतराव नाईक यांचा पुतळा उभारण्यासाठी चबुतऱ्याचे भूमिपूजन झालेले आहे. दोन महिन्यापासून पुतळा उभा करुन तयार आहे. आचारसंहितेपूर्वी अनावरण व्हावे परंतू खेद वाटतो कालच त्यांची पुण्यतिथी होती. त्या निमित्ताने पुण्यतिथीच्या दिवशी अनावरण व्हावयास पाहिजे होते. यापूर्वी स. सदस्य श्री. कोकाटे स. सदस्य श्री. ताठे यांनी देखील बोलेले होते. निर्णयाचे पालन होत नाही. समन्वयाचा अभाव आहे. नुसता पुतळा झाकून ठेवलाय. खेद वाटतो. हा भाग माझ्या प्रभागात मोडतो. किती दिवस पुतळा झाकून ठेवणार उद्घाटन कशा अभावी थांबलेले आहे. कोणाच्या समन्वयाचा अभाव आहे. याचे श्रेय कोणाला जाणार दोन-तीन दिवसात आचारसंहिता लागणार आहे.

**मा. सभापती** : या संदर्भात कोणालाही श्रेय लादण्याची बाब नाही. मागील बैठकीत मा. महापौर व पदाधिकारी याची तारीख घेवून अनावरण करण्याबाबत ठरविण्यात आले होते. अतिरिक्त शहर अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** सभेत आदेश दिल्याप्रमाणे आदेशाचे पूर्णतः पालन करुन पुतळा सर्वतोपरी पूर्ण करण्यात आलेला आहे. अनावरणसंबंधित मा. महापौर यांचेकडे संचिका पाठविण्यात आलेली आहे. तारीख प्राप्त झालेली नाही. कोणतीही तारीख मिळाल्यास प्रशासनाकडून तयारी आहे.

**मा. सभापती** : तारीख ठरविण्याचा अधिकार मा. महापौरांचा आहे. स्थायी समितीने दिलेल्या आदेशाची अतिरिक्त शहर अभियंता यांनी पालन केलेले आहे.

अनावरणासंबंधी तारीख देण्याचे अधिकार मा. महापौरांचे आहे. लवकरात लवकर तारीख देऊन अनावरण करण्यात येईल.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** अनावरण जर आचारसंहितेपूर्वी होत नसेल तर मी जेष्ठ नागरीकांकडून करुन घेईल. अनावरण करण्यासाठी जेष्ठ नागरीक सज्ज आहेत. अनावरण त्यांचा हक्क आहे.

**मा. सभापती** : अतिरिक्त शहर अभियंता यांनी तात्काळ मा. महापौरांची तारीख व वेळ घेऊन अनावरण तात्काळ घेईल अशी कार्यवाही करावी.

**श्री. संजय शिरसाठ :** मागील दोन स्थायी समिती सभेपासून आयुक्त मिळावे म्हणून वारंवार गोंधळ झाला होता. आज सुरक्षा रक्षकाच्या मदतीने आत आले. मंत्रालयापासून ते सिडको कार्यालयापर्यंत सदस्य गोंधळ करतात असा समज करण्यात आलेला आहे. अचारसंहिता पुढे लागणार म्हणून जाता जातांना काही नेमणूका केल्या. कोण आले कोण गेले याबद्दल काही घेणे देणे नाही. मा. मंत्र्याच्या स्वीय सहाय्यकांनी जरी फोन केला तरी सज्ज रहावे लागते. शासनाने दिलेले आदेश बंधनकारक आहेत. मा. जोशी साहेबांनी १० तारखेला रजा पाठविली ते ११ तारखेला होते. मालमत्ता अधिकारी यांच्याकडील वसूलीचा आढावा घेतला. रजेवर जाण्याचे घरगूती कारण सांगितले काम घरी बसूनच होते. तर महानगरपालिकेचे काम देखील घरी बसूनच होते. तर महानगरपालिकेचे काम देखील घरी बसून करता येते. शासनाने श्री. मनोहर हिरे यांना पाठविले त्यांना रुजू करुन घेऊ शकत नाही. विभागीय अधिकारी यांची वेतनश्रेणी त्यांच्यापेक्षा जास्त आहे. आमचा हक्क दाखविण्यात आला. उपआयुक्त यांना तात्काळ मुंबईला बोलाविले या संदर्भात दबाव टाकण्यात यावा. सर्वसाधारण सभेने श्री. मनोहर हिरे यांना रुजू करु होऊ नये म्हणून ठराव पारीत केलेला आहे. सर्वसाधारण सभा lसर्वोच्च आहे. सर्वसाधारण सभेने ठरविले की, आयुक्त नको अशा वेळी आयुक्तांना देखील चोवीस तासात पद सोडावे लागते. महानगरपालिकेने दिलेला निर्णय त्या पलीकडे जाऊन येथे येण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. मागच्या आयुक्तांनी हे पसंत नव्हते. म्हणून सुट्टीवर गेले. १००-१२५ संचिका प्रलंबीत आहेत. येणाऱ्या आयुक्तांना याबद्दल संभ्रम निर्माण घेवू नये. अधिकाऱ्यांना विश्वासात घ्यावे. चर्चा म्हणजे प्रकरण लांबणीवर टाकु नये. पावसाळयाच्या तोंडवर अनेक प्रश्न आहे.काही निर्णय घ्यायचे असतात. प्रत्येक वेळा वृत्तपत्रामध्ये छायाचित्र छापले जाते. आम्हास नगरसेवक म्हणून खाली माना घालाव्या लागतात. महानगरपालिकेत बऱ्याच सभा घेतात व वेळ मिळाला तर कामे करावे लागतात. सांगायचे तात्पर्य असे आहे की, निर्णय कोण होणार, नगरपरिषदेमध्ये नगराध्यक्षाला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. मात्र महापौरांना अधिकार पोहचत नाही. दैनिक वेतन कर्मचाऱ्याप्रमाणे आमची गत झालेली आहे. रुपये ३०००/- मानधन मिळते. या मानधनावर स. सदस्य प्रत्येक फाईलच्या मात्रे फिरतात. प्रत्येकांना वाटते निवडणूक जवळ आलेली आहे. आपल्या कारकीर्दीत कामे झाली पाहिजेत व आचार संहितेपूर्वी कामे व्हायला पाहिजेत. आचारसंहिता लागल्यानंतर दीड महिन्यानंतर पुढील कामे होतील. आपणाकडे अतिरिक्त कार्यभार आहे याची आम्हाला जाणीव आहे. जोशी साहेब ३० तारखेला रुजू होतील १ ला सही

होईल. आमच्या भावना ओळखा. कृपया संचिका चर्चा म्हणून थांबू देऊ नका. कामाला दिशा द्या अशी प्रभारी आयुक्त यांना विनंती आहे.

**मा. आयुक्त** : मी यापूर्वीच माहिती काढलेली हाती. प्रलंबित संचिका अंतीम टप्यात आहेत आचार संहितेपूर्वी काढण्याचा प्रयत्न करेल.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांनी दर वाटाघाटीच्या संचिका अर्ध्या तासाच्या तहकूबीच्या कालावधीत देखील निकाली काढलेल्या आहेत. संचिका मा. जोशी साहेबांनी शेरा दिलेल्या आहेत. त्यांचेदेखील अवलोकन व्हावे. ते पण निकाली काढण्यात यावे. पाहणी व चर्चेच्या संचिका निकाली काढण्यात यावे. मा. आर. एन. जोशी यांना संशय होता की, शासनाचा दबाव येईल व श्री. मनोहर हिरे यांच्यामुळे विकास कामाला खीळ बसेल सर्वसाधारण सभेने ठराव घेतलेला आहे की, श्री. मनोहर हिरे यांच्या सारखे अधिकारी महानगरपालिकेवर लादण्यात आलेत प्रतिनियुक्तीने नियुक्ती झाली तरी श्री. मनोहर हिरे यांना रुजू करुन घेवून नका असा ठराव झालेला आहे. स्थायी समितीने देखील निर्णय घेतलेला आहे. प्रशासनाने यास बळी पडू नये. जोपर्यंत सर्वसाधारण सभा प्रतिनियुक्तीला मंजूरी देत नाही. तोपर्यंत श्री. हिरे यांना रुजू करुन घेऊ नये. उपआयुक्त महसूल श्री. शिंदे यांना मुंबईला बोलाविले आहे. त्यांच्यावरही दबाव टाकण्यात येत आहे. संघटनेने सुध्दा श्री. हिरे यांना रुजू करुन घेऊ नये. म्हणून आंदोलनाचा इशारा दिलेला आहे. कोणाच्याही दबावाला बळी न पडता श्री. मनोहर हिरे यांना एकतर्फी रुजू करुन घेऊ नये.

**श्री. संजय शिरसाठ :** तीन महिन्यापूर्वी नगर रचना विभागातील संचिका आढळत नाही. याबद्दल गोंधळ झाला होता. अनेक प्रश्नोत्तरे झाले. समिती स्थापन करण्यात आली. त्यात काही नगरसेवक, उपआयुक्त व सहाय्यक संचालक नगररचना यांची मिळून सिमती आहे. रेखांकनाअंतर्गत स्वत: विकास करावा अशा प्रकरणास मंजूरी देण्यात आलेली आहे. विकासक यांनी अशी प्रकरणे मंजूर करुन घेतली. अशा एक दोन प्रकरणांमध्ये उपआयुक्त (म) स. सदस्य श्री. कोकाटे यांनी भेटी दिल्या. एका ठिकाणी रस्ताच नाही व दुसऱ्या ठिकाणी बांधकाम परवानगी न घेता बांधकामे चालू आहे हे सहाय्यक संचालक नगररचना हे महापालिकेत दिसत नाही. एखादया दिवशी कोर्टात तारीख असेल तर पूर्ण दिवस तिकडेच जातो. नगररचना विभागाचे विभाजन करावे असे ठरले होते. या संदर्भात आदेश देण्यात यावे.

**मा. सभापती** : आपण यापूर्वी नगररचना विभागासंदर्भात ज्या बैठकीत आढावा घेण्यात आलेला होता. त्यावेळेस आदेश देण्यात आलेले होते की, नगररचना विभागाचे विभाजन सक्षमीकरण इत्यादी बाबत आराखडा तयार करुन स्थायी समितीला सादर करावे. या संदर्भात काय कार्यवाही झाली.

**उपआयुक्त (प्र.) :** मागच्या स्थायी समिती सभेत झालेल्या निर्णयाप्रमाणे सहाय्यक संचालक नगर रचना श्री. राठोड साहेब यांच्यासह चर्चा केली ते सविस्तर अहवाल तयार करुन देणार आहेत. २३ तारखेच्या बैठकीमध्ये सादर करण्यात येईल.

**मा. सभापती** : २३ तारखेला विकेंद्रीकरण व सक्षमीकरण या संदर्भात अहवाल सादर करण्यात यावा.

**श्री. ईलीयास किरमाणी :** महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता यांचेकडे स्वीय सहाय्यक म्हणून उपअभियंता यांनी नेमण्यात येते. त्यांना १५ ते २० हजार रुपये पगार

दिला जातो. संचिका होणे नोंद करणे इ. कामे कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता सुध्दा करु शकतात. उप अभियंता दर्जाचे जे अधिकारी आहेत. त्यांचेकडून इतरत्र कामे घेण्यात यावी. स्वीय सहाय्यकाचे काम दिले जाते ही चूकीची पध्दत आहे. कनिष्ठ/शाखा अभियंता देखील काम करु शकतात. त्यांना नेमण्यात यावे.

**सौ. शाहीन जफर :** उपअभियंता यांना १५ ते २० हजार रुपये पगार दिला जातो. एक दोन पत्र घेणे व त्याबद्दलची काही कार्यवाही करायची तेवढेच काम त्यांचेकडे देणे योग्य नाही. सिनियर उपअभियंता हे कार्यकारी अभियंता यांचेकडे स्वीय सहाय्यक म्हणून काम करतात. अशी पध्दत बरोबर नाही कनिष्ठ अभियंता अशी कामे हाताळू शकतात.

**मा. सभापती** : कोणकोणत्या कार्यकारी अभियंता यांचेकडे उपअभियंता दर्जाचे अधिकारी स्वीय सहाय्यक म्हणून काम करतात. खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** कार्यकारी अभियंता यांचेकडे उपअभियंता दर्जाचे अधिकारी स्वीय सहाय्यक म्हणून काम करतात. इतर तीनही कार्यकारी अभियंता यांचेकडे स्वीय सहाय्यक कार्यरत नाहीत.

**मा. सभापती** : अगोदरच या महानगरपालिकेत उपअभियंता पदाचे अधिकारी कमी असून जे आहेत. त्यांना स्वीय सहाय्यक म्हणून काम देणे बरोबर नाही. या सभागृहाची भावना लक्षात घेता कार्यकारी अभियंता यांचेकडे जे स्वीय सहाय्यक म्हणून उपअभियंता दर्जाचे अधिकारी दिले जातात. त्या ऐवजी शाखा अभियंता दर्जाचे दिले जावेत.

**अति. शहर अभियंता :** शाखा अभियंता म्हणून स्वीय सहाय्यक दिले तरी चालेल. तसेच कार्यालय अधिक्षक म्हणून कर्मचारी दिल्यास काम करण्यास मदत होईल.

**मा. सभापती** : कार्यकारी अभियंता यांचेकडे उपअभियंता दर्जाचे अधिकारी स्वीय सहाय्यक म्हणून न देता शाखा अभियंता यांना स्वीय सहाय्यक म्हणून नेमावे व चारही कार्यकारी अभियंता यांचेकडे कार्यालयीन अधिक्षक नेमण्यात यावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मा. आयुक्त आलेले आहेत. खुलासा केला आहे की, ज्या संचिका प्रलंबीत आहेत. ज्या निकाली काढण्यात येतील. आजच्या आज काही संचिकांना मंजुरी दिलेली आहे व सर्व कामे सुरळीत होतील अशी ग्वाही सभागृहास दिलेली आहे. निश्चितपणे कामे होतील अशी अपेक्षा आहे. जर कामे झाली नाही तर लोक प्रतिनिधींना नागरीकांकडून काय त्रास होतो याची जाणीव प्र. आयुक्त यांना आहे. नगररचना विभाग शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व इतर अनेक विभागावर विकास कामाच्या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. सर्वच अहवाल २३ तारखेच्या बैठकीत सादर करणार आहे. हा भाग वेगळा, परंतू विकास कामे होत नाही. शासनाचा निधी उपलब्ध होत नाही. म्हणून सभेत स. सदस्य वारंवार चर्चा करतात. गेल्या चार वर्षापासून या शासनाने या मनपासाठी काही केले नाही. चांगले व जास्तीत जास्त कामे होण्याच्यादृष्टीने लक्ष दिलेले नाही. दुजाभाव पध्दतीने पाहीले गेले. सर्वसाधारण सभेच्या एखादया महत्वाच्या विषयाला शासनाने मान्यता द्यायची नाही. मा. आयुक्तांना चांगल्या पध्दतीने काम करु द्यायचे नाही. एकतर्फी धोरण अवलंबीले जाते. त्याचा एकभाग समोर आला. मनपाच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद केलेली आहे. नावानिशी बजेट आहे. काही

कामाच्या निविदा काढलेल्या आहेत. काही दुरुस्तीचे प्रस्ताव येत आहेत. सर्व काही व्यवस्थित चालले असतांना वरीष्ठ स्तरावरुन वेगवेगळे डावपेच रले जात आहेत. या मनपाचे काम ठप्प व्हावे. म्हणून प्रयत्न होत आहेत. शासनाने आदेश दिले म्हणून ते मा. आयुक्तांना डावलणे अवघड झाले. व त्यामुळे मा. आयुक्तांनी रजेवर जावे हे बरोबर वाटत नाही. मा. सभागृहाने जे अधिकार दिले ते मा. आयुक्तांनी वापरावयास पाहिजे. मा. आयुक्त रजेवर गेले म्हणून १५ दिवस विकास कामांना बाधीत येत आहे व तसा प्रयत्न होत आहे. म्हणून मी निषेध व्यक्त करतो. अतिरिक्त आयुक्त पद निर्मितीचा ठराव शासनाकडे गेलेला आहे. त्या ठरावाची कुठपर्यंत अंमलबजावणी झालेली आहे. प्रशासनाने काय शिफारस केलेली आहे. आज रोजी अतिरिक्त आयुक्त पद असेल तर कोणतीही विकास कामे रखडली नसती. जे झाले ते पुन्हा होता कामा नये. अतिरिक्त आयुक्त पद कार्यरत असते तर आजच्या स्थितीत मा. आयुक्त रजेवर गेले असते तरी सह्या करु शकत होते. अतिरिक्त आयुक्त पदा संदर्भात काय कार्यवाही केली त्याचा खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. अदयाप उत्तर मिळाले नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या पदास शासनाने मान्यता देण्याच्या दृष्टीने लक्ष ठेवण्यासाठी महानगरपालिकेने स्मरणपत्र देण्याची गरज आहे. स्थायी समितीच्या चर्चेच्या सारांश विचारात घेऊन मा. विभागीय आयुक्तांना सुध्दा पत्र पाठविण्यात यावे. सूचना दिल्या होत्या, पत्रव्यवहार झालेला नाही. पत्रव्यवहार केला असेल तर तसा खुलासा करण्यात यावा. पत्रव्यवहार केला नसेल तर, मा. सभापतींचा म्हणजेच या सभागृहाचा अवमान होत आहे हे विसरता येणार नाही अशा वेळी जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे.

यापुर्वीही याच सभागृहात प्रशासकीय विभागावर वादळी चर्चा झाली. श्री. संगेवार नावांचे इमारत निरिक्षक यांचे संचिकेवर तत्कालीन आयुक्त मा. श्री. शर्मा साहेबांनी त्यांची प्रशासकीय विभागात पाच वर्षे बदली करु नये असा शेरा दिला असतांना सुध्दा त्यांना प्रशासकीय विभागात देण्यात आले. का देण्यात आले असा प्रश्न येतो. आयुक्तांचे आदेश पाळले जात नसतील तर योग्य नाही. गेल्या दोन-चार दिवसांपासून मनपाचे काही कर्मचारी/अधिकारी साईटवर जाऊन पाहणी करतात. तपासणी करतात. कोणत्या अधिकारात जातात. परवानगी दिलेली आहे का? खुलासा करावा.

**मा. सभापती** : सिडको नाट्यगृह बांधण्याबाबत सभागृहाने निर्णय घेतलेला होता. २५ लक्ष मनपामार्फत जमा करण्यात आले होते. ५० लक्षची अर्थसंकल्पात तरतुद आहे. मनपाचे सिडको भागात नाट्यगृह असावे. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता. मा. विभागीय आयुक्तांच्या मार्फत शासनास कळविण्यात यावे. सिडकोच्या माध्यमातून बांधकाम होत असेल तरीही पत्र देवून सभागृहाच्या भावना लक्षात घेता मा. विभागीय आयुक्तांच्या मार्फत शासनास कळविण्यात यावे. सिडकोच्या माध्यमातून बांधकाम होत असेल तरीही पत्र देवून सभागृहाच्या भावना कळवाव्यात.

**अति. शहर अभियंता :** माझ्या माहिती प्रमाणे विभागीय आयुक्तांना तसे पत्र देण्यासंदर्भात आदेश प्राप्त नाहीत. आज आपल्या भावना काढलेल्या आहेत. आज कळविण्यात येईल.

**मा. सभापती** : सुतगिरणी भागात क्रिडा संकुल बांधण्याच्या संदर्भात प्रस्ताव होता. ते करणे योग्य की, अयोग्य अहवाल मागविलेला होता. सदर अहवाल प्राप्त झाला असून, तो पुढील प्रमाणे आहे. सुतगिरणी गारखेडा येथील नियोजीत क्रिडा संकुलाचे बांधकामा संदर्भाने नगर रचना विभागाचे उप-अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता असे निर्दशनास आले की, सिडको मार्फत या ठिकाणी स्टेडीयमची मार्कीग तसेच हॉलीबॉल टेनिस इत्यादी मैदानी खेळाचे पटांगणाचे मार्कींग करण्याचे काम सुरु होते. येत्या दोन-तीन दिवसात क्रिडा संकुलाच्या कामाची सुरुवात करण्यास्तव कार्यक्रम आयोजीत केला आहे असे स्थानिक चौकशीत समजले आहे.

या प्रकरणी अधिक माहिती घेतली असता मा. सहाय्यक संचालक नगररचना शाखा कार्यालय औरंगाबाद यांनी विषयांकित प्रकरणी जमीन वापरा संदर्भात ना हरकत जिल्हा क्रिडा अधिकारी तथा सदस्य सचीव औरंगाबाद यांना दिले आहे. असे समजते.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५८ नुसार कुठल्याही शासकीय प्राधिकरणास कुठल्याही जमिनीचा विकास करावयाचा असेल तर, अशा विकास कामास सुरुवात करण्यापुर्वी तीस (३०) दिवस अगोदर नियोजन प्राधिकरणास नियोजीत विकासाच्या संपूर्ण तपशीलासह कागदपत्रांसह व आराखडयासह कळविणे आवश्यक आहे.

विषयांकित प्रकरणी अशा प्रकारचा कुठलाही प्रस्ताव नगररचना विभागास प्राप्त झालेला नाही. करीता अहवाल माहितीस्तव सादर.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** ही गायरान जमीन होती. शासनाच्या ताब्यात होती. अहवाल ठेवला त्या जागेवर जो काही विकास करावयाचा त्यासाठी प्लॅनिंग ॲथॉरीटी महानगरपालिका आहे. एन. ओ. सी. मनपाने दिल्याशिवाय त्या जागेवर कोणताही विकास घेऊ शकत नाही. त्या ठिकाणी एन. ओ. सी. दिल्यानंतर मोठे व्यापारी संकुल होईल. मोठे सभागृह होईल. वाचनालयासाठी जागा असेल. अनेक सोयी सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागणार आहेत. स्पष्ट तरतूद आहे. प्लॅनिंग ॲथॉरिटी मनपा आहे. ३० दिवस अगोदर मनपाची एन. ओ. सी. मागविणे आवश्यक होते. जर एन. ओ. सी. न घेता तेथे क्रिडा संकुलाचे उद्‌घाटन होत असेल तर, ते अनाधिकृत होईल असे शासनाच्या निर्दशनास आणून दयावे.

**मा. सभापती** : प्लॉनिंग ॲथॉरिटी म्हणून ३० दिवस अगोदर प्रस्ताव मनपाकडे एन. ओ. सी. साठी सादर करणे आवश्यक होते. आपण मागणी करावी उद्‌घाटन थांबवावे प्रत्यक्ष एन. ओ. सी. घेतल्याशिवाय काम सुरु करता येणार नाही. ३० दिवस अगोदर आपणाकडे प्रस्ताव यायला पाहीजे.

**श्री. संजय शिरसाठ :** सदर जागे संदर्भात अहवाल दिला. त्या जागेवर क्रिडा संकुल होणार. दोन-चार दिवसात उद्‌घाटन होणार. वृत्तपत्रात सुध्दा बातम्या प्रसिद झाल्या. एन. ओ. सी. न घेता बांधकाम केले तर कार्यवाही करणार हा मुद्दा आहे. जिल्हा क्रिडा अधिकारी सदस्य आहे. परंतू मा. महापौर, मा. आयुक्त हे सदस्य नाहीत.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** सभा संपण्यास वेळ होतो. रात्रीचे सात वाजले. अशा विषयावर जास्त चर्चा न करता इतर चर्चेसाठी वेळ ठेवावा.

**मा. सभापती :** ठिक आहे. या संदर्भात २३ तारखेला स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा करुन निर्णय घेता येईल क्रिडा संकुल, उभारण्यासाठी मनपाची एन. ओ. सी. घेणे आवश्यक आहे.

**श्रीमती शाहीन जफर :** सिल्लेखाना येथील अतिक्रमण संदर्भातील प्रकरणात काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** या संदर्भात संबंधित व्यक्तीने लोअर कोर्टात प्रकरण दाखल केले होते. दिवाणी दाखल केला. मा. न्यायालयाने तो फेटाळला. महानगरपालिकेची कार्यवाही वैध ठरविली. पुन्हा संबंधिताने मा. जिल्हा न्यायालयात रीट दाखल केला. तेथेही न्यायालयाने महानगरपालिकेची कार्यवाही वैध ठरविली रिट याचिका काढून घेतली. आजची स्थिती अशी आहे की, पुन्हा संबंधिताने खालच्या कोर्टात प्रकरण दाखल केले त्यास न्यायालयाने अंतीम सुनावणी पर्यंत जैसे थे असे आदेश दिलेले आहेत.

**मा. सभापती :** स्थगिती आदेश तात्काळ व्हॅकेट करा. पॅनल वरील वकील काय काम करतात. त्यांना बदलण्याबाबत वारंवार मागणी होते. तशा सूचनाही या सभागृहाने दिल्या होत्या. आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**विधी सल्लागार :** या संदर्भात कार्यवाहीसाठी संचिका मा. आयुक्तांकडे प्रस्तावित केलेली होती. रिमार्क आले माहिती घेऊन सादर करण्याचे आदेशित केले. याबाबत वरीष्ठांकडे चर्चा केली. मा. आयुक्त आल्यानंतर कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** तात्काळ त्या संचिकेवर निर्णय घ्यावा. मनपाचे वकीलांचे पॅनल बदलावे. या प्रकरणासंदर्भात तात्काळ न्यायालयात कॅव्हेट दाखल करावे.

**श्रीमती शाहीन जफर :** १५ ऑगस्ट २००४ पुर्वी शालेय विदयार्थ्यांना गणवेश वाटप करणार होते. अदयाप गणवेश देण्यात आलेले नाही. तसेच शालेय साहित्य पुरवठा नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** २३ तारखेपर्यंत गणवेश येतील. तसेच फर्निचर खरेदीची निविदा काढण्यात आलेली आहे. लवकरच फर्निचर येईल. काहीही अडचण येणार नाही.

**श्री. भगवान रगडे :** सम्राट अशोक विदयालयासमोर २.५ ते ३ फुट पाणी रस्त्यावर साचते म्हणून राजेन्द्रनगर भागात मुरुम टाकण्याचे आदेश दिलेले होते. परंतू त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही तेथील नागरीकांना बेटरमेंट चार्जेस भरणा केलेले आहेत. सुविधा का दिल्या जात नाहीत? (कागदपत्र दाखवितात.)

**मा. सभापती :** उपअभियंता यांना सूचना देण्यात येतात की, ज्या त्या भागातील रहिवाश्यांनी बेटरमेंट चार्जेस भरणा केला असेल तर, स. सदस्य श्री. रगडे यांनी कागदपत्रे दाखल केलेले आहेत. मुलभूत सुविधा देण्यास हरकत नसावी. उपआयुक्त (प्र.) यांनी याबाबत तपासून कार्यवाही करावी. तसेच अतिरिक्त शहर अभियंता यांना सूचना करण्यात येतात की, जेथे १००% विकास खर्च भरणा केलेला आहे. त्या भागात सुविधा देण्यास हरकत नसावी. तशी कार्यवाही प्रशासनाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे.

**अति. शहर अभियंता :** नगररचनाकार बरोबर तपासणी करतो. देखभाल दुरुस्तीची तरतुद संपलेली आहे. अतिरिक्त तरतुद लागेल.

**मा. सभापती** : कामा अंतर्गत वळती करावयाचे ठरले होते. सात-आठ झोनची देखभाल दुरुस्तीची निविदा काढणार होते.

**श्री. मधुकर सावंत :** श्री. एम. एम. खान यांना शाळेच्या फर्निचर सर्वेक्षणाचे काम देण्यात आलेले होते. त्यांनी त्यांचा अहवाल देण्याबाबत सूचना केल्या अहवाल प्राप्त झाला आहे का? तसेच श्री. संगेवार हे अनाधिकृत प्लॉटींग धारकांकडून पैसे वसूल करीत आहे. अशी माहिती आहे.

**मा. सभापती** : त्यांची चूक नसल्याचे अहवालात नमूद आहे. अहवाल प्राप्त आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** माझ्या वार्डातील शाळेत फर्निचर संदर्भात चौकशी करण्यासाठी कोणीच कर्मचारी/अधिकारी आलेले नाही. अहवाल कसा सादर केला. तसेच श्री. संगेवार यांचे बाबत खुलासा केलेला नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** श्री. संगेवार यांना कार्यालयीन काम दयावे असे आदेश प्रशासकीय अधिकारी यांना दिलेले आहे. ते कार्यालयात काम करतात. साईटवर जात नाही. जर आदेशांचे पालन होत नसेल तर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. ९२ :**

औरंगाबाद शहर नागरी पुरवठा योजना (जायकवाडी उद्‌भव) संदर्भात महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. नावापु/१००१/प्र. क्र. ५२६/पापु-२२/मंत्रालय, मुंबई दिनांक १७-०१-२००२ अन्वये महानगरपालिका " अ " वर्ग नगरपालिका यांनी सन २००४-०५ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा योजनेचे " पाणी व उर्जा " परिक्षण करावे अशा सूचना प्राप्त झाल्यानुसार स्वयंस्पष्ट प्रस्ताव खालील प्रमाणे सादर केला आहे.

सद्यःस्थितीत पाणी टंचाई, पाणी उचल व वाटप यातील तफावत, पाण्याची चोरी, पाणी गुणवत्ता, मुख्य वाहीन्या तसेच वितरण प्रणाली मधील गळत्या पाणी दर्जा तसेच सुयोग्य क्लोरीशन व्यवस्था यांचा योग्य तो समन्वय व हिशोब तसेच उर्जा संदर्भातील अनावश्यक खर्च याचा ताळमेळ लागण्या संदर्भात सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाने पत्र क्र. पा. पु./३६९/०४ दिनांक २६-०३-२००४ दिनांक २१-०३-२००४ नुसार शासन यादीमधील १० संकल्पनार्थीना निविदा पाठविल्या होत्या. (एकुण १६ संकल्पनार्थीपैकी १० संकल्पनार्थी पाणी व उर्जा दोन्हीची कामे करत असल्याने १० संकल्पनार्थी निविदा पाठविल्या होत्या) या निविदेची निविदा पुर्व बैठक दिनांक १७-०४-२००४ रोजी बोलाविली होती. या बैठकीस चार संकल्पनार्थी हजर होते. निविदा स्विकृतींच्या शेवटच्या दिवशी मे. बी. व्ही. दाते यांची एकच निविदा प्राप्त झाली. स्पर्धात्मक निविदा न आल्याने तसेच मे. दाते यांनी एकच निविदा असल्याने उघडू नये असे लिखित दिल्यामुळे प्रारंभीची निविदा प्रक्रिया रद्दबातल ठरविण्यात आली.

त्यानंतर एकूण १६ संकल्पनार्थीचा नामनिर्देश करुन या संकल्पनार्थी मधून योग्य त्या संकल्पनार्थीची निवड करण्याबाबत ठरले. त्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाने पत्र क्र. ४६४/०४ दिनांक २०-०५-२००४ नुसार नामनिर्देशन यादी मधून १५ संकल्पनार्थीना निविदा पाठविल्या. निविदा प्राप्तीच्या शेवटच्या दिवशी एकूण पाच संकल्पनार्थीनी दुजोरा देऊन खालील प्रमाणे दराची मागणी केली.

| | | |
|---|---|---|
| १. | टाटा कंन्सल्टींग इंजिनियर्स | रु. १००.४० लाख |
| २. | मे. कन्सल्टींग इंजि. सर्व्हीसेस | रु. ४७.७९ लाख |
| ३. | मे. शहा टेक्नीकल कन्सल्टींग | रु. ३६.०० लाख |
| ४. | मे. एम. डब्ल्यू एच. | रु. ३४.५६ लाख |
| ५. | मे. बी. व्ही. दाते | रु. १७.३० लाख |

उपरोक्त निविदा प्राप्त दरामध्ये किमान दर श्री. बी. व्ही. दाते व कमाल दर मे. टाटा कन्स्टींग यांचे मध्ये खुपच तफावत असल्याने मे. टाटा कन्सल्टींग यांच्या दराबाबत विचार करुन नये असे शिफारशीत केले गेले. त्याच प्रमाणे मे. बी. व्ही. दाते यांनी दर्शविलेले दर रुपये १७.३० लक्ष हे औरंगाबाद शहराच्या मोठया परिणामाच्या योजने संदर्भात कितपत योग्य आहेत. याबबात मुख्य लेखाधिकारी यांनी मे. बी. व्ही. दाते यांचे कडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त करुन दयावी असे सुचविले.

१. मे. बी. व्ही. दाते यांच्या मार्फत त्यांनी केलेल्या कामांची प्रमाणपत्रे
२. मे. बी. व्ही. दाते यांचेकडे कामासंदर्भात उपलब्ध असलेली मशिनरी साहित्य सयंत्रे.
३. मे. बी. व्ही. दाते यांचेकडील उपलब्ध तांत्रिक कर्मचारी वर्ग त्यांचे बॅलेन्स शीट वगैरे

सुचनेनुसार पत्र क्र. पापु-जा/७५०/०४ दिनांक २१-०४-२००४ अन्वये माहिती मागविण्यात आली. परंतू मे. बी. व्ही. दाते यांनी त्यांच्या दिनांक ३१-०७-२००४ च्या पत्राद्वारे जी माहिती पाठविली ती संयुक्तिक वाटली नाही. त्यामुळे मे. बी. व्ही. दाते हे शहराच्या पाणी व ऊर्जा कार्यक्रम राबविण्यात सक्षम नसल्याचे दिसून आले. त्यामुळे श्री. दाते यांची संकल्पनार्थी म्हणून (कमी दर असले तरी) निवडन करण्याची शिफारस कार्यकारी अभियंता यांनी केली. त्यावर मुख्य लेखाधिकारी यांनी सहमती दर्शविली.

उर्वरीत तीन संकल्पनार्थीपैकी मे. एम. डब्ल्यू एम. व मे. शहा टेक्नीकल कन्सल्टंट या दोघांच्या निविदा दरामध्ये फारसा फरक नसल्याचे तसेच एम. डब्ल्यू. एच. यांचे दर दोघांत कमी असल्याने त्यांच्या नावाची शिफारस करण्यात आली. मा. आयुक्त महोदयांनी प्रस्तावाचा सखोल अभ्यास करुन एम. डब्ल्यू. एच. व एम. टी. सी. या दोघांपैकी कोणता संकल्पनार्थी योग्य आहे. याबाबत तज्ज्ञांचे मत घेण्याच्या दिल्या.

मा. आयुक्त महोदयांच्या सुचनेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे निवृत्त मुख्य अभियंता मा. श्री. ए. एस. नरसापूर यांचेकडे चर्चा केली व संकल्पनार्थींचा अंतीम निवडीबाबत अभिप्राय मागविला. या संदर्भात मा. श्री. नरसापूर यांनी संकल्पनार्थीकडून (CES. MWH व STC) त्यांच्या कामाचा अनुभव व प्रमाणपत्र सविस्तराने मागवावीत असे सुचविले.

श्री. ए. एस. नरसापूर, निवृत्त मुख्य अभियंता म. जी. प्रा. यांच्या सुचनेवरुन उर्वरीत तीनही संकल्पनार्थीकडे संपर्क साधून प्रमाणपत्राची मागणी केली असता मे. शहा. टेक्नीकल कन्सल्टंट यांनी दुजोरा देवून योग्य तो प्रमाणपत्रे पाठविली. उर्वरीत संकल्पनार्थीनी प्रमाणपत्रे पाठविली नाहीत.

मा. आयुक्तांच्या सुचनेनुसार मा. श्री. ए. एस. नरसापूर यांचेकडे जेव्हा चर्चा करण्यात आली तेव्हा यांनी प्राथमिक अहवाल सविस्तराने दिला. त्यांचे मते मे. शहा टेक्नीकल कन्सल्टंट हे संकल्पनार्थी सर्व दृष्टीने योग्य असल्याचे दिसते. कारण त्यांचेकडे

उर्जा परिक्षणाच्या दृष्टीने योग्य अर्हता प्राप्त यांत्रिकी कक्षेचा अभियांत्रिकी वर्ग आहे व मे. शहा यांना औरंगाबाद शहराची माहिती देखील आहे.

एकूण सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या पाहणी वरुन श्री. ए. एस. नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता यांनी अंतीम अहवाल दिला की, उर्जा परिक्षणा संदर्भात मे. शहा टेक्नीकल कन्सल्टंट व प्राईमा टेक्नो यांच्यात झालेल्या कराराची प्रत प्राप्त करुन घ्यावी व मे. शहा टेक्नीकल कन्सल्टंट या संकल्पनार्थीना दुसऱ्या क्रमांकाच्या दरावर काम करण्यास सांगावे. त्यानुषंगाने संबंधिताबरोबर दुरध्वनी वरुन केलेल्या चर्चेनुसार त्यांनी दुसऱ्या क्रमांकाचे दरामध्ये म्हणजे ३४.५६ लक्ष रक्कमेवर काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

तद्नुषंगाने मे. शहा टेक्नीकल कन्सल्टंट यांच्या नावास तसेच पाणी व उर्जा परिक्षणाच्या रुपये ३४.५६ लक्ष रक्कमेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** रुपये १७.३० लक्षची कमी असलेली निविदा न स्विकारता रु. ३४.५६ लक्षची श्री. शहा यांची निविदा का स्विकारली गेली माहिती देण्यात यावी.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** औरंगाबाद शहर नागरी पाणी पुरवठा योजना संदर्भात वॉटर एनर्जी ऑडीट बाबत शासनाने आदेश दिलेले आहेत. पाणी पुरवठा व्यवस्थितरित्या व्हावा म्हणून वारंवार सर्वसाधारण सभा तसेच स्थायी समिती सभेत चर्चा झालेली आहे. शासनाचे कन्सल्टंट म्हणून एकूण १६ संकल्पनार्थींची यादी आहे. त्यातूनच दयावयाचे आहे. सर्वसाधारण ठेकेदाराकडून नाही. त्यांचे मार्फत पाणी व ऊर्जा दोन्हीची कामे करत असल्याने प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे १० संकल्पनार्थीनाच निविदा पाठविल्या होत्या. यात ७५% खर्च शासनाकडून मिळणार असून २५% खर्च महापालिकेचा होणार आहे. यात टाटा कन्सल्टींग इंजिनियर्स रु. १००.४० लक्ष टाटा कन्सल्टींग इंजिनियर्स रु. १००.४० लाख मे. कन्सल्टींग इंजि. सर्व्हीसेस रु. ४७.७९ लाख मे. शहा टेक्नीकल कन्सल्टींग रु. ३६.०० लाख मे. एम. डब्ल्यू एच. रु. ३४.५६ लाख, मे. बी. व्ही. दाते यांची रु. १७.३० लाखची निविदा भरुन आलेली आहे. यात सर्वात कमी दराची निविदा मे. बी. व्ही. दाते यांची आहे. टाट, मे. बी. व्ही. दाते यांची रु. १७.३० लाखची निविदा भरुन आलेली आहे. यात सर्वात कमी दराची निविदा मे. बी. व्ही. दाते यांची आहे. टाटा कन्सल्टंटची १००.४० लाखाची निविदा परवडणार नाही. त्यामूळे सर्वात कमी दराच्या तीन निविदा धारकांचे नकाशा वैगेरे तपासले व मुख्य लेखाधिकारी यांचे सुचनेनुसार मे. बी. व्ही. दाते यांचेकडून आवश्यक ती माहिती मागविली. त्यांनी दिलेली माहिती संयुक्तीक वाटली नाही. यानंतर मा. आयुक्त यांनी एम. डब्ल्यू एच. यांची निविदा व एस. टी. सी. यापैकी कोणता संकल्पनार्थी योग्य आहे. याबाबत तज्ज्ञांचे मत घेण्याच्या सूचना केल्या त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे निवृत्त मुख्य अभियंता श्री. ए. एस. नरसापूर यांचेकडे जाऊन छाननी केली. त्यांची सांगितलेल्या शहा कन्सल्टंट टेक्नीकलदृष्ट्या परफेक्ट आहे. त्यांना विचारणा करावी. दुसऱ्या क्रमांकाची निविदा ३४.५६ लाख याप्रमाणे करण्यास तयार आहे का, विचारणा केली. शहा टेक्नीकल कन्सल्टंट यांनी मान्यता दिली. त्यामुळे ३४.५६ लक्षची निविदेचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केलेला आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासनाकडे पाठविण्यात येईल. त्या ठिकाणीही छाननी

होईल. यात शासन ७५% खर्च करणार असून २५% खर्च मनपाचा राहील. जसजसे काम होईल त्याप्रमाणे शासन निधी उपलब्ध करुन देईल.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर नागरी पुरवठा योजना (जायकवाडी उद्‌भव) संदर्भात सन २००४-०५ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा योजनेचे " पाणी व उर्जा " परिक्षण करण्याचे कामासाठी मे. शहा टेक्नीकल कन्सल्टंट नियुक्ती करण्यास तसेच पाणी व ऊर्जा परिक्षणाच्या रुपये ३४.५६ लक्ष रक्कमेच्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८१ व ३८२ अन्वये मांस विक्री परवाना देण्यात येत आहे. असे निर्दशनास आले आहे की, परवाना मिळण्यासाठी आवश्यक बाबींची पुर्तता न करता साध्या कागदावर सविस्तर तपशील, पत्ता इत्यादी माहिती न देता अर्ज करण्यात येतो. त्यामुळे छाननी करण्यास अडचण निर्माण होते. मांस विक्री परवाना देण्याची कार्यवाही सोपी करता यावी यासाठी मांस विक्री परवाना देण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज करणे बंधनकारक करण्यात यावे व सोबतच्या नमुन्यातच अर्ज केल्यानंतरच परवाना देण्यात येईल. या पध्दतीचा अवलंब करण्यास व नमुना अर्जाची शुल्क रु. २५/- आकारणी करण्यास्तव प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**मा. सभापती** : मंजुरी देण्यात येते.

## : मांस विक्री परवाना अर्ज (नमुना) :

दिनांक :

मा. आयुक्त,
महानगरपालिका, औरंगाबाद.

विषय : ________________________ विक्री करीता परवाना मिळणे बाबत.

महोदय,

मी खालील माहितीसह ____________________ विक्री परवानासाठी अर्ज करीत आहे.

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :- _________________________
२. पूर्ण पत्ता (टपाल पत्र) :- __________________________
३. व्यवसायाचे ठिकाणी :- मोहल्ला __________________
   घर क्रमांक _________________
   (भाडयोन असल्यास)
४. दुकानाचे नांव :- ____________________

५. मांस विक्रीचे प्रकार :- ________________
६. नोकर (मांस विक्री करणाऱ्या व्यक्तींचे नांव) :- __________
७. एकुण जागेचे (दुकानाचे) क्षेत्रफळ _____________
८. दुकान पक्की बांधलेली आहे काय :- होय/नाही

वरील प्रमाणे सादर केलेली माहिती ही सत्य व खरी असून, मी महापालिकेने ठरवून दिलेल्या अटीचे पालन करीत. तरी मला परवाना देण्याची कृपा करावी.

________________

अर्जदाराने नांव व स्वाक्षरी.

सोबत :- अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.
१. दुकान दर्शविणारा मार्गदर्शक नकाशा (३ प्रत)
२. _______________ पर्यंतचे घरमालकाने भरलेली मालमत्ता कराची पावती
३. घरभाडे करारनामा (भाडेकरुन असल्यास)
४. सध्याचे पासपोर्ट आकाराचे ३ फोटो

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मांस विक्री परवाना देण्याची कार्यवाही सोपी करता यावी यासाठी मांस विक्री परवाना देण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज केल्यानंतरच परवाना देण्याच्या पध्दतीचा अवलंब करण्यास व नमुना अर्जाची शुल्क रु. २५/- आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/१ :**

कार्यकारी अभियंता (पापु) महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने ०१ एप्रिल १९९८ पासुन महानगरपालिका औरंगाबादकडे हस्तांतरीत केलेली आहे. या योजने सोबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाचे उप अभियंता व चार शाखा अभियंता स्थापत्य शाखेसाठी महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्तीवर आलेले असून, सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. सध्या स्थापत्य विभागासाठी कार्यरत असलेले श्री. जी. बी. जावळे उपअभियंता हे दिनांक ३०-०९-२००४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. संबंधित उप अभियंता हे सेवानिवृत्त होत असल्याने संपूर्ण योजनेची माहिती करुन घेण्यासाठी महानगरपालिकेतील उप अभियंता यांचे सोबत देण्यासाठी अस्थापना विभागाकडे मागच्या एक वर्षापासून पाठपुरावा सुरु आहे. अद्यापही या जागेसाठी उपअभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती झालेली आहे.

सिडको व औरंगाबाद शहराच्या विस्तारीत भागासाठी रक्कम रुपये ६७.३० कोटीची योजना ही महानगरपालिकेतर्फे राबविण्यात धोरणात्मक निर्णय झाला असून, या योजनेतील रजा-१ अंतर्गत रुपये ७१४.०० लक्ष रक्कमेच्या निविदा प्रक्रियेत आहेत. तसेच रोजाबाग येथे २.०० द. ल. लि. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र व पाणी व उर्जा परिक्षण यासारखे महत्वाकांशी प्रकल्प महानगरपालिकेमार्फत राबविण्यता येत असल्याने औ.बाद महानगरपालिका श्री. जी. बी. जावळे उपअभियंता यांच्या अनुभवनाची गरज आहे. कारण श्री. जी. बी. जावळे हे या योजनेवर ही योजना कार्यान्वीत करणेपासुन कार्यरत आहेत.

तसेच १९९८ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यापासून या योजनेवरच कार्यरत आहेत. पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद या विभागास श्री. जी. बी. जावळे, उपअभियंता यांच्या अनुभवाची आवश्यकता असल्याने मा. आयुक्त महोदय यांनी संबंधितांना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर मानधनावर घेण्याबाबत तत्वत: मान्यता दिलेली आहे.

करीता श्री. जी. बी. जावळे उपअभियंता यांचा या क्षेत्रातील अनुभव व त्यांनी महानगरपालिकेस असलेली गरज लक्षात घेता त्यांना सेवानिवृत्ती नंतर (म्हणजेच दिनांक ०१-१०-२००४) एक वर्षाकरीता मानधनावर घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. संजय शिरसाठ :** श्री. जावळे हे सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना पाणी पुरवठा विभागातील कामाचा चांगला अनुभव असल्याने त्यांना मानधनावर घेण्यात यावे.

**मा. सभापती** : स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** स्थायी समितीच्या मान्यतेनुसार मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यास कार्यवाही केली जाईल. ११ महिन्यांसाठी मानधनावर घेता येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. जी. बी. जावळे उपअभियंता यांना औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेवरील त्यांचा अनुभव लक्षात घेता व महानगरपालिका कार्यालयास त्यांची असलेली गरज लक्षात घेता त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर दिनांक ०१ ऑक्टोंबर ते ३० सप्टेंबर २००५ या एक वर्षाच्या कालावधी करीता प्रशासन व संबंधितामध्ये जी काही मानधनाची रक्कम ठरेल. त्या मानधनावर घेण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. श्री. जी. बी. जावळे यांची सेवा मानधनावर घेण्यात यावी. दरम्यान मा. सर्वसाधारण सभेमध्ये सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीस्तव सादर करावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांकडून अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे बाबत प्राप्त झालेले प्रस्ताव अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे तसेच विविध कामांसाठी सुधारीत तरतुद उपलब्ध करुन देण्याचे अनुषंगाने सन्माननीस सदस्यांकडून प्राप्त झालेले विविध प्रभागातील नविन कामे तसेच लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव पुढील प्रमाणे आहेत. स. स. डॉ. आशा बिनवडे, श्री. भगवान रगडे यांचेकडून लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. नवीन कामाकरीता लागणारी तरतूद वाढीव रक्कम तांत्रिकदृष्ट्या रद्द होणाऱ्या कामातून व बचतीतून वाढीव तरतुद उपलब्ध करणे या प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देण्याचा निर्णय होते.

**निर्णय** : सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात सामाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणे. काही कामांसाठी असलेली तरतुद अपुरी असल्याने सुधारीत आर्थिक तरतुद करणे संबंधाने ज्या कामांकरीता सुधारीत वाढीव आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. अशा कामांकरीता तांत्रिकदृष्ट्या रद्द होणारी कामे तसेच इतर कामांचे होणाऱ्या बचतीमधून वाढीव तरतुद उपलब्ध करुन या कामाकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद | सुधारीत कामाचे नांव सुधारीत आर्थिक तरतुद |
|---|---|---|
| १८. | प्रभाग क्र. १८ मित्रनगर येथे साईड ट्रेन गटार बांधणे-५ लक्ष (पृ. क्र. १७५ अ. क्र. २३) | १. स्नेहवर्धिनी कॉलनी येथील मोकळया जागेसमोरील व पाठक व कोरटकर यांच्या घराच्या बाजूच्या रोडचे खडीकरण व मजबुतीकरण करणे-२ लक्ष |
| | | २.समर्थ हौ. सो. सा. अशोकनगर विनायकनगर येथे रस्त्याचे रुंदीकरण व फुटपाथ बांधणे-३ लक्ष |
| | शास्त्रीनगर मनपा शाळा ते जवाहर कॉलनी पोलीस स्टेशन पर्यंत साईड ड्रेन बांधणे-५ लक्ष (पृ. क्र. १७० अ. क्र. ४२) | शास्त्रीनगर भगवती कॉलनी भागातील रस्त्यांचे रुंदीकरण, मंजबूतीकरण करणे व फुटपाथ बांधणे. |
| ०७. | दशनाम गोसावी समाज स्मशान भूमी विकसीत करणे-७.५०लक्ष | ब्रिजवाडी येथे दगडी भिंत बांधणे-७.५० लक्ष |
| | नारेगांव मनपा शाळेस संरक्षित भिंत बांधणे - ३.५० लक्ष | नारेगांव येथील मनपा सभागृह व मोकळया जागेस कंपौंड वॉल बांधणे ३.५० लक्ष |

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.